॥ ॐ नमः सद्गुरुदेवाय ॥

# अनाकलनीय प्रश्न




लेखक

स्वामी श्री अड़गड़ानन्द

श्री परमहंस आश्रम शक्तेषगढ़, चुनार-मिर्जापुर (उ.प्र.)भारत.

।। ॐ नमः सद्गुरूदेवाय ।।

# अनाकलनीय प्रश्न

ॐ

लेखक :

परमपूज्य श्री परमहंसजी महाराजांचा कृपाप्रसाद

स्वामी अड़गड़ानन्द

श्री परमहंस आश्रम

ग्राम - पोस्ट - शक्तेषगढ, जिल्हा -मिर्जापूर

उत्तर प्रदेश, भारत

फोन -(०५४४३) २३८०४०

**प्रकाशक :**

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. 5, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ),

अंधेरी पूर्व, मुम्बई - 400069 भारत.

अनंत श्री विभूषित,

योगिराज, युग पितामह

**परमपुज्य श्री स्वामी परमानन्दजी**

**श्री परमहंस आश्रम अनुसुया**

(चित्रकुट)

यांच्यापरम पावन चरणी

सादर समर्पित

**- अन्तस्प्रेरणा**

# गुरु-वन्दना

**।। ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय ।।**

जय सद्गुरुदेवं, परमानन्दं, अमर शरीरं अविकारी।।
निर्गुण निर्मूलं, धरि स्थूलं, काटन शूलं भवभारी।।

सूरत निज सोहं, कलिमल खोहं, जनमन मोहन छविभारी।।
अमरापुर वासी, सब सुख राशी, सदा एकरस निर्विकारी।।


अनुभव गम्भीरा, मति के धीरा, अलख फकीरा अवतारी।।
योगी अद्वैष्टा, त्रिकाल द्रष्टा, केवल पद आनन्दकारी।।

चित्रकूटहिं आयो, अद्वैत लखायो, अनुसुइया आसन मारी।।
श्री परमहंस स्वामी, अन्तर्यामी, हैं बड़नामी संसारी।।

हंसन हितकारी, जग पगुधारी, गर्व प्रहारी उपकारी।।
सत्-पंथ चलायो, भरम मिटायो, रूप लखायो करतारी।।

यह शिष्य है तेरो, करत निहोरो, मोपर हेरो प्रणधारी।।
जय सद्गुरु.........भारी।।

।। ॐ ।।




"आत्मने मोक्षार्थ जगत् हिताय च"
श्री श्री १००८ श्री स्वामी परमानन्दजी महाराज ( परमहंसजी )
जन्मः शुभ सम्वत् विक्रम १९६९ ( १९११ ई. )
महाप्रयाण ज्येष्ठ शुक्ल ७, २०२६, दिनांक २३/०५/१९६९ ई.
परमहंस आश्रम अनुसुइया, चित्रकूट




श्री स्वामी अड़गड़ानन्द जी महाराज


# आमची प्रकाशने





**यथार्थ गीता–**
'यथार्थ गीते' मध्ये श्रीकृष्णांच्या वाणीचा आशय चांगल्या प्रकारे, जसाच्या तसा समजाविला आहे. ही एक कालजयी कृति आहे
२८ भाषांमध्ये





**अंग क्यों फडकते हैं और क्या कहते हैं?–**
मानवी शरीराच्या विभिन्न भागांमध्ये होणाऱ्या स्पंदनांचे कारण आणि त्याद्वारे मिळणाऱ्या संकेतांचे विश्लेषण केले गेले आहे की जे साधना करताना सहाय्यक ठरते.
४ भाषांमध्ये





**जीवनादर्श एवं आत्मनुभूति–**
पूज्य गुरु परमहंस स्वामी श्री परमानंदजी महारांजांचे जीवन चरित्र, त्यांचे अनुभव तसेच त्यांच्या उपदेशांचे संकलन केले आहे. साधकांसाठी हा अतिशय उपयुक्त ग्रंथ आहे.
४ भाषांमध्ये.



**अनाकलनीय प्रश्न**
वर्ण, मूर्तिपूजा, ध्यान, हठ, चक्र-भेदन आणि योग अशा विषयांचे स्पष्टीकरण करुन, भ्रमात असलेल्या समाजाला मार्गदर्शन केले आहे.
३ भाषांमध्ये





**शंका समाधान–**
समाजामध्ये प्रचलित असलेल्या सर्व वाईट रिती, रुढि, आवडंबर आणि अंधविश्वास ह्याबद्दल असलेल्या शंकांचे निरसन केले आहे
५ भाषांमध्ये.



**एकलव्याचा अंगठा–**
शिक्षण देणारा गुरु आणि सद्गुरु मधील फरक सांगितला आहे. शिक्षक हा लोकजीवनाची कला शिकवितो तर सद्गुरु जीवनामध्ये समृद्धि बरोबरच परम श्रेयाची जागृति आणि त्या परमपदाची प्राप्ति करवितो ज्यामुळे मनुष्याचा जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ति मिळते.
३ भाषांमध्ये.




**भजन कोणाचे करावे?**
धर्माच्या नावावर गाय, पिंपळ, देवी-देवता, भूत-भवानी ह्यांची पूजा लोक करीत आहेत. प्रस्तुत पुस्तकात ह्या सर्व भ्रांतिंचे निवारण करुन स्पष्ट केले आहे की सनातन धर्म कोणता? इष्ट म्हणजे कोण? साधना कोणाची करावी व कशी करावी?
६भाषांमध्ये.




**षोडशोपचार पूजा पद्धति–**
ह्या पुस्तकामध्ये हे सांगितले गेले आहे की एका परमात्म्यावर श्रद्धा स्थिर ठेऊन, त्या एका परमात्म्याचे चिंतन करायला शिकविणे म्हणजेच कर्मकांड होय.
३ भाषांमध्ये.


# आमची प्रकाशने



**योगशास्त्रीय प्राणायाम–**

योगशास्त्रीय प्राणायाम मध्ये आपण सांगितले आहेत की यम, नियम आणि आसन साध्य होताच श्वास–प्रश्वासाचे शांत प्रवाहित होणे म्हणजेच प्राणायाम होय. प्राणायाम नावाची वेगळी अशी कोणती क्रिया नाही. ही योग–चिंतनाची एक अवस्था आहे. त्याचेच निरसन ह्या पुस्तकात केले गेले आहे.


३ भाषांमध्ये.




**बारहमासी –**

आपले पूज्य गुरु श्रीपरमानंदजी महाराजांना आकाशवाणीने प्राप्त झालेले भजन (ईश्वरीय गायन) बारहमासीचे संकलन तसेच त्याचे विवेचन केले आहे. ह्यामध्ये लक्ष्यापर्यंत पोहोचण्याचा प्रवेशापासून ते पराकाष्ठेपर्यंतचा मार्ग दाखविला आहे.


हिंदी भाषेमध्ये.




**योगदर्शन– प्रत्यक्षानुभूत**

व्याख्या– महर्षि पतंजलि कृत ह्या पुस्तकात सांगितले गेले आहे की 'योग' प्रत्यक्ष दर्शन आहे, तो लिहिता किंवा सांगता येत नाही. क्रियात्मक होऊनच साधकाच्या लक्षात येते की जे काही महर्षिंनी लिहीले आहे त्याचा वास्तविक अर्थ काय आहे? साधनेस उपयोगी असे पुस्तक आहे.


३ भाषांमध्ये.




**ग्लोरिज ऑफ योग–**

हठ, चक्र, भेदन आणि योग, प्राणायाम, ध्यान ह्या बद्दल पूर्ण माहिती.


इंग्रजी भाषेमध्ये.



**प्रश्न समाज के उत्तर गीता से–**

ह्या पुस्तकामध्ये सामाजिक, आध्यात्मिक तसेच धार्मिक असे कोणतेही प्रश्न असतील, त्यांचे गीतेच्या दृष्टि कोनातून निरसन केले आहे.

हिंदी भाषेमध्ये.



**अहिंसे चे स्वरुप–**

अहिंसा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. मूळतः हा यौगिक, आंतरिक साधनेचा शब्द आहे. ह्या पुस्तकात आपल्याला दिसेल की आपल्या पूर्वीच्या महापुरुषांनी अहिंसेला कोणत्या संदर्भात घेतले.

४ भाषांमध्ये.

MP3 ऑडियो सिडिज



६ भाषांमध्ये

श्री स्वामीजींच्या मुखातून निःसृत अमृतवाणीचे संकलन व्हात्युम १ ते ६० पर्यंत



हिंदी भाषेमध्ये.

## अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | भगवान श्रीरामाचा इतिहास | १ |
| २ | सीता – परित्याग | ७ |
| ३ | वर्ण ? | १७ |
| ४ | शम्बूक | ३० |
| ५ | सरस्वती पूजन? | ४० |
| ६ | ईश्वराला दाढी का नाही? | ४८ |
| ७ | विश्वकर्मा पूजा? | ५२ |
| ८ | मूर्तिपूजा योग्य की अयोग्य? | ६७ |
| ९ | ध्यान? | ७९ |
| १० | हठयोग – चक्रभेदन आणि योग? | ९५ |
| ११ | रामकथेच्या दृष्टिकोनातून द्रविड आणि आर्य | ११४ |
| १२ | महाभारताची ऐतिहासिकता | १२७ |
| १३ | श्रीमद्भगवतगीतेच्या सर्वग्राह्य टिकेचे औचित्य | १४२ |
| १४ | हिंदू धर्म हे कोणत्या जीवन–शैलीचे नाव आहे काय? | १४५ |
| १५ | हिंदुत्व म्हणजे काय? | १४९ |


॥ ॐ ॥

# भगवान श्रीरामाचा इतिहास

भगवान श्रीरामाने आपल्या दीर्घकालीन शासनकाळात न भूतो न भविष्यती असे कार्य केले. त्यांनी लोकांना परमगती दिली, तसेच लोककल्याणाची पुष्कळ कामे करून लोकांना शांती व समृध्दी प्राप्त करून दिली. तशा प्रकारचे कार्य त्यांच्यानंतर कोणीही केल्याचे इतिहासात आढळून येत नाही.

**– स्वामी अड़गड़ानन्द**

ब्रह्मलीन स्वामी श्री विमलानन्द, आश्रम विजयपूर, येथे मिर्जापूरच्या वार्षिक समारंभात स्वामी अड़गड़ानन्द महाराजांनी दिनांक २८/१२/१९९८ मध्ये अनाकलनीय प्रश्नांची रहस्ये उकलून दाखवली.

# भगवान श्रीरामाचा इतिहास

बंधुनो,

आपल्याकडून अनेक प्रश्न आले आहेत. त्यापैकी एक प्रश्न एका महात्म्याचा आहे. ते सोळा वर्षे परदेशात राहून आले आहेत. तेथील लोक त्यांना म्हणतात की रामाचा इतिहास फक्त बावन्न वर्षाचाच आहे. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. घरी अयोध्येला आल्याबरोबर लगेच चौदा वर्षे वनवासात जावे लागले, म्हणजे सत्तावीस आणि चौदा मिळून एक्केचाळीस झाले. त्यानंतर लंकेहून अयोध्येला परतल्यावर तेथील जनतेत सीतेच्या चारित्र्याविषयी चर्चा सुरू झाली. तेव्हा रामाने तिची रवानगी वनवासात केली. तेथे लव-कुश अकरा वर्षाचे असताना त्यांनी रामाचा अश्वमेधाचा घोडा पकडला. अश्वमेध रामाचे शेवटचे कृत्य होते, म्हणजे एक्केचाळीस आणि अकरा मिळून फक्त बावन्न वर्षेच झाली, आणि आपण लोक म्हणता की रामाने अकरा हजार वर्षे राज्य केले. मग तो शेष इतिहास कुठे गेला? वाल्मीकी रामायणानुसार रामाचा इतिहास पन्नास-बावन्न वर्षाचा आहे. तसेच लोक म्हणतात की लंकेत रामाने अनेक राक्षसांना मारले. यामध्ये विशेष काय आहे? हिटलरनेही साठ लाख युहुदींना यमसदनाला पाठवले होते. तेव्हा रामाचे राक्षसांना मारणे हे फार विशेष कृत्य म्हणता येत नाही.

एडॉल्फ हिटलरने इतक्या लोकांना मारले की त्याची काही नामनिशाणीही उरली नाही. याउलट रामाच्या यशाची शृंखला मोठी आहे. रामाने रावणाचा वध केल्यानंतर कधीही शस्त्र हाती घेतले नाही. सुरूवातीस गरज भासली तर त्यांनी कधी लक्ष्मणाला पाठवले तर कधी भरताला किंवा शत्रुघ्नाला पाठवले. त्यांनी सामान्य जनजीवन संपन्न केले. वास्तविक जगात सर्वांनाच असे वाटते की सर्वसामान्यांचे जीवन समृध्द असावे. परंतु आजपर्यंत असे कोणी करू शकले नाही. परमाणूसंपन्न देशांना अशी चिंता वाटते की, कोणी अन्य देश परमाणूंचा नाश करण्यास सज्ज झाला तर आपली सुरक्षा व्यवस्था धोक्यात येईल. आज समृध्द देशांत आत्महत्येचे प्रमाण खूप वाढले आहे. तेथे वृध्दत्व शापवत बनले आहे. पतिपत्नी अनेक मुलांना जन्म तर देतात; पण वृध्दावस्थेत मदतीसाठी कोणी नसते. हॉस्पिटलमध्ये जेव्हा एखाद्या घरच्या वडील मनुष्याचा मृत्यू होतो, तेव्हा हॉस्पिटलमधून फोन येतो की तुमच्या वडीलांचा आताच देहान्त झाले आहे. पण तेव्हा मुलांना त्याचे काही दु:ख होत नाही. ते दोन मिनिटे फक्त मौन पाळतात. हॉस्पिटलमध्ये जाण्याचीही तसदी घेत नाहीत. ही आहे त्यांची संस्कृती ! आपल्या स्वजनांपासून दूर एकाकी अवस्थेत शेवटचे श्वास घ्यावे लागतात. अंतिम क्षणी जवळ आपल्या प्रेमाचा कोणी मनुष्य नाही, हे केवढे दु:ख !

भगवान श्रीरामाच्या राज्यात कोणत्याही प्रकारचे दु:ख नव्हते. जगातील लोकांना ज्या प्रकारचे सुख पाहिजे होते, पण जे कोणी देऊ शकत नाही, ते सुख सर्वांना रामाच्या राज्यात प्राप्त होत होते. लाखो वर्षांपासून जो महापापी रावण समाजाला दु:ख देत होता त्याचा श्रीरामाने प्रथम समूळ नाश केला. त्यानंतर त्याच्या मागे राहिलेल्या अनुयायांचे हृदयपरिवर्तन करून श्रीरामाने सर्वत्र शांती प्रस्थापित केली. त्यामुळे लोक खूप आनंदित झाले. ''**राम राज बैठे त्रैलोका। हरषित भये गये सब सोका।।**'' केवळ अयोध्येतच नव्हे तर तिन्ही लोकांत आनंदाचा सागर उसळला. दु:ख, क्लेश संपूर्ण नाहिसे झाले. ''**अल्पमृत्यू नहि कवनिउ पीरा। सब सुन्दर सब बिरूज सरीरा।।**'' अल्पमृत्यूचे भय दूर झाले. लोकांना स्वास्थ्य प्राप्त झाले व शरीर व्याधींपासून मुक्त झाले. ''**वरनाश्रम निज निज धरम, निरत वेदपथ लोग।**'' चारी वर्णाचे लोक रूढीप्रमाणे अनासक्त भावाने आपापल्या कामात मग्न झाले. **'वेदपथ'** शुद्रदेखील वेदानुसार आचरण करत होते. **'चलहिं सदा'** निरंतर तसे वागत होते. **'पावहिं सुखहि-'** सुख प्राप्त करत होते. **'नही भय सोक न रोग।'** सुखाची परिभाषा काय आहे? तर जेथे भय नाही, उद्वेग नाही, व्याधी नाही–इतकेच नव्हे तर प्रियजनांचा विरहही नाही. रामाचे राज्य असे सर्व क्लेशांपासून मुक्त होते.

धन–धान्याची समृध्दी किती होती? **'नहि दरिद्र कोउ दुखी न दीना। नही कोउ अबुध न लच्छन हीना।।'** श्रीरामाच्या राज्यात कोणी दरिद्री नव्हते, कोणी दु:खी नव्हते, कोणी दीन नव्हते. शुद्र होते; पण मनुस्मृतीत किंवा पाराशर स्मृतीत वर्णन केलेले म्हणजे ठीकरीत भाकरी घेऊन खाणारे, झाडाखाली राहणारे, स्थावर संपत्ती न बाळगू शकणारे असे असहाय्य, हीन–दीन शूद्र नव्हते. ते सर्व ज्ञानी व जागृत होते. गुणहीन कोणी नव्हते. **'सब गुनज्ञपण्डित सब ज्ञानी। सब कृतज्ञ नहि कपट सयानी।।'** ते शुद्र गुणवान होते. सर्वजण पंडित होते. ''ब्राह्मणानेच शिकावे व शिकवावे. शूद्रादिंनी शिकण्याचा प्रयत्न केल्यास ते नरकात जातील.'' असे नव्हते. **'सब कृतज्ञ'** कोणी आपल्यावर थोडासा उपकार केला तरी परतफेड करण्यास तत्पर–असे ते कृतज्ञ लोक होते. कपट, दंभ यांना तेथे थाराच नव्हता.

''**ससि सम्पन्न सदा रह धरनी। त्रेता भई कृतयुग के करनी।।**'' मौर्य लोकांच्या दारात बाराही महिने सर्व भाज्या मोसमाप्रमाणे उगवलेल्या असतात, म्हणजे बाराही महिने त्यांचे घर–अंगण हिरवेगार दिसून येते. परंतु श्रीरामाच्या राज्यात अवघी पृथ्वी हिरव्यागार शालूत शोभत होती. ''**बयरू न कर काहू सन कोई। राम प्रताप विषमता खोई।।**'' कोणीही कोणाचा द्वेष करत नव्हते, कोणाबद्दल वैरभाव ठेवत नव्हते. जेव्हा आपल्यापेक्षा दुसऱ्याला अधिक मिळते तेव्हाच वैरभाव निर्माण होतो. रामाच्या राज्यात वैरभावाचे मुख्य कारण जी विषमता–तिचेच उच्चाटण करून टाकले होते. **बैठे बजाज सराफ बनिक अनेक मनहुँ कुबेर ते।** एकेक व्यापारी

म्हणजे जणू कुबेरच होता. वस्त्र विकणारे, सोने-चांदी, हिरे-जवाहीर व पैशांची देवाण-घेवाण करणारे सराफ व इतर अनेक वस्तूंचे व्यापारी म्हणजे जणू कुबेरच बाजारात बसले होते. संपत्तीची देवता कुबेर म्हणजे येथे नानाविध वस्तूंचे अत्यंत श्रीमंत व्यापारी असा अर्थ आहे. त्यांच्याकडे वस्तुंचे अक्षुण्ण भांडार आहे की जे कधी रीतेच होत नाही; असा अर्थ आहे, आणि वस्तूही कशा मिळत होत्या? **''वस्तू बिनु गथ पाइए-''** वस्तू विनामूल्य मिळत होत्या. कोणाला आपल्या मुलीच्या लग्नात दागिने पाहिजे असतील तर सराफ (सोनार) म्हणायचा, 'अहो, एक दोन हारेभरून दागिने घेऊन जा. दुकान आपलेच आहे.' तेथे प्रत्येक वस्तू सुलभ रितीने प्राप्त होत आहे मग अकारण वस्तूंचा संग्रह करण्यात काय अर्थ आहे? जेवढी आवश्यक आहे तेवढीच वस्तू घेऊन जावी. जास्तीची वस्तू दुकानदारालाच सोपवून द्यावी म्हणजे रामाच्या राज्यात व्यापरी वस्तूंचे फक्त रक्षक होते.

रामाच्या राज्यात विषमता नव्हती, समानता होती. तेथे शूद्र होते, वैश्य होते, चारी वर्णांचे लोक होते. परंतू उठणे-बसणे, खाणे-पिणे, राहणी-करणी, शिकणे-शिकवणे, या सर्व गोंष्टीत समानता होती. धन-धान्यात समानता, कृषिकार्यात समानता, उद्योग-व्यापारात समानता आणि **''सकल परम गति के अधिकारी''** परमगतीमध्ये ही तशीच समानता होती. कारण रामाबरोबर सर्वजण परम धाम गेले. समृध्द जीवनाची प्राप्ती व परमश्रेयाची प्राप्ती या दोन्ही गोष्टी रामाच्या राज्यात सर्वांना सारख्याच प्राप्त होत्या.

शरयूवर राजघाट नावाचा सुंदर घाट होता. **''राजघाट सब विधी सुन्दर वर। मज्जहि तहाँ बरन चारिउ नर ॥''** आमच्या लहानपणी आम्ही पाण्यासाठी तहानलेल्या हरिजनांना विहिरीपासून दूर ओळीने बसलेले पाहिले आहे. उच्च वर्णीय लोक स्नानासाठी विहिरीवर आले तर एखादा सदस्य सज्जन हरिजनांना पिण्यासाठी त्यांच्या घड्यात वरून पाणी घालायचा. स्नानासाठी नव्हे तर पाणी पिण्यासाठी द्यायचा. वास्तविक सर्व हिंदूच होते; परंतु विहिरीवर चढण्यास त्यांना मज्जाव होता. चार-पाच वर्षांपूर्वी ची गोष्ट आहे. त्यावेळी आम्ही जगतानन्द आश्रमात राहात होतो. जवळच असणाऱ्या बरैनी गावातील गुदरू आजोबा म्हणजे त्या गावातील सर्वात वयोवृध्द व्यक्ती होती. तेव्हा ते ऐंशी वर्षाचे होते.(आता ते दिवंगत झाले आहेत.) एक दिवस ते गंगा-स्नान करून तणतणतच आश्रमात आले. आम्ही विचारले,''दद्दा, काय झाले?'' ते म्हणाले, ''महाराज, कहर झालाय. विचारू नका. अहो, मी गंगेत स्नान करीत होता. तेव्हा एक चांभारही जवळच स्नान करीत होता. त्याच्या पायाला स्पर्श करून पाणी माझ्याकडे येत होते. तेव्हा मी त्याच्या वरच्या बाजूला जाऊन स्नान करू लागलो. त्यानेही आपले कपडे उचलेले आणि माझ्याहून वरच्या बाजूला पश्चिमेकडे गेला. मी पुन्हा वर गेलो तर तो पुन्हा माझ्या वरच्या बाजूला गेला. तेव्हा त्याला मी खूप रागवलो, फटकारले, त्याला शिव्याही

दिल्या. मला वाटते त्याला कोणी तरी फूस लावून चढवले होते–बहकावले होते.'' परंतू रामाच्या राज्यात ''**राजघाट सब विधी सुन्दर वर । मज्जहि तहाँ बरन चारिउ नर ।।**'' रामाबरोबर सर्वजण एकाच घाटावर स्नान करायचे. जर राजघाटावर राजपरिवार किंवा सवर्णंच स्नान करीत असते तर विषमता झाली असती; परंतु तेथे अशी विषमता नव्हतीच.

यात्प्रकारे आपल्या दीर्घ शासनकाळात भगवान श्रीरामांनी न भूतो न भविष्याति असे कार्य करून दाखवले. श्रीरामाप्रमाणे कोणत्याही शासकाने प्रजेला व्यापक शांती, समृध्दी दिली नाही. त्यांच्या इतकी लोककल्याणाची कामेही केली नाहीत, तसेच सर्वांना परमगतीही दिली नाही. त्यांच्या नतंरही तशा प्रकारचे कार्य कोणी केलेले इतिहासात आढळत नाही. आजकाल लोकांना वाटते इतिहास म्हणजे लढाया आणि नरसंहार असा अर्थ घेतात. पण तो अर्थ चुकीचा आहे. ज्या परम शांतीसाठी लोक आज क्रांती करतात, युध्द करतात, आंदोलन करतात ती शांती भगवान श्रीरामाने आपल्या अकरा हजार वर्षाच्या जीवनकाळात आपल्या प्रजेला प्राप्त करून दिली. त्यामुळे आजही समग्र मानवतेसाठी त्यांचे कार्य आदर्शरूप बनले आहे.

**।। ॐ श्री सदगुरू भगवान की जय ।।**

# देवता

सभी जगत के देवता, जोर लगावे जाय ।
जब लगि सतगुरू सीख ना, मूरख गोता खाय ।

प्रथम सीढी के देवता, अवसि लगावे पार ।
आगे सीढी अनन्त की, गुरू महिहा आधार ।

देवन पूजा एक तक, अरथ पाय बस बोल ।
मन चाहो परतत्व को, सतगुरू संगत डोल ।।

**स्वामी अड़गड़ानन्द.**

# सीता – परित्याग

सीता म्हणजे आपल्या हृदयातील सुप्त ईश्वरीय अनुभूती आहे. सीता म्हणजे कोणी स्त्री नव्हे.

गर्भवती सीतेचा परित्याग केला ही गोष्ट खरी नाही. वास्तविक रामचरित मानस म्हणजे एक योगशास्त्र आहे. रामचरित मानसाचा शब्दशः अर्थ आहे–मनाच्या अंतरंगात प्रवाहित असणारे रामाचे चरित्र. यात ब्रह्मज्ञानरूपी राम आहे व शक्तिरूपी सीता आहे.

हे योगातील शब्द आहेत.

जनमानसात व समाजात सीतेचे जे रूप प्रचलित आहे ते रूप म्हणजे आपली गौरवशाली संस्कृती आहे, आदर्श आहे.

**– स्वामी अड़गड़ानन्द.**

एनी बेझंट कॉलेज, प्रयाग- अलाहाबाद येथे विशाल जनसभेत तारीख २४/१/२००० मध्ये सीता परित्याग या विषयावर पूज्य महाराजांचे औचित्यपूर्ण निदर्शन.

# सीता परित्याग

बंधुनो,

गर्भवती सीतेचा श्रीरामाने का त्याग केला? असा प्रश्न उपस्थित करून आदर्श राज्यशासक अशा रामाला नेहमी दोष दिला जातो. हा प्रश्न आपल्या संस्कृतीला कलंकरूप आहे. ज्यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे ते सन्माननीय विद्वान स्त्रियांचे कैवारी आहेत तर त्यांनी मग कुराणाचेही अवलोकन करावयास हवे. कुराणात असे लिहिले आहे की, जर एखाद्या पुरूषाला त्याची पत्नी पसंत नसेल व जर तो 'तलाक ! तलाक ! तलाक !' असे तीनदा तोंडाने म्हणाला तर त्याची पत्नी आपल्या औरस मुलांपासून व संपत्तीपासून वंचित होते. राम तर लाखो वर्षापूर्वी होऊन गेले आहेत. आज ना सीता आहे ना राम आहे. परंतु ही घटना तर आपल्या नजरेसमोर घडत आहे. नेताश्री, जरा विचार करा. अहो, या देशातील माता-भगिनी आपल्याच देशातील नागरिक आहेत. त्यांचा सन्मान करा. तुम्ही खुर्ची मिळवण्यासाठी अवश्य लढा. तुमच्यासाठी ती गौरवास्पद गोष्ट आहे; परंतु धर्मशास्त्रांना स्पर्श करू नका. कारण धर्मशास्त्र जाणणारा एखादाच महापुरूष असतो आणि एखादाच अधिकारी पुरूष त्याचे कसे जतन करावे ते जाणत असतो. आपल्या प्रश्नाचे (आक्रोशाचे) उत्तर आम्ही एका कथेद्वारे आपल्याला देऊ इच्छितो.

जेव्हा युध्दभूमीवर रावण जखमी होऊन खाली पडला तेव्हा रामाने लक्ष्मणाला सांगितले, ''लक्ष्मणा, रावण हा राजनीतिज्ञ आहे. त्याच्याकडून तू राजनीतिचे ज्ञान करून घे.'' लक्ष्मण म्हणाला, ''हा कसला राजनीतिज्ञ !'' तेव्हा श्रीरामाने त्याला समजावून सांगताना म्हटले, ''लक्ष्मणा, रावण हा बुध्दिमान आहे, असा राजनीतिज्ञ आजपर्यंत झालेला नाही. तेव्हा त्याच्याकडून ते ज्ञान प्राप्त करून घे.''

परंतु लक्ष्मणाला रावणाकडून ज्ञान ग्रहण करण्याची इच्छा नव्हती. त्याच्या दृष्टिने रावण हा अहंकारी, पापी व मत्त राजा होता. सीतामातेचे त्याने अपहरण केले होते. तरीही रामाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी अनिच्छेने रावणाजवळ गेला व त्याच्या डोक्याजवळ उभे राहून म्हणाला, ''हे राजनीतिज्ञ सम्राटा, मी रामाचा अनुज आपल्याकडून राजनीतीचे ज्ञान घेऊ इच्छित आहे,'' परंतु रावणाने आपले डोळेही उघडले नाहीत.

तेव्हा लक्ष्मण परत रामाजवळ आला आणि म्हणाला, ‘‘भ्राताश्री, रावणाच्या तोंडावर माशा घोंगावत आहेत. तो बेशुध्द आहे. तो राजनीतीचे ज्ञान कसे देऊ शकणार? त्याला श्वासही नीट घेता येत नाही. त्याची चेतना नष्ट झाली आहे.’’ यावर रामाने विचारले,‘‘तू कोठे उभा राहिला होतास?’’ लक्ष्मण म्हणाला, ‘‘ त्याच्या डोक्याच्या बाजूला.’’ श्रीराम म्हणाले, ‘‘अरे, गुरूच्या चरणाजवळ बसून ज्ञान ग्रहण करायचे असते. तू त्याच्या पायाशी बैस. त्याला नमस्कार करून ज्ञान देण्याची प्रार्थना केली पाहिजे.’’ लक्ष्मण रावणाजवळ जाऊन त्याचे चरण वंदन करून त्याला म्हणाला, ‘‘महान राजनीतिज्ञ सम्राटा, मी लक्ष्मण आपल्याकडून राजनीतीचे ज्ञान ग्रहण करू इच्छित आहे.’’

हे ऐकल्याबरोबर रावण ताडकन उठला व लक्ष्मणाचे धनुष्य व बाण हिसकावून घेतले. लक्ष्मणाला क्षणाचीही उसंत न देता रावणाने शरसंधान केले व गळयावर निशाण टाकून म्हणाला,‘‘रामाचा भाऊ आहेस म्हणून जिवंत सोडून देत आहे. तेव्हा राजनीतीतील पहिला पाठ हा लक्षात ठेव की शत्रू कितीही मरणासन्न अवस्थेत असो अगर मृत स्थितीत असो, त्याच्या जवळ जाताना सावधान मुद्रेत जावे.’’ हे ऐकून लक्ष्मण आश्चर्यचकित झाला. तो विचार करू लागला की हा अंतिम क्षण मोजत आहे, तोंडावर माशा घोंगावत आहेत तरीही हा आहे तसाच भक्कम आहे. तेव्हा मनाचा संयम करून लक्ष्मण म्हणाला, ‘‘राजन आपण एका स्त्रीसाठी स्वतःच्या कुळाचा मुलोच्छेद करून घेतलात ही कोणत्या प्रकारची राजनीति आहे? असा मूर्खपणा आपण का केलात ?’’

रावण हसला व म्हणाला, ‘‘लक्ष्मणा, अरे कुळाचा नाश कोणीही करू शकत नाही. आमच्या कुळाच्या रक्षणासाठी आम्ही प्रथमच बिभीषणाला रामाच्या आश्रयाला पाठवले आहे.’’ यावर लक्ष्मण म्हणाला ‘‘आपले म्हणणे खरे मानले तर मग तुम्ही बिभीषणाला लाथ का मारली होती? त्याच्यावर मरणांतक शक्तीचा प्रहार का केलात?’’ रावण म्हणाला ‘‘अरे लाथ मारली नसती तर आमचे बेंड फुटले असते. तुम्हा लोकांचा विश्वासही बसला नसता, आणि राम आमच्या वंशाचे रक्षण करेल की नाही हे आजमावण्यासाठी अशा शक्तीचा प्रहार केला, आणि त्या प्रहारातून बिभीषणाला वाचवण्यासाठी रामाने स्वतः तो प्रहार छातीवर घेतला तेव्हा माझी खात्री झाली की माझा वंश सुरक्षित आहे. लक्ष्मणा, तुझ्या लक्षात आले नाही का की त्या घटनेनंतर माझ्या रणकौशल्यात मी परिवर्तन केले. मी वेगाने युध्द करणे सुरू केले.’’

लक्ष्मण म्हणाला, ‘‘तुम्ही कदाचित मरणार नाही असे आम्हाला वाटत होते.’’ रावण म्हणाला मी निश्चिंत झालो होतो. त्यामुळे मी घनघोर युध्द सुरू केले. आम्ही आयुष्यभर पाप केले, अनुयायांकडूनही पाप करवले. पापाची आम्ही सीमा पार केली होती. भक्ती-अर्चन

करूनही अनेक जन्मापर्यंत आम्हाला मुक्ती मिळाली नसती. तेव्हा ज्या वेळेस खर-दूषण या माझ्या बांधवाचा वध झाला तेव्हा माझ्या मनाने मला ठामपणे सांगितले की हाच ईश्वर आहे. तेव्हा माझ्यासह सर्व बांधवांना परमधाम प्राप्ती करवून देण्याचे ठरविले. म्हणून मी प्रथम सीतेचे हरण केले. नंतर मीच तुम्हाला धमकी दिली की तुम्ही माझ्याशी युध्द करायला या आणि मी माझ्या ध्येयसिध्दीत यशस्वी झालो. लक्ष्मणा, जेव्हा तु परमधामात येशील तेव्हा माझ्या वंशासह मी तेथे भेटेन. राम तर अयोध्येच्या प्रजेसह नंतर पोहोचेल, पण आम्ही मात्र तेथे त्याच्या आधी विराजमान झालेले असू. लक्ष्मणा, आम्ही लोकांनी समृध्द जीवन उपभोगले, जगाच्या छातीवर पाय ठेवून आम्ही चाललो. आता जेथे ऋषिमुनी, तपस्वी राहतात, जे रामाचे धाम आहे, जेथे तुम्ही राहणार आहात तेथे मी आता चाललो आहे.''

आश्चर्यचकित झालेला लक्ष्मण परत आला आणि म्हणाला, ''बंधू रावणाने लढाई केलीच नाही. त्याने तर आपले ध्येय साध्य करून घेतले. आम्ही समजत होतो की तो खल आहे, दुष्ट आहे. सीतामातेला त्याने पळवून नेले. परंतु त्याने खऱ्या अर्थाने चोरी केलीच नाही. ती तर त्याची राजनीती होती. आपल्या वंशाच्या सुरक्षिततेसाठी त्याने ही सर्व कृत्ये केली.''

श्रीरामास रावणाच्या या सूक्ष्म राजनीतीची कल्पना होती. कारण ते स्वतः कुशल राजनीतिज्ञ होते. त्यांच्या जीवनात महर्षि विश्वमित्रांनी त्यांना केवळ अस्त्र-शस्त्रांचे ज्ञान दिले नव्हते तर आपल्या दिव्यास्त्रांचे भांडार त्यांना अर्पित केले होते. महर्षि अगस्त्य यांनी त्यांना धनुष्य आणि तलवारी दिल्या, बाणाचा दिव्य भाथा दिला. महर्षि अगस्त्यांच्या बाणानेच रावणाचा संहार झाला. वाल्मीकीय रामायणानुसार सुतीक्ष्ण आश्रमात श्रीरामाने शस्त्र धारण केले. अस्त्र-शस्त्र प्रत्येक महापुरूषाजवळ होते. वसिष्ठाजवळ जे होते ते सर्व त्यांनी श्रीरामाला दिले; परंतु या सर्वांहून श्रेष्ठ असा शस्त्रास्त्र-संग्रह महर्षी वाल्मीकीजवळ होता. त्यांत त्यांची जन्मजात अभिरुची सामाविष्ट होती. मोठमोठ्या फौजा आल्या पण रत्नाकराचा कोणी पराभव करू शकले नाही. रत्नाकराने दस्यूवृत्तीचा त्याग केला, भक्ती व उपासना केली. तेव्हा रत्नाकराला महर्षी वाल्मीकीचे रूप मिळाले.

भगवान श्रीराम त्यांच्या जवळ गेले. **''मुनि कहँ राम दण्डवत कीन्ही। आसिरवादु विप्रवर दिन्हा ॥''** वाल्मीकींनी श्रीरामाला आशीर्वाद दिला परंतु दिव्यास्त्राच्या भांडाराचे नावसुध्दा उच्चारले नाही. रामाने विचार केला की या महात्म्यांच्या जवळ हे भांडार नुसते पडून आहे. त्याचा सदुपयोग झाला पाहिजे. तेव्हा सीतेला लोकापवादाचे निमित्त बनवून तिला वाल्मीकीच्या आश्रमाजवळील वनात सोडले. श्रीरामाचे हे कृत्य महर्षींना आवडले नाही. ज्या सीतेने हिरण्यमयी लंकेला तुच्छ मानले, अग्नीमध्ये परीक्षा दिली अशा त्या दिव्य स्त्रीला लोकापवादाच्या भयाने वनवासात सोडून दिले. सीतेने आश्रमात लव आणि कुश या दोन

पुत्रांना जन्म दिला. महर्षींनी त्यांचेकडून रामाला धडा शिकवायचे ठरवले, आणि त्यासाठी आपल्या दिव्यास्त्रांचे भांडार त्यांनी उघडले. मातेच्या प्रेमछत्राखाली वाढत असणाऱ्या मुलांना आपल्या कुशल निर्देशनाखाली अकराव्या वर्षी युद्धकलेत निष्णात केले. या मुलांनी वयाच्या बाराव्या वर्षी रामाच्या अश्वमेधाचा घोडा आश्रमाजवळून जात असताना पकडला.

अश्वाच्या सुरक्षिततेसाठी बरोबर असणारा शत्रुघ्न आणि त्याची सेना धाराशायी झाली. लक्ष्मणाचे सर्व युध्द कौशल्य या मुलांसमोर निष्फळ गेले. अतुलनीय बलशाली अशा हनुमंताची अप्रतिहत गती सींकच्या एका बाणाने निरुध्द करणारा भरतही या पराक्रमी वीरांकडून पराभूत झाला. रावणाच्या अजेय अशा लंकेचा विध्वंस करणारी अयोध्येची चतुरंगिणी सेना व पुनर्जिवीत झालेली वानरांची सेनाही पराजित झाली. हनुमान विवश झाले. सुग्रीव, बिभीषण हे सर्वजण मूर्च्छित झाले. स्वतः रामाला तेथे यावे लागले. महर्षींना हस्तक्षेप करावा लागला. रामाचे स्वागत करून हसत ते रामाला म्हणाले, ''राजहट्ट जरी महान असला तरी जेव्हा बालहट्टाशी त्याची टक्कर होते, तेव्हा राजहट्टाला माघार घ्यावी लागते.''

महर्षींकडून श्रीरामाचा परिचय झाल्यानंतर मुलांनी रामाला प्रश्न विचारला की आपण सती-जगत जननी व अग्नी परीक्षेत सुलाखून बाहेर आलेल्या देवी सीतेला वनवासात का पाठवले? श्रीराम म्हणाले, ''मुलांनो, ती एक राजनीती होती.'' **''राम धरण सरबस एतनोई । जिमि मन माहिं मनोरथ गोई ।।''** गोपनीयता राजनीतीतील सर्वस्व आहे. म्हणजे सीतेचा परित्याग ही श्रीरामाची राजनीती होती. श्रीराम हे महान क्षत्रिय सम्राट होते. ते वाल्मीकींजवळ शस्त्रास्त्रांची याचना करू शकत नव्हते. त्यांनी युक्ती योजून वाल्मीकींकडून सर्व भांडार मिळवले. सीतेला त्यांनी वनवासाची शिक्षा केलेली नव्हती तर मुलांना उत्तम प्रकारचे व अप्राप्य असे शिक्षण मिळावे या हेतूसाठी वनात पाठवले होते. मुलांच्या शिक्षणाची काळजी आईशिवाय कोण घेणार? श्रीरामांना ही गोष्ट माहीत होती.**''नीति प्रीति परमारथ स्वारथ । कोउ न राम सम जान यथारथ ।।''** त्यांनी सीतेचा त्याग केलेला नव्हता तर मुलांना सर्वोत्कृष्ट दिव्यास्त्रांची प्राप्ती आणि मुलांच्या शिक्षणाची उत्तम सोय व्हावी यासाठी ही व्यवस्था होती.

वास्तविक सीता ही कोणी स्त्री नव्हती. गर्भवती सीतेचा रामाने परित्याग केला, तिला वनात पाठवले ही गोष्ट चुकीची आहे. हे मानस आहे. मनाला मानस म्हणतात. रामचरित मानस म्हणजेच मनाला सांगणे-शिकवणे होय. रामचरित मानस श्रीरामाचे चरित्र आपल्या मनाच्या अंतरंगात प्रवाहित आहे. ते दिसत नाही. तुम्ही तुमच्या मनाचा सूक्ष्मपणे अभ्यास केला तर कामाचे चरीत्र, लोभ-मोहाचे चरित्र, राग-द्वेषाचे चरित्र तुम्हाला तेथे आढळून येईल. पण श्रीरामाचे चरित्र प्रसुप्त असल्याने ते तुम्हाला दिसू शकत नाही. ते प्रसुप्त चरित्र कशा प्रकारे

जागृत करता येईल? ते कसे जागृत करायचे व रामामध्ये व आपल्यामध्ये असणारे अंतर दूर करून राममय होण्याचा परमानंद कसा प्राप्त करायचा याचा साधना-क्रम रामायणात सांगितला आहे. त्यामध्ये श्रीराम विज्ञानरूपी (बह्मज्ञान) आहे व सीता ही शक्ती आहे असे दर्शविलेले आहे.

सीतेचा जन्म भूमीमधून (पृथ्वीकन्या) झाला असे म्हणतात. मुलं काय अशी कधी जमिनीत जन्म घेतात का? जे धनुष्य दहा-दहा हजार शक्तिशाली राजे उचलू शकले नाहीत ते धनुष्य सीता सहजतेने उचलत होती, ती ते स्वच्छ करीत होती. ही गोष्ट विचित्र वाटते नाही का? वास्तविक **''धड धरती एकै लेखा। जो बाहर सो भीतर देखा॥''** या शरीराला धड असे म्हणतात. पृथ्वीला धरती म्हणतात. बाह्य जगात जे जे दृष्टिगोचर होते ते ते सर्व मनाच्या अंतरंगात प्रवाहित झालेले आहेत.- **''असन वसन पशु वस्तु विविध विधि, सब मनि महँ रह जैसे। सरग नरक चर अचर लोक बहु, बसत मध्य मन तैसे॥''** ज्याप्रमाणे भोजन, वस्त्र, धन-धान्य, मर्यादा, प्रतिष्ठा इत्यादी गोष्टी एका मौल्यवान रत्नात समाविष्ट असते त्याप्रमाणे स्वर्ग-नर्क, चर-अचर व परमधामसहित सर्व लोक मनाच्या अंतरंगात विद्यमान आहेत. ज्याचा क्रम येतो तेव्हा एका विशिष्ट आकाराने ते समोर येतात.

शरीररूपी पृथ्वीमध्ये शक्ती प्रसुप्त आहे. योगरूपी जनकपूर, चित्तचढरूपी चाप ! चित्ताची चंचलताच चाप आहे. योगांचा अभ्यास करताना चित्ताचे चांचल्य नष्ट होते तेव्हा मन ध्यानात निमग्न होते. ध्यान म्हणजेच धनुष्य होय. मन ध्यानमग्न होताच शक्तिस्वरूपा सीता त्या भक्ताच्या हृदयात प्रसारित होते. जेथे शक्तीचा संचार होतो तेथे जागृतीरूपी जयमाला येते. **मोह निशा सब सोवनिहारा** सर्वजण झोपलेले आहेत. जीव तेव्हाच जागृत होतो, जेव्हा **'जानिय तबहिं जीव जग जागा। जब जब विषय विलास विरागा॥'** सर्व विषयांचे ठिकाणी वैराग्य निर्माण होईल. लौकिक यज्ञांच्या परंपरेपेक्षा वेगळा असा गोस्वामीद्वारे सृजित केलेला एक अदभूत यज्ञ 'धनुष्य यज्ञ' याच जागृतीचा संदेश देत आहे.

अनेक राजांनी आपल्या बाहुबळाचे प्रदर्शन केले, पण धनुष्याला तीळमात्र उचलू शकले नाहीत. दहा-दहा हजार राजांनी एकत्र येऊन ते धनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला तरी धनुष्याला साधे हलवूही शकले नाहीत. दहा हजार लोक एकत्र येऊन एखादे धनुष्य उचलण्याचा प्रयास केला असे म्हणणे शक्य आहे? ही गोष्ट अतिरंजित व एक खोटी थाप वाटते. परंतु अध्यात्माच्या पातळीवर ध्यान हेच धनुष्य आहे. चित्ताचे चांचल्य संपुष्टात आल्याशिवाय ध्यानावस्था प्राप्त होत नाही. दहा इंद्रियांच्या सहस्त्र प्रवृत्ती म्हणजे दहा हजार नरेश आहेत. जोपर्यंत इंद्रिये व त्यांच्या वासनायुक्त वृत्तींचा प्रवाह वाहत आहे तोपर्यंत तुम्ही या राजयोगाचे अनुष्ठान करता परंतु तुम्हाला काहीही प्राप्त होत नाही.

साधारणतः साधक या आत्मपथावर चालण्यासाठी उद्युक्त होतात. पण या मार्गावर जी सावधगिरी घ्यायची त्याचा विचार करत नाही. मार्गदर्शक तत्त्वदर्शी सदगुरू त्यांना प्राप्त न झाल्याने आपल्याला सुचेल त्याप्रमाणे करत राहतात. **'चले इष्ट देवन्ह शिर नाई।'**- आपापल्या इष्ट देवांची म्हणजे गणेश, महेश, सुरेश, दिनेश इत्यादी म्हणजे ज्याचा जो इष्ट देव होता, दहा हजार राजांचे दहा हजार इष्ट देव त्या सर्व इष्टदेवांसमोर ते नतमस्तक झाले; पण त्यांना यश आले नाही.

श्रीरामानेही धनुष्याकडे पाहिले, इष्ट देवाचे स्मरण केले. **'गुरूहि प्रणाम मनहि मन कीन्हा। अति लाघव उठाइ धनु लीन्हा ॥'** आणि अत्यंत सहजतेने धनुष्य उचलले. त्यांचे इष्टदेव सद्गुरू होते. प्रारंभी सद्गुरूच्या मूर्त स्वरूपाला प्रणाम केला जातो. त्यांच्या आज्ञेचे पालन केले जाते. दुसरी अवस्था सूक्ष्म असते. यामध्ये मनाने गुरूदेवाचे स्वरूप पकडून आपल्या हृदयात त्यांना धारण करायचे असते. असे केल्याबरोबर तत्क्षणी ध्यानाची स्थिती प्राप्त होते. हाच संस्कार आहे, हाच यज्ञ आहे. **'यज्ञानां जप यज्ञोऽस्मि।'**-यज्ञांमध्ये सर्वश्रेष्ठ यज्ञ म्हणजे जप-यज्ञ आहे. जेथे ध्यानावस्था प्राप्त होते तेथे शक्तिरूपी सीतेची प्राप्ती होते.

या अध्यात्माच्या जगात, मोहरूपी रावण आहे. **''मोह सकल व्याधिन्ह कर मूला।''** सर्व व्यांधीचे मूळ कारण मोह आहे. **'तेही ते पुनि उपजहिं बहु शूला।'** यामुळे सर्व प्रकारची दुःखे निर्माण होतात. आसुरी प्रवृत्तींचा हाच तर सम्राट आहे. जोपर्यंत मोहरूपी प्रवृत्ती जिवंत असतात तोपर्यंत शक्तिरूपी सीता योगाग्नीमध्ये प्रसुप्त राहते. पंचवटीत भगवान श्रीराम सीतेला म्हणाले-

**''सुनहू प्रिया व्रत रुचिर सुशीला। मै कछु करबि ललित नरलीला ॥**

**तुम्ह पावक महुँ करहु निवासा। जौ लगि करौ निसाचार नासा।''**

प्रिये, मी आता काही सुंदर, मनोहारी अशा लीला करणार आहे. त्या मनोहर लीला कोणत्या होत्या? तर निशाचरांचा संहार, ज्यामुळे रक्ताच्या नद्या वाहू लागल्या. महाकाय हत्ती त्या प्रवाहात वाहून जाऊ लागले. शंभर योजने लांब कायेचे कुंभकर्ण त्यात बुडून गेले. आता या लीला मनोहारी आहेत की भंयकर संहारकारक? **''तुम पावक महुँ करहु निवासा''** पावक म्हणजे फायू स्टार हॉटेल होते की काय ! कारण हे काय निवासस्थान झाले? असे सांगितले जाते की श्रीरामाने मानवोचित लीला केल्या. तसे आचरण केले. पण हा अग्नीचा निवास मानवोचित आहे का? काय हे शक्य आहे?

वास्तविक **'वपुष ब्रह्माण्ड सुप्रवृत्ति लंका।'** शरीर म्हणजे एक सुव्यवस्थित असे ब्रह्मांड आहे. मायिक प्रवृती म्हणजे लंका होय. मनरूपी मय दानवाने याची संरचना केली

आहे. ज्यामध्ये मोहरूपी रावण, क्रोधरूपी कुंभकर्ण, लोभरूपी नारान्तक, आशारूपी पिशाचयोनी-अशा प्रकारच्या अनेक आसुरी प्रवृत्ती आहेत. **'दसमुख सभा बैठ एक बारा । देखि अमित आपन परिवारा ।'** असा रावणाचा परिवार फार व्यापक आहे.

निशाचरांचा पुष्कळ संहार केल्यानंतर सुध्दा एकट्या रावणाने असंख्य निशाचरांना जिवंत केले. वास्तविक सर्व निशाचर मरून गेले होते मग पुन्हा इतक्या मोठ्या संख्येत ते कोठून निर्माण झाले? कारण रावण मोहाचे प्रतीक आहे. सर्व व्याधींचे मूळ कारण मोह आहे. एखाद्या वृक्षाचे मूळ तसेच ठेवून वरून त्याला कापून टाकले तरी काही दिवसांनी तो वृक्ष फांद्यांनी, पानाफुलांनी पुन्हा पल्लवित झालेला दिसतो म्हणजे जर मूळ शाबूत असेल तर त्याच्या अंतरंगात सर्व आसुरी वृत्ती समाविष्ट असतात. त्यामुळे रावण प्रचंड सैन्य घेऊन निघाला, परंतु जेव्हा तो मृत्यू पावला तेव्हा **'रहा न कुल कोउरोवनिहारा ।'** त्याच्यासाठी दोन अश्रू ढाळायलाही कोणी वाचले नव्हते ना कोणी पाणी पाजायला उरले होते.

मोहाचे अस्तित्व संपताच सीता अग्नीतून प्रकट झाली. मोह नष्ट होताच परमात्म्याशी मिलन होते. त्यालाच योग म्हणतात. सर्व विषयांशी संयोग-वियोग रहित होऊन आत्यंतिक सुखदायक अशा परमतत्व परमात्म्याशी मिलन म्हणजेच योग होय. हा योगाग्नि असा आहे की जो सर्व प्रकारचे विकार व शुभाशुभ कायमचे नष्ट करतो. या योगाग्नीमध्ये अवगाहन करूनच सीता प्रकट झाली. अग्नीने सीतेचा हात पकडून रामाला सांगितले- ''रामा, ही सीता आदिशक्ती, चिन्मयी अविनाशी शक्ती असून ती सदैव निर्लेप, निर्दोष तसेच तुमच्याशी अभिन्न असून तुमचेच ती प्रतिबिंब आहे. तिचा स्वीकार करा.'' वास्तविक मोह समूळ नष्ट होतो तेव्हा चिन्मयी, आल्हादिनी शक्तीच्या स्वरूपात आत्मा परिवर्तित होतो व योगामध्ये पूर्णतेची अवस्था येते. त्यानंतर सर्वत्र राममयी स्थिती पसरते व्यापून राहते.

**''राम राज्य बैठे त्रैलोका । हरषित भये गये सब शोका ।।''**

श्रीराम राज्याभिषिक्त होताच तिन्ही लोकांतील भवसंबंधी शोक कायमचा नष्ट झाला. सर्वत्र आनंद व्यापून राहिला. विकार उरलाच नाही. आता ध्यान कोणाचे करावे? पुढे कोणाची सत्ता आहे की जिचा शोध घेणे बाकी आहे? अशा अवस्थेत ध्यान म्हणजेच धोबी आहे. कबीर म्हणतो-**सदगुरु धोबिया से परिचय नाहीं ।** कपडयांवरचे डाग धोबी धुऊन देतो; परंतु अंतर्मनावरील मलावरणाच्या विक्षेप रूपातील संस्कारांचे डाग सदगुरूच धुऊन देतो. आता तिन्ही लोकांमध्ये काही विकारच उरला नाही, सर्वत्र आनंद व्यापून राहिला आहे मग ध्यानाने कोणाचा शोध घ्यावा? डाग तर धुऊन निघाले. आता शक्तीचा उपयोग संपला; काही काळ ही शक्ती ब्रह्मविद्येच्या आश्रयाने प्रसुप्त राहते. पण जेव्हा लव-कुशांचा जन्म होतो तेव्हा कुशलता प्राप्त होते व मग शक्तीची आवश्यकताच

राहात नाही. सीता मरत नाही पण ज्या धरतीतून ती जन्माला आली त्याच धरतीमध्ये तत्त्वमय होऊन ती कायमची प्रसुप्त होते.

सीता पृथ्वीमध्ये समाहीत होऊन गेली. सर्वत्र रामराज्य स्थापित झाले. '**नहिं दरिद्र कोउ दुःखी न दीना । नहिं कोउ अबुध न लच्छन हीना । सर्व परमगतीचे अधिकारी ! बयरू न कर काहू सन कोई । राम प्रताप विषमता खोई ।।**' आता शक्तीचा काहीच उपयोग राहात नाही. त्या योग्यासाठी त्याचे काही प्रयोजन नाही. परंतु ती पृथ्वीमध्ये सदैव राहाते, तिच्याद्वारे दुसऱ्यांना मार्गदर्शन होत राहते. संतांमध्येच ही जागृती संभव आहे. सीता म्हणजे आपल्या हृदयातील सुप्त अशी ईश्वरीय अनुभूती आहे. सीता म्हणजे ईश्वरीय स्वरूप आहे. सीता म्हणजे कोणी स्त्रीरूप नव्हे, जनमानसात सीतेचे जे स्वरूप आहे ती आपली गौरवशाली संस्कृती आहे, आदर्श आहे, सुसंस्कृत जीवन चरित्र आहे आणि मोक्षाचा मार्ग आहे.

**।। ॐ श्री सद्गुरू भगवान की जय ।।**

# धर्म-संदेश

भारतातील वैदीक ऋषिमुनींनी मर्यादा पुरूषोत्तम श्रीरामाच्याही हजारो वर्षां पूर्वी कठोर तपश्चर्या व निरंतर प्रयत्न करून परमात्म्याला प्रत्यक्ष प्राप्त करून घेतले. त्यानंतर भारतातील निसर्गरम्य अशा एकांत स्थळी आश्रम उभे करून त्यांनी आपली एक शिष्य-परंपरा निर्माण केली व हे सत्य जतन करून ठेवले. हेच सत्य पाच हजार वर्षापूर्वी भगवान श्रीकृष्णाने गीतेमध्ये सांगितले. त्यांनी सांगितले की एक आत्माच फक्त सत्य आहे. त्याच्याशिवाय अन्य जे काही अस्तित्वात आहे ते सर्व नश्वर आहे, अस्तित्वहीन आहे. हा संदेश त्यांनी मानवमात्रांना संबोधित केला. विश्वातील साक्षात्कारी महापुरुषांनी तो आत्मसात केला आणि प्रादेशिक व विदेशी भाषांमध्ये तो प्रस्तुत केला. अहुरमज्दा, गॉड, अल्ला इत्यादी विविध नावांनी ज्याला पुकारले जाते तो एका परमात्म्याचाच बोध करत असतो. तेव्हा ते सर्व आपले अनुयायीच आहेत. धर्म एकच आहे. धर्मनिरपेक्षतेच्या घोषणा करणाऱ्यांच्यात एकवाक्यता नाही. त्यांच्यातही मतभेद असल्याचे दिसून येते. कारण मतभेदामुळेच पक्ष-विपक्ष निर्माण होतात. तेव्हा खरे रहस्य चांगल्या प्रकारे जाणण्यासाठी 'यथार्थ गीता' हा ग्रंथ पाहावा. गीताधर्माचा समग्र बोध करून देणारा असा हा ग्रंथ आहे.

ईश्वर म्हणजे काय? तो कोठे राहतो? त्याला कसे प्राप्त करावे या सर्वांची उत्तरे मिळवण्यासाठी 'यथार्थ गीता' हा ग्रंथ पाहावा.

# वर्ण

वास्तविक वर्ण म्हणजे आमचा सनातन धर्म आहे. आत्मा सनातन आहे.

आत्म्याला जाणून घेण्यासाठी साधनेचा जो सोपान आहे त्याला चार पायऱ्या आहेत. त्या म्हणजे वर्ण-ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र.

आत्मप्राप्तीच्या साधनेला आरंभ करीत नाही तो शूद्राहूनही शूद्र म्हणावा लागेल.

**स्वामी अड़गड़ानन्द**

लाईफ लाईन हॉस्पिटल, सुंदरपूर, वाराणसी येथे हॉस्पिटल उद्‌घाटन समारंभात रविवार ता. १६ जानेवारी २००० रोजी पूज्य महाराजांनी समाजातील ज्वलंत प्रश्नावर समाधानकारकपणे केलेले भाष्य.

# वर्ण

बंधूनो,

आज सभेमधून काही प्रश्न विचारण्यात आले आहेत. एका सज्जन व्यक्तीने विचारले आहे की मागासलेल्या काही जाती जशा **''जे बरनाथ तेलि कुम्हारा। श्वपच किरात कोल कलवारा॥''** चांडाळ, तेली, कुंभार, कोळी, भिल्ल, कोष्टी इत्यादी जातींना अधम म्हणजे हलक्या प्रतीच्या जाती असे म्हटले आहे. तेव्हा अधम वर्ण ही सामाजिक व्यवस्था आहे की धर्म आहे याचे स्पष्टीकरण करावे.

या प्रश्नाची सविस्तर चर्चा आश्रमातून प्रकाशित होणाऱ्या **'जीवनादर्श एवं आत्मानुभूति'**, **'यथार्थ गीता'**, आणि **'शंका समाधान'** नावाच्या पुस्तकात केलेली आहे. तरीही येथे संक्षेपाने सांगण्याचा प्रयत्न करू. वर्ण म्हणजे समाजाच्या वाटण्या असतील तर मग आपले कफन आपणच खरेदी करून ठेवा.

प्राचीन भारतात आर्य संस्कृती सर्व विश्वभर पसरली होती. आपल्याच पूर्वजांचा असा उद्घोष होता की **''कृण्वन्तु विश्वम् आर्यम्''** म्हणजे संपूर्ण विश्वाला आर्य बनवा. त्यांनी तसे प्रयत्नही केले. तीन चतुर्थांश विश्वात तसा प्रसारही झाला होता. अरब येथील गझनी, समरकन्द इत्यादी शहरे भारतातील राजांनी वसवली आहेत. अल्ताई, हिंदूकुश पर्वतापर्यंत भारतीय सीमा दाखवलेले नकाशे सापडतात. संपूर्ण एशिया, युरोपचा काही भाग, जर्मन इत्यादी आर्य आहेत. अमेरिकेत कोलंबसाच्याही पूर्वी माया आणि इंका संस्कृती पोहचलेली होती. संपूर्ण विश्वाला आर्य बनवा. परमश्रेयाचा त्यांना भागीदार बनवा असे आवाहन केलेले होते. तीच आर्य संस्कृती आज संकुचित बनून राहिली. बुध्द, जैन आणि शीख हे आमचे सख्खे बांधव आहेत. परंतु ते वर्ण मानत नाहीत. पूर्व पश्चिम पाकिस्तान दोन्ही हिंदू आहेत. भारतातील सर्व ख्रिश्चन हिंदूच आहेत. या सर्वांना धर्म बहिष्कृत करून येणारे दिवस धर्म संपून जाण्याचे संकेत देत आहेत. आज हरिजन म्हणतात की आम्ही हिंदू म्हणून जन्मलो कारण आमच्या हातात नव्हते, पण आम्ही बौध्द धर्मात मरण पत्करू. मग तर तीन पायऱ्याचांच सनातन धर्म उरला. अस्पृश्य लोक म्हणतात की जर आम्हाला मंदिरात प्रवेश नसेल तर या मंदिरांचा आम्हाला काय उपयोग?

हिंदुस्थानाचे विभाजन झाले तेव्हा साठ कोटी हिंदूमधून आता तीस-पस्तीस कोटीच हिंदू उरले आहेत. आता जे उरले आहेत त्यांच्यातही आपापसात एकवाक्यता किंवा मनोमेळ नाही. ना लग्नकार्यात ना आचरणात ना जीवनपध्दतीत एकवाक्यता आहे. तरीही आमची घोषणा मात्र ''सनातन धर्म की जय !'' हीच आहे. भारतातील काही राज्यांमधून मुसलमानांपेक्षा व ख्रिश्चन लोकांपेक्षा हिंदूंची संख्या कमी झालेली आहे.

आम्ही प्रत्येक दिवशी घोषणेत ओरडतो, विश्वगुरू भारत ! पण ही गर्वोक्ती किती पोकळ आहे ! आपण आपल्या धर्मात वर्णांच्या बाहेरच्या लोकांना कधी दीक्षित करू शकतो का? त्यांच्यापैकी कोणाला कधी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शुद्रांमध्ये सामावून घेवू शकाल? कधीही नाही, असेच उत्तर आपण देणार. जर आपण एकालाही आपल्यात सामावून घेत नाही तर मग कसला विश्वगुरू? गुरू शिष्याला आपल्या समकक्ष् बनवत असतो, शिष्याला गुरू बनवतो. परंतु आजकाल आपण असे गुरू आहात की एखाद्या विदेशी शिष्याने तुम्हाला नुसता स्पर्श केला तरी तो गुरूच संपून जातो.

तुलसीकृत रामायणाची पाने फाडली जातात कारण त्यात म्हटले आहे की, **''ढोल गँवार शुद्र पशु नारी''** म्हणजे तुलसीदास पक्षपाती आहेत. **''पूजिय विप्र शील गुण हीना ।''** हे रामायण साठ टक्के जनतेला दुदैवी अस्पृश्य, नीच आणि अधर्मी असे म्हणते. **''जे बरनाधम तेली कुम्हारा''** हे वर्ण अधम आहेत. असे रामायण घरात ठेवण्यास अयोग्य आहे. तुलसीदास ब्राह्मणांचा पक्षपाती आहे. खरी गोष्ट म्हणजे या ब्राह्मणांनी तुलसीदासाला कधी शांततेने राहूनच दिले नाही. त्याचे रामायण यमुनेत अर्पण केले. यावरून विचार करावा की वर्णाची अवस्था कशी आहे?

वास्तविक वर्ण आमचा सनातन धर्म आहे. सनातन तर आत्मा आहे. या आत्माला प्राप्त करण्यासाठी, त्याला जाणून घेण्यासाठी साधनेचा सोपान सांगितला आहे. या सोपानाला चार पायऱ्या आहेत. या चार पायऱ्या म्हणजेच चार वर्ण-ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र ! जर आत्मप्राप्तीसाठी साधनेचा क्रम जाणत नसाल, ईश्वर प्राप्तीच्या साधनेचा नियत क्रम जाणत नसाल आणि जाणल्यानंतर देखील जर साधना आरंभच करीत नसाल तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांची तर गोष्टच सोडा पण आपल्याला शूद्रसुध्दा म्हणता येणार नाही.

**''या निशा सर्वभूतांनां तस्यां जागर्ति संयमी ।''**

या जगतरूपी रात्रीत सर्वजण निश्चेष्ट पडले आहेत. ते दीर्घ झोपेत आहेत. रात्रंदिवस जे परिश्रम करत आहेत ते फक्त स्वप्न पहात आहेत. संयामी पुरूष हयामध्ये जागृत

असतात. ज्या दिवसापासून संयमाला सुरवात होते त्या दिवसापासून ते शूद्र असतात. कारण आरंभी लगेच संयम करणे साधत नाही. त्यासाठी एखाद्या महापुरूषाची सेवा करावी. येथे शूद्र म्हणजे क्षुद्र-अल्पज्ञ ! भगवत्पथावर जाण्याचे हे प्रवेशद्वार आहे. जर भगवत्पथ जाणूनही आम्ही त्याच्यावर पाऊल ठेवले नाहीतर आम्ही शुद्रही उरत नाही. जर भगवत्पथ जाणून त्यावर पाऊल ठेवले तर मग तो मनुष्य अरब देशात जन्मला असला तरी तो सनातन धर्माच्या प्रशस्त मार्गावर आहे असे समजावे. ज्ञान जागृत झाले, सद्गुणांचा संग्रह वाढू लागला की तो वैश्य ! प्रकृतीशी संघर्ष झेलण्याची क्षमता आली की तो क्षत्रिय ! जेव्हा विकार शांत होतात, ब्रह्मामध्ये विलीन होण्याची योग्यता प्राप्त झाली की तो ब्राह्मण ! ब्रह्मविलीन झाल्यानंतर सर्व श्रेणी समाप्त होतात. मग तो **''न ब्राह्मण न क्षत्रिय न वैश्य शूद्रो चिदानन्द रूपो शिवो केवलोऽहम् ।''**

या प्रकारे वर्ण म्हणजे अंतःकरणाच्या योग्यतेचा निकष होता. ज्याप्रमाणे लोक आपल्या घरांना शास्त्रोक्त, सुंदर नावे देतात त्याप्रमाणे कालांतराने व्यवसायांच्या संबोधनासाठी या वर्णाचा उपयोग केल्याने समाजात भिन्न भिन्न जाती निर्माण झाल्या. जे समाजातील लोकांची सेवा करून आपला चरितार्थ चालवत होते त्यांना शुद्र म्हटले गेले. धन-संचय करीत होते ते वैश्य, सुरक्षा व्यवस्था पाहात होते ते क्षत्रिय आणि शिकवणारे होते ते ब्राह्मण असे संबोधले गेले. आरंभी उद्देश चांगलाच होता, परंतु समाजाची व्यवस्था पाहणाऱ्यांनी पूर्वजांच्या नावाचा दुरूपयोग करून निंदनीय अशी सामाजिक व्यवस्था समाजाला दिली. उदाहरणार्थ आजकाल मनूच्या नावाने प्रचलित असणाऱ्या स्मृतीनुसार जन्माच्या बाराव्या दिवशी शिशूचे नामकरण व्हावे. ब्राह्मणाचे नाव मंगलसूचक ठेवावे. क्षत्रियाचे नाव बलसूचक ठेवावे व शूद्राचे नाव घृणास्पद ठेवावे. समजा जन्मराशीचे अक्षर 'क' असेल तर त्या ब्राह्मण मुलाचे नाव कृष्णदत्त, 'प' आले तर पतित पावन, बालक क्षत्रिय असेल तर क्रंदनसिंह, पर्वतसिंह, बालक वैश्य असेल तर करोडीमल, पन्नालाल आणि बालक शूद्राच्या घरचे तर कातवारू पतवारूअसे नाव ठेवले जाते. ही नावे घेऊन मनुष्य बाहेर जातो तेव्हा त्याच्याशी कसा व्यवहार करायचा हे त्याच्या नावावरूनच समजले जाते. हा धोकेबाजपणाच नव्हे का?

जर वर्णानाच सनातन म्हणायचे झाले तर आज ती व्यवस्था तुटू लागली आहे. आज शूद्र मुलांचेही परमानन्द, ब्रह्मानन्द असे नाव ठेवू लागले आहेत. स्टेट पीरियडमधील या सामन्तशाही व्यवस्थेला तडा जाऊन नष्ट होण्याच्या पंथाला लागली आहे. समाजातील या जातींमध्ये जे निर्धारित गुण होते तेही नंतर शिथिल होत गेले. फक्त एक गोष्ट रूढ झाली की शुद्राचा मुलगा शुद्रच राहिल. ब्राह्मणाच्या मुलाला ब्राह्मणच समजला जाईल. मग तो अगदी अंगठेबहाद्दर का असेना ! त्याला साधना येत नसली तरी हरकत नाही, कारण ब्राह्मण म्हणजे मुक्त. कारण शास्त्रांत ब्राह्मण म्हणजे मुक्त असे म्हटले आहे. वास्तविक ब्रह्म-दर्शन, ब्रह्मात

विलय आणि ब्रह्मामध्ये स्थिती प्राप्त झालेला (ब्रह्मस्थिती) मुक्त असतो. परंतु योग्यता नसणारेही म्हणू लागले की जाती म्हणजेच वर्ण आहेत आणि समाजातील चार वर्ण म्हणजेच सनातन धर्म आहे व याच चौकटीत राहा. वास्तविक आमच्या आर्षग्रंथात असे कोठेही सांगितलेले नाही.

वर्ण-व्यवस्थेच्या संबंधात वेदात ऋचा आहे-''**ब्राह्मणःअस्य मुखमासीत्**'' ईश्वराचे मुख म्हणजे ब्राह्मण होत. या अवस्थेत शम, दम, तप, शौच, शांती, आर्जव, ज्ञान, विज्ञान, ब्रह्मामध्ये विलय देणारे सर्व गुण साधकामध्ये येतात. या वेळी बुध्दी यंत्रवत होते. साधकाच्या मुखातून ईश्वरच बोलतो म्हणून ईश्वराचे मुख म्हणजे ब्राह्मण होय. विकारांची कापाकापी करणारे क्षत्रिय म्हणजे ईश्वरांचे बाहू होत. ईश्वरच चालायला शिकवतो म्हणून ऊरू (मांड्या) वैश्य आणि साधनेचा आरंभ म्हणजे जागृतीच्या काळात पायांच्या म्हणजे चरण स्तरावर शूद्र असतात.

भागवतात एक श्लोक आहे की परमात्म्याच्या तुष्टीसाठी त्याच्या पावित्र चरणकमलांची सेवा करण्याच्या वृत्तीतून शूद्रांचा जन्म झाला. म्हणजे ईश्वराला प्रसन्न करण्याची क्षमता शूद्रांमध्येच प्राप्त झाली. अन्य कोणामध्येही ती क्षमता नव्हती. साधनेच्या प्रारंभी परम पावन चरणांशी समर्पित झाल्यानंतर ईश्वरच सेवा विधि सांगतात की भजन कसे करावे? ते ज्ञान मिळाले तर तुम्हांला बढती मिळाली असे समजा. साधनेच्या आरंभी सेवा म्हणजे प्रारंभिक अवस्था म्हणून तो शूद्र. तो प्रभूच्या निर्देशनानुसार ईश्वराची सेवा व ईश्वराचे स्मरण करीत असतो.

हेच गीतेत सांगितले आहे की चारी वर्णांची रचना मी केली आहे. म्हणजे ईश्वराने मनुष्याला काय चार श्रेणीत विभागले? भगवान म्हणतात-नाही, ''**कर्माणि प्रविभक्तानि**'' कर्मात वाटले. साधनेला आम्ही चार भागात वाटले त्यानुसार आचरण करणे हा आमचा धर्म आहे. म्हणून वर्ण म्हणजे आमचा सनातन धर्म आहे. जर आम्ही भजन-पूजनाचा विधी जाणत नसू तर आम्ही कोणत्याच वर्णात बसत नाही. तोपर्यंत आम्ही या जगात प्रकृतीच्या जात्यात भरडणारे एक प्राणी आहोत. जेव्हा साधनेचे थोडे ज्ञान होते तेव्हा ईश्वराचे स्मरण सुरू होते व ईश्वर ते स्वीकारू लागतात तेव्हा त्या दिवसापासून तो प्राणी (मनुष्य) शूद्र असतो. या आधी जोपर्यंत तो कर्म जाणत नाही तोपर्यंत शूद्रसुध्दा नसतो. तुलसीदासांनी वर्ण कोणी निर्माण केले आहेत हे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. रामचरित्र मानसामध्ये एकदा गरुडाच्या मनात संशय निर्माण झाला की ईश्वराचा अवतार झाल्याचे आम्ही ऐकले आहे; पण तसा प्रभाव आम्हाला कुठे आढळला नाही. ''**भव बंधन ते छूटही नर जपि जा कर नाम। खर्व निशाचर बाँधेड नागपास सोई राम।**'' त्या क्षुद्र निशाचर मेघनादाने रामाला नागपाशात बध्द करून टाकले. मी जर तेथे गेलो नसतो तर युध्दाचा परिणाम न जाणो काय आला असता?

हा विचार मनात येताच गरुड संशयाने घेरला गेला. त्याला रात्रभर चैन पडले नाही. त्याचा आत्मा त्याचा शत्रू झाला. जेथे शकुन मिळत होते तेथे आता अपशकुन होऊ लागले. तेव्हा गरुड सरळ नारदाजवळ गेला. त्यांना आपल्या मनातला संशय त्याने सांगितला. नारद चकित होऊन गेले. त्यांनी विचार केला कि ईश्वराच्या या मायेने तर अनेक वेळा आम्हाला संभ्रमित केले आहे. ते त्याला म्हणाले, ''बंधो, मी तुझ्या प्रश्नाचे समाधान करू शकत नाही. तू ब्रह्माजवळ जा'' विधात्याने विचार केला की ईश्वराच्या मायेने अनेक वेळा मला नाचवले आहे तेव्हा मी निर्माण केलेला गरूड जर संभ्रमित झाला तर त्यात आश्चर्य नाही. म्हणून त्याने गरुडाला समजावले, ''गरुडा, तू शिवजींच्या कडे जा,'' श्रीशंकरांनी दृष्टी टाकताच त्यांना गरुडाच्या बेचैनीचे कारण समजले. **''होइहि कीन्ह कबहुँ अभिमाना । सो खोवे चह कृपानिधाना !''** याला अभिमान झालेला दिसत आहे सकल शोकदायक अभिमान ! या जीवनाच्या दुःखाचे कारण अभिमान हेच आहे. याचा अहंकार-अभिमान नष्ट करून भगवान त्याचे रक्षण करू इच्छित आहेत. तेव्हा ते म्हणाले, ''गरुडा, तू काही काळ सत्संग कर म्हणजे तुझा संदेह दूर होईल. तू काकभुसुण्डिंच्या आश्रमात जा. तुझे दुःख दूर होईल.'' उत्तर दिशेला एक सुंदर नीलगिरी पर्वत आहे. त्या बाजूला गरुड गेला. त्याला एक सुंदर पर्वत दिसला. त्या पर्वतावर एक तलाव होता. तलावात सात शिड्या होत्या. शिडया रत्नजडित होत्या. त्या पारदर्शी होत्या. चार शिखरे, त्यावर चार वृक्ष होते. रात्रंदिवस तेथे भजन सुरू होते. सत्संग चालू होता. तेथे दुसरे काहीच होत नव्हते. काकभुसुण्डिच्या आश्रमात पोहचताच गरुडाचे सर्व संभ्रम दूर झाले. तेथे त्याने उपदेशाचे श्रवण केले व त्याला निरंतराची शांती प्राप्त झाली. तो निर्मूल झाला.

गरुडाने काकभुसुण्डिना सादर प्रणाम केला. पक्ष्यांचा सम्राट असणाऱ्या गरुडाने पक्ष्यांमध्ये चांडाळ समजल्या जाणाऱ्या कावळयाला सादर प्रमाण केला. ईश्वर व भगवद् धर्माचा त्याला झालेला अहंकार केव्हाच गळून पडला. कृतज्ञता व्यक्त करून गरुड म्हणाला, **''संशय सर्प ग्रसेउ मोहि ताता । दुखद लहर कुतर्क बहुब्राता ।। तब सरूप गारूडि रघूनायक । मोहि जियाएउ जन सुखदायक ।।''** तात, संशयरूपी सर्पाने मला डसले होते. नाना कुतर्क माझ्या मनात निर्माण होत होते. आपल्या सारख्या विषशामक मंत्रविदांच्या दर्शनाने दंशाचा प्रभाव शामित झाला आहे. मला नवजीवन मिळाले आहे. काकभुसुण्डि म्हणाले, ''गरूडराज, आपल्याला कोणताच संभ्रम झालेला नव्हता. तुमच्या संभ्रमाच्या निमित्ताने ईश्वराने तुम्हाला कृतार्थ करण्यासाठी माझ्या जवळ पाठवले आहे आणि साधनेच्या मार्गावर संदेह होणे स्वाभाविक आहे. कारण मायेचा प्रभाव यशस्वी होऊन ती तुम्हाला आधिक संभ्रमित करू शकते; परंतु सत्पथावर चालण्याने उद्या तुम्हाला परमात्म्याची प्राप्ती निश्चितपणे होईल.

अत्यंत मधुर वाणीत काकभुसुण्डि म्हणाले, ''तुमच्या प्रमाणे मीही असाच संभ्रमित झालो होतो. **''पूरब कल्प एक प्रभु, युग कलियुग मलमूल । नर अरु नारि अधर्म रत,**

**सकल निगम प्रतिकूल ।। ७।९६ ख ।।''** खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. पूर्वीच्या एका कल्पमध्ये सर्व पापांचे मूळ असणारे कलियुग सुरू होते. स्त्री-पुरूष अधर्माचे आचरण करीत होते. सर्व लोक वेदमार्गाच्या विरुध्द आचरण करीत होते. (काकभुसुण्डि स्वतःची एक आठवण सांगत आहेत. आज त्रेतायुग सुरू आहे. त्यापूर्वी सत्य युग होते व त्याही खूप पूर्वी एक कलियुग होते. त्यातही एक हजार वर्षांपूर्वीची ही आठवण ! नीलगिरी पर्वतावर महर्षी काकांच्या सत्तावीस कल्पांच्या निवासाच्याही पूर्वीची ही आठवण ! म्हणजे काही लाख वर्षांपूर्वीची ही घटना. ती आठवण ते येथे सांगत आहेत. एकविसाव्या शतकातील हे वर्णन नाही. तेव्हा आजच्या वर्तमानाच्या संदर्भात त्याचा विचार करू नये.) त्या वेळी मी शुद्र शरीरात होतो. तो आमचा प्रथम जन्म होता.''

येथे प्रथम जन्माचा अर्थ काय आहे? जीव ईश्वरांचा अंश आहे. मग तो अंश पहिल्यांदा ईश्वरापासून अलग होत होता? नाही. येथे जन्म म्हणजे जेव्हा आत्मिक जागृती होते ती वेळ. ही जागृती म्हणजेच जन्म होय. असा जन्म की ज्यात मृत्यू नाही. कारण ईश्वरपथावर बीज नष्ट होत नाही. शिवाय त्यांना भगवान शंकराचा असा आशीर्वाद होता की कोणत्याही जन्मात त्यांचे पूर्वज्ञान नष्ट होणार नाही. त्यायुगाचे वर्णन करताना ते म्हणत आहेत-

**''कलिमल ग्रसे धर्म सब, लुप्त भये सदग्रन्थ ।**
**दंभिन्ह निज नति कल्प करि, प्रगट किए बहुपन्थ ।। (७/९७ क)।।''**

कलियुगातील पापांनी सर्व धर्म उदरस्थ करून टाकले. सदग्रंथ लुप्त झाले. दंभी लोकांनी आपल्या बुध्दिचातुर्याने सर्व पंथ तयार केले. **'प्रकट किये बहु पंथ ।'** कलियुगाने कशाकशाचा ग्रास केला होता? त्याने गीळंकृत केला होता धर्म. धर्म म्हणजे काय? वर्ण-धर्म ! **''बरन धरम नहि आश्रम चारी श्रुति विरोध रत सब नर नारी ।।''** वर्ण धर्म तेव्हा अस्तित्वातच नव्हता. चार आश्रम नव्हते. कलियुगाने ज्याचा ग्रास केला तो होता वर्ण-धर्म. **''सब लोग वियोग विशोक हुए बरनाश्रम धर्म अचार गए ।''** सर्व लोक प्रियजनांच्या विदारक वियोगाच्या दुःखाने मृतवत झाले होते. वर्णाश्रमाचे धर्म आणि आचरण नष्टवत झाले होते. त्यावेळी धर्माच्या नावावर दांभिकांच्या बुध्दीतून निर्माण झालेला धर्माभास व समानान्तर धर्म होता. वास्तविक धर्म म्हणजे साधनेचे विविध स्तर किंवा भगवपत्थावरील पायऱ्या होय. परंतु दांभिक लोकांनी तो धर्म नष्ट केला व माणसांचेच विभाजन केले. **''जे बरनाधम तेलि कुम्हारा । श्वपच किरात कोल कल वारा ।। नारि मुई गृह संपति नासी । मूड मुडाह होहिं संन्यासी ।।''**

वर्णामध्ये अधम कोण याबाबत त्यांनी नवे नवे नियम बनवले. तेली, कुंभार, कोळी, भिल्ल, कोष्टी, चांभार, धोबी इत्यादी जाती व जो मजुरी करून आपला जीवन निर्वाह करत होते त्यांना अधम समजले गेले. सेवा करून जीवन निर्वाह करत होते ते वरील लोकांकडून

अधम समजले गेले. भजन-पूजनाचा अधिकार त्यांच्याकडून त्यांनी काढून घेतला. पत्नी मेल्यानंतर किंवा संपत्ती नष्ट झाल्यावर ते संन्याशी बनू लागले. त्यांचे हे कृत्य त्या कलियुगात अन्यायकारक मानले गेले.

**'' ते विप्रन्ह सन आपु पुजावहिं । उभय लोक निज हाथ नसावहिं ।।''**

ते ब्राह्मणांकडून पूजा करवून घेत व आपले दोन्ही लोकातील वास्तव्य भ्रष्ट करीत. आम्ही अधम आहोत. आम्ही ना मंदिरात जाऊ शकत ना पूजा करू शकत असे समजले गेले तेव्हा हा लोक नष्ट झाला. जेव्हा कलियुगाने धर्माचा ग्रास घेतला तेव्हा पुढचा लोकही नष्ट झाला. वर्णच नव्हते तर मग विप्र कोठून आले? काकभुसुण्डि ने सांगितले की विप्रदेखील बनवण्यात आले होते. **''द्विज चिन्ह जनेउ उघार तपी''** गळयात जानवे घातले की द्विज बनले. वस्त्र फेकून दिले व तपस्वी बनले. ब्राह्मणांची गीतोक्त परिभाषा **'शमः दमः तपः शौचः'** अशी आहे. म्हणजे इंद्रियांचे दमन, मनाचे संयमन, तप (इष्टाला अनुरूप मनासहित इंद्रियांना तापवणे), स्वरूपाचे अध्ययन करणे, आस्तिकता, धारणा, ध्यान, समाधी इत्यादी लक्षणांनी युक्त असे ते ब्राह्मण नव्हते मग ते होते कसे? **''विप्र निरक्षर लोलूप कामी । निराचार शठ वृषली स्वामी ।।''** निरक्षर, लोलुप, कामी, चरित्रहिन, शठ, धोकेबाज आणि स्वैराचारी लोकांनाही विप्र म्हणू लागले. मग विप्राला कसे ओळखावे? जानव्यावरून **''व्दिज चिन्ह जनेऊ''**. या प्रकारे त्या दांभिक लोकांनी विप्रांनाही बनवले व शुद्रानाही तयार केले (बनवले). अशा विप्रांकडून पूजा केल्याने आमचे दोन्ही लोक कसे नष्ट होतात?

या प्रकारे वर्णांमार्फत मानवा-मानवात या दांभिक लोकांनी विभाजन केले. मग त्यांच्या या कृत्याची आपण आजही री का ओढीत आहोत? तुलसीदासांनी किंवा त्यांच्या रामायणाने असे नाही सांगितले की मजुरी करून पोट भरणारे अधम जातीचे आहेत म्हणून, गोस्वामीजी तर म्हणतात की **''बुध जुग धर्म जानि मन माहीं । तजि अधर्म रति धर्म कराही ।।''** ज्ञानी लोक धर्माचा चढाव उतार मनोमन जाणून असतात. बाहेरील जातीपातीत धर्म शोधणारे खरे विप्र नव्हते. ती दांभिक लोकांची उपज आहे. लाखो वर्षांपासून ते त्याच परंपरेने प्रभावित आहेत. आजही त्याच धर्माची री ओढणे आपल्या क्षुद्रतेचे द्योतक मात्र आहे.

## राम राज्यातील वर्ण-धर्म

वर्ण हा आमचा सनातन धर्म आहे. रामचरित मानसानुसार जेव्हा रामाचा राज्यभिषेक झाला, रावण मारला गेला. राम अभिषिक्त होताच धर्म परत आला.

**''बरनाश्रम निज निज धरम, निरत वेद पथ लोग ।**
**चलहि सदा पावहि सुखहि, नहि भय लोक न रोग ।। ७/२० ।।''**

वर्ण म्हणजे साधनेची जी श्रेणी आपल्याला उपलब्ध आहे, त्यात राहून व्यवहार करणे आपला धर्म आहे. त्याच्या पूर्तीसाठी आपल्याला प्रयत्न करावयाचे आहेत. म्हणून याला आश्रम असेही म्हणतात. या वर्ण आणि आश्रमानुसार रामराज्यात लोक आपापल्या धर्माच्या वेदानुसार आचरण करीत होते. चारी वर्णातील लोकांना वेदांचे ज्ञान होते. शूद्रांनाही वेदांचे ज्ञान होते. आता रामराज्यातील हा शूद्र आहे कसा? काही लोक म्हणतात की शूद्रांनी वेदांचे पठण करावयाचे नाही. संस्कृत शिकायची नाही. ही गोष्ट म्हणजे काकभुसुण्डिच्या कलियुगातील दांभिक लोकांची देणगी आहे व ती वाढत इथपर्यंत आली. पुढेही ती जाऊ शकते. परंतु तुलसीदासांच्या मते रामराज्यात शूद्रांनाही वेद समजत होते आणि तद्नुसार आचरण करीत होते.

**''अल्प मृत्यू नहि कवनिउ पीरा। सब सुंदर तब विरुज सरीरा ॥**
**नहि दरिद्र कोउ दुखी न दीना। नहि कोउ अबुध न लच्छन हीना ॥''**

रामाच्या राज्यात संपूर्ण समाज चार वर्णांत विभागलेला होता. त्यानुसार आचरण करणे हाच धर्म होता. मात्र कोणीही दरिद्री नव्हते. झाडूवाले होते पण वैभवात राजाच्या तोडीचे होते. कोणी दुःखी नव्हते, कोणी असहाय्य नव्हते. ''**नहि कोउ अबुध ॥**'' सर्वजण ज्ञानी होते. शिक्षण घेण्याचा अधिकार सर्व वर्णातील लोकांना होता. '**सब गुणज्ञ पण्डित सब ज्ञानी**' सर्वजण ज्ञानी व पंडित होते, गुणवान होते. तेथे शूद्रदेखील ज्ञानी होते. आता वर्ण म्हणजे काय ते तुम्हीच सांगा.

एक राजघाट होता. गोस्वामी म्हणतात, ''**राजघाट सब विधी सुन्दर वर। मज्जहि तहाँ वरन चारिउ नर ॥**'' चारी वर्णांतील लोक बरोबरच राजघाटावर स्नान करीत असत. श्रीराम तेथेच स्नान करीत असत. वशिष्ठही तेथेच स्नान करायचे व चांभारही तेथेच स्नान करायचा. येथून दूर जाऊन आंघोळ कर, आम्हाला स्पर्श करू नकोस असा प्रकार नव्हता.

वर्ण हे साधनेचा सोपान आहे. वर्ण म्हणजे एकत्र करणे (चयन). एकाच योग-साधनेच्या चार पायऱ्या आहेत. ज्या भागात रामाचे राज्य आहे महापुरूषाच्या संरक्षणाखाली असणारे सर्व साधक भक्तमंडळ रामराज्याचे निवासी आहेत. जेव्हा इष्टदेव राम हृदयात जागृत होऊन, ज्या दिवसापासून ते भजनास प्रवृत्त होतात त्या दिवसापासून वर्णाची सुरूवात होते. येथूनच धर्म सुरू होतो. '**वरणाश्रम निज निज धरम-**' 'वरणाश्रम' म्हणजे आपापला धर्म होय. ज्याला जी श्रेणी उपलब्ध आहे तो तेथून साधना करतो. '**निरत वेदपथ लोग !**' ते निरत म्हणजे अनासक्त होऊन साधना करतात. वेद अपौरुषेय आहेत. वेद म्हणजे पुस्तक किंवा ग्रंथ नव्हे. वेद म्हणजे परमात्म्याच्या श्रीमुखातून निसृत झालेली वाणी आहे. तेव्हाही ते तसे अपौरुषेय होते. आजही ते तसेच आहेत आणि भविष्यात ते तसेच राहणार आहेत. जो साधक भजनात

प्रवृत्त होतो तो अपौरुषेय परमात्मा त्याच्या अंतरंगात बोलू लागतो. ती वाणी त्याच्या अंतरंगात उतरू लागते. ती वाणी चांगल्या प्रकारे समजून घेऊन तसे अध्ययन करून त्यानुसार रामराज्यातील रहिवासी आचरण करीत असतात. सकाळ-संध्याकाळ डोळे मिटून बसल्याने भजन होत नाही किंवा भजन करताना थोडे मनोरंजन करणे किंवा हसून मजा करणे, चहापान करणे सारांश मौजमस्ती म्हणजे भजन नव्हे. भजनानंदी साधकाला हसू येतच नाही. त्याची स्थिती तर **'गदगद गिरानयन बह नीरा'** अशी होत असते. **'जागतमे सुमिरन करे, सोवत मे लव लाय। सुरत डोर लागी रहे, तार टूट ना जाय ।।'** रामराज्याचे रहिवासी **'चलहि सदा'** अहर्निश साधनेत रत असतात. **'पावहिं सुखहिं'** त्यांना सुख प्राप्ती होते. सुख म्हणजे काय? **'नहि भय शोक न रोग ।'** जेथे भय नाही शोक नाही, प्रियजनांचा वियोग नाही. भय काळाचे असते. जर साधक सतत इष्ट देवाच्या निदर्शनाप्रमाणे आचरण करणारा असेल तर त्याच्या मार्गावर त्याला भय, किंवा व्याधी भेटतच नाहीत. एक रोग शारीरिक असतो. जसे फोड होणे ही शारीरिक व्याधी झाली. दुसरा रोग म्हणजे भवरोग असतो. जसे **'मोह सकल व्याधिन्ह कर मूला'** इत्यादी. रामराज्यातील रहिवाशांना हे भवरोग नाहीत. ज्या दिवशी परमात्मा हृदयरथाचा सारथी बनतो त्या दिवसापासून ते भजन शिकवायला सुरूवात करतात. त्या क्षणपासून भजनाला सुरूवात होते व मग समजून जावे की साधकाचा भगवत्पथावर प्रवेश झाला. कोणी कितीही विद्वान असला, पी.एच.डी.चा मार्गदर्शक असला तरी तो बालकाला पी.एच.डी.चे ज्ञान देण्याचे साहस करणार नाही. त्याला तर अक्षर ज्ञानापासून तो प्रारंभ करेल की 'क' हे अक्षर असे लिहा. त्याच प्रमाणे साधक जर प्रारंभिक स्तरावरील असेल तर भगवानही त्याला प्रारंभापासूनच सांगतात-सेवा कर, बस, उठ. अशी सुरूवात करून साधकाचा क्रमशः विकास करत करत त्याचे वर्ण-परिवर्तन करत त्याला वर्णाच्या पलीकडे नेतात. अपौरुषेय वाणी इष्टदेवाकडून समजून घेऊन साधकाने त्यात निरंतर लीन राहिले पाहिजे.

या भगवत्पथावर बीज नष्ट होत नाही. प्रारंभाचे उन्मूलन होत नाही. एकदा साधना जागृत झाली की मध्ये काही अडथळा येत नाही. त्यामुळे रामराज्यात **'अल्प मृत्यू नहि कवनिउ पीरा'** अल्पमृत्यूचा शब्दशःअर्थ आहे अल्पायुषी मरणे. जसे कधी कधी मुलं अकाली मृत्यू पावतात परंतु रामाच्या राज्यात असे होत नव्हते. जेव्हा साधना जागृत झाली, अंकुर फुटला, पाने दिसली की मग माया त्या साधनेत काहीही वितुष्ट आणू शकत नाही. त्याचाच मग वृक्ष होईल, फुलेल, फळेल. समजा या जन्मात भगवत्पथावर दोन पावले चालला असाल तर पुढच्या जन्मात तिसरे पाऊल ठेवाल आणि दोन चार जन्मात तुम्ही त्या राघवेन्द्राच्या स्वरूपाच्या ठिकाणी, परमधामी स्वतःला असलेले पाहाल. म्हणून **'अल्प मृत्यू नहि'** भजन जागृत झाल्यानंतर अल्पमृत्यू येतच नाही. उलट भजन जागृती लक्ष्यापर्यंत पोहचवून स्वरूपस्थ करून

सोडते. **'नहि कवनिउ पीरा-'** ईश्वराची अपौरुषेय वाणी ऐकून निरंतर त्या मार्गावर चालणाऱ्याला काही पीडा होत नाही. जेव्हा भजनात मन लागत नाही तेव्हा पीडा होते. भजन सोडून मन बहकते तेव्हा पीडा होते. मन हे कधीही सुट्टी न घेणारे यंत्र आहे. जर मनाला भजनातून सुट्टी दिली की ते मायेत गुंतून पडेल आणि मग ध्यानातून विचलित होऊन खूप पीडा देईल. जेव्हा आम्ही भजनाबाबत बेदरकार राहतो तेव्हा पीडा होते. परंतु इष्टाच्या आज्ञेने निरंतर चालणाऱ्या पथिकाला कोणतीही पीडा होत नाही. **'अल्पमृत्यू नहि कवनिउ पीरा'**.

**'सब सुन्दर सब विरुज सरीरा'** रामाच्या राज्यात सर्व सुंदर होते. कोणी काऱ्या डोळयाचा, कुबडा, पांगळा नव्हतेच का? वृध्द, तरुण, मुले सर्व एकसारखेच सुदंर होते का? असे काही नाही. आपण जसे-जसे निश्चित विधीनुसार चिंतनाला लागाल तसे ईश्वरीय कांती आपणात उतरायला लागेल. आपल्याला प्रभुचे प्रतिबिंब प्राप्त व्हावयास लागेल. तेच आपले सौंदर्य आहे. शरीरात भले कोणते सौंदर्य असते? शरीर म्हणजे काही आपण नव्हे. शरीर तर आपल्याला काही दिवसांसाठी मिळालेले ठिकाण आहे, त्याला सुंदर आणि कुरूप म्हणण्यात वा बनविण्यात आपण आपला बहुमूल्य वेळ नष्ट का करता? कोटयावधी प्रयत्नांनंतरही ह्या शरीराला नष्टच व्हायचे आहे. रामकृष्ण परमहंस, शंकराचार्य इत्यादी अल्पवयातच गेले. शरीराची सुदंरता हे आपले लक्ष्य नाही. ते तर **'साधन धाम मोच्छ कर द्वारा ।'** साधना करण्यासाठी मिळाले आहे. मानव शरीर हा मुक्तीचा दरवाजा आहे. ते साधना करण्याकरीता मिळाले आहे. **'सब बिरुज सरीरा'**-जसे-जसे आपण ह्या मार्गावरून चालाल, तसे काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादी मानसिक रोग कमी होत जातील, आरोग्य रूप प्राप्त होत जाईल, जे आपले सहज रूप आहे.**'नहिं दरिद्र कोउ'**-ईश्वर-पथावर कोणी दरिद्री नसतेच. हातात कमंडलू, एक काठी ह्यामधे कोणती श्रीमंती आहे? वास्तविक आत्मिक संपत्तीच स्थिर संपत्ती आहे. अपौरूषेय वाणी ज्याने ऐकली, समजून घेतली तो निरंतर भजनात लीन होतो. तो जो जो भजनात लीन होईल तो ती आत्मिक संपत्ती त्याच्यात उतरत जाईल. ईश्वरीय अनुभूती त्याला होईल. त्यामुळे तो सदा समृध्द बनतो. **'नहि कोउ अनबुध'** तो ज्ञानी बनतो, त्याला कोणाला विचारायची जरूर नाही. ईश्वरविषय-जाण आपोआप त्याच्या हृदयात प्रकट होते व तेथूनच भगवत्पथाचा निरंतराचा पथिक बनतो. भगवत्पथाच्या मार्गावर चालणाऱ्या पथिकामध्ये जे गुण हवे असतात ते सर्व रामराज्यातील रहिवाश्यांच्या मध्ये आहेत.

**'सब गुज्ञ पण्डित सब ज्ञानी । सब कृतज्ञ तही कपट सयानी ।'** सर्वजण गुणी, पंडित आणि ज्ञानी आहेत. शूद्र ही पंडित, वैश्यही पंडित, क्षत्रिय व ब्राम्हणही पंडित आहेत. तो ज्या श्रेणीचा आहे, त्यामध्ये साधना कशी करावी ह्याची अनुभूति त्याच्याजवळ आहे. कारण हा वेद-पथ आहे. वेद म्हणतात जाणण्याला. जो परमात्मा अविदित आहे, अदृश्य आहे, क्रमाक्रमाने तो ज्ञात होणे, त्याला वेद म्हणतात. ईश्वराने स्वतः समजावले तरच समजू शकते.

परमेश्वर सांगतात की तुम्ही कोणत्या स्तरावर आहात. शूद्र श्रेणीचे असाल तर त्या स्तरावरून, वैश्य श्रेणीचे असाल तर त्या स्तरावरून, संघर्ष झेलण्याची क्षमता असेल तर त्या स्तरावरून ईश्वर समजावतात. त्यामुळे चारही श्रेणींचे लोक गुणज्ञ आहेत. साधनेचा पूर्ण बोध त्या सर्वांना आहे. सर्व ज्ञानी आहेत. **'सब कृतग्य नहिं कपट सयानी।'** थोडयाशा उपकारांचीही परतफेड करायला तत्पर होते. रामराज्यातील या साधकांमध्ये कपट नव्हते. धोकेबाजपणा तेथे बिलकूल नव्हता. 'सब ज्ञानी' याचा अर्थ लोक असा करतात की किती अध्ययन केले आहे? परंतु योग-साधनेत ज्ञान म्हणजे ईश्वराने आपल्याला काय शिकवले ते समजून घेणे-त्याला ज्ञान म्हणतात.

गीतेत १३/११ मध्ये म्हटले आहे. **'अध्यात्म ज्ञान नित्यत्वं तत्त्वज्ञानार्थ दर्शनम्। एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा।।'** आत्म्याच्या आधिपत्याखाली निरंतर चालावे. भगवान काय म्हणत आहेत हे समजून घेऊन त्यानुसार चालणे म्हणजे ज्ञानाची सुरूवात आहे आणि त्याच्या निर्देशाने चालत असताना तत्त्वरूप परमात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन व त्याबरोबरच ईश्वराविषयीचे ज्ञान प्राप्त होणे म्हणजे ज्ञानाची पराकाष्ठा होय व त्याच्या विरुध्द जे घडते ते अज्ञान होय. म्हणूनच रामराज्यामध्ये सर्व ज्ञानी आहेत.

**'राजघाट सब विधि सुन्दर वर। मज्जहि जहाँ वरन चारिउ नर।।'**

राज या शब्दाचा अर्थ लोक क्षत्रिय असे समजतात. उदा.एखादा महात्मा क्षत्रिय असेल तर त्याला राजर्षी म्हणतात. जर ब्राम्हण असेल तर ब्रह्मर्षी म्हणतात. दुसऱ्या जातीत एखादा महात्मा झाला तर त्याला काय म्हणायचे ते भगवान जाणे. रामराज्यात यजनपूर्ण स्वरच शरयू आहे. आज आपणास भजनाला-साधनेला आरंभ करायचा असेल तर श्वासावर ध्यान केंद्रित करायला हवे. कोणी कोणी दहा दहा वर्षे वाटचाल करीत आहेत, पण अजून श्वासावर लक्ष ठेवूनच भजन सुरू आहे. असो रामराज्याकडे पुन्हा वळू या. तेथे एकच घाट होता. भजन साधना करण्याची एकच पध्दत होती. आरंभी श्वास पकडता येत नाही तेव्हा मध्यमा व वैखरी चालते. तेव्हा श्वासावर पकड येते तेव्हा पश्यन्ति व परा यांचा क्रम लागतो. साधनेला प्रारंभ केलेले साधक नुकतेच भगवत्पथावर प्रवेश करीत आहेत तेव्हा त्यांचे ज्ञान कमी-अल्प असल्याने ते शूद्र आहेत. ते दहा तास भजनात बसतील पण दहा मिनीटेही स्वतःचे मन शांत ठेवू शकत नाहीत. म्हणून ते शूद्र-अल्पज्ञ आहेत. वैश्य श्रेणीचा मध्यम साधक पन्नास टक्के यश प्राप्त करू शकतो. त्यापेक्षा उन्नत असणारा क्षत्रिय साधक विकारांना कापून टाकत श्वासात पश्यन्ति श्रेणी प्राप्त करून घेतात आणि तीन चतुर्थांश रस्ता काटतात. जेथे विकार शांत होतात तेव्हा परामध्ये प्रवेशाबरोबर ब्राह्मणत्व प्राप्त करतात. चारी वर्णांचे लोक या यजनपूर्ण शरयूत अवगाहन करतात.

वास्तविक वर्ण योग-साधनेचे चार सोपान आहेत. एकाच भगवत्पथाला चार श्रेणींमध्ये विभाजित केले आहे. प्रथम श्रेणीवर प्रवेश करणारा पथिक क्रमशः उत्थान करत करत चौथी

श्रेणी पार करून ईश्वराचा महिमा प्राप्त करून ब्रह्मर्षी पदाला पोहचतो. याच कारणामुळे जन्माने ब्राह्मण नसलेले विश्वामित्र, वाल्मीकी, व्यास, कण्व, भरव्दाज, श्रृंगी हे सर्व ऋषी ब्रह्मर्षी पदाला पोहचले. वाल्मीकी रामायणात राम जेव्हा शबरीला भेटायला गेले तेव्हा त्यांनी तिला विचारले तुमची तपश्चर्या चांगल्या प्रकारे सुरू आहे ना? जे व्रत तुम्ही घेतले आहे ते व्यवस्थित निभावले जात आहे ना? गुरूजनांच्या सेवेचे फळ तुम्हाला मिळाले ना? तेव्हा शबरी श्रीरामाच्या चरणावर मस्तक ठेवून म्हणाली, ''प्रभू, आज आपल्या दर्शनाने माझी तपस्या पूर्ण झाली आहे. व्रत पूर्ण झाले आणि आपल्या भेटीच्या रूपाने गुरूजनांच्या सेवेचे फळही मला मिळाले.''

रामचरितमानसमध्ये आपला परिचय देताना शबरी म्हणते, **'अधम ते अधम अति नारी ।'** एक तर अधम ज्ञातीतील, त्यातून अधम स्त्री त्यातून अशिक्षित व बुध्दिहीन अशी मी आहे. यावर श्रीराम म्हणाले, ''शबरी, मी केवळ भक्तीचे नाते जाणतो. या चराचरात कोणीही असो स्त्री असो, पुरूष असो की नपुंसक असो मला जे सर्वभावे भजतात हृदयपूर्वक माझी भक्ती करतात ते मला प्रिय असतात. भक्ती नऊ प्रकाराने करतात. **'प्रथम भगति संतन्ह कर सांगा ।'** इत्यादी या पैकी कोणत्याही प्रकाराने जो माझी भक्ती करतो तो मला प्रिय आहे. माता शबरी तुम्ही तर भक्तीच्या नऊही अंगांनी परीपूर्ण आहात. तुम्ही माझ्या धामी जा'' जर शुद्राला भजनाचा अधिकार नसेल तर शूद्र स्त्रीला कोठून असणार? पण येथे शबरीला अधिकार होता. म्हणजे रामाच्या राज्यात शूद्र लोक होते, पण प्रकांड पंडित होते; शूद्र धनवान होते, शूद्र होते पण रोज स्नान-पूजा करणारे होते. जर आमचे भजन (भक्ती) जागृत नसेल, अपौरुषेय वाणी आमच्यात उतरत नसेल, त्या भगवंताला समजून घेऊन **'चलहि सदा-'** भगवत्पथावर जर सतत चालता येत नसेल तर आम्ही शूद्र तर सोडाच पण आम्ही फक्त जड जीव मात्र आहोत.

**।। ॐ श्री सद्‌गुरू भगवान की जय ।।**

# शम्बूक ?

भगवान राम आत्म्याचे मार्गदर्शक बनले असताना साधक जेव्हा साधनेला सुरूवात करतो तेव्हा तो अल्पज्ञ (शुद्र) असतो.

तो शम्बूक संसाररूपी वृक्षावर (गर्भवासात) उलटा लटकला आहे; परंतु स्वतः पुर्णपुरूष असल्याचे सोंग त्याने घेतले आहे.

शम्बूकाने असे करताच ब्राह्मणाचे मूल मरून गेले. याचा अर्थ असा की त्या अल्पज्ञ असणाऱ्याची मती कुंठित झाली व त्याच्या हृदयात ब्रह्म चिंतन जागृत झाले.

भगवान राम अंतःकरणात प्रविष्ट झाले तेव्हा त्यांनी त्याच्या हृदयातील उणीव काय आहे ती शोधून काढली व त्यागरूपी तलवारीने व अपौरुषेय प्रेरणेव्दारे शम्बूकाला खाली पाडले आणि मग शम्बूकाचे ब्रह्मचिंतन पूर्ववत सुरू झाले.

अशा प्रकारे शम्बूक म्हणजे रामचरित मानसातील एक यौगिक शब्द आहे.

**- स्वामी अड़गड़ानन्द**

# शम्बूक?

सर्वप्रथम भारतानेच जगाला एकता शिकवली. सर्वप्रथम वैदिक ऋषींनी गर्जून सांगितले, **'श्रृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्राः'** हे अखिल विश्वातील बांधवांनो, तुम्ही अमृताचे म्हणजे त्या अविनाशी ईश्वराचे पुत्र आहात. एकतेचे हे सूत्र जगात अन्यत्र कोठेही नव्हते. परंतु आज जगात भेदभेदाने पोखरून निघालेला भारतासारखा दुसरा देश अन्यत्र नाही. बुध्दिजीवी लोकांनी सामान्य लोकांना आपसात लढत ठेवून त्यांच्या विकासाचा चक्काचूर करून टाकला आहे. त्यांनी अमुक लोकांना सांगितले की तुम्ही तेली आहात, तुम्ही कुंभार आहात, तुम्ही क्षत्रिय आहात, तुम्ही ब्राह्मण आहात. अशा प्रकारचा भेदाभेद भारतात पूर्वी कुठेही आढळून येत नव्हता. आज भारतात सर्वत्र सवर्णांची व शूद्र वर्णाची लढाई सुरू आहे. मागास जातीच्या लोकांत आज अनामताच्या (आरक्षणाच्या) प्रश्नावरून वितंडवाद सुरू आहे असा प्रकार रामराज्यात नव्हता. एकदा काशीमध्ये एक नेता म्हणाला, ''रामाने आमच्या शम्बूकाचा वध केला. रामाचे हे कृत्य दोषार्ह आहे, म्हणून मी रामाला दोषी समजतो.'' वास्तविक रोज हजारो लोक मारले जात आहेत. मद्रास येथे नुकत्याच घडलेल्या एका घटनेत अनेक हरिजन मारले गेले. तेथील मुलांना भाकरीचा तुकडा तरी तुम्हाला खायला मिळाला का? असे कोणी विचारले सुध्दा नाही आणि येथे आमचे हे जनतेचे नेते हजारो वर्षांपूर्वी मारल्या गेलेल्या शम्बूकासाठी शोक करत आहेत. अर्थात समाजात फूट पाडण्यासाठीच शम्बूकाचा वापर केला जात आहे. या बोलणाऱ्यांना शास्त्राचे ज्ञान नाही आणि होऊही शकणार नाही.

शास्त्रात म्हटले आहे **'यह चरित्र जानहि मुनि ज्ञानी ।'** गोस्वामी तुलसीदासांनी वचन लिहून पुढे ते म्हणतात की हे चरित्र फक्त ज्ञानी मुनीच जाणतात. बाकीच्या लोकांत ही क्षमताच नसते. **'यह शुभ चरित जान पै सोई । कृपा राम की जा पर होई ।।' परंतु** ज्यांच्यावर श्रीरामाची कृपा आहे त्यांच्यात हे चरित्र जाणण्याची क्षमता असते. सध्या निवडणुकीचे गरमागरम वातावरण आहे. त्यामुळे हे नेताश्री श्रीरामाचा असा उल्लेख करत आहेत की जणू भगवान श्रीराम त्यांचे शेजारी आहेत ! ते म्हणतात की मी रामाला दोषी समजतो. वा ! रावणही असे म्हणत होता. स्वतःला हे नेताश्री ज्ञानी समजतात की तपस्वी मुनी समजतात?

भगवान श्रीरामाच्या काळात माणसामाणसात भेदाभेदाची खाई निर्माण करणाऱ्या आजच्या प्रचलित जाती तेव्हा नव्हत्या. वर्ण म्हणजे योग साधनेच्या चार पायऱ्या आहेत. जर आम्हाला योग साधनेचे ज्ञान नसेल व योगक्रिया समजून घेऊन आम्ही त्याप्रमाणे कधी दोन पावलेही टाकली नसतील तर कोणत्याही वर्णामध्ये आमचा समावेश होऊ शकत नाही. साधना करू लागल्यानंतरच वर्ण प्राप्त होत असतात. ज्याने साधनेचे ज्ञान करून घेऊन साधनेला सुरूवात केली तो शूद्र भाग्यवान बनतो. कारण योगक्रियेचे केवळ ज्ञान घेण्यात काही अर्थ नाही. त्याप्रमाणे आचरण करणे महत्त्वाचे आहे. मांणसांचे उच्च-नीच अशा प्रकारचे विभाजन म्हणजे 'वर्ण' असे कधीच अभिप्रेत नव्हते. असे असले तर ब्रह्मर्षीपद कोणा व्यास, जोशी, दुबे सारख्या ब्राह्मणाला मिळाले असते. परंतु त्या युगात एकही ब्रह्मर्षी ब्राह्मण परिवारात निर्माण झालेला नाही. त्या काळात जेवढे ब्रह्मर्षी झाले ते नदीत, जंगलात, टोपलीत अशा ठिकाणी सापडलेल्या अनाथ मुलांमधून झालेले आहेत. कदाचित काही संस्कारी स्त्रियांच्या हातून घडलेल्या चुकीमुळे ही मुले जन्मली असतील. उदा. कुंतीने विवाहपूर्व झालेल्या कर्णाचा परित्याग केला होता. त्याच प्रकारे शृंगी ऋषी हरिणांच्या एका कळपात पडलेले सापडले होते. मांडव्य ऋषींचे लक्ष त्या मुलाकडे गेले. त्यांनी मुलाचे पालन केले. त्याच्याकडून अध्ययन करून घेतले. त्याला ब्रह्मचिंतनाची विद्या दिली. तो मुलगा शृंगी ऋषी झाला. पुढे ब्रह्मर्षी झाला. म्हणजे सामाजिक कुलीनता, कुटुंबाचे श्रेष्ठत्व या गोष्टींशी येथे काहीच संबंध नव्हता. बृहस्पती व उतथ्य यांचा मुलगा भरद्वाज ऋषीही नदीमध्ये एका पेटीत सापडले होते. वरुणाने ती पेटी पकडली, असे वाटते की त्या युगात केवटांची पवित्र जात वरुण असावी. वरुणाने त्या मुलाचे पालन पोषण केले. भरद्वाज अत्यंत प्रतिभासंपन्न व विद्वान निघाले.

त्या वेळी आर्यावर्तात महाराज भरताचे शासन होते. त्यांना जेव्हा दिसून आले की आपल्या एकाही मुलात राज्य करण्याची क्षमता नाही, तेव्हा त्याने भरद्वाजाला दत्तक घेतले. त्याला राज्याभिषेक केला. भरद्वाज अंत्यत संस्कारी होते. सर्व वैभवाचा त्याग करून ते प्रयाग येथे गेले. प्रख्यात ऋषी झाले. याचप्रमाणे ब्रह्मर्षी वशिष्ठ उर्वशीचे पुत्र होते. नारद दासीपुत्र होते. वाल्मीकी कोळी होता. विश्वामित्र ऋषी हे प्रथम विश्वरथ नावाचे क्षत्रिय नरेश होते. त्यांनी वशिष्ठ ऋषींशी भीषण युध्द केले. पण विश्वामित्र हतबल झाले; तेव्हा विश्वामित्र म्हणाले, "क्षात्रबळाचा धिक्कार असो. ब्रह्मबळ हेच खरे बळ आहे. मी ब्रह्मसामर्थ्य प्राप्त करेन." त्यांनी तपश्चर्येला सुरूवात केली. ईश्वराने त्यांची तीन वेळा घेतलेल्या परीक्षेत ते अयशस्वी झाले. तेव्हा त्यांनी ईश्वराची कळकळीने आराधना केली व मगच ते यशस्वी झाले.

अशा प्रकारे जेवढे ऋषी, महर्षी आणि ब्रह्मर्षी होऊन गेले ते शुद्र वर्णतील होते. महर्षी अगस्तीसुध्दा एका घड्यात सापडले. ही परंपरा द्वापार युगात सुरू होती. वेदव्यास हे कुमारिकेचे पुत्र होते. त्या युगात त्यांच्या इतका श्रेष्ठ महर्षी कोणी नव्हता. जर जातीनुरूप

वर्णव्यवस्था असती तर एखाद्या ब्राह्मण कुटुंबातून महर्षी झाला असता. अहो, एकसुध्दा ब्राह्मण महर्षी नाही. यावरून स्पष्ट होते की त्या वेळी सामाजिक जातिव्यवस्था नव्हती. मात्र मनुस्मृती कलीयुगीन समाजव्यवस्था सांगताना सांगते की ब्राह्मण परिवारात जन्म घेणाराच ब्रह्मर्षी होऊ शकतो. क्षत्रिय कुळातील व्यक्ती राजर्षी होऊ शकते; पण ब्रह्मर्षी होऊ शकत नाही. वैश्याने भजन करावे, पण तो कधी ऋषी होऊ शकत नाही. काय म्हणावे या विधानाला? अहो, आमचे सगळे ब्रह्मर्षी शूद्र वर्णात जन्मलेले होते. त्या काळात अशा प्रकारची जातिव्यवस्था नव्हतीच. **'बडे भाग मानुस तन पावा-'** मोठ्या भाग्याने हा मनुष्य-देह प्राप्त झालेला आहे. मग शूद्रांची उपेक्षा का करायची?

महर्षी वाल्मीकीविषयी रामायणात म्हटलेले आहे की **'उलटा नाम जपत जग जाना । वाल्मीकी भए ब्रह्म समाना ।'** रामाचा राम ऐवजी मरा अशा उलट नामाचा जप करून वाल्मीकींनी ब्रह्मसमान स्थिती प्राप्त करून घेतली. या चौपाईच्या खाली वाल्मीकीचा परिचय करून देताना गोस्वामी तुलसीदास म्हणतात-

**'शबर श्वपच खस जमन जड, पामर कोल किरात ।।**
**नाम लेत पावन परम, होत भुवन विख्यात ।।'**

कोळी वंशात दस्यू (चोर) रत्नाकरास संतांचे सानिध्य प्राप्त झाले. प्रथम तर तो त्या महापुरूषाला लुटण्यास धावला. परंतु त्या सज्जनाच्या कृपेने त्याला योग साधनेचे ज्ञान प्राप्त झाले. साधना त्याच्या हृदयात ठसली आणि लुटारू ब्रह्मर्षी पदापर्यंत पोहोचला. वनवासात जाताना श्रीरामांनी अनेक ऋषींचे दर्शन घेतले. अनेक ऋषींनी रामाचे चरण-दर्शन घेतले. कुठे कुठे भगवान श्रीरामांनी आदराने ऋषींना नमस्कार केला. कुठे हात वर करून आशीर्वाद दिला, कोठे मस्तक झुकवले, कोठे मस्तक टेकले, परंतु काही महान विभुती अशा होत्या की श्रीरामाने त्यांना साष्टांग दंडवत घातला. उदाहरणार्थ **मुनि कहँ राम दण्डवत कीन्हा । आसिरवाद विप्रवर दीन्हा-** मुनी वाल्मीकींना श्रीरामाने दंडवत घातला. मुनींनी श्रीरामाला आशीर्वाद दिला. आता हे वाल्मीकी ब्राह्मण गोत्रातले होते का? अहो, एकही ब्रह्मर्षी असा नाही की ज्याचा संबंध जातीगत कुलीनतेशी आहे.

सारांश श्रीरामाच्या काळात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा सामाजिक जातीच नव्हत्या. वास्तविक ही व्यवस्था म्हणजे साधनेतील आंतरिक क्षमतेचे नामकरण होते. ज्याप्रमाणे आजकाल आई.ए.एस, पी.सी.एस. ही अक्षरे जशी पूर्ण शब्दाऐवजी प्रथम येतात त्याप्रमाणे साधनेच्या प्रशिक्षणाचा प्रारंभिक चरण शूद्र हा आहे. शूद्र म्हणजे साधनारूपी शिडीची पहिली पायरी आहे. लाखोंमधून एखादाच भाग्यवान मनुष्य ही शिडी यशस्वी रीतीने चढू शकतो.

रामराज्यात एकदा एका शूद्राच्या हातून चूक झाली. त्याचे नाव होते शम्बूक ! तो एका फांदीवर खाली डोके वर पाय करून तपश्चर्या करीत होता. त्याने अशी तपश्चर्या सुरू करताच एका ब्राह्मणाचे मूल एकाएकी मरण पावले. रामराज्यात अशी अशुभ घटना घडल्याने एकच गोंधळ उडाला. या घटनेमागे काय कारण असावे याचा शोध ऋषीं-मुनींनी सुरू केला आणि त्यांनी असे अनुमान केले की कोणी शूद्र व्यक्ती तपश्चर्या करीत असावी; पण ते त्याला पाहू शकत नव्हते. रामाने त्या व्यक्तीला शोधून काढले व 'तू असे तप का करीत आहेस?' असे विचारले. शम्बूक उत्तरला-'मला सदेह वैकुठधाम जायची इच्छा आहे. अर्थात शरीरासह ईश्वराचे स्वरूप मला प्राप्त करायचे आहे. रामा, तुझे सदैव कल्याण हो ! मात्र मी शूद्र आहे हेही लक्षात ठेव.' रामाने तलवार उपसली व त्याला झाडावरून प्रथम खाली पाडला. नंतर त्याचा शिरच्छेद केला. त्या क्षणी ते ब्राह्मण मूल जिवंत झाले. देवतांनी दुदुंभी वाजवल्या. बिघडू लागलेल्या धर्माची पुनर्स्थापना झाली.

वा ! काय सर्जरी होती ! असा इलाज तर कधी आम्ही ऐकला नाही. न जाणे केव्हा मरून पडलेले ब्राह्मणाचे मूल जिवंत झाले? एकाचा गळा कापून टाकला व दुसरा जिवंत झाला? अगदी असंभव ! शूद्राला मारल्यावर ब्राह्मणाने पुनर्जीवित व्हावे ! आश्चर्य ! आश्चर्य !! अहो, आपल्या येथे कोणी पंडित जिवंत होतो का? वास्तविक हे शम्बूक प्रकरण काय आहे?

वास्तविक रामायण किंवा रामचरित मानस हा रहस्यमय ग्रंथ आहे. यातील सर्व कथांचा अर्थ प्रत्यक्षतः घेतला तर रामायण कधी उकलणारच नाही. उदाहरणार्थ रामायणात सांगितले आहे की सीतेने स्वतःचे पावित्र्य सिध्द करण्यासाठी अग्निस्नान केले. अग्नी शांत झाल्यावर सीता शांतपणे बाहेर आली. आज असे अग्निस्नान शक्य आहे का? अशा दिव्य प्रयोगात कोणी जिवंत राहू शकेल का? काही लोक म्हणतात की, रामाने सामान्य माणसासारखे आचरण केले. पण सामान्य मनुष्याला तर हे अशक्य आहे. एखाद्या कुमारिकेची परीक्षा घेण्यासाठी तिला आज धगधगत्या अग्नीत बसवले तर ती जिवंत राहील का? मग सीतेची अग्निपरिक्षा म्हणजे काय?

खरी गोष्ट अशी आहे की सीतेची अग्निपरिक्षा, शम्बूक प्रकरण, हे प्रसंग म्हणजे आध्यात्मिक रूपक आहे. शास्त्र दोन प्रकारे रचले जाते. एक इतिहास कायम राखण्यासाठी लिहिले जाते म्हणजे त्यायोगे लोकांना आपल्या पूर्वजांचा आदर्श ठेवून त्यांचे अनुकरण करता येईल. परंतु चांगल्या प्रकारे खाऊन-पिऊन आयुष्य घालवण्याने आयुष्याचे कल्याण होत नाही. कर्तव्याची पूर्तीही होत नाही. म्हणून शास्त्राचा दुसरा पैलू आहे. अध्यात्म ! जीव मायेने वेढलेला आहे. त्या आवरणातून बाहेर काढून जो त्याला योग्य मार्गावर नेतो, जो ईश्वर त्याला उठवतो, बसवतो, चालायला शिकवतो, ज्ञान देतो त्याचे नाव अध्यात्म ! संपूर्ण रामायण हा एक

अध्यात्मिक ग्रंथ आहे. त्याचे दुसरे नाव रामचरित मानस असे आहे. अंतःकरणाला मानस असे म्हणतात. त्यामुळे त्यात अंतःकरणातील वृत्तींचे चित्र आहे. रामचरित म्हणजे रामाचे चरित्र, कोणते चरित्र? अयोध्येत जन्मलेल्या, वनवासगमन केलेल्या, लंकेत युध्द केलेल्या, पृथ्वीवर त्याच्या बाबत ज्या घटना घडल्या त्या रामाचे चरित्र? नाही, ते चरित्र नव्हे. मानस म्हणजे अंतःकरण-मन. या अंतःकरणात प्रवाहित झालेल्या रामाचे चरित्र ते रामचरित मानस. ते चरित्र सर्वांच्या अंतःकरणात आहे पण प्रत्यक्ष दिसत नाही. रोज आपल्याला दिसते ते लोभी वृत्तीचे चरित्र, मोहाचे चरित्र, कामवासनेचे चरित्र किंवा क्रोधाचे चरित्र दिसते. मग हे सुप्त असणारे रामचरित्र आपल्या अंतःकरणात कशा प्रकारे जागृत करता येईल? व जागृत झाल्यावर रामापर्यंतचे मधले अंतर कशाप्रकारे कमी करता येईल? तसेच रामस्वरूप स्थिती तुम्ही कशा प्रकारच्या साधनेद्वारे प्राप्त कराल या सर्वांचे उत्तर तुम्हाला रामायण सांगते. साधनेला सुरूवात केली नसेल तर श्रेणी कोठून प्राप्त होईल?

शम्बूक प्रकरणात भगवान राम न्यायकर्ता होते. अयोध्येतील सुखाचा त्याग करून भगवान श्रीरामाबरोबर छायेप्रमाणे वावरणाऱ्या, राम झोपल्यानंतरही सतत जागृत राहून रामाचे प्राणपणाने रक्षण करणाऱ्या लक्ष्मणाने एक दिवस न्याय डावलला तर रामाने त्या प्राणप्रिय लक्ष्मणाचाही त्याग केला. स्वजनांचा त्याग मृत्यूदंडाप्रमाणे भयंकर असतो. तेव्हा लक्ष्मणाने शरयू नदिच्या तटावर अठरा दिवस उपोषण करून या इहलोकाचा त्याग केला. त्याच प्रमाणे अयोध्येच्या साम्राज्य वैभवाचा त्याग करणारी, रामाच्या छायेप्रमाणे रामाबरोबर राहणारी, स्वर्णमयी लंकेलाही कस्पटासमान तुच्छ लेखणारी, अग्निपरीक्षेतून बाहेर आलेली सीतेसारखी सहधर्माचारिणीही न्यायाच्या कसोटीला आली तेव्हा जनहिताचा विचार करून रामाने तिचाही त्याग केला. एवढेच नव्हे तर त्यांनी स्वतःलादेखील दंडित केले. जगातील एकमात्र महान सम्राट श्रीराम न्यायदेवतेचा सन्मान करण्यासाठी सिंहासनासीन होत असत. बाकी ते गवताच्या चटईवर बसत व झोपत असत. जर पत्नी सीता पर्णशय्येवर झोपत असेल तर आपल्यालाही तशाच शय्येचा उपयोग केला पाहिजे. मऊ शय्येचा अधिकार आपल्यालाही नाही असे श्रीराम समजत असत. एका कुत्र्याने एका ऋषीवर आरोप केला तेव्हा, रामाने त्या ऋषीलाही शिक्षा केली. असा न्यायप्रिय, महान सम्राट चूक झालेल्या व्यक्तीला जवळ पोटाशी धरेल हे शक्य आहे? न्यायाधीशही कधी पक्षपात करू शकतो का?

रामराज्यात आजच्या प्रमाणे आरक्षणाची व्यवस्था होती की काय? नाही, रामाच्या राज्यात केवळ एकाच प्रकारचे आरक्षण होते ते म्हणजे सर्वांगीण सुख आणि अक्षय धाम ! आज एकाला आरक्षण प्राप्त झाले तर दुसरा सूडभावनेने व अतीव दुःखाने पेटून निघतो. रामराज्यात असे कधीच नव्हतेच. **'नही दरिद्र कोउ दुखी न दीना। नहिं कोउ अबुध न लच्छन हीना ।।'**

रामाच्या राज्यात कोणी दरिद्री नव्हते सर्वजण समृध्द होते. कोणीही दुःखी नव्हते. सर्व समंजस, ज्ञानी व आनंदी होते. मग राखीव जागांचा कोटा कसला? जेव्हा कोठे कमी पडते तेव्हा आरक्षणाचा प्रश्न निर्माण होतो. त्या जमान्यातील ब्रह्मर्षी आजच्या सारख्या तथाकथित कुलीन व श्रेष्ठ जातीतून आलेले नव्हते. यावरून सिध्द होते की रामराज्यात वर्ण-व्यवस्थेच्या नावावर व्यक्तीचे विभाजन केले जात नव्हते. जर बाह्य समाजव्यवस्थेतच वर्ण-प्रथा नव्हती तर मग राम कोणा शूद्राचा वध कसा करेल? यावरून स्पष्ट होते की शंबूकाच्या प्रकरणात कोणताही सामाजिक संदर्भ नव्हता किंवा भौतिकही संदर्भ नव्हता. मग रामायणातील या शंबूक प्रकरणाचा अर्थ काय असावा?

शम्बूकाचा अर्थ समत्व वृत्ती असण्याचे ढोंग करणारा शूद्र. हा साधनेचा प्रथम चरण आहे. तो अल्पज्ञ असतो. तो दहा तास डोळे बंद ठेवतो परंतु दहा मिनिटेही मन स्थिर ठेवू शकत नाही, म्हणजे डोळे बंद करून ध्यानाचे व्यर्थ ढोंग करतो. जर पूजनच होत नसेल तर ध्यानस्थ होऊन तो काय करत असतो? केवळ डोळे बंद करून भजन होत नसते. तर मग तो स्वतःचा वेळ वाया दवडतो का? मग भजन कुठून सुरू करावे? गीतेत सांगितले आहे, ''**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावंजम् । (१८/४४ )**'' ज्यांनी ईश्वराला जाणले आहे जो तत्त्वादर्शी आहे अशा महापुरूषांची सेवा करण्याने ईश्वराच्या भजनाची योग्यता अंतःकरणात येत राहील. मनात भजनाची तीव्रता जशजशी वाढत जाईल तसतशी साधकाला वरची श्रेणी प्राप्त होत जाईल.

अल्प ज्ञानी साधकांच्या हातून चुका होतात. ''**सोचिय शुद्र विप्र अवमानी । मुखर मान प्रिय ज्ञान गुमानी ।।**'' जो शूद्र वाचाळ असतो, ज्याला केवळ मान-सन्मान प्रिय असतो, जो दांभिक असतो, जो विप्राचा अपमान करतो तो स्वतःच्या आचरणाने सर्वांना दुःख देतो. त्याचे आचरण क्लेशकारक असते. परंतु शुद्र काळ दरम्यान अशा प्रकारचे दोष असतात.आत्मतत्त्वाचे ज्ञानी महर्षी काकभुसूण्डी जन्माने प्रथम शुद्र होते. नंतर साधनेत प्रवेश मिळाला, पण गुरूजींचा त्यांच्या हातून अपमान झाला. महर्षी काक आपला परिचय सांगताना म्हणतात, '**धन मद मन परम वाचाला । उग्र बुध्दि उर दंभ विशाला ।।**' मला माझ्या तेजस्वी बुध्दिमत्तेचा खूप गर्व होता ''**हरिजन व्दिज देखे जरउँ, करऊँ विष्णु कर द्रोह ।**'' एकदा माझे गुरूदेव आले. मी शिवनामाचा जप करत होतो. दंभवश मी त्यांना उत्थान देऊन प्रणाम केला नाही. ज्या भगवंताचे ते सेवक होते त्यांचा अपमान करून मी माझ्याच आत्म्याचा शत्रू बनलो. त्यांनी मला शाप दिला- ''हे पापी, अजगरासारखा बसून राहिलास. जा तू अजगरच बनशील.'' सारांश शुद्राकडून (शूद्र काळात) चूक होऊ शकते. अन्य श्रेणिंचे....साधक (वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण) कधी चूक करीत नाहीत. तेथे माया त्यांना धोका देऊ शकते. मोठे विघ्न आणू शकते, पण तो साधक चूक करू शकत नाही. तेथे शूद्राकडूनच चूक होते व ते स्वभाविक आहे.

रामाच्या राज्यात अर्थात भगवान जेव्हा आत्म्याचे मार्गदर्शक बनतात अशा अवस्थेत प्रवेश केलेला साधक हा शूद्र अवस्थेतला म्हणजे शम्बूक असतो. तो समत्वाच्या भावनेचा आश्रय घेतो. त्याने स्वतःला वृक्षावर उलटे टांगून घेतले होते. **'संसार विटप नमामहे,' 'ऊर्ध्वमूल मधः शाखम्'** ज्याचे मूळ वर आहे व मूळ म्हणजेच परमात्मा असून सर्व पशू, पक्षी, कीटकरूपी प्रकृती ज्याच्या शाखा आहेत असा संसार हा एक वृक्ष आहे. या संसारवृक्षावर शंबूक गर्भवासातल्या अवस्थेत उलटा लटकत आहे. तो स्वतः अल्पज्ञ आहे; पण आपण पूर्ण पुरूष असल्याचे ढोंग करत आहे. असे ढोंग करताच ब्राम्हण मूल मरून गेले. म्हणजे अंतःकरणात अंशतः जागृत झालेले ब्रह्मचिंतन कुंठित होऊन गेले. न जाणो ते कधी मृतप्राय झाले. ब्रह्मचिंतन, भजन बंद झाले. ऋषींनी कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना कळले नाही. बाहेरून कोणी ढोंगी व कोण खरे हे जाणता येत नाही. परंतु श्रीराम अंतःकरणाचे, आत्म्याचे रथी आहेत त्यामुळे रामाने शम्बूकाचे ढोंग जाणले. मग त्यांनी त्यागरूपी तलवारीने अपौरुषेय प्रेरणेद्वारे त्याचा शिरच्छेद करुन त्याला खाली पाडले व मग ते ब्राह्मण बालक जिवंत झाले. दैवी वृत्ती त्याच्यात पुन्हा प्रवाहित झाली. देवतांनी दुंदुभी वाजवल्या. ब्रह्मचिंतन पूर्ववत सुरू झाले.

या प्रकारे रामायणात कोणी बोट ठेवून प्रश्न करू शकेल किंवा कसला दोष लावू शकेल अशी तीळमात्रही जागा नाही. रामायणात कसलाही भेदभाव नाही, स्पृश्यअस्पृश्यता नाही, तरीही आमच्या शम्बूकाला रामाने मारले असा रामावर आक्षेप केला जातो. वास्तविक रामाने आपल्या आयुष्यात केवट, शबरी, वानर-भालू अशा शूद्र वर्णातील असंख्य लोकांचा व प्राण्यांचा उध्दार केला आहे. एकाही ब्राह्मणाचा किंवा क्षत्रियांचा उध्दार केल्याचा उल्लेख त्यांचा चरित्रात कोठेही सापडत नाही. लक्षावधी अधम अशा सामान्यांना प्रभूने तारले. एका थाळीत त्यांच्याबरोबर जेवले, घासातला घास त्यांना काढून दिला, उष्टी बोरे खाल्ली, त्यांना परमगती प्राप्त करून दिली. त्यांच्या या महानतेचा गौरव करण्याऐवजी त्यांना दोष देत लाखो वर्षापूर्वी कोणी एक शम्बूक मारला गेला तर त्याच्यासाठी आता शोक करायचा असतो का? अरे तो शम्बूक म्हणजे योग-साधनेचे एक रूपक आहे.

आता राहिला जातपात आणि औचित्याचा प्रश्न. वास्तविक पाहाता या जाती म्हणजे पूर्वजांच्या गौरवगाथा आहेत. आमच्या पूर्वजांनी अत्यंत महान कार्य केलेले आहे. ते त्यांना गौरवास्पद आहे.ज्या पूर्वजांनी दोन वेदांचे अध्ययन केल त्यांना द्विवेदी म्हणण्यात आले. ज्यांनी तीन वेदांचे अध्ययन केले ते त्रिवेदी झाले. अवघा भारत हा ऋषींमुनींची संतान आहे. त्याशिवाय दुसरी जात नाही. जाती हे व्यवहाराचे दुसरे नाव आहे. ज्याने लोखंडाचे काम केले तर लोहार झाला. सोन्याचे काम करणाऱ्यास सोनार म्हटले गेले व चामड्याचे काम करणाऱ्याला चांभार म्हटले गेले. पोथी सांगणाऱ्याला पंडित म्हटले गेले. शस्त्र धारण करणाऱ्याला क्षत्रिय म्हटले

गेले. काही दिवसांनी गाडी चालवणाऱ्यांना ड्रायवर तसेच इंजिनियर व डॉक्टरांचीदेखील त्यांच्या व्यवसायावरून ती ती जात बनू शकते. पण हा त्यांच्या व्यवसायाचा परिचय आहे त्यांचा धर्म नव्हे. लोक आपल्या मुलांची नावे गुड्डू, चुन्नू अशी ठेवतात. पण जर त्यांचे नाव न ठेवता म्हटले, 'चला मुलांनो, या' तर सगळीच मुलं धावत येतील. म्हणून मुलांना अलग अलग नावाने बोलवण्याची पध्दत आहे. व्यवहारातील पध्दत ! त्याच प्रमाणे धंदा किंवा व्यवसाय म्हणजे धर्म होऊ शकत नाही. परंतु समाजात अशा प्रकारची भ्रांती निमार्ण झाली की, जातींची व्यवस्था ही सनातन व्यवस्था आहे. पुढे काही लोक म्हणू लागले की जाती ह्या ईश्वराने बनविलेल्या आहेत.

सनातन काय आहे याचा आम्ही विचार करायला पाहिजे. फक्त आत्माच सनातन आहे. '**अछेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च। नित्यः सर्वागताः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ धर्म काय आहे? सोइ धर्मज्ञ गुनी सोइ ज्ञाता सोइ महि मंण्डित पंडित दाता ॥ धर्म परायन सोइ कुल त्राता । राम चरन जाकर मन राता ॥**' तो धर्मज्ञ आहे. धर्माचे मर्म, जाणणरा आहे. त्याला धर्माचे विशेष ज्ञान आहे, तो धर्माचा ज्ञाता आहे. कोण आहे तो? एक परमात्मा असणाऱ्या रामाच्या चरणी ज्याचे मन अनुरक्त झाले आहे ती श्रध्दा-भक्ती म्हणजे धर्म ! साधनेच्या जागृतीपूर्वी आम्ही अनेक देवी-देवतांचे पूजन करत असतो. परंतु मनातील जागृतीनंतर एका परमात्म्याचे भजन मनात निरंतर सुरू होते. राम, परमात्मा, सनातन, शाश्वत सर्व एकाच तत्त्वाचे नाव आहे. विविध दृष्टिकोनातून त्या ईश्वराला समजवण्याचा महात्म्यांनी प्रयत्न केला आहे. सद्गुरूला शरण गेल्याशिवाय ईश्वर हृदयात जागृत होत नाही. त्याशिवाय परमात्म्याची चावी सापडत नाही म्हणून ईश्वराला जाणायचे असेल तर कोणा सद्गुरूला किंवा एखाद्या महात्म्याला शरण जावे व त्याची सेवा करावी. सेवा करीत करीत परमात्म्याचा बोध करून देणाऱ्या दोन किंवा अडीच अक्षर असणाऱ्या राम किंवा ओम चा जप करावा, उठता-बसता, पाणी पिताना, खाताना सांराश जीवनातील प्रत्येक क्षणी त्या नावाचा जप करावा. रोज वीस-तीस मिनिटे नियमित वेळ काढून परमात्म्याचे स्मरण करावे. अत्यंत श्रध्देने व समर्पणाच्या भावनेने त्या ईश्वराला विनवावे की हे प्रभू ज्या महात्म्यात आपण निवास करीत आहात त्याचा माझ्याशी परिचय करून द्या. केवळ चर्मचक्षूंनी आम्ही त्याला ओळखू शकत नाही. जेव्हा आपल्यातील व आत्म्यामधील आवरण दूर होईल, पूर्व संस्काराचे मलावरण, विक्षेप नष्ट होतील तेव्हा आपला आत्माच सांगेल की 'पाहा येथे बसले आहेत तुझे गुरूदेव !' आणि जेव्हा सद्गुरू प्राप्त होतात तेव्हा शेष काय उरणार?

'**सद्गुरू मिले जाहि जिमि संशय भ्रम समुदाय** !'

तेव्हा स्त्रियांनी व पुरूषांनी परमात्म्याची उपासना करावी. भेदभावाची वृत्ती कमी करण्याचा प्रयत्न करावा. रामायण तसे सांगत नसेल तर करू नका. गीता, भगवान महावीर, गुरूनानक हे नको सांगत असतील तर तसे करू नका. परंतु त्यांनी भेदभावाच्या वृत्तीचा त्याग करायला सांगितले असल्याने उदार वृत्तीने तसे आचरण करा. विद्वानांनी गोष्टींच्या जागी गीता शिकवावी. गीता मानवाचे धर्मशास्त्र आहे. या गीतेचाच अनुवाद आहे योगदर्शन ! रामचरित मानसदेखील गीतेचाच अनुवाद आहे. रामचरित मानस रहस्यात्मक ग्रंथ आहे; परंतु गीता सरळ व स्पष्ट आहे. गीतेत तर्क नाही जगातील कोणतीही व्यक्ती त्यात सांगितलेल्या तत्त्वज्ञानाकडे टीकेच्या दृष्टीतून बोट दाखवत नाही. कारण साक्षात्कारी परमात्म्याला जाणणाऱ्या महात्म्यांनी गीतेचे अनुसरण केले आहे. आपणदेखील या विश्वातीलच मानव आहात मग तेथे भेदभावाचा विचार कशाला हवा? जेव्हा गीतेला धर्मशास्त्राची प्रतिष्ठा मिळेल त्यादिवशी हे जग एक सूत्रात बांधले जाईल आणि मग एकाच ईश्वराची उपासना करणाऱ्या आर्यांची संख्या जगात सर्वात अधिक होईल. यासाठी आपणा सर्वांनी प्रयत्न करायला हवा. त्यासाठी श्रीमद्‌भगवदगीतेवर आम्ही लिहिलेले भाष्य 'यथार्थ गीता' अवश्य वाचा.

**॥ ॐ श्री सद्‌गुरू भगवान की जय ॥**

# सरस्वती-पूजन

सरस्वतीचा उपयोग केवळ ईश्वराच्या भक्तीसाठी होतो. या सरस्वतींचे म्हणजे वाणीचे प्रेरक ईश्वर आहे. ईश्वर ज्याच्यावर असीम कृपा करतात त्यांच्या हृदयात सरस्वतीचे चैतन्यमयी स्फुरण होत असते.

**- स्वामी अड़गड़ानन्द**

२२ जानेवारी १९९९ मध्ये पिलिग्रिम्स बुक हाऊस वाराणसीच्या उद्‌घाटन समारंभात पूज्य महाराजांनी सरस्वती-पूजनाचे औचित्य या विषयावर केलेले विवेचन.

# सरस्वती-पूजन

बंधुनो,

आज वसंत पंचमी आहे. हा दिवस म्हणजे वंसताच्या आगमनाचे द्योतक आहे. भारतामध्ये सहा ऋतू सांगितले आहेत. ज्येष्ठ व आषाढ ग्रीष्म ऋतू, श्रावण-भाद्रपद वर्षा ऋतू, अश्विन-कार्तिक शरद ऋतू, मार्गशीर्ष-पौष शिशीर ऋतू, माघ-फाल्गुन हेमंत ऋतू व चैत्र-वैशाख वसंत ऋतू-अशा प्रकारे बारा महिन्यांचे सहा ऋतूत विभाजन केले आहे. या ऋतूंमध्ये वसंताला ऋतुराज असे म्हणतात. त्यामुळे वसंताच्या स्वागताची तसेच पूजनाची परंपरा भारतात आहे. या ऋतूमध्ये सृष्टी हरीत तृण-पर्णांनी पल्लवित होते, वृक्ष फळ-पुष्पांनी बहरून जातात. यावन्मात्र सृष्टी सौंदर्याने नटून थटून सजलेली असते. प्राणिमात्रांच्या भरण पोषणासाठी ती बहरलेली असते आणि म्हणूनच आपल्या पूर्वजांनी वसंत पूजनाची सुरूवात केली. आज तोच पवित्र दिवस आहे. आजपासून हळूहळू वसंताचा पदरव सृष्टीवर सुरू होईल. आम्रवृक्षावर मोहोर येण्यास सुरूवात झाली आहे. झाडांना नवीन पालवी फुटू लागली आहे. वातावरणातील प्रसन्नता हे मधुऋतूचे वैशिष्ट्य आहे.

अर्थात, जगात सर्वत्र हे सहा ऋतू दिसून येत नाहीत. चेरांपुंजी येथे फक्त दोनच ऋतू असतात-एक शीत व दुसरा पावसाळा म्हणजे वर्षा ऋतू. तेथे ग्रीष्म ऋतू असतच नाही. तीच दशा इंग्लडची आहे. उन्हाळयात फक्त दोन तास ऊन येते, छतावर येणाऱ्या उन्हासाठी तर शुल्क घेतले जाते. सकाळच्या उन्हात उबदारपणा असतो म्हणूनच त्याचे शुल्क कमी असते. भर दुपारचे ऊन प्रखर असते म्हणून त्या वेळचे ऊन अंगावर घेण्यासाठी जास्त पैसे द्यावे लागतात. इतर देशांमध्ये सर्व ऋतूंचे भाग्य नाही.

वसंत पंचमीला वसंत ऋतूच्या स्वागतासाठी त्या ऋतूचे पूजन होते. बालकाचे भविष्य घडवणाऱ्या शिक्षणाचा विद्यारंभ आजच्या दिवशीच केला जातो. त्यामुळे वसंत पूजनात सरस्वती पूजनाचे आयोजन केले जाते. आता आम्हाला हे पाहायचे की ही सरस्वती म्हणजे आहे कोण? व तिची पूजा कशी केली जाते? गोस्वामी तुलसीदासांनी साध्या व सोप्या शब्दांत भारताच्या आध्यात्मिक परंपरेचे चित्रण आपल्या रामचरित मानसामध्ये केले आहे. ज्यात सरस्वतीचाही समावेश आहे, पण तीन वेगवेगळया संदर्भात सरस्वतीची विचित्र कृती आढळून येते. एक

कुंभकर्णाच्या तपस्येच्या संदर्भात, दुसरी रामाच्या राज्याभिषेकाच्या संदर्भात व रामाला वनवासातून परत आणण्यासाठी गेलेल्या भरताला त्याच्या निश्चयापासून भ्रमित करण्याच्या संदर्भात.

रावण, कुंभकर्ण आणि बिभीषणाच्या अपार तपस्येने विधाता प्रसन्न झाला. रावणाने लाखो वर्षांचे आयुष्य व विश्वविजयाचा आशीर्वाद विधात्याकडून प्राप्त केला. बिभीषणाने ईश्वराच्या चरण कमलाशी प्रेमाची अपेक्षा केली. मात्र कुंभकर्णाला पाहून विधाता व्याकूळ झाला. **'जो यह खल नित करब अहारू। होइहि सब उजार संसारू ।।'** कारण विधात्याला वाटले की हा जर कोणत्याही कारणाने उभा राहिला तर माझ्या या सृष्टीचा विनाश होईल. विधात्याला आपल्या भक्तापेक्षा आपल्या सृष्टीची चिंता अधिक वाटत होती. सृष्टीचा विनाश होऊ नये, असे वाटल्याने ईश्वराच्या आशीर्वादाने कुंभकर्णाचा मृत्यु झाला.

सरस्वतीचा दुसरा प्रयोग रामाच्या राज्याभिषेकाच्या वेळेस दिसून येतो. चारी पुत्रांचा विवाह झाला, सीतेसारखी गुणवती व रूपवती सून मिळाली हे पाहून चक्रवर्ती सम्राट दशरथाच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता, **'मानहु परमानन्द समाना'** मन आनंदित व प्रसन्न होते. अशा या मनाच्या आनंदी अवस्थेत दशरथाने लगेच दुसरे दिवशी रामाला राज्याभिषेक करायचे ठरवले. राम आता सर्व तऱ्हेने राज्य संभाळण्यास समर्थ झाला आहे. जेव्हा माता कौसल्येला ही आनंदाची गोष्ट समजली तेव्हा ती लगेच देवघरात गेली. **'पूजी ग्राम देवि सुर नागा । कहेसि बहोरि देन बलिभागा ।।'** तिने ग्रामदेवतांची पूजा केली सर्व देवांची पूजा केली. नागदेवतांची पूजा केली आणि तिने देवाला प्रार्थना केली की जर माझ्या रामाचा अभिषेक चांगल्या प्रकारे सफल पार पडलास तर मी तुला राजभोग देईन'

प्रथम तर देवतांना या जगात काय सुरू आहे याची कल्पना नव्हती. आजकाल गावांमध्ये जशी ग्रामसेविका असते त्याप्रमाणे त्यावेळी 'ग्रामदेवी.' प्रत्येक गावात एक ग्रामदेवी ! ग्रामदेवीचे पूजन होताच त्यांनी लगेच इंद्राला ही गोष्ट सूचित केली. देव घाबरले. त्यांनी शारदेचे स्मरण केले **' सारद बोलि विनय सुर करहीं । बारहिं बार पाय लै परहीं ।। विपत्ति हमार विलोकी बड, मातु करिअ सोइ आज । राम जाहिं बन राजु तजि, होइ सकल सुर काज ।'** 'माते, माझ्या रामाचे शुभकार्य चांगले यशस्वी पार पडू दे' असे माता कौसल्याने प्रार्थना केली आहे, पण तसे केले तर देवांचा हेतू साध्य होणार नाही. 'माते सरस्वती, देवांचे काम साध्य होईल असे काही कर.'

सरस्वती थोडी बावरली, ती म्हणाली, 'देवगण, मी तुमचे ऐकले तर आयुष्यभर श्रध्देने तुमचे पूजन केले आहे त्या माता कौसल्येवर काय बितेल?' तेव्हा देव म्हणाले **'जीव करम बस दुख सुख भागी। जाइज अवध देव हित लागी।'** 'मनुष्य त्याच्या कर्मवश दुःखे

भोगत असतो. माते, तू देवांच्या कडेच लक्ष दे. जीवाला त्याच्या कर्मवश दुःखे भोगू दे. माते देवांचे काम प्रथम कर.'

माता सरस्वती तसे करायला उद्युक्त होईना हे पाहून देवांनी दुसरी चाल सुरू केली.- **'बार बार गहि चरन संकोची चली बिचारी बिबुध मति पोची ।।'** ते तिच्या पायावर लोटांगण घालू लागले. सारखे तिच्या पाया पडू लागले. सरस्वतीला यामुळे फार संकोच वाटला. ती विचार करू लागली या देवांची बुध्दी वाईट आहे ! **'उँच निवास नीच करतूती देखि न सकहि पारई विभूती ।।'** इतक्या उच्च स्थळी राहतात आणि बुध्दी किती हलक्या पातळीची ठेवतात ! हे लोक चांगल्या माणसांना आनंदाने विभोर झालेले पाहू शकत नाही का?

अयोध्येमध्ये माता सरस्वतीने पदापर्ण केले.- **'हरिष हृदय दसरथ पुर आयी । जनु ग्रह दशा दुसह दुखदायीं ।।'** माता सरस्वती तिकडे पोहचताच दुर्दशा करणारे सर्व ग्रह एकत्र झाले आणि ते सर्वजण अयोध्या नगरीत आले. शनीची साडेसाती साडेसात वर्षांची असते असे म्हणतात. पण येथे ती चौदा वर्षाची होती, आणि कौसल्येच्या मागे तर जन्मभर राहणार होती.

अयोध्येतील जनतेकडे सरस्वतीने नजर फिरवली. भगवान रामाविषयी एकाच्याही मनात-रक्तात दुर्बुध्दीचा लवलेशही नव्हता. सरस्वती चोहोकडे पाहू लागली. शेवटी तिला यश मिळाले-**'नाम मंथरा मंदमति, चेरी कैकयी केरी । अजस पिटारी ताहि कर, गई गिरा मति फेरि ।।'** ती दुसऱ्या गावाहून कैकयीची दासी म्हणून तिच्या सोबत आलेली होती. तिची बुध्दी भ्रष्ट करणे शक्य होते. सरस्वती तिच्या जिव्हेवर विराजमान झाली. तिची बुध्दी भ्रमित केली व अपयशाचे खापर तिच्या डोक्यावर फोडण्याचे ठरवले.

ती तर प्रथमपासूनच मंद बुध्दीची होती. आता माता सरस्वतीची तिच्या जिव्हेवर कृपा झाली. मग काय विचारता ! ती आता मनमानेल तशी बडबडू लागली. ती कैकयीला म्हणाली ''मुली, कौसल्या खूप धूर्त आहे. तू तिला ओळखत नाहीस. रामाला राजा बनवून भरताला आपला दास बनवेल. तुझ्याकडून दासीची कामे करवून घेईल,'' वास्तविक कैकयीच्या मनात रामाबद्दल अत्यंत प्रेम होते. तिने मंथराला विरोधहि केला. परंतु ती सरस्वतीच्या प्रभावाखाली आलेली होती. त्यामुळे ती तिच्या कह्यात गेली. रामाला वनवासात जावे लागले. माता कौसल्येने देवतांची पूजा केली होती; परंतु तिला काय मिळाले तर चौदा वर्षे रडणे तर आलेच पण कपाळी वैध्यव्यही आले. कोणत्याही स्त्रीला वैधव्याइतके मोठे दुःख नाही. देवतांच्या पूजनाचे हे फळ तिच्या पदरात पडले. फळ-वर देणाऱ्या देवतांचा न्याय पाहा की जीव आहे तर कर्मवश असणारी दुःखे त्याला भोगू द्या. आपण देवहिताला अग्रक्रम द्या.

विष जाणून बुजून घेतले तरी मृत्यू आणि नकळत त्याला स्पर्श झाला तरी मृत्यू तर ठरलेलाच असतो. त्याप्रकारे सरस्वतीला आवाहन केल्यावर ती येवो की स्वेच्छेने येवो ती

ज्याच्या कंठात बसते त्याचे मंगलच व्हायला हवे. परंतु ज्या गरीब मंथराच्या कंठात विराजमान झाली त्या मंथरेची दशा कशी किती दयनीय झाली ! '**कूबर टूटेड फूट कपारू । दलित दसन मुख रूधिर प्रचारू ॥**' तिचे कुबड तोडले गेले. तिचे मस्तक फोडले, दात पाडले, तिला रक्ताच्या उलटया झाल्या. अयोध्येतून तिची हाकलपट्टी झाली. या दुर्घटनेनंतर मानसमध्ये मंथरा पाहायला की ऐकायला मिळत नाही. सरस्वती जिच्या कंठी विराजमान झाली तिची ही दुर्दशा ! शेवटी मानसकारांना काय सांगावयाचे आहे? जेव्हा भरत रामाला परत आणण्यासाठी -मनवण्यासाठी चित्रकूटला गेला तेव्हाही देवतांनी सरस्वतीचे स्मरण केले.- '**सुरन सुमिरि शारदा सराही । देवि देव सरनागत पाही ॥**' देवतांनी स्मरण करताच सरस्वती प्रकट झाली तेव्हा देवतांनी तिचे स्तुतिगान सुरू केले, देवी असे कोणते कार्य आहे जे तुम्ही करू शकणार नाही? हे देवी, आम्ही तुला शरण आलो आहोत. कृपया आमच्यावर कृपा करा. '**फेरू भरत मति करि निज माया । पालू विवूध कुल करि छल छाया ॥**' आपण आपले मायाजाल पसरून भरताची बुध्दी भ्रष्ट करा की ज्यायोगे रामाची व भरताची भेटच होणार नाही. कृपया देवतांवर कृपा करावी. सरस्वती रागवली. ती म्हणाली, '**मोसन कहउ भरत मति फेरू । लोचन सहस न सूझ सुमेर ॥**' मला भरताची बुध्दी भ्रमित करायला सांगत आहात. अहो, पण मध्ये एवढा मोठा उभा असणारा सुमेरू पर्वत दिसत नाही का? भरतामध्ये सुमेरू प्रमाणे कोणती भक्कमता-भव्यता होती? '**भरत हृदय सियराम निवासू । तहँ कि तिमिर जहँ तरनि प्रकासू ॥**' भरताच्या हृदयात राम आणि सीतेचा निवास आहे. जेथे सूर्य संपूर्ण कलांनी तळपत आहे तेथेही अंधकार पसरवला जाऊ शकतो का? असा विचार करून सरस्वतीने भरताला आदराने नमस्कार केला व परत गेली.

देवतांनी आपले सामर्थ्य पणाला लावून प्रयोग केला; भरत, वशिष्ठ, विश्वामित्र, जनक इत्यादी महानुभवांना या षड्यंत्राची कल्पनाही आली नाही. कारण या गोष्टींचा त्यांच्यावर काही परिणामच झाला नाही. '**हरि भक्तन के पास न आवे, भूत प्रेत पाखण्ड ।**' जादू-टोणा तंत्र-मंत्र किंवा माता सरस्वतीही त्यांची बुध्दी भ्रष्ट करू शकली नाही. हरिभक्तांवर सरस्वतीच्या प्रयोगाचाही काही परिणाम झाला नाही. या प्रकारे तीन प्रसंगात आम्ही सरस्वतीचे आगमन पाहिले. त्यात महानुभावांवर ती काही परिणाम करू शकली नाही. बाकी जेथे गेली तेथे तिने विनाशच केलेला दिसून येतो व म्हणूनच सरस्वतीची पूजा का व कशी करावी ते समजून घ्यायला पाहिजे.

रामचरित मानसमधलाच हा एक प्रसंग आहे. एकदा प्रयाग येथील भरद्वाजमुनींच्या आश्रमात महर्षी याज्ञवल्क्य आले. माघ महिना सुरू होता. स्नानपर्व तेव्हा सुरू होते. भरद्वाज ऋषींना विनंती केली की, मुनीवर आम्हाला रामचरित्र कथन करा. तेव्हा महर्षी याज्ञवल्क्य म्हणाले, '**रामचरित अति अमित मुनीसा । कहि न सकहि सत कोटि अहींसा ॥**' हे

मुनीश्वर, रामचरित्र फार असीम व अपार आहे. शंभर कोटी शेषनाग रात्रभर त्याचे वर्णन करत बसले तरी ते संपणार नाही; **'तदपि जथाश्रुत कहँउ बखानी सुमिरि गिरापति प्रभु धनु पानी ।।'** मी जसे ते चरित्र ऐकले आहे तसे त्या वाणीचे स्वामी असणाऱ्या प्रभू धनु पानी धनुर्धर परमात्मा श्रीरामाचे स्मरण करून आपल्याला सांगतो. चरित्र सांगताना आवश्यकता होती वाणीची. परंतु वाणीला वंदन न करता वाणीचे प्रेरक जे प्रभू रामचंद्र यांचे स्मरण केले. असे का? **' सारद दारु नारि राम स्वामी । राम सूत्रधर अन्तर्यामी ।।'** ही शारदा म्हणजे आहे कोण? कठपुतळी? येथे दारु म्हणजे काष्ठ आणि स्त्री म्हणजे काष्ठाची जणू पुतळी ! स्वतः एक काष्ठाचा तुकडा ! आणि श्रीराम म्हणजे काय आहे? तिचे सूत्रधर ! कठपुतली नाचवणारे ! ते अंतर्यामी आहेत. ज्याच्या हृदयात त्यांच्याविषयी भक्तीचा असीम भाव आहे, ज्यावर ते असीम कृपा करतात त्याच्या हृदयात सरस्वतीला ते नाचवतात. सरस्वती नृत्य करू लागले. **'कवि उर अजिर नचावहि वानी ।'**

असाच रामाचा दुसरा असीम भक्त होता हनुमान ! एकदा तो लंकेमध्ये क्रूर व मायावी राक्षसांच्या तावडीत सापडला. राक्षसांनी त्याला ठार करायचे ठरवले. काही राक्षस म्हणाले तसे नको. त्याचे हातपाय तोडून टाका. शरीराचे तुकडे करा. तेव्हा रावण म्हणाला **'कपि के ममता पूँछ पर, सबहि समुझाइ । तेल बोरि पट बाँधि पुनि, पावक देहू लगाइ ।।'** अरे तुम्हाला काही माहित नाही. वानराचे त्याच्या शेपटीवर खूप प्रेम असते. त्याच्या शेपटीला चिंध्या गुंडाळा व त्या तेलात भिजवून पेटवून द्या. **'पूँछ हीन बानर तहँ जाइहि । तब सठ निज नाथहि लई आइहि ।। जिन्ह के कीन्हिसि बहुत बड़ाई । देखऊँ मे तिन्ह के प्रभुताई ।।'** राम माझ्या अंतःकरणात वसत आहे. राम म्हणजे माझ्या आत्म्याचा पण आत्मा आहे. अशा तो खूप बढाया मारत होता. त्याची भक्ती मला जरा बघू दे. त्याचे शेपूट जाळून टाका तेव्हाच तो आपल्या स्वामीला घेऊन येईल.

हे ऐकून हनुमान खुपच आनंदित झाला. **'वचन सुनत कपि मन मुसुकाना । भइ सहाय सारद मै जाना ।।'** त्याला वाटले की चला शारदा माता सहाय्याला धावून येत आहे. **'जेहि पर कृपा करहिं जन जानी । कवि उर अजिर नचावहिं बानी ।।'** भक्ताच्या संरक्षाणासाठी राक्षसांच्या हृदयात ती प्रेरणारूप बनली आहे म्हणून त्यांच्या तोंडून भक्ताचे ज्यात हित आहे ते शब्द बाहेर पडले.

वास्तविक सरस्वतीचा उपयोग काय आहे? **'भगति हेतु विधी भवन विहाई । सुमिरत शारद आवत धाई ।।'** भक्ताच्या हितासाठी शारदा माता विधात्याचा निवास सोडून धावत येत असते. **'कीन्हे प्राकृत जन गुन गाना । सिर धुनि गिरा लगति पछताना रामचरित सर बिन अन्हवाये । सो श्रम जाइ न कोटि उपाये ।।'** सरस्वती धावत येऊन रामचरित्राच्या

पवित्र जलाने तिने स्नान करताच तिचा श्रमपरिहार झाला; नाही तर लाखो उपाय करून देखील सरस्वतीचा लवकर श्रमपरिहार होत नाही. सारांश काय तर सरस्वतीचा उपयोग ईश्वराच्या भक्तीमध्येच होत असतो.

गोस्वामींनी पवित्रता आणणाऱ्या-देणाऱ्या गोष्टींमध्ये सरस्वतीची गणना केली आहे. **'पुनि बन्दउँ सारद सुर सरिता । युगल पुनीत मनोहर चरिता ।।'** सरस्वतीच्या व गंगेच्या मनोहर चरित्राचे वर्णन तुलसीदास फार छान करतात. कसे आहे दोघींचे चरित्र? दोघीही का पवित्र आहेत? **'मज्जन पान पाप हर एका । कहत सुनत एक हर अविवेका ।।'** गंगेमध्ये अवगाहन करताच, जलपान करताच ती पापांचे परिमार्जन करते. तर सरस्वती भक्ताने सांगितल्यानंतर ऐकल्यानंतर विचार-विमर्श करून अविवेक दूर करते.

परंतु विवेक आहे काय? गोस्वामी म्हणतात-**'सुनहु तात मायाकृत, गुन अरु दोष अनेक । गुन यक उभय न देखिअहिं देखिअ सो अविवेक ।।'** हे लक्ष्मणा, या संसारात मायेने जसे अपार गुण निर्माण केले आहेत तसेच अनंत दुर्गुणही निर्माण केले आहेत. मायेने निर्माण केलेल्या गुणांकडे किंवा दुर्गुणांकडे पाहणे अविवेकी अविचारांचे ठरते. तिकडे लक्ष देऊ नका. मायेपेक्षा श्रेष्ठ केवळ ईश्वर आहे. म्हणून विवेक म्हणजे आत्म चिंतनास जाणणे व त्यानुसार चालणे हीच सरस्वतीची कृपा आहे.

गोस्वामींनी उत्तरकाष्ठात सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. धर्म म्हणजे काय? कर्म म्हणजे काय? परमेश्वराची अपार सत्ता मान्य करताना ते म्हणतात-अनेक देवतांची पूजा करण्याची आवश्यकता नाही. एकटा श्रीराम कोट्यावधी शारदांपेक्षा श्रेष्ठ आहे. **'दुर्गाकोटि अमित अरि मर्दन'** -दुर्गेची पूजा केली तर दुर्गा प्रसन्न होईल, पण श्रीरामाची पूजा कराल तर कोट्यावधी दुर्गा, कोट्यावधी विष्णू, अब्जावधी ब्रह्मदेव अब्जावधी रूद्र तुमच्यावर एकाच वेळी प्रसन्न होतील. **'सारद कोटि अतिम चतुराई ।। विधि सत कोटि सृष्टि निपुनाई ।।'** एकट्या सरस्वतीचे पूजन कराल तर फक्त एक सरस्वतीच तुम्हांला साथ देईल, पण रामाला भजाल तर कोट्यावधी माता शारदांची कृपा तुमच्यावर होईल व तुम्हाला सहाय्य करतील. गोस्वामींनी मोठमोठ्या देवतांचे स्मरण केले आणि सांगितले की देवता ह्या केवळ एकपक्षीय प्रगतीमध्ये सहाय्यक होऊ शकतात. परंतु परमात्मा श्रीरामाच्या प्रखर प्रकाशाच्या तुलनेत या देवता कुठेही बसत नाहीत. म्हणून एका परमात्म्याच्या चरणी समर्पित होण्यातच आपला सर्वांगीण विकास होत असतो. आपल्या मनातील सर्व इच्छा, शक्ती, सरस्वती, परिवर्तन आणि ऐश्वर्य तर मिळेलच पण त्याबरोबर मोक्षही मिळेल कारण ईश्वरीयपथ लक्ष्यपूर्तीच्या पूर्वी कधीही संपत नाही.

परमात्म्याच्या उपासनेशिवाय कोणालाही मोक्ष प्राप्त होत नाही. गोस्वामीजी म्हणतात **'रामचंद्र के भजन बिन, जो चह निरबान । ज्ञानवंत अपि सो नर, पशु बिन**

**पूछँ विषान ।।**' परमात्मा श्रीरामाच्या भजनाशिवाय कोणी मुक्तीची-मोक्षाची इच्छा करेल तर तो कितीही ज्ञानी असला तरी शिंगांशिवाय व शेपटीशिवाय असणाऱ्या पशुसारखा असतो. त्याच्यात व बैलात काही फरक नसतो. अशा मनुष्याला केवळ शेपूट व शिंगे नसतात एवढाच फरक आहे. (असा वनमानव मात्र असू शकतो.) **'वारि मथे घृत होइ वरु, सिकतो ते बरु तेल बिन हरि भजन न भव तरिय, यह सिध्दान्त अपेला ।।**' पाणी घुसळण्याने त्यातून तूप निघणे अशक्य वाटले तरी तेही शक्य होऊ शकते किंवा वाळू पाण्यात घातल्याने कदाचित त्यातून तेल निघूही शकेल. या अशक्य गोष्टी शक्य होऊ शकतील; परंतु ईश्वराच्या उपासनेशिवाय कोणीही भवपार होऊ शकत नाही आणि म्हणून परमात्म्याची उपासना करणे-भजन करणे अंत्यत आवश्यक आहे. तेव्हा आपण कोणत्याही देवतांचे उत्सव करा. परंतु महर्षी याज्ञवल्क्य म्हणतात त्याप्रमाणे, **'सुमिरि गिरापती प्रभू धनु पानी**' प्रार्थना एका परमात्म्याचीच करावी. गोस्वामी म्हणतात त्याप्रमाणे लहान-सहान देवतांचा एक वर्ग अवश्य आहे. परंतु सर्व विभागांचे संचालक परमात्मा श्रीरामच आहेत. राम, शिव, ओम हे परस्परांचे पर्यायवाची शब्द आहेत. त्या सर्वांचा आशय एकच आहे ते म्हणजे परमात्म्याच्या चरणी सर्वार्थाने समर्पित होणे आणि म्हणूनच वाणी, धन-धान्य, जीवन-मोक्ष इत्यादी सर्व इच्छांची प्राप्ती करून घ्यावयाची असेल तर परमात्म्याचे अंतःकरणपूर्वक पूजन-उपासना करणे हाच एकमेव शास्त्रोक्त विधी आहे. हीच एक बिनचूक अशी खरी पध्दत आहे.

**।। ॐ श्री सद्गुरूदेव भगवान की जय ।।**

# ईश्वराला दाढी का नाही?

तो ईश्वरच सर्व काही करण्यास समर्थ आहे, म्हणून किशोर अवस्थेतील ईश्वराच्या मुर्ती मंदिरासाठी बनविण्यात आल्या.

मूर्ती केवळ प्रतीक आहेत.

वास्तविक ईश्वर अमूर्त आहे, निराकार आहे, निर्गुण व अनिर्वचनीय आहे.

याप्रमाणे ज्या परमात्म्याला काही भौतिक आकारच नाही त्याला दाढी कशी असणार?

**- स्वामी अड़गड़ानन्द**

एका जिज्ञासू भाविकाने एक दिवस प्रश्न विचारला की ईश्वराला दाढी का नाही?

# ईश्वराला दाढी का नाही?

बंधुवर्य,

ईश्वर कसा असतो किंवा कसा आहे? हा तुमचा प्रश्न स्वाभाविक आहे हा प्रश्न एकदा माता पार्वतीच्या मनातही निर्माण झालेला होता. मातेने भगवान शंकराला प्रश्न केला, **''राम सो अवध नृपति सुत सोई ।। की अज अगुन अलखगति कोई ।।** राम अयोध्या नरेशाचा पुत्र होता की अदृश्य, अविनाशी असा कोणी दुसरा होता?'' यावर भगवान शंकर नाराज झाले. ते म्हणाले, **''कहहिं सुन अस नर, ग्रसे जो मोह पिसाच पाखंडी हरि पद विमुख, जानहिं झूठ न साच ।।''** हे पार्वती, तू इतक्या हलक्या प्रतीचा व अर्वाच्य असा प्रश्न विचारला आहेस की प्रश्न एखादा पाखंडी मनुष्यच करू शकतो- **''वातुल भूत विवश मतवारे ते नही बोलहिं वचन विचारे ।।''**

याप्रकारे भगवान भोलानाथांनी पार्वतीला बरेच ऐकवले; परंतु पार्वती शांतपणे बसून राहिली. शंकर मनात विचार करू लागले की माझ्या रागवण्याचा हिच्यावर काहीच परिणाम झाला नाही का? अखेर काय गोष्ट असेल? हा प्रश्न पार्वतीचा आहे की नाही? तेव्हा शंकरानी ध्यान लावून पाहिले. भगवान शंकराकडे दुसऱ्याच्या मनातले जाणून घेण्याचे यंत्र होते. त्यांनी पार्वतीच्या मनात डोकावून पाहिले. ते खूप प्रसन्न झाले. जेव्हा त्यांचे ध्यान संपले तेव्हा ते पार्वतीला म्हणाले **''राम कृपा ते पारवति, सपनेहुँ तव मन माहिं । शोक मोह संदेह भ्रम, मम विचार कछु नाहिं ।।''** हे पार्वती, ईश्वराच्या असीम कृपेमुळे तुझ्या मनात ना कसला संदेह आहे, ना कसला भ्रम, ना मोह, ना क्रोध ना कसले दुःख आहे ! तुला तर कोणती शंकाच नाही. परंतु तू जो प्रश्न विचारला आहेस तो जगाच्या हितासाठी अत्यंत उपयुक्त आहे. तेव्हा ईश्वर कसा आहे ते तू ऐक.

**''आदि अन्त कोउ जासु न पावा । मतु अनुरूप निगम अस गावा ।।''** ईश्वर केव्हा जन्मले? त्यांचे अस्तित्व कोठपर्यंत आहे? अर्थात आजपर्यंत कोणीच जाणू शकले नाही. परंतु विचारविमर्ष करून वेदाने ईश्वराविषयी सांगितले आहे की- **''बिनु पद चलइ सुनइ बिनु काना । कर बिनु करम करइ विधि नाना । आनन रहित सकल रस भोगी बिनु बानी बकता बड़ जोगी ।।''** तो शरीराशिवाय स्पर्श करतो, डोळ्यांशिवाय पाहतो, पायांशिवाय

चालतो, हातांशिवाय सर्वत्र कार्य करतो- **''अस सब भाँति अलैकिक करनी । महिमा जासु जाइ नहिं बरनी ।।''** या प्रकारे ईश्वराचे कृत्य अलौकिक आहे. आता बिन हातापायांच्या ईश्वराचे चित्र तू मनःचक्षुपुढे आणू नकोस.

ज्या भगवान भोलेनाथाने रामचरित मानसाची रचना केली त्या महापुरूषाने स्वतःच रामाचे स्वरूप कसे आहे ते सांगितले आहे. तो पायांशिवाय चालतो, हातांशिवाय कार्य करतो तो निर्गुण, निराकार व अमूर्त आहे. तो कणाकणात व्याप्त आहे. ज्याचा निवास प्रत्येकाच्या हृदयदेशात असतो.- **'सब के उर अंतर बसहु, जानहु भाउ कुभाउ ।'** परंतु तो सदैव किशोरस्वरूप असतो. तो अडखळणारा अबोध बालक नसतो किंवा चुका करणारा किंवा भ्रमित होणारा वृध्दही नव्हे. ईश्वर नेहमी किशोरस्वरूप आणि अमूर्त असतो.

किशोरावस्था ही दाढी येण्याच्या थोडी आधीची अवस्था आहे. तारूण्याने मुसमुसत असलेली ! तेजस्वी व स्फूर्तीचे भांडार असणाऱ्या अजस्त्र स्त्रोत असणाऱ्या, जीवमात्राची व्यवस्था व सुरक्षिततेची कवच असणाऱ्या अशा रूपाची कल्पना किशोरस्वरूपाच्या ठिकाणी केली. वास्तविक हे रूप अमूर्त आहे, अनिर्वचनीय आहे. पूर्वीच्या महापुरूषांच्या वाङमयात भगवंताच्या रूपाचे असेच वर्णन आहे.

अनादि वैदिक काळापासून जेवढे अवतारी महापुरूष होऊन गेले व ज्यांनी परमेश्वराला प्रत्यक्ष पाहिले त्या सर्वांनी ईश्वराचे एकच स्वरूप सांगितले आहे की तो अनिर्वचनीय आहे, सर्वज्ञ आहे, व शाश्वत असा पुरूष आहे. भगवान बुध्दांविषयी लोकांनी अशी अफवा पसरवलेली आहे की ते ईश्वराला मानत नव्हते, परंतु त्या महापुरूषाने स्वतः सांगितले आहे की माझ्या पूर्वीच्या महर्षींनी जे अविनाशी पद प्राप्त केले होते ते पद आज मी प्राप्त केले आहे. मी आज ते सर्वज्ञ पद प्राप्त केले आहे. त्या परमतत्त्वाचे एवढेच तर स्वरूप आहे. हेच गीता सांगते की, आत्मा अविनाशी आहे, सर्वज्ञ आहे परंतु काळा-गोरा, हलका वजनदार, जन्म आणि मृत्यू असे गुण परमात्म्यात मुळीच नाहीत. भगवान बुध्दांनी, महावीर स्वामींनी सर्वांनी एकच गोष्ट सांगितली आहे की हा परमात्मा अंतर्दृष्टीलाच दिसतो, ध्यानाच्या-समाधीच्या अवस्थेतच विदित होतो आणि भक्ताला आपल्यात समाविष्ट करून घेतो. अशा प्रकारे ज्याला काही भौतिक आकारच नाही अशा अवस्थेतील परमात्म्याला दाढी कोठे व कशी लावावी?

**'जिन देखा सो कहा नहिं, कहा सो देखा नहिं । रहिमन अगम बात के, कहन सुनन को नाहिं ।।'** ज्यांनी त्या परमसत्तेला पाहिले आहे त्यांनी त्याचे भौतिक स्वरूप सांगितले नाही. ज्यांनी त्याला पाहिले नाही व जे त्याच्या विषयी सांगतात किंवा बोलतात त्यांनी त्या परमात्म्याला पाहिलेले नाही; मग त्याच्या भौतिक स्वरूपाचे रेखांकन कसे करावयाचे?

सारांश ईश्वर म्हणजे कोणी व्यक्ती नसून आपल्या हृदयात लपलेले ज्योतिर्मय तत्त्व आहे. भजनाद्वारे, चिंतनाद्वारे तो प्रथम आपल्याशी बोलतो. नंतर हळूहळू आपले बोट पकडून आपला योगक्षेम करतो. मग तुम्हाला दृष्टी देऊन तो तुमच्यात संचारित होईल, समोर स्वतः दर्शन देईल, ज्ञान देईल. **'जानत तुम्हाहिं तुम्हाहि होइ जाई।'** आपल्यामध्ये तुम्हाला सामाविष्ट करून घेईल कारण **'मन वश होई तबहिं जब प्रेरक प्रभु बरजे ॥'** तो एकमेव परमात्माच हे सर्व काही करण्यास तत्पर असतो आणि म्हणूनच ईश्वराला किशोर समजण्यात आले आणि मंदिरामध्ये त्याच्या किशोर अवस्थेतील मूर्ती तयार करण्यात आल्या. अर्थात या मूर्ती प्रतीकरूप आहेत. लहान मुले, अज्ञ प्राणी यांच्या मनात साधनेची सुरूवात करण्यासाठी-चंचुप्रवेश करण्यासाठी केलेली रचना आहे. जेव्हा हृदयात साधना जागृत होते तेव्हा साधक हृदयात बध्द होतो. तो बाहेर पाहण्याचे सोडून देतो आणि म्हणूनच मनुष्यमात्राने याबाबत दक्ष राहिले पाहिजे. नीट लक्ष दिले पाहिजे. आमच्या पूर्वीच्या महापुरूषांनी या प्रश्नाबाबत अकारण गुंतागुत करणे योग्य समजले नाही. भगवान बुध्दांना एका सज्जनाने विचारले की तुम्ही आमची ईश्वराची गाठ घालून द्याल का? आम्हाला तुम्ही ईश्वर दाखवू शकाल का? यावर बुध्दांनी सांगितले की मी तुम्हाला ईश्वर दाखवू शकत नाही; परंतु तुम्हाला तो प्राप्त करून देऊ शकतो. कारण तो अमूर्त आहे. त्याला प्राप्त करायचे असेल तर तुम्ही आमच्या बरोबर ध्यान करून त्याला प्राप्त करण्याच्या उद्योगाला लागणे श्रेयस्कर आहे.

**॥ ॐ श्रीसद्गुरूदेव भगवान की जय ॥**

# विश्वकर्मा पूजा ?

विश्वकर्माचा आशय आहे की विश्वात कर्मच मुख्य आहे.

मनुष्यच कर्माचा निर्माता आहे.

विश्वात आपण आपले स्वतःचे कल्याण करून घेऊ शकतो.

ईश्वरचरणी स्वतःला समर्पित करून त्याचे निरंतर चिंतन करावे व विश्वाच्या म्हणजे भवसागराच्या पार जावे. जर मोहाच्या प्रलोभनाच्या मागे लागाल तर जन्ममृत्यूचे दोन फेरे आणखी वाढतील.

**– स्वामी अड़गड़ानन्द**

# विश्वकर्मा पूजा ?

भारतात अनेक प्रकारच्या पूजा प्रचलित आहेत. अशाच अनेक पूजांमध्ये एक प्रकार विश्वकर्मा पूजेचा आहे. आता आम्हाला पाहावयाचे आहे की ही विश्वकर्मा पूजा म्हणजे कशा प्रकारची आहे?

विविध पुराणांना आणि वेदांना मान्य असा ग्रंथ रामचरित मानसाचे कर्ते गोस्वामी तुलसीदासांनी असे उद्घोषित केले की **'करम वचन मन छाडी छल, जब लगि जन न तुम्हार । तब लगि सुख सपनेहु नही किये कोटी उपचार ।।'** मनाने, कर्माने व वाणीने कपटवृत्तीचा त्याग करून जो एकमात्र असणाऱ्या परमात्म्याची कृपा संपादन करत नाही तोपर्यंत **'सुख सपनेहु नहिं'** त्याला स्वप्नात सुध्दा सुख मिळू शकत नाही. **'किए कोटि उपचार-'** किंवा अन्य प्रकारचे कोट्यावधी उपचार केले तरी सुख मिळू शकत नाही. परंतु आम्ही एक-दोन नव्हे तर अनेक प्रकारचे उपचार करतो. तेहतीस कोटी देवी-देवता, तेहतीस कोटी त्यांची नावे, प्रत्येक देवतेचे अलग मंत्र व अलग पुजारी आम्ही ठरवून टाकले आहेत. येथे तुलसीदासांची काही चूक तर झाली नाही ना? की आम्ही त्यांच्या आज्ञेचे उल्लंघन केले आहे? कोठे तरी चूक झाली आहे हे नक्की !

सर्व भारतीय मुनींनी सर्वसंमत्तीने स्वीकारले आहे की ईश्वर ही एकमेव सृष्टीमध्ये असणारी महासत्ता आहे. ही सत्ता कधी दोन होऊ शकत नाहीत. **'व्यापक एक ब्रह्म अविनाशी । सत चेतन घन आनन्द राशी ।'** तो कोठे राहतो? **'अस प्रभु हृदय अछत अविकारी ।-'** तो ईश्वर कणाकणांत भरलेला आहे. ईश्वर एकाचे कधी दीडही होऊ शकत नाही. तो अपरिवर्तनशील आहे, अजर आहे, अमर आहे, काळाच्या अतीत आहे, तो सर्वज्ञ आहे, परम सत्य आहे. **'-सत चेतन घन आनन्दराशी ।'** तो राहतो कुठे? गोस्वामी म्हणतात की असा परमात्मा सर्वांच्या हृदयात निवास करतो. तो अक्षत आहे. शस्त्रक्रियेने कोणाचे काळीज कापून बाजूला ठेवले तरी ईश्वराला कसलीच क्षती पोहचत नाही. ''तो अविकारी आहे.'' तुम्ही घोडा, गाढव, कुत्रा किंवा काहीही खा, कितीही वाईट वृत्तीने वागा त्याच्यामध्ये असणारा ईश्वरी अंश द्रष्ट्याच्या रूपात त्याच्यामध्ये असतो. तो कशानेही लिप्त होत नाही. तो निर्लेप आहे. विकारांपासून अलिप्त आहे. जेव्हा कोणी ईश्वराला प्राप्त केले ते हृदयदेशातच प्राप्त केले.

आपल्या होऊन गेलेल्या ऋषींमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात- **'ईश्वर सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठाति।' गीता (१८-६१)** अर्जुना, तो ईश्वर सर्वांच्या हृदयदेशात निवास करत असतो. तो एकच आहे. जर दुसरा ईश्वर पैदा झाला तर तो राहील कोठे? कारण विधात्याच्या सृष्टीमध्ये प्रथमपासून एकच ईश्वर आहे, आणि तो सृष्टीच्या कणाकणात व्यापून आहे. मग दुसरा ईश्वर पैदा झाला तर तो कोठे व्याप्त होईल? मग त्याच्यासाठी ब्रह्माला दुसरी सृष्टी निर्माण करावी लागेल. परंतु ब्रह्मदेखील त्याच्या नाभीपासून जन्मले आहेत मग ते वेगळी सृष्टी कोठून रचून देणार? मग प्रत्येक ईश्वरासाठी अलग सृष्टी असे चक्र सुरू होईल. पण हे सर्व अशक्य आहे. ईश्वर केवळ एकच आहे आणि आपण सर्व जण त्याची लेकरे आहोत. **'ईश्वर अंश जीव अविनाशी।'** वेदांची अशी घोषणा आहे की **'अमृतस्य पुत्राः'** तुम्ही त्या अविनाशी अमृतत्त्वाचे पुत्र आहात. म्हणजेच तुम्ही त्या परमात्म्याची लेकरे आहात. ईश्वरच केवळ असा आहे की तो एक आहे. कायेने-मायेने-वाचेने व कर्माने त्याल शरण गेल्याशिवाय स्वप्नातसुध्दा जीवाला आराम लाभणार नाही. आम्हाला असे ऐकायला येते की साठ कोटी हिंदू आहेत व तेहतीस कोटी देवी-देवता आहेत. म्हणजे दोन माणसांत एक देव असे प्रमाण झाले. खरोखर हिंदूच्या मध्ये ऐक्य हे एक प्रश्नचिन्ह बनले आहे. विस्कळितपणामुळे त्यांची समृध्दीही होत नाही. काही वर्षांपूर्वीच राम मोठा की शिव मोठा हा मोठा वादाचा विषय बनला होता. या विषयावर तलवारी परजल्या गेल्या. शरयू तर कितीतरी वेळा रक्तरंजित झाली ! पूर्वी शैव आणि शाक्तांमध्ये लढाया व्हायच्या. युगपुरूष तुलसीदासांनी मनुष्या मनुष्यांत समन्वय करण्याचे खूप मोठे कार्य आहे. त्यांनी हे सर्व संघर्ष यशस्वीपणे हाताळून त्याबाबतचे प्रश्न सोडवले आहेत. हे काम त्यांनी ईश्वराच्या प्रेरणेनेच केले- **'तस कसियउँ हिय हरि के प्रेरे।'**

रामचरित मानसच्या सांगण्यानुसार केवळ एका ईश्वराचे भजन करावे. **'सोइ धर्मज्ञ गुनी ज्ञाता। सोइ महि मण्डित पण्डित दाता॥ धर्म परायन सोइ कुल त्राता। राम चरन जा कर मन राता॥'** तो धर्मज्ञ आहे, धर्माचा मर्मज्ञ आहे, विशेषज्ञ आहे, गुणवान आणि ज्ञानवान आहे, पृथ्वीवरील सन्मानित पुरूष आणि दानवीर आहे (त्याच्या जवळ देण्यासाठी चांगली सामग्री आहे.) असा कोण? **'राम चरन जा कर मन राता।'** ज्याचे मन प्रभूच्या चरणी समर्पित आहे, अनुरक्त आहे असा राम! **'नीति निपुन सोइ परम सयाना। श्रुति सिध्दान्त नीक तेहिं जाना॥ दक्ष सकल लक्षण युत सोई जाके पद सरोज रति होई॥'**

तो नीतीमध्ये निपुण आहे, तो अत्यंत शहाणा आहे, वेदांमध्ये सांगितलेले तत्त्वज्ञान-सिध्दांत त्याने चांगले जाणून घेतले आहेत. (मग तो अंगठेबहाद्दर असला तरी ते ज्ञान त्याला प्राप्त होते), तो अंत्यत कार्यदक्ष आहे, सर्व सुलक्षणांनी युक्त आहे. असा कोण? तर ईश्वराच्या चरणी ज्याचे मन अनुरक्त आहे असा राम !

रामचरित मानस हा ग्रंथ ज्यांच्या प्रेरणेने झाला आहे किंवा ज्याची ती संरचना आहे त्या भगवान शंकरांनी पार्वतीला सांगितले **'सो कुल धन्य उमा सुनु, जगत सुपुनीत । श्री रघुवीर परायण जेहि नर उपज विनूत ।।'** हे पार्वती, ज्या कुळात कोणा एकाचे श्रीरामाच्या, त्या परमतत्त्वाच्या चरणी प्रेम जागृत झाले ते समस्त कुळ धन्य आहे. ईश्वराप्रती समर्पण हाच फक्त धर्म आहे.

परंतु भारतात व्यवसायाच्या नावावर वेगवेगळया जाती व वेगवेगळी पूजन पध्दतींची प्रथा पाडण्यात आली आहे. श्रीवास्तव लोक किंवा कायस्थ समाजातील लोक चित्रगुप्ताचे धुमधडाक्याने पूजन करतात. हे चित्रगुप्त म्हणजे यमराजाचे मुख्य लेखणिक ! त्यांचे अनुयायी सांगतात की जेव्हा भगवान श्रीकृष्ण आपले गुरू सांदीपनी ऋषींचे पुत्र पुनर्रवा यास यमलोकहून परत आणण्यास निघाले तेव्हा त्यांच्या चरणकमलांचे तेज पाहून यमराज विचलित झाले. त्यांनी त्याचे कारण शोधण्याचे ठरवले. तेव्हा चित्रगुप्ताने आपले रजिस्टर पाहून म्हणाले की या वेळेत कोणाच्याही येण्याचा समय निर्धारित नव्हता. त्याच वेळेस ईश्वराने शंखध्वनी केला. यमपुरी हलू लागली. चित्रगुप्ताने त्यांचा परिचय देण्यास आपण असमर्थ असल्याचे सांगितले. या विवरणावरून चित्रगुप्त लेखक असल्याची प्रतीती येते. रावणाच्या दरबारात **'वरून कुर्बेर पवन धनधारी अगिनि काल यम सब अधिकारी । आयसु करहिं सकल भयभीत ।।'** हे सर्वजण घाबरून त्याच्या आज्ञेचे पालन करत असत. त्याच्या अधीन असणारा कर्मचारी वर्ग चित्रगुप्ताची पुजा कोणत्या इच्छेने किंवा कोणत्या कारणाने करत आहेत हेच कळत नाही. प्रजापती असणारे कुंभार लोक ब्रह्मदेवाची पूजा करतात. विधात्याप्रमाणे हे लोकही मातीच्या भांड्याचे सृजन करतात एवढेच त्या दोघांत साम्य आहे, अन्य काहीही नाही. लोखंडाचा व्यवसाय करणारे लोहार विश्वकर्म्याची पूजा करतात. भारतापेक्षा इतर देशात कितीतरी पटीने अधिक लोक लोखंडाचा व्यवसाय करणारे आहेत; पण भारताच्या बाहेर कोठेही चित्रगुप्ताची किंवा विश्वकर्म्याची पूजा केली जात नाही.

जर एका ईश्वराशिवाय इतर कोणत्याही ईश्वराचे अस्तित्वच नाही तर मध्ये या नवनव्या देवता कोठून आल्या? कोणी धनाची देवता, कोणी जलाची देवता, कोणी पृथ्वीची देवता, कोणी आकाशाची तर कोणी युध्दाची देवता-देवतांची जणू रांग लावली आहे. प्रत्येक विभागाची एकेक देवता बनवली गेली, या देवता आपल्याला एकेक वस्तू देऊ शकतात. कोणी युध्दासाठी शक्ती देईल, कोणी धन देईल, परंतु मोक्ष देण्याची क्षमता या कोणातही नाही. तुम्हाला जर धन हवे असेल, समृध्दी हवी असेल तर त्या ईश्वरालाच शरण जावे लागेल.

श्रीमद्भागवताच्या द्वितीय स्कंधातील तिसऱ्या अध्यायात असा उल्लेख आहे की पती-पत्नींमध्ये सहृदयता व सलोख्याचे संबंध ठेवायचे असेल तर पार्वतीची, संतानप्राप्तीसाठी प्रजापती, पत्नीसाठी अप्सरा उर्वशीची, धनासाठी कुबेराची, आरोग्यासाठी धनवन्तरीची आराधना केली पाहीजे. या प्रकारे वीस-पंचवीस देवतांच्या नावांचा परिचय देऊन शेवटी शुकदेव म्हणतात

की सर्व कामना, समृध्दी आणि परमश्रेय असणाऱ्या मोक्षाच्या प्राप्तीसाठी त्या एकमेव परमात्म्याला शरण जा. गोस्वामी तेच सांगतात **'लोक लाहु परलोक निबाहु ।'** एकमेव परमात्म्याचे भजन केल्याने समृध्दीचे सर्व स्त्रोत तुमच्या जवळ येतील, आणि ईश्वराच्या चरणी तुमचे स्वागत होईल, परमपद तुमच्या मुठीत येईल. या जन्मात थोडी साधना झाली भजन झाले तर पुढच्या जन्मात भवपार व्हाल, कारण हेच भजन तुम्ही पुढच्या जन्मातही करणारच आणि काही जन्मानंतर या भजनांमुळे तुम्ही ते शाश्वत परमधाम प्राप्त करू शकाल. हीच तुमची शाश्वत समृध्दी आहे.

ज्याने विश्वाची रचना केली त्याची चर्चा गोस्वामींनी मानसामध्ये सर्वत्र केली आहे. वनवासी श्रीरामाकडे नजर जाताच सुग्रीव दंग होऊन गेला. तो हनुमंताला म्हणाला, हनुमंता कोण दोन शूरवीर आपल्या येथे आले आहे ते बघ. वालीच्या मनात मलीनता आहे. त्यामुळे तो रामलक्ष्मणाला पाहून म्हणतो, माझी हत्या करण्यासाठी तर यांची येथे नियुक्ती केली नाही ना? तसा संकेत मिळताच मी येथून पळून जाईन. मारुतीने ब्राह्मण वेष घेतला व रामाची परीक्षा घेण्यासाठी गेले **'की तुम तीन देव महँ कोऊ । नर नारायण तुम दोऊ ।।'** आपण ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन देवतांपैकी कोणी आहात की आपण नर-नारायण आहात? **'जग कारन तारन भव, भंजन धरनी भार । की तुम अखिल भुवनपति ,लीन्ह मनुज अवतार ।।'** अथवा आपण जगाच्या उत्पत्तीचे कारण, भवसागरातून उध्दार करणारे आणि पृथ्वीवरचा भार हरण करणारे साक्षात परमात्मा आहात? यावरून स्पष्ट दिसते की ब्रह्मा, विष्णू, महेश कोणी वेगळे आहेत, नर नारायण कोणी अन्य आहेत व जगाचा निर्माता, उध्दारकर्ता, भार हरणकर्ता कोणी अन्य आहे. विश्वकर्माचा अर्थ विश्वाचा रचनाकार असा असेल तर ही संरचना स्वतः परमेश्वराची आहे. अन्य रचनाकर्त्याचे अस्तित्त्व मानसकारांनी स्वीकारलेलेच नाही.

सृष्टीचे आदि पुरूष महाराज मनूला समस्त वैभव असतानाही एक दिवस खूप दुःख झाले- **'हृदय बहुत दुःख लाग, जनम गयउ हरि भगति बिनु ।'** वृध्दत्व आले तरी विकार कमी न झाल्याने खूप दुःख झाले. तेव्हा इच्छा नव्हती तरी मोठ्या निग्रहाने आपल्या पुत्राला राज्य सोपवून तो तपोभूमी नैमिषारण्यात गेला. ऋषींच्या कडून साधना क्रम समजून घेतला आणि एकांतात शांतपणे ईश्वरचिंतनाला बसला. त्याने विचार केला **'विष्णू विरंचि शंभु भगवाना । उपजहिं जासु असं ते नाना । ऐसेउ प्रभू सेवक बस अहई । भगत हेतु लीला तनु गहई । जौ यह बचन सत्य श्रुति भाषा । तो हमार पूजिहि अभिलाषा ।।'** म्हणजे ब्रह्मा, विष्णू, महेश हे ज्याच्या अंशमात्राने उत्पन्न होऊन त्याच्यातच विलीन होतात असा पण कोणी भगवान आहे का जो सेवकाला वश असतो. जर वेदातील हे विधान सत्य असेल तर माझी अभिलाषा अवश्य पूर्ण होईल. सर्व भारतात अधिकांश हिंदू विष्णूचे किंवा शिवाचे उपासक असतात परंतु मनूने त्याचे भजन केले ज्याच्या अंशमात्राने अनंत त्रिदेव उत्पन्न होतात व विलय

पावतात. म्हणजे येथे विश्वाचा निर्माता, प्रथम उत्पत्ती-स्थिती-संहारकर्ता एक परमात्माच आहे. तोच खरा विश्वकर्मा आहे. तुलसीदास विश्वाचा रचनाकार, गतिविधी नियंत्रक असा संचालक एकमात्र परमात्म्यालाच मानतात.

ज्या लंकाधिपती रावणाच्या राज्यसभेत **'कर जोरे सुर दिशिप विनीता । भृकुटी विलोकत सकल सभीता ।।'** समस्त देवता विनीत होऊन त्याला नमस्कार करत होते, तुमच्या रक्षणासाठी मी अवतार घेईन असे परमात्म्याने त्यांना आश्वासन दिले होते त्या सभेत ईश्वराचा एक दूत निर्भीडपणे उभा होता. रावण त्याला म्हणाला-दृष्ट मर्कटा, तू माझी यशोगाथा, माझी कीर्ती ऐकली नाहीस का? तू कशाच्या जोरावर वाटिकेचा ध्वंस केलास? माझ्या प्रजाजनांना व सेवकांचा संहार तू कोणाच्या जोरावर केलास? तुला काय मृत्यूचे भय वाटत नाही? हनुमान म्हणाला, **'सुन रावण ब्रह्माण्ड निकाया । पाइ जासु बल विरचति माया ।।'** यावन्मात्र बह्मांड, सूर्य, चंद्र, पृथ्वी, जड चेतन, स्थावर, जंगमयुक्त अनंत ब्रह्मांडाची संरचना ज्याच्या बळावर माया करते, त्या मायेला निर्माण करणारा ईश्वरच आहे. ज्याच्यामुळे विश्वाची रचना होते ती सामुग्री निर्माण करणारा ईश्वरच आहे. म्हणजे उत्पादन कारण, निमित्त कारण, 'कारणं कारणानाम' ईश्वरच आहे. ज्या शक्तीने विधाता सृजन, विष्णु पालन, रुद्र संहार करतो आणि **'जाके बल लवलेश ते, जितउ चराचर झारी । तासु दूत मै जाकर, हरि आनेहु प्रिय नारि ।।'** ज्याचे लेशमात्र बळ प्राप्त करून तू हे चराचर जग जिकूंन घेतले आहेस त्या ईश्वराचा मी दूत आहे. त्या परमात्म्याच्या पत्नीचे तू अपहरण केले आहेस. नाहीतर या विश्वाची रचना करू शकेल अशी मायेत मुळींच क्षमता नाही. **'माया खलु नर्तकी विचारी'** अरे, ही माया म्हणजे नाचणारी नुसती नटी आहे. तिच्या पुढे काही नाही. माया ज्याच्यापासून शक्ती घेऊन सृष्टीची संरचना करते, ब्रम्हा ज्याच्यापासून शक्ती प्राप्त करून सृजन करतो, ज्याच्यापासून शक्ती मिळवून शेषनाग पृथ्वीला धारण करतो, ज्याच्यापासून लेशमात्रबळ घेऊन तू अगदी वैभवात व गर्वात फिरत आहेस त्याच परम प्रभूचा मी दूत आहे. थोडक्यात म्हणजे या विश्वाचा निर्माता कोण? विश्वात परिवर्तने घडवून आणणारा कोण? अर्थात तो परम शक्तिमान ईश्वर-परमात्मा ! त्या परमात्म्याला शरण जाण्यासाठी गोस्वामी तुलसीदासांनी पुनः पुन्हा आग्रह केला आहे.

पुराणांत विश्वकर्म्याचा उल्लेख मिळतो. महाभारतात इन्द्रप्रस्थाची रचना मय नावाच्या दानवाने केली होती. हनुमानाने लंकेचे दहन केले. सोन्याची लंका मातीच्या ढिगाऱ्यात लोपून गेली. विश्वकर्माने तिचा जीर्णोध्दार केला. लंका पुन्हा तशाच तेजाने तळपू लागली. मय दानव हा रावणाचा सासरा होता. भगवान श्रीकृष्णाच्या द्वारकापुरीची रचना विश्वकर्माने केली. सुदामापुरीही त्यानेच निर्माण केली. आता एका सज्जनाचा प्रश्न असा होता की, विश्वकर्मा देव

होता की दानव? आम्हाला तर तो दोन्ही ठिकाणी दिसून येत आहे. कारण दानव व देव दोघे सख्खे भाऊच होते. एकाच पित्याचे पुत्र होते. दितीचे पुत्र देव व अदितीचे पुत्र दानव. तेव्हा विश्वकर्मा दोन्ही पक्षात आहे.

पुराणात एक गोष्ट आहे. एकदा इंद्राने महाल बनवला. इंद्राला असा महाल बनवायचा होता की आजपर्यंत सृष्टीमध्ये अशा प्रकारची कोणी निर्मिती केली नाही. म्हणून इंद्र त्या महालाला आणखी सजवू इच्छित होता. त्याने त्यातील विशेषतज्ञांचे मत घेतले. अतिथींना काही सूचना देण्याची विनंती केली. प्रत्येक जण आपापल्या दृष्टिकोनातून सूचना देऊ लागले. त्याप्रमाणे महालात सुधारणा करता करता विश्वकर्मा थकून गेला, अगदी त्रासून गेला. एक दिवस महर्षी लोमेश तेथे आले. विश्वकर्माने त्यांना आपल्याला होणारा त्रास सांगितला व त्यांचे निवारण करण्याची विनंती केली. महर्षींनी त्याला आश्वासन देऊन ते इंद्राजवळ गेले. इंद्राने त्यांना सादर प्रणाम केला व आपला उत्कृष्ट महाल पाहण्याची महर्षींना विनंती केली. महर्षींनी महाल पाहिला; पण काही बोलले नाहीत. तेव्हा इंद्राने विचारले-भगवान महाल कसा वाटला? त्यात काही तृटी तर राहिली नाही ना? निःसंकोचपणे सांगावे-आम्ही तशा प्रकारे सुधारणा करू. यावर महर्षी लोमेश म्हणाले, यामध्ये मला दोन त्रुटी दिसत आहेत त्या कोणीही सुधारू शकणार नाही. इंद्राला हे ऐकून आघात लागला. पण तो म्हणाला आपण आदेश तर देऊन पाहा. महर्षी लोमेश म्हणाले पहिली त्रुटी ही आहे की महाल एक दिवस ढासळून जाईल. आणि दुसरी त्रुटी ही आहे की हा महाल ज्याने बनवला आहे तो येथे राहू शकणार नाही. इंद्र एकदम गप्प झाला. विश्वकर्म्याचा जीव वाचला. या कथानकावरून असे प्रतीत होत आहे की विश्वकर्मा देवराज इंद्राचा शिल्पी होता, व त्याला इंद्राच्या आज्ञेचे पालन करावे लागत होते. परंतु भगवान परम शिल्पी आहे. ऋग्वेदातील पुरूष सूक्तात एक ऋचा आहे. त्यात म्हटले आहे की, ईश्वराच्या तेजाच्या मात्र एका अंशाने सृष्टीचे पालन आणि परिवर्तन होत असते. सर्व प्रथम शिल्पी तर तो ईश्वरच आहे. विश्वकर्मा हा स्वंतत्र अस्तित्व असणारी कोणी देवता नाही.

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात **'ममैवांशो जीव लोके'** माझ्या एका अंशाने सर्व सृष्टीचे पालन, परिवर्तन व संचालन होत असते. म्हणून हे अर्जुना, तू मला शरण ये. म्हणजे विश्वाची संरचना करणारा फक्त एक परमेश्वर आहे. परमात्म्याहून अलग अशी विश्वकर्मा ही कोणी देवता नाही.

एकदा शस्त्रांचे पूजन सूरू होते. भीष्माने अर्जुनाला सांगितले, उद्या शस्त्रांची पूजा केली जाईल तेव्हा अर्जुन खूप लहान होता. त्याने भीष्माला विचारले पितामह, शस्त्रांची पूजा कशाला करावयाची? शस्त्रे देव थोडेच आहेत. यावर भीष्म म्हणाले, वेड्या शस्त्रे म्हणजे परमेश्वर नाही, पूजा तर भगवंताचीच होईल, ही शस्त्रे चालविण्यात ईश्वराने आम्हाला निपुणता

(पारंगतता) द्यावी म्हणून शस्त्रांच्या रूपाने भगवंताचीच पूजा केली जाईल. याचमुळे सर्व देशभर कारखाने किंवा आपला व्यवसाय सुरू करण्यापूर्वी ईश्वराची प्रार्थना-पूजा करूनच कार्यारंभ केला जातो की ज्या योगे कोणत्याही दुर्घटना होऊ नयेत. व्यवसायात प्रभूच्या कृपेने चांगली प्रगती व्हावी, भरभराट व्हावी पूजेमागे हाच हेतू असतो. विश्वकर्म्याच्या पूजनाचेही हेच रहस्य आहे. **'अखिल विश्व यह मोरि उपाया।'** ईश्वरच विश्वाचे निर्माते आहेत म्हणून ईश्वराचेच नाव विश्वकर्मा असे आहे. ईश्वराच्या अनेक रूपांमधून त्या शिल्पी रूपाची निवड करून त्याची पूजा केली जाते. त्यामागचा हेतूही हाच असतो की ज्यामुळे आमच्या कार्यात सतत यश मिळावे, कार्यात वृध्दी व्हावी. यावेळी आम्ही ईश्वराची अशी प्रार्थना करत असतो की आम्ही आपल्याला शरण आलो आहोत. आम्हाला अर्जुनाप्रमाणे यश द्या-विजय द्या. सारांश ईश्वराची रूपे कितीही असोत पण मूलतः कर्ता-धर्ता-संहर्ता ईश्वरच आहे म्हणून पूजन परमात्म्याचेच केले पाहिजे.

मिथिला नगरीत सीतेचे स्वयंवर होते. अनेक पराक्रमी राजे शिवधनुष्य उचलून त्याला प्रत्यंचा लावण्यात अयशस्वी झाले होते. दहा हजार राजांनी तर सामूहिक प्रयत्न केले; पण धनुष्य जागचे हालले नाही. तेव्हा मनात भरलेल्या कोमल रामाकडून हे धनुष्य कसे उचलले जाईल या विचाराने सीता व्याकूळ झाली होती- **'तब रामहि विलोकि वैदेही। सभय हृदय विनवति जेहि तेहि ।।'** ज्या ज्या देवतेचे नाव आठवले त्या त्या देवतेला ती विनंती करू लागली, प्रार्थना करू लागली. **'गननायक वरदायक देवा'** गणेशाची स्तुती करत गणेशाला प्रार्थना करू लागली की गणेशा मी आपली खूप सेवा केली आहे. आपण माझी प्रार्थना ऐका की राम धनुष्याच्या जवळ पोहचताच धनुष्य हलके होऊ दे. तिने शंकर-पार्वतीला विनवले प्रत्येक देवी-देवतेला आवाहन केले- **'देखि रघुवीर तन सुर मनाव धरि धीर। भरे विलोचन प्रेम जल, पुलकावली शरीर ।।'** डोळे विव्हलतेने डबडबले, शरीर रोमांचित झाले, त्या रघुवीरासाठी सीता सर्व देव देवतांना विनवू लागली. तिने इंद्र, वरूण, कुबेर या सर्व देवतांना विनवले असेल. विश्वकर्म्यास तर ती विसरली नसेलच. कारण त्याने एक रंधा मारताच धनुष्य हलके होणार होते. परंतु कोणत्याही देवता तिच्या मदतीला धावून आल्या नाहीत.

तेव्हा सीतेने डोळे बंद करून परमात्म्याचे स्मरण सुरू केले, **'तन मन वचन मोर पनु साचा। रघुपति पद सरोज चितु राचा ।। तौ भगवान सकल उरवासी। करिहि मोहि रघुवीर के दासी ।।'** वाचा-मने त्या रघुपतीवर माझे नितांत प्रेम आहे. तेव्हा भगवंता, त्या रघुवीरची दासी बनण्याचे भाग्य मला द्या. कोणता भगवंत? **'सकल उरवासी'** -जो सर्वांच्या हृदयात निवास करतो तो भगवंत ! कारण तेहतीस कोटी देवांना प्रार्थना करून पाहिले आहे. तेव्हा सर्वांनी निराश केल्यानंतर ती भगवंताच्या चरणी शरण आली. हृदयातील प्रेम भगवंताने लगेच जाणले. **'तेही क्षण राम मध्य धनुष्य तोरा'** -इकडे सीतेच्या हृदयाने भगवंताला

हृदयपूर्वक विनविले त्याच क्षणी इकडे रामाने शिवधनुष्य तोडले (प्रत्यंचा लावताच ते मधोमध तुटले.) सीतेची प्रार्थना सफल झाली. प्रथम तर तिने अनेक देवी देवतांना विनवून पाहिले, पण पदरी निराशा येताच तिने परमात्म्याचे स्मरण केले. रामचरित मानसामध्ये ज्याचे स्मरण करण्याचा आदेश आहे त्या भगवंताचे स्मरण करताच सफलता मिळाली.

सारांश आमच्या परंपरेत देवपूजन केले जाते. सीतेनेही प्रथम तेच केले. परंतु जेव्हा ती सकल उरवासी सर्वांच्या हृदयात वास करणाऱ्या परमात्म्याला शरण गेली तेव्हाच यश आले. तेव्हा जोपर्यंत त्या ईश्वराचे तुम्हाला खरे ज्ञान होत नाही तोपर्यंत तुम्हाला जसे समजेल तसे पूजन करा, परंतु खरा बोध होताच त्या परमात्म्याचे भजन करा. त्या प्रभूचरणी समार्पित व्हा.

विश्वकर्मा शब्दाचा सांकेतिक अर्थ आहे की विश्वात कर्मच प्रधान आहे- **'कर्म प्रधान विश्व करि राखा ।'** विश्वात काही प्राप्त करायचे असेल तर कर्म करा. **'जो जस करइ सो तस फल चाखा ।'** जसे कर्म कराल तसे फळ मिळत असते. चांगल्या कर्माचे चांगले फळ मिळत असते. वाईट कर्माचे फळ वाईट म्हणजे ते पतनाकडे नेते. शुभ-अशुभ कर्म अनंत आहेत. परंतु या सर्व कर्मांत हरीचे स्मरण हे सर्व श्रेष्ठ स्मरण असते. त्याचे फळ कधी वाईट असत नाही. उलट तुम्ही जे इच्छिता तसेच फळ मिळते व सर्वत्र समृध्दी व यश प्राप्त होते.

भगवान रामाचा अभिषेक झाला. तिन्ही लोकांत सुख-शांतीचा सुगंध पसरला. त्या वेळेस भगवंताने एक सभा बोलवली. **'एक बार रघुनाथ बुलाये । गुरू व्दिज पुरवासी सब आये ।।'** गुरू, द्विज, नगरवासी सर्वजण आले तेव्हा त्यांना उद्देशून भगवंत म्हणाले,-**'बडे भाग तन पावा । सुर दुर्लभ सदग्रन्थन्ह गावा ।।'** देवतांना सुध्दा मनुष्य शरीर दुर्लभ आहे. देवतांच्या पेक्षा मानव शरीराला एक मोठा लाभ मिळत असतो. देवतांचे पुण्य क्षीण झाले की त्यांना मृत्युलोक प्राप्त होतो. पुण्य असेपर्यंत देवयोनीचे पुण्य मिळत असले तरी नंतरची मिळणारी गती भयंकर आहे. **'ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं, क्षीणे पुण्ये मर्त्यलोके विशन्ति ।'** देवता मनुष्याप्रमाणे साधना करून परमात्मस्वरूप पोहोचू शकत नाहीत. ही क्षमता फक्त मनुष्य शरीरातच आहे. म्हणूनच मानव शरीरास **'सुर दुर्लक्ष सदग्रन्थन्ह गावा'** ते देवदुर्लभ आहे असे म्हणतात. या शरीराची अशी विशेषता काय आहे ? **' साधन धाम मोच्छ कर व्दारा-'** शरीर म्हणजे मोक्षाचा दरवाजा आहे. साधनेचे ते धाम आहे. येथे साधन म्हणजे डाळ, तांदूळ आटा (पीठ) असे उपजिवीकेस लागणारी साधनसामुग्री नसून मुक्ती मिळवून देणारी तपस्या म्हणजे साधना. श्रध्दा, विवेक वैराग्य व समर्पण या चार गोष्टींनी साधना केली की भगवत्प्राप्ती होत असते. या गोष्टी भगवंताने मानवी शरीरास भेट दिल्या आहेत.

शेवटी भगवंत म्हणाले, **'जो परलोक इहाँ सुख चहहू । सुनि मम वचन हृदय दृढ गहहू ।।'** तेव्हा तुम्हाला परलोक, परमश्रेय पाहिजे असेल अथवा याच लोकात सुखसमृध्दी पाहिजे असेल तर हृदयात एक गोष्ट दृढतापूर्वक धारण करा **'-सुलभ सुखद मारग यह भाई । भगति**

**मोरि पुराम श्रुति गाई ॥**' सर्वांसाठी सुलभ, सुखकारक असा एकच मार्ग आहे -तो म्हणजे माझी भक्ती ! श्रुतीने हेच सांगितले आहे. आता बाजूला सीता बसली होती. तिची भक्ती करण्यास त्यांनी नाही सांगितले. हनुमंत चवऱ्या ढाळीत होता. त्याचीही भक्ती करण्यास त्यांनी सांगितले नाही. त्यांनी सांगितले की माझी भक्ती करा. हेच श्रुतींमध्ये सांगितले आहे. तुम्हाला जर समृध्दी पाहिजे असेल तर माझी भक्ती करा. सर्व गोष्टींसाठी केवळ एकच मार्ग आहे. -माझी भक्ती ! फक्त एका परमात्म्याचे भजन केले पाहिजे -मानसचे संपूर्ण सत्य केवळ एवढेच आहे. अनंत योनी या भोग भोगण्यासाठी आहेत. फक्त मनुष्य कर्मांचा निर्माता आहे. **'कर्मनुबन्धीनि मनुष्यलोके ।'** मनुष्ययोनीत कर्मानुसार बंधन बनत असते. जर तुम्ही सम्यक कर्मांचे परिपालन कराल तर तुमच्या प्रारब्धात काही लिहिले जाणार नाही. कारण कर्म हे एक असे यंत्र आहे की तुम्ही ईश्वराला प्राप्त करू शकता.

भगवान बुध्द गंगेच्या किनारी चर्चा करीत बसले होते. एक ज्योतिषाचार्य तेथून चालले होते. त्यांनी एका पावलाची खुण पाहिली. ते पाहताच तेथेच बसले व आपल्या पुस्तकांचा गठ्ठा उघडून त्या पदचिन्हाचा अभ्यास करू लागले. तेव्हा त्यांना कळले की ते पदचिन्ह कोणा चक्रवर्ती सम्राटाचे असले पाहिजे. पण एक चक्रवर्ती सम्राट असा उघड्या पायाने कसा फिरणार? माझं ज्योतिष खोटं असलं पाहिजे असा तो विचार करू लागला. पुन्हा तो मनात म्हणाला की सम्राट असता तर त्याचे छत्र चामर लवाजमा यांचे काहीच चिन्ह कसे दिसत नाही? कोणत्याही वैभवाच्या खुणा नाहीत. खोटं ! माझं ज्योतिष अगदी खोटं ठरलं. त्यांनी आपली पुस्तकं गंगेच्या प्रवाहात सोडून देण्याचे ठरवले. त्याने पुस्तके गोळा केली. तेवढ्यात त्याला आठवले की हे पाऊल तर नुकतेच उमटलेले दिसत आहे. तेव्हा हा मनुष्य येथे जवळच कोठेतरी असला पाहिजे. बघू या तर खरं की हा सज्जन मनुष्य आहे तरी कोण? त्याने इकडे तिकडे नजर फिरवली तेव्हा त्याला दिसले की एका पिंपळाच्या झाडाखाली भगवान बुध्द पद्मासनात ध्यानस्थ बसले होते. तेव्हा ज्योतिषाचार्याने त्यांच्या हाताच्या रेषा पाहिल्या. पावलांचे अवलोकन केले. त्यांनी गळयावर व मस्तकावर असणाऱ्या रेषा अभ्यासल्या. सगळे तंतोतंत खरे होते, मग असे का? तेव्हा त्याने भगवान बुध्दांना नम्रतेने विचारले की महाशय, आपण कोण आहात? आपण तर मी आयुष्यभर ज्योतिषाचा अभ्यास केला त्या विद्येवर पाणी फिरवलेत. कारण आपल्यामध्ये चक्रवर्ती सम्राट होण्याची सर्व लक्षणे दिसत आहेत. या लक्षणांनी युक्त असा सम्राट गेल्या दोन हजार वर्षांत फक्त दोनच होऊन गेले व तिसरे आपण आहात. आपण सम्राट होण्याऐवजी भिक्षापात्र हातात घेऊन भिक्षाटन करीत फिरत आहात. मला वाटते की माझे ज्योतिषाचे ज्ञान खोटे आहे. आपल्या हातापायाच्या रेषांवरून तर आपण सम्राटच व्हायला हवे होते पण तसे झालेले दिसत नाही. कृपया आपण कोण आहात?

बुध्द म्हणाले, पंडितवर्य, तुमचे ज्योतिष अगदी सत्य आहे. माझ्या जन्माच्या वेळी ज्योतिषाचार्यांनी भविष्य वर्तवले होते की, हे मूल चक्रवर्ती सम्राट होईल. जेव्हा मी मोठा झालो तेव्हा सम्राट बनवण्यासाठी सर्व तऱ्हेचे मला शिक्षण देण्यात आले. परंतु भजनाच्या उपासनेच्या प्रभावाने मी ते संस्कार नष्ट केले. आता ते संस्कार मला विवश करत नाहीत. ते संस्कार म्हणजे भौतिक जीवन मापनाची व्यवस्था होती. त्यात शाश्वत असे काहीही प्राप्त होणार नव्हते. म्हणून भजन आणि तपस्येच्या प्रभावने मी ते कुसंस्कार छिन्न भिन्न करून टाकले.

**'मंत्र महामणि विषय व्याल के । भेटत कठिन कुअंक भाल के ।।'** तुमच्या भाग्यात असाध्य, घोर नरक किंवा अनंत यातना लिहिलेल्या असल्या तरी केवळ श्रध्देने व समर्पणाच्या भावनेने जर त्या परमात्म्याचे नाव तुम्ही घेतले तर या गोष्टींपासून तुमची मुक्तता होते. दोन ते अडीच अक्षराचे कोणतेही भगवंताचे नाम (ॐ अथवा राम) भगवंताला संबोधित असते. अशा नावाचा जप श्रध्देने व समर्पणासह करा. उठताना, बसताना, चालताना, फिरताना सतत नाम जप सुरू ठेवा. कंजूष मनुष्याच्या सोन्याप्रमाणे चित्तापासून त्याला विचलित होऊ देऊ नका. सकाळी उठल्यापासून म्हणजे प्रातःर्विधी करताना, पाणी-पिताना, भोजन करताना, झोपताना जागताना सदैव नाम जप सुरू ठेवा. नियमित नामजपाने अवघ्या चार-सहा महिन्यातच तुम्हाला जाणवेल की ईश्वर तुमच्या बरोबर तुम्हाला साथ देत आहेत. तेव्हा सर्वांनी अत्यंत श्रध्देने व बरोबर परमात्म्याचे भजन करा. तुमची सर्व व्यवस्था ईश्वर स्वतः करेल.

**'कर्म प्रधान विश्व करि राखा ।'** विश्वात शुभाशुभ गोष्टींची जबाबदारी कर्मावर असते. विश्वात कर्मच सर्व काही आहे. सत्कर्म करा.सत्कर्म म्हणजे जे ईश्वराच्या प्रती समपर्ण केले जाते, जे तुम्हाला स्वगृही म्हणजे स्वस्वरूपाकडे घेऊन जाते, ते स्वस्वरूपाचे दर्शन घडवते व परमात्म्याची स्थिती प्राप्त करून देते. आपल्याला पूर्णत्वाकडे घेऊन जाते ते पुण्य कर्म असते व जे पतनाच्या गर्तेकडे घेऊन जाते त्याला पाप कर्म असे म्हणतात. जगात कितीही काही घडले, जग पुढे गेले तरी एक दिवस मनुष्याला हे जग सोडून जायचेच आहे. मग आम्ही अशीच सत्कर्मे का करू नयेत की ज्यामुळे ईश्वर आमच्या मागे पुढे संरक्षक म्हणून राहील.

मनुष्य कर्मांचा निर्माता असतो. महाराज दशरथ पुत्र वियोगाने मरून जाईल असे त्याच्या भाग्यात कोठेच लिहिलेले नव्हते. या जन्मात त्याने केलेल्या कर्माचे ते फळ होते. युवराज दशरथ तारूण्यात शब्दवेधी बाणाचा अभ्यास करत होते. जंगलात झाडीतून 'चिव' असा पक्ष्याचा आवाज दशरथाने ऐकला व त्या आवाजाच्या अनुरोधाने त्याने शरसंधान केले. चिमणी जमिनीवर पडली. वानर म्हणाले 'खाऊ' तर तेही जमिनीवर घायाळ होऊ पडले. हरिण म्हणाले 'पिऽऽ' किंवा वाघाने गर्जना केली तर बाण झाडीतून सूं सूं करीत त्यांच्या छातीत घुसला.

एक दिवस जंगलातल्या जलाशयात बुड-बुड असा आवाज झाला. युवराजाला वाटले की हत्ती पाणी पीत आहे. त्याने लगेच आवाजाच्या अनुरोधाने बाण सोडला आणि बाण श्रावणाच्या छातीत घुसला. दशरथाला खूप पश्चाताप झाला. श्रवण त्याचे सांत्वन करीत म्हणाला मृत्यूला काही ना काही निमित्त पाहिजे असते. राजा तू चिंता करू नकोस. माझे आई-वडील तहानेने व्याकूळ झाले आहेत, त्यांना तू हे पाणी नेऊन पाज. मरणान्तक वेदना सुरू आहेत, मृत्युपंथाला लागला आहे तरी आईवडील तहानलेले आहेत त्यांना प्रथम जाऊन पाणी पाज असे तो मातृपितृ भक्त श्रावण दशरथाला सांगत आहे. त्याला स्वतःची चिंता नाही. दुसरा कोणी असता तर म्हणाला असता की युवराज, प्रथम माझ्यावर इलाज करावा. असा भक्तांचा इतिहास आमच्या संस्कृतीत आहे. दशरथ श्रवणाच्या मातापित्यांना पाणी पाजायला गेला. तेव्हा ते वृध्द माता-पिता म्हणाले, बाळा श्रवण, तू बोलत का नाहीस? अरे आमचा जीव व्याकूळ होऊ लागला आहे. बाळा, तू जोपर्यंत आमच्याशी बोलणार नाहीस तोपर्यंत आम्ही जलग्रहण करणार नाही. तेव्हा दशरथाने त्यांना वास्तव परिस्थिती काय आहे ती सांगितली. दोघेही संपप्त झाले. त्यांनी दशरथाला शाप दिला. वास्तविक त्यांचा शापही दशरथासाठी वरदानच होते. कारण तोपर्यंत दशरथाला संतानप्राप्ती झालेली नव्हती कालांतराने त्याला चार मुलगे झाले. दुराग्रहामुळे रामाला वनवासात जावे लागले. त्या वृध्द माता-पित्यांचा शाप खरा ठरला. दशरथाला पुत्रही झाले व पुत्रशोकही झाला. पुत्रवियोगामुळे दशरथाला मृत्यू आला. मृत्यूपूर्वी दशरथ कौसल्येला म्हणाला -''कौसल्ये, आता तर तूही मला दिसत नाहीस आम्हाला केवळ श्रावणाचे माता-पिता दिसत आहेत. माझा अंतसमय जवळ आला आहे आणि दशरथांनी प्राण सोडला. आता हे पूर्व जन्माचे संचित नाही. याच जन्माचे अर्जन होते. म्हणजे मनुष्यच कर्माचा कर्ता आहे. -निर्माता आहे आणि कर्मच विश्वामध्ये सर्व काही आहे. तेव्हा आपण आपले जीवन सुव्यवस्थित ठेवा. त्यासाठी भगवंताच्या चरणी स्वतःला समर्पित करून भगवंताचे चिंतन करा म्हणजे या भवसागरातून तुम्ही मुक्त व्हाल. जर आपण मायेच्या बंधनात अडकाल तर आवागमनाचे दोन फेरे आणखी वाढतील.

साधरणतः लोक असे म्हणतात की हे आमच्या कर्मात नाही, आमच्या भाग्यात कोठून असणार? परंतु मनुष्य शरीर मिळाले हे तुमच्या पूर्ण भाग्यामुळेच आहे. या व्यतिरिक्त कर्मामध्ये काही लिहिलेले असो की नसो काही अंतर पडत नाही. **'भाग्य मानुष तन पावा'** सर्वांत अधिक भाग्य तर तेव्हाच समजावे जेव्हा अनेक योनीतून भटकत भटकत आम्ही या घाटावर पोहचलो. म्हणजे मनुष्यजन्म आम्हाला लाभला. मग तो जन्म भिकाऱ्याचा असो की सम्राटाचा जन्म असो. त्यात काही अंतर पडत नाही. कारण मनुष्यच कर्माचा निर्माण करणारा आहे, तोच कर्माचा कर्ता आहे.

केवट हा एक नावाडी होता. '**-लोक वेद सब भाँतिहि नीचा । जासु छाँह छुइ लेइय सींचा ।।**' लोकांमध्ये आणि वेदांमध्ये दोन्ही ठिकाणी त्याचे स्थान कमी प्रतीचे होते; परंतु रामाने त्याला ज्या दिवशी जवळ केले तेव्हा तिन्ही लोकांत केवट हा पवित्रपुरूष ठरला. केवट भक्त शिरोमणी ठरला. आज मोठी माणसे जेव्हा एखाद्या गरीब मनुष्याला जवळ करतात तेव्हा म्हणतात -तुम्ही आमचे आहात, जरा दूर बसा. परंतु श्रीरामाने-प्रभूने कधी असे केले नाही. राम एखाद्याला जवळ घेतात तेव्हा त्याला रामत्व प्रदान करतात. आपल्या महानतेत त्याला सामावून घेतात. भगवान श्रीराम म्हणतात-'**तुम मम सखा भरत सम भ्राता । सदा रहेउ पुर आवत जाता ।**' तू मला भरताइतकाच प्रिय आहेस. आमचे घर तुमचेच आहे. केव्हाही या राहा. रामाने त्याला छातीशी कवटाळले. केवटाने गुरू वशिष्ठांचे चरण वंदन करण्यासाठी त्यांच्या चरणांना स्पर्श केला. तेव्हा त्यांनीही त्याला छातीशी धरले. जेव्हा जेव्हा केवट अयोध्येला जायचा तेव्हा तेव्हा भरताच्या बरोबरीने त्याला स्थान मिळे. '**जो जस करइ सो तस फल चाखा**' लहानपणापासून त्याने मनात विचार केला की माझ्या कर्मात काही नाही. नाव या काठावरून त्या काठावर घेऊन जाण्याचे काम करायचा. मासेमारी करण्यात पूर्वजांचे आयुष्य गेले. खा, प्या, काम करा व मरून जा बस एवढेच आयुष्य आहे की अन्य कोणता मार्ग आहे? त्याला समजले-तो रामाचे चिंतन करू लागला रामाच्या वियोगाने तो नाव चालवायचे विसरून गेला. भगवंताने त्याच्या प्रेमाचा प्रवाह पाहिला. आपला रस्ता बदलून प्रभू स्वतः त्याच्या जवळ आले. त्याला उठवले, त्याला जवळ घेतले, त्याच्याकडून पाय धुवून घेतले आणि केवट भुवन भूषण बनला. म्हणून मनुष्य स्वतःच्या कर्माचा स्वतःच कर्ता आहे. तो त्याच्या पूर्वकृत संस्काराचा दास नाही.

लंकेला जाताना सागर पार करून जाण्याची समस्या उभी राहिली. बिभीषणाने भगवान रामाला समुद्रातून मार्ग देण्याची प्रार्थना केली. प्रभू रामचंद्र एका गवताच्या चटईवर बसले होते. पण लक्ष्मणाला ही गोष्ट आवडली नाही. '**मंत्र न यह लछिमन भावा । राम वचन सुनि अति दुख पावा ।। कादर मन कर एक अधारा । देव देव आलसी पुकारा ।।**' हे नाथा, देवाचा काय भरोसा? भाग्य, तकदीर, चांगले संस्कार, प्रारब्ध इत्यादी देवाचे पर्यायी शब्द आहेत. भाग्यामध्ये लिहिलेले नाही तर हात जोडून बसून राहण्यात काय अर्थ? ते काय लिहिले जाणार आहे? देव म्हणजे भीत्र्या लोकांची कुबडी आहे. आपण धनुष्य उचला व समुद्राला कोरडे करून टाका. श्रीराम म्हणाले-लक्ष्मण, तसेच होईल, परंतु प्रथम आम्हाला नीतीचे पालन करू दे. तीन दिवस त्यांनी नीतीचे पालन केले आणि चौथ्या दिवशी त्यांनी बाण धनुष्यावर चढवला. तोच समुद्र त्यांच्यापुढे एक स्वरूप धारण करून उभा राहिला. त्याने श्रीरामांना वंदन करून सांगितले की आपल्या सेनेत नल आणि नील हे विश्वकर्म्याचे मुलगे आहेत. त्यांच्या स्पर्शाने दगड पाण्यावर तरंगतील. आपल्याकडून तयार झालेला सेतू अनंत काळापर्यंत लोकांना प्रेरणा देईल.

वास्तविक संसार हाच समुद्र आहे. ब्रह्म आचरणरूपी प्रवृत्ती ही वानरी सेना आहे. ईश्वर हे या सेनेचे संरक्षक आहेत व अनुभवांच्या रुपाने ते सदैव त्यांच्या बरोबर आहेत. नल आणि नील नियम आणि नाम आहे. जेव्हा या नामाला नियमिततेचे रूप मिळते (म्हणजेच ते नियमाने सतत हृदयपूर्वक घेतले जाते) तेव्हा ते नाम भवसागर तारून नेणारे ठरते. आपला प्रत्येक संकल्प जगाची अभिवृध्दी करणारा पण तुम्हाला बुडवणारा आहे. पण जेव्हा नाव नियमितपणे घेतले जाते तेव्हा प्रत्येक संकल्प ईश्वराच्या नावाने ओतप्रोत होऊ लागतो. नावाचा इतका जप करा की ते तुमच्या श्वासात प्रवाहित होऊद्या. जेव्हा स्वरांचा निरोध होतो, स्वर जेव्हा स्थिर होतो, संकल्प-विकल्प शांत होतात तेव्हा मायेच्या आवरणा खाली लपलेली जी सत्ता आहे तिचेच नाव राम आहे. **'जे रामेश्वर दर्शन करिहहिं। ते तनु तजि मम लोक सिधरिहहिं।।'** सृष्टीमध्ये कोणालाही भवपार होण्यासाठी रामाचा हा सेतू आहे.

विश्वकर्माचा अर्थ आहे की विश्वात कर्म हेच प्रधान आहे. कर्म करताना पुजन करा. विश्वाच्या निर्मात्याचे पूजन करा आणि त्याच्या आदेशाचे पालन करा. **'नर तन भव वारिधि कहँ बेरो। सन्मुख मरूत अनुग्रह मेरो।। करनधार सद्गुरू दृढ नावा। दुर्लभ सांज सुलभ करि पावा।। जो न तरइ भव सागर, नर समाज असपाइ। सो कृत निन्दक मन्दमति, आत्महन गति जाइ।।'** भवसागर पार करण्यासाठी मनुष्याचे शरीर म्हणजे एक जहाज आहे. सद्गुरू म्हणजे केवट आहे. माझी अनुकुलता हाच अनुकुल पवन आहे. मनुष्य शरीराचा हा साज फार दुर्लभ आहे. असे दुर्लभ असणारे मनुष्याचे शरीर प्राप्त झाल्यानंतर जो भवसागर तरून जाऊ शकत नाही तो कृतनिंदक आहे, जो कृती करण्याला घाबरतो, जो उद्यावर पुढे ढकलतो तो मंदमती आहे. हलक्या बुध्दीचा आहे. आणि तो आत्म्याचा खुनी समजला जातो. तेव्हा मनुष्य कर्माचा निर्माता असतो. **'जो सुख करम धरम जरि जाऊ। जहाँ न राम पद पंकज भाऊ।।'** अत्यंत शुभ-पवित्र कर्मे करुन ईश्वराचे जे अविनाशी धाम आहे तेथे तुम्ही पोहोचू शकता. हे धाम म्हणजे आपलेच अव्यक्त स्वरूप आहे, आपले अनंत जीवन व परम शांतीचे ते स्थान आहे. ते प्राप्त झाल्यानंतर तुम्हाला कोणतीही इच्छा राहत नाही, कोणताही अभाव राहत नाही. अशुभ म्हणजेच पापकर्मे केल्याने तुम्ही भवसागरात इकडे-तिकडे भटकत राहाल. तेव्हा मोठया सद्भाग्याने तुम्हाला मानव शरीर मिळाले आहे. त्याच्या सहाय्याने जगातील सर्वोत्कृष्ट नियत कर्म करून तुम्ही या लोकी समृध्दी व परलोकात शाश्वत शांतीचा उपभोक्ता बनू शकता.

**।। ॐ श्री सद्गुरुदेव भगवान की जय ।।**

# ‘ओमित्येकाक्षंर ब्रह्मन व्याहरन्मामनुस्मरन्
# यःप्रयाति त्यजन्देहं स याति परमा गतिम् ।।’

‘ओम् इति’ ओम् हा अक्षय ब्रह्माचा परिचय करून देणारा शब्द आहे. जो पुरूष या नामाचा जप करीत (भगवंताचे स्मरण करीत) शरीराचा त्याग करतो त्याला परमगती प्राप्त होते. श्रीकृष्ण एक योगी होते, परमतत्त्वात स्थित असणारे महापुरूष होते, सद्गुरू होते. योगेश्वर श्रीकृष्णांनी सांगितले की ओम् अक्षय ब्रह्माचा परिचायक आहे, तू त्याचा जप कर आणि ध्यान माझे कर. परमतत्त्वाची प्राप्ती झालेल्या प्रत्येक महापुरूषाचे नाव तेच असते की ज्याची त्याला प्राप्ती होते व ज्यात त्याचा विलय होतो म्हणून नाम ओम्चे सांगितले आणि रूप आपले सांगितले. योगेश्वरांनी कृष्ण, असे जपण्यास सांगितले नाही. परंतु कालांतराने श्रध्दाळू लोकांनी त्यांचेच नाव जपण्याचे चालू केले. अर्थात जशी श्रध्दा असेल त्यानुसार त्याचे फळही त्यांना प्राप्त होते. श्रीकृष्ण म्हणतात, मनुष्याची श्रध्दा जेथे बसते तेथे मी उभा राहतो व त्याची श्रध्दा पुष्ट करीत त्याला इच्छित फळ देतो; परंतु ते फळ भोगले जाते. मात्र माझा जो खरा भक्त असतो तो मलाच प्राप्त होतो. त्याचे कधीही पतन होत नाही.

**‘ यथार्थ गीताः श्रीमद्भगवद्गीता ’**

**(अध्याय - ८, श्लोक १३)**

# मूर्तिपूजा योग्य की अयोग्य ?

अध्यात्ममार्गावर जाण्याचे प्रवेशद्वार म्हणजे मूर्तिपूजा आहे. यामुळे प्रत्येक लहान मुलातसुध्दा अध्यात्माचे बीज रुजवता येते.

याहून उच्च अवस्थेला पोहचण्यासाठी महापुरुषाचे सान्निध्य अपेक्षित आहे.

**- स्वामी अड़गड़ानन्द**

# मूर्तिपूजा योग्य की अयोग्य ?

बंधुनो,

आज सभेतील काही लोकांकडून काही प्रश्न विचारले गेले आहेत. त्यापैकी एका सज्जनाने असा प्रश्न विचारला आहे की मूर्तिपूजा करणे योग्य आहे की नाही ?

हा प्रश्न म्हणजे जगातील अत्यंत विवादास्पद प्रश्नांपैकी एक प्रश्न आहे. मूर्तिपूजकांमध्ये व मूर्तिभंजकामध्ये अनेकदा झालेल्या संघर्षाच्या ठिणग्यांनी इतिहास भरून गेलेला आहे. जगात सर्वांत अधिक मूर्ती भारतात आहेत. तेहतीस कोटी देवी-देवतांची संख्या तर केव्हाच पार होऊन गेली आहे. कारण आजपण त्या संख्येत वाढ होत आहे. एवढेच नव्हे तर आजकाल मुलांची नावे जशी गुड्डी-गड्डू असे ठेवतात, तसा प्रकार देवतांमध्येही घुसला आहे. कारण बरैनी गावात गुड्डी माईचा चबुतरा आहे. थोडासा लाल रंग फासला की नमस्कार करायला येणाऱ्यांची रांग लागते. आपण कुटुंबनियोजन स्वीकारले असले तरी देवी-देवतांच्या वाढीवर कोणताच अंकुश नाही आणि देवतांची उणीव भासली तर लोक कबरीकडे धाव घेत आहेत. गेल्या दोन अडीच हजार वर्षांमध्ये आपल्या धर्माचार्यांनी या देवतांना वाढवण्याचे काम केले आहे. गणेशाच्या पूजनापासून आरंभ करुन न जाणो किती तरी देवांची नावे घेत बसतात. भगवंताचे नाव ते घेतच नाहीत. व म्हणूनच मूर्तिपूजा केली पाहिजे की करू नये हा आपला प्रश्न अत्यंत विचार करण्यासारखा आहे.

तसे पाहिले तर अवघे विश्वच मूर्तिपूजक आहे. पंचमहाभूतांपासून निर्माण झालेल्या कोणत्याही आकारावर दृढ श्रध्दा ठेवणे म्हणजे मूर्तिपूजा करणे होय. मंदिर, मशीद, चर्च, गुरूद्वारा, पुस्तक, आकाश इत्यादी गोष्टीवर श्रध्दा ठेवणे म्हणजे मूर्तिपूजाच होय. मग मूर्तिपूजक कोण नाही?

भारतामध्ये सर्वांत जास्त मूर्ती आहेत, मंदिरे आहेत हे खरे असले तरी भारताला मूर्तिपूजक म्हणता येत नाही. कारण भारत हा अध्यात्मिक देश असल्याने मंदिर, मूर्ती म्हणजे अध्यात्माच्या प्राथमिक स्तरावरील गोष्टी आहेत. माता आपल्या लहान मुलांना शिकवताना सांगते की बाबांना नमस्कार कर, मोठ्या दादाला (भावाला) नमस्कार कर. घरात जेवढी देवतांची चित्रे-फोटो असतील त्या सर्वांना नमस्कार कर असे आई मुलाला सांगते. धुपदीप

लावायला सांगते. तुळशीला नमस्कार करायला सांगते. गंगादि नद्या पवित्र आहेत. सूर्य-चंद्र नक्षत्रे आहेत. त्या सर्वांना नमस्कार करायला आई सांगते. अध्यात्माचे संस्कार होतात. यामुळे त्यांना एवढे समजते की शाश्वत सत्ता, सक्षम आहे ती आम्हांला शक्ती देते. आपल्या पूजनाच्या पूर्तिकाळात आमच्या महापुरूषांनी हे तत्त्व जाणून घेतले की, तो परमात्मा या जगाच्या कणाकणात व्याप्त आहे. तो कणाकणात ओतप्रोत भरलेला आहे म्हणून जड-चेतन या सर्वांना नमस्कार करावा, हे प्रशिक्षण लहानपणापासून आम्हाला मिळत असते.

मूल हळूहळू अठरा-वीस वर्षांचे झाल्यानंतर ते संभ्रमात पडते की ईश्वर एक आहे की अनेक आहेत? आम्ही भजन कोणाचे करावे? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी तो मोठमोठ्या विद्वानांना भेटतो. तीर्थक्षेत्री जातो, मंदिरात जातो, संतांच्या सान्निध्यात राहतो. आणि जेथे जेथे महापुरूष-सद्गुरू भेटतात तेव्हा त्यांच्याकडून साधनाक्रम समजावून घेतो आणि मग तो शांत, एकांत अशा जंगलात, झोपडीत किंवा पडक्या वास्तूत बसलेला दिसतो. आरंभी कट्टर मूर्तिपूजक असणारा तो जिज्ञासू साधक पुन्हा कधीही मंदिरात जात नाही. जर योग्य साधनाक्रमाने तो जात असेल तर तो जिज्ञासू शांत, एकांत अशा वनात प्राप्त होतो, तो एकांतसेवी बनतो.

गौतम बुध्द प्रथम मूर्तिपूजक होते. परंतु नंतर बुध्दांनी मूर्तिपूजेचे जेवढे खंडन केले तेवढे अन्य कोणीही केले नाही. महावीर स्वामी प्रथम मूर्तिपूजक होते. गृहत्याग करण्यापूर्वी सामान्य लोक जसे धर्म-कर्म करत असतात तसेच तेही करत होते. गृहत्यागापूर्वी एक वर्षांपर्यंत त्यानी ब्राह्मणांना एक कोटी सुवर्ण मुद्रा दान दिल्या होत्या. जैन हा एक अलग धर्म असता तर त्यांनी ब्राह्मणांना दान का दिले असते? प्रथम आपल्या परंपरांचे पालन चांगल्या प्रकारे केले; परंतु जेव्हा साधनेच्या मार्गाला लागले तेव्हा मंदिरात पुन्हा कधीही गेले नाहीत. जड भरत, प्रत्येक महापुरुष, आमचे गुरुदेव आणि स्वतः आमचेही तेच इतिवृत्त आहे. थोडक्यात भारत मूर्तिपूजक नाही. मूर्तिपूजा म्हणजे अध्यात्म मंदिराचे केवळ प्रवेशद्वार आहे. यामुळे भारतातील प्रत्येक मुलात लहानपणापासूनच अध्यात्माचे बीज रुजवले जाते.

शिशूच्या चेतन, अचेतन, मनावर संस्कारांचे दूरगामी होणाऱ्या परिणामांचे संशोधन करुन मग आमच्या भारतीय मुनींनी गर्भाधान संस्काराची कल्पना समाजात रुजवली. त्यांनी जाणून घेतले की गर्भस्थ बालक ऐकू शकतो, समजू शकतो,आणि तसे आचरणातही आणतो. काही दिवसांपूर्वीच एक सद्गृहस्थ आपल्या अडीच-तीन वर्षाच्या मुलाला घेऊन आले होते. तो मुलगा रामचरित मानसामधील **''नमामीशमीशान निर्वाण रूपं''** ही शिव-स्तुती तोंडी म्हणत होता. त्यांनी सांगितले की याला आम्ही पुढे बसवून ही स्तुती शिकवलेली नाही परंतु जेव्हा तो गर्भात होता तेव्हा मी रोज हे स्त्रोत्र त्याच्या आईला ऐकवत असे व तीही तल्लीन होऊन श्रध्दापूर्वक ते स्तोत्र ऐकत असे. अशाच प्रकारचे कथानक महाभारतात अभिमन्यूचे आहे. त्याने

गर्भावस्थेमध्ये असताना चक्रव्यूह-भेदाचे ज्ञान अर्जित केले होते-महर्षी अष्टावक्रांचीही कथा अशीच आहे. त्यांचे वेदपाठी वडील शिष्यांना श्रुतज्ञान देत होते. त्यांची आई तल्लीन होऊन ऐकत होती. शिकताना थोडी चूक झाल्याबरोबर गर्भस्थ शिशूने त्यांना टोकले. पिताजी क्रोधित झाले. अजून जन्मलाही नाही तोच मला शिकवू लागला आहे. त्यांनी गर्भस्थ बालकाला शाप दिला की आठ अंगाने वाकडा होशील. तोच मुलगा अष्टवक्र नावाने प्रसिध्द आहे. उपनिषदात त्याच्या कथा आहेत, असे म्हणतात त्यांनी आपल्या पित्याला विदेहराज जनकाच्या कैदवासापासून मुक्त केले होते. थोडक्यात सांगायचे म्हणजे मुले गर्भात असल्यापासूनच शिकण्यास सुरूवात करीत असतात आणि म्हणून आमच्या पूर्वजांनी या अवस्थेत मुले असतानाच त्यांना संस्कार देणे सुरू केले.

त्यानंतर जातकर्म, मुण्डन संस्कार (जावळ काढणे), अन्नप्राशन संस्कार (उष्टावण) इत्यादी सोळा संस्कारातून केवळ एक गोष्ट सांगितली जाते की ''सहस्त्रशीर्ष पुरूषः'' अर्थात तो परमात्मा अनेक हातांचा, अनेक मुखांचा आहे. त्याच्या तेजाच्या अंशमात्राने या सृष्टीचे सृजन आणि पालन होते. पूर्व महर्षींनी त्या परमात्म्याला मानस यज्ञाद्वारे जाणले व सांगितले की ब्रह्माने ज्याचे ध्यान केले, इंद्राने ज्याची स्तुती केली तेच एक सत्य आहे. ते तुम्ही धारण करा. कर्मकांडामध्ये एवढेच सांगितले जाते. काण्ड म्हणजे घटना ! जन्म एक घटना आहे. विवाह ही देखील एक घटना आहे. जीवनातील प्रत्येक प्रमुख घटनेच्या वेळी आमच्या पुरोहितांनी ईश्वराची उपासना करण्यासाठी-त्याचा शोध घेण्यासाठी समाजाला उत्प्रेरित केले. ईश्वर भजनाची भावना रूजवण्यासाठी आमच्या पुरोहितांनी केलेली ही अध्यात्मिक व्यवस्था आहे.

बाल वर्गात मुलांना 'ग' गणतीचा 'क' कमळाचा किंवा 'ए' फॉर ॲपल, 'बी' फॉर बॅट असे शिकवले जाते.प्रत्येक अक्षर समजण्यासाठी मोठमोठ्या चित्रांनी पुस्तक भरून गेलेले असते. 'चल रे भोपळया टुणुक टुणुक !' अशा कुतुहल वाढवणाऱ्या काल्पनिक गोष्टी मुलांना फार आवडतात. तीच मुलं जेव्हा माध्यमिक शाळेत जातात तेव्हा महाराणा प्रतापचा भाला व त्याचा घोडा चेतक, राजा शिवाजी, अकबराच्या साम्राज्याचा विस्तार अशा लहान मोठ्या ऐतिहासिक गोष्टी त्यांच्या मनावर बिंबून राहतात आणि हीच स्नातक, परास्नातक आणि संशोधनाच्या स्तरावर पोहचतात तेव्हा ज्यात एकही चित्र नाही अशी मोठमोठी पुस्तके तन्मयतेने वाचतात. तेथे ना कमळ असते ना ॲपल असते. कारण चित्रांच्या माध्यामातून ज्या आकृतींचा बोध द्यायचा होता तो करून दिला ते अक्षर मनात ठसल्यावर चित्रांचे काम संपले, बरोबर याच प्रकारे मूर्ती म्हणजे अध्यात्माच्या पातळीवरील प्राथमिक स्तर आहे. परिचयाचे अक्षर आहे, आरंभीचे साधन आहे.परंतु मरेपर्यंत मूल जर 'ए' फॅार ऍपलच शिकत राहील तर ते शोचनीय आहे. अहो, याच्या पुढेही त्याने जायला पाहीजे. याचप्रकारे मंदिरात जाणे उचितच आहे परंतु मरेपर्यंत रोज मंदिरात जाणे साधकासाठी भीत्रेपणाचे ठरेल.

जागतिक पातळीवर पाहिले तर देवांची मंदिरे अब्जोंनी आहेत. त्यात ईश्वराच्या मूर्तीही एक प्रकारच्या नाहीत, कारण त्यात ईश्वराची वास्तविक प्रतिमा कुठेच दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे **'जिन देखा सो कहा नहिं,काही सो देखा नहिं । रहिमन अगम बात के, कहन सुनन को नाहिं ।'** ज्यांनी ईश्वराला पाहिले आहे त्यांनी तो कसा आहे ते सांगितले नाही आणि जे सांगतात की ईश्वर असा आहे त्यांनी त्याला कधी पाहिलेलेच नाही. वास्तविक ईश्वर अगम्य आहे. सांगण्याची किंवा ऐकण्याची ही गोष्टच नाही. भगवान श्रीकृष्ण म्हणतात 'तो नित्य आहे, अगोचर आहे. त्याला इंद्रियाकडून पाहिले किंवा जाणले जात नाही. मन व बुध्दी ज्या मर्यादेपर्यंत निर्णय करू शकतात केवळ तेथपर्यंत ईश्वर नाही. तेव्हा इंद्रियांचे दमन व मनाचे शमन करून महापुरूषांनी त्याला अनुभवरूपी डोळयांनी पाहिले.' आदि शंकराचार्य म्हणतात-अनिर्वचनीय ! वाणीने त्याचे वर्णन करताच येत नाही. परंतु तुम्ही त्याला प्राप्त करू शकता कसे? **'करतल भिक्षा तरूतल वास भज गोविन्दम मूढमते ।'** अरे मूर्खा भजन कर. हातावर भिक्षा आणि वृक्षाखाली राहायला मिळाले तरी ''भज गोविन्दम्''-कोणत्याही परिस्थितीत असलास तरी भजन कर. कबीर म्हणतात, **'लाली मेरे लाल की, जित देखूँ तिन लाल । लाली देखन मै गयी, मै भी हो गई लाल ।'** कबीरांनी ईश्वराच्या स्वाभाविक प्रकाशाला लालीची संज्ञा दिली. त्या माझ्या लालची लाली सर्वत्र व्यापून आहे. लाली म्हणजे लालीमा-'जित देखूँ तित लाल' 'ईशांवास्यमिंद सर्व' जेथे जेथे या लालीम्याचा स्पर्श झाला ते सर्व काही त्यात सामावून गेले. पूज्य महाराज म्हणत असत की मिठाचे गोठोडे समुद्राचा थांग घ्यायला गेले आणि समुद्रच होऊन गेले. त्यातच विरघळून गेले. मग परत येऊन तुम्हाला संदेश कोण देणार?

प्रत्येक महापुरूषाचा एकच निर्णय आहे. गोस्वामी तुलसीदास म्हणतात **''तुम्हरी कृपा पाव कोइ कोइ''** भगवान, तुमच्या कृपेने क्वचितच कोणी तुम्हाला प्राप्त करू शकतो आणि जेव्हा तो तुम्हाला प्राप्त करतो तेव्हा तर भगवान कसे आहेत? **'जानत तुम्हहि तुम्हहि होई जाई ।।'** तो तुम्हाला जाणून तुमच्यासारखा होऊन जातो. सेवक नेहमीसाठी संपून जातो आणि स्वामीरूप बनून जातो. गोस्वामी एक उदाहरण देतात.**''सुरसरि मिले सो पावन कैसे । ईस अनीसहिं अन्तर जैसे ।।''** जर पाण्याच्या एका थेंबाला गंगेचा स्पर्श झाला तर थेंबाचे वेगळे अस्तित्व शोधूनही सापडत नाही. तो थेंब गंगारूप बनून जातो. गंगेच्या धाराच सर्वत्र दिसू लागतात. बरोबर याच प्रकारे ईश्वराचे शुध्दतम अंश असणारा जीवात्मा साधनेचा दोर पकडून परमात्म्याला स्पर्श करताच **''जानत तुम्हहिं तुम्हहि होई जाई''** परमात्मास्वरूप होऊन गेला. कारण जो अधिक असतो त्याचेच नाव मागे उरते. जो अंशमात्र असतो त्याचे अस्तित्व अंशामध्ये सामावले जाते. ही सहजस्वरूपाची प्राप्ती होय.

हेच कैवल्य पद होय. म्हणूनच आम्ही म्हणालो की ईश्वराची मंदिरे खूप बनवली आहेत परंतु खरी प्रतिमा कोठेही नाही.

गोस्वामींनी हा प्रश्न अनेक पैलूंनी समजवण्याचा प्रयत्न केला आहे. माता पार्वतीने भगवान शंकरांना विचारले की ज्याचे आपण रांत्रदिन चिंतन करता तो राम कोण आहे? ''**राम सो अवध सुत सोई। की अज अगुन अलखगती कोई।**'' अयोध्येच्या नरेशाचा पुत्र होते की तुमच्या चिंतनातला राम अविनाशी, निर्गुण असा दुसरा कोणी आहे? '**जौ नृप तनय त ब्रह्म किमि, नारि विरह मति भोरी। देखि चरित महिमा सुनत भ्रमित बुध्दिं अति मोरि।।**' **(मानस १/१०८)** जर श्रीराम एका राजाचा पुत्र आहे तर तो ब्रह्मरूप कसा समजावा? पत्नीच्या विरहात हाय सीते, हाय सीते, करणारा, वृक्ष आणि लतांना तिचा ठावठिकाणा विचारणारा ब्रह्म कसा होऊ शकतो? वृक्षांनी त्याच्या बरोबर यापूर्वी कधी वार्तलाप केला होता का? '**देखि चरित महिमा सुनत, भ्रमित बुध्दि अति मोरि।**' एकीकडे असे चरित्र आणि दुसरीकडे त्याचा थोर महिमा की जेथे राम दिसला तेथे लक्ष्मण व सीताही उभे असलेले दिसले, म्हणून मला संभ्रम होत आहे. राम कोण आहे? कसा आहे?

प्रथम भोलेनाथ खूप संतापले. मग ध्यान लावून पाहिले आणि म्हणाले पार्वती, हा प्रश्न तुझा नाही. तुला तर कसली शंकाही नाही. परंतु या जगातील लोकांचा मात्र हा प्रश्न निश्चितपणे आहे. या जगताच्या हितासाठी तू हा प्रश्न विचारला आहेस तर मग ऐक '**आदि अन्त कोउ जासु न पावा। मति अनुमानि निगम अस गावा।।**' तो केव्हा जन्मला (आदि) व तो कोठपर्यंत राहणार आहे (अंत)कोणीही सांगू शकत नाही, परंतु आपल्या विवेकानुसार वेदांनी त्याचे वर्णन करताना म्हटले आहे की '**बिनु पद चलइ सुनइ बिनु काना। कर बिनु करम करइ विधि नाना।।**' पायाशिवाय तो चालतो, हातांशिवाय तो सर्व कार्य करतो.'**तन बिनु परस नयन बिनु देखा**'-शरीराशिवाय तो स्पर्श करतो, डोळयांशिवाय तो सर्व काही पाहतो. अशा या परमात्म्याचा फोटो काढण्यासाठी फोटोग्राफर बोलवा. काढा फोटो. शक्य आहे का ते? '**असि सब भाँति अलौकिक करनी। महिमा जासु जाइ नहि बरनी।।**' जो अलैकिक आहे सृष्टीच्या पलीकडे ज्याचे आचरण आहे, त्याचा महिमा वाणीने वर्णन करण्याचा विषय नाही. जो अनुभवगम्य आहे. शेवटी ते निर्णय देतात. '**जेहि इसि गावहि वेद बुध जाहि धरहि मुनि ध्यान। सो दशरथ सुत भगत हित, कोशलपति भगवान।**' या प्रकारे वेद आणि बुध म्हणजे प्रत्यक्षदर्शी तत्त्वदर्शी महापुरूष ज्याचे वर्णन करतात, मुनी ज्याचे ध्यान करतात तो आहे दशरथ सुत, भक्तांचा हितेच्छू. अयोध्याचा स्वामी भगवान ! मुनी कोणत्याही मूर्तीचे

ध्यान करत नाहीत. जो पायाशिवाय चालतो, डोळयाशिवाय पाहतो, ज्याची करणी अलौकिक आहे अशा परमात्म्याचे मुनी लोक ध्यान करतात. जर त्याच्या व्यतिरिक्त कोणी कशाचे ध्यान करत असतील तर ते खरे मुनी नव्हते.

भगवान राम दशरथ सुत आहे. तुलसी मानस म्हणजे आत्मदर्शनाची पुंजी आहे. म्हणून ते रहस्यात्मक आहे. मनाला-अंतःकरणाला मानस असे म्हणतात. रामचरित मानस म्हणजे आपल्या अंतःकरणात प्रवाहित असणारे रामाचे चरित्र. ते सर्वांच्यात आहे; परंतु दिसत नाही. सूक्ष्मतेने मनाचे विश्लेषण केले तर तेथे कामच्छेचे चरित्र, लोभाचे व मोहाचे चरित्र, राग-द्वेषाचे चरित्र आपल्याला दिसून येते. रामाचे चरित्र तेथे पाहायला मिळतच नाही. आता रामाचे चरित्र ज्या प्रकारे जागृत होते व जागृत झाल्यावर जे रामाच्या जवळ नेते तो साधना विधी या रामायणात अंकित केला आहे. याप्रकारे संपूर्ण रामायण मानसिक आहे. आपल्या मनाच्या अंतरंगात प्रसुप्त रामाची अर्थात त्या परम चेतनाची जागृती व रामापर्यंत आमचा असणारा दुरावा अंतर कमी करून देणारी प्रक्रिया या मानसामध्ये आहे. यात दहाही इंद्रियांची निरोधमयी प्रवृत्ती म्हणजे दशरथ आहे. विषयांचे सेवन करण्याने मनाचा निरोध-संयम होत नाही. **'जिमी प्रतिलाभ लोभ अधिकाई। सेवत विषय विवर्ध जिमि, नित नव नूतन मार'** इच्छा अधिक भडकून उठतात. परंतु जेव्हा मनाचे संयमन होते ते ईश्वराच्या भजनाने-चिंतनाने होते. ईश्वराच्या स्मरणाने होते. ईश्वराच्या स्मरणाने ईश्वरावरील श्रध्दा दृढ होते, दहाही इंद्रिये संयमित होऊन एका इष्ट दिशेने ज्या क्षणी प्रवाहित होतात त्या क्षणी राम प्रकट होतात.

भगवान भक्तांचे हितैषी असतात आणि जो आपल्या सर्व इंद्रियांच्या विकारांचा निरोध करून ईश्वराचे स्मरण करतो तोच खरा भक्त असतो. आत्मिक संपत्तीच्या संग्रहाला कोश म्हणतात. तेच आपले निज धन आहे. ते एकदा प्राप्त झाले की साधकाला निश्चितपणे मुक्ती देत असते. त्या संपत्तीचा जो मालक आहे तो म्हणजे ईश्वर !

याच कारणामुळे ईश्वराची मंदिरे अनेक बनली; परंतु ईश्वराची मूर्ती कोणत्याही मंदिरात नाही आणि असूही शकत नाही. जो पायाशिवाय चालतो, तो अलौकिक आहे, ज्याने त्याला जाणले तो त्याच्यातच सामावून जातो, तेथून कोणीही ईश्वराविषयी सांगण्यासाठी परत येत नाही व तो अनिर्वचनीय असे कोणी सांगितलेही नाही **'कह कबीर गूँगे की शक्कर खाय सोई पै जाने'** मुका मनुष्य साखर खातो, डोके हलवतो, हसतो; परंतु साखरेच्या स्वादाचे वर्णन तो करू शकत नाही. म्हणूनच जेवढया, मूर्ती आहेत त्यापैकी अधिकांश मूर्ती त्या महापुरूषांच्या आहेत की ज्यांनी परमात्म्याला स्पर्श करून परमात्मभाव प्राप्त केला आहे. म्हणजे मूर्ती कैवल्यपद प्राप्त

केलेल्या परमात्मस्वरूप महापुरूषांच्या आहेत म्हणजे पर्यायाने त्या परमात्म्याच्याच मूर्ती आहेत. आमचे ते पूर्वज परमात्म्याच्याच मूर्ती आहेत. आमचे ते पूर्वज परमात्मरूप आहेत मग तो कृष्ण असो, राम असो, नानक असो की बुध्द असो अथवा भगवान महावीर असो किंवा शिव असो. अशाच श्रध्दास्थान असणाऱ्यांच्या मूर्ती मंदिरांत विराजमान आहेत. महापुरूष ज्या रूपात सृष्टीमध्ये येतात त्या रूपाचे स्मरण करताच ते लगेच प्रेरणा देतात व मार्गदर्शनही करतात. महापुरूषांचे ते स्वरूप कधी मरत नाही. पूज्य महाराज म्हणायचे-मी कधीही मरणार नाही. माझे शरीर नष्ट होईल; पण मी मरणार नाही. मी सूक्ष्म शरीराने येथे सदैव विद्यमान राहीन. जो कोठूनही मला पुकारेल मी तेथे त्याची मदत करेन.

आम्ही महाराजांना विचारले की, महाराज जर शरीर जतन करून ठेवले तर? तेव्हा ते म्हणाले, वृध्दावस्थेत शरीराला कष्ट होतात. खोकला-ढास सुरू होते. ज्या त्रुटीच्या पूर्तीसाठी शरीर प्राप्त झाले होते त्या त्रुटीची पूर्ती झाली. उपासनेचा-भजनाचा परिणाम प्राप्त झाला. स्वरूप प्राप्त झाले. मग ते कशासाठी ठेवायचे? मोठमोठे अवतार होऊन गेले, ऋषी-महर्षी होऊन गेले पण आज कोणाचेही शरीर जतन केलेले दिसून येत नाही. कोणत्या ना कोणत्या निमित्ताने शरीराचा त्याग करावाच लागतो. तुम्ही पाहता ते शाश्वत कधीच नसते. त्यानंतर बरोबर पाचव्या दिवशी महाराजांनी आपल्या शरीराचा त्याग केला. अत्री महाराज आजही सूक्ष्म रूपाने आहेत. प्रत्येक महापुरूष सूक्ष्म रूपाने आजही आहेत. अत्यंत श्रध्देने आपण त्यांचे स्मरण केले तर ते आपल्याला मार्गदर्शन करतात. परंतु जेव्हा तुम्ही चांगली साधना (भजन) करून परमात्म्याच्या पथावर वाटचाल करू लागाल तेव्हा वर्तमानात जे स्वरूप प्राप्त केलेले महापुरूष आहेत त्या महापुरूषांशी ते तुमचा संपर्क साधून देतील. तुमच्या कल्याणासाठी तुम्हाला ते त्या महापुरूषांच्या मांडीवर बसवतील **'सद्गुरू मिले जाहि जिमि संशय भ्रम समुदाय'** सद्गुरू प्राप्त होताच सर्व शंका-भ्रम यांचे समूळ उच्चाटण होते आणि मग साधनेला एक गती येते.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात की हे अर्जुना, अनेक प्रकारच्या कामनांनी ज्यांची बुध्दी वेढली गेली आहे, ते मूढ बुध्दीचे अविवेकी लोक अन्य देवतांची पूजा करीत बसतात. परंतु मी सर्वत्र व्यापून असल्याने त्याची एखाद्या खांबावरील, झाडावरील, एखाद्या रोपावरची किंवा एखाद्या मूर्तीवरची श्रध्दा टिकून आहे. कारण मी त्याच्या मागे उभा राहतो व त्याची देवश्रध्दा पुष्ट करून त्याला इच्छित फळ तत्काळ देतो. परंतु ते फळ भोगताच नष्ट होऊन जाते.

जर फळ प्राप्तच होते मग कशाचीही पूजा केली तरी काय हरकत आहे? यावर श्रीकृष्ण म्हणतात,-अर्जुना, देवतांची पूजा करणारे माझीच पूजा करतात; परंतु ते पूजन अविधीपूर्वक असते. पूजन करायचे तर विधीपूर्वक का करू नये? जर श्रम करायचेच आहेत तर मग ते नष्ट न होता ते आम्हाला सतत मदतरूप होतील; आम्हाला साथ देतील असेच का

करू नयेत? यासाठी योगेश्वर श्रीकृष्णांनी आम्हाला विधीही सांगितला आहे. तो विधी आहे-नियत कर्म,-गीतोक्त कर्म ! एक आत्माच परमपूज्य, नित्य, सत्य, व सनातन तत्त्व आहे, तोच भगवान आहे. तो प्राप्त करण्याचा एक नियत विधी आहे, एक निश्चित विधी आहे. त्याचे नाव आहे यज्ञ ! या यज्ञाला कार्यरूप देणे म्हणजे कर्म होय. मनुष्य शरीर मिळाले आहे तर आपलेही दायित्व तेवढेच महत्त्वाचे आहे. म्हणून हेच 'कार्यम् कर्म' आहे. ते कर्म केवळ माझ्यासाठी आहे. माझ्या प्राप्तीचा उपाय आहे यासाठी 'मदर्थं कर्म' असे म्हटले जाते. कामनारहित होऊन माझे चिंतन कर. यालाच कर्म म्हटले आहे. म्हणून गीतेमध्ये निर्धारित विधीने पूजन करायला पाहिजे. या चिंतनसाधनेत जेथे कोठे त्याला तत्त्वदर्शी भेटतात तेव्हा त्याला पुढे जाण्यासाठी रस्ता मिळतो, आणि मगच योग्य मार्गावर वाटचाल करू लागतो. मग भजन जागृत होते.

अर्जुनाने यावर प्रश्न विचारला-भगवान ते ज्ञान मी कोठे प्राप्त करू? त्यावर भगवान म्हणाले, ''एखाद्या तत्त्वदर्शी महापुरूषाजवळ जाऊन निष्कपट भावाने सेवा करून व प्रश्न विचारून तू ते ज्ञान प्राप्तकर. त्याच्या कडून जाणून घेतल्यानंतर तुला पुन्हा कधीही कसली शंका राहणार नाही. कोणता रस्ता बरोबर आहे. इकडचा की तिकडचा? हे भजन बरोबर की ते भजन बरोबर असा कधी संदेह राहणार नाही आणि तू ते ज्ञान प्राप्त करू शकशील की त्यानंतर काहीही प्राप्त करण्याचे बाकी राहणार नाही.''

का बरं? स्वतः भगवान समोर उभे होते. दुसऱ्या तत्त्वदर्शीकडे पाठवण्याची काय आवश्यकता होती? भगवान श्रीकृष्णाच्या शब्दांत विचार करायचा झाला तर तेही एक तत्त्वदर्शी आहेत, पुरूषोत्तम आहेत. योगेश्वर आहेत. जो स्वंय योगी आहे किंवा दुसऱ्यांना योग प्रदान करण्याची ज्याच्यात क्षमता आहे त्याला योगेश्वर म्हणतात. तो योगाचा ईश्वर, योगाचा विशेषज्ञ, योगाचा स्वामी, प्रेरक आणि संचालक असतो. भगवान श्रीकृष्ण जाणत होते की ते स्वतः योग्यता पात्र होते. पण भविष्यात लोकांना असा संदेह होता कामा नये की भगवान निघून गेले आता भजन कोणाचे करावे? आणि म्हणून त्या महापुरूषाने साधकाला तत्त्वदर्शी महापुरूषाकडे शरण जायला सांगितले.

सारांश मूर्तिपूजेसारख्या छोट्या-छोट्या पूजा करता करता साधक जेव्हा उन्नत अवस्थेला पोहचतो, तेव्हा त्याला तत्त्वदर्शी महापुरूषाचे सान्निध्य मिळाल्यानंतर तोच साधक शांत, एकांत वातावरणात जेथे पूजा करायला पाहिजे तेथे तो पूजा करू लागतो.

आरंभी भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले नाही; परंतु अठराव्या अध्यायापर्यंत पोहचता पोहचता अर्जुनाने प्रश्न करण्याचे बंद केले. कारण त्याच्या शंकांचे निरसन झाले होते. जेथे तो विचारू शकला नाही तेथे भगवंताने स्वतः त्याला सांगितले, शेवटी त्याची योग्यता जाणून भगवंताने स्वतःच कोठे राहतो हे सांगितले आहे. **'ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन**

**तिष्ठाति (गीता/१८/६१)'** तो ईश्वर सर्व प्राण्यांच्या हृदयदेशात निवास करतो. हृदय इतके जवळ अगदी शरीराच्या आत असून लोक त्याला कसे जाणत नाहीत? श्रीकृष्ण म्हणाले- अर्जुना मायारूपी यंत्रावर आरूढ होऊन भ्रमवश झालेले लोक इकडे तिकडे भटकत राहतात व म्हणून ते अंतर्यामी असणाऱ्या ईश्वराला जाणत नाहीत. त्याला जाणण्यासाठी शरण कोणाला जायचे? तेव्हा पुढच्या श्लोकात श्रीकृष्ण सांगतात **'त्वमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत । तत्प्रसादात्परां शान्ति स्थानं प्राप्यसि शाश्वतम् ।। (१८य६२)'** त्या हृदयस्थ ईश्वराला शरण जा. संपूर्ण भांवांनी त्याला शरण जा. आपला थोडा भाव पशुपतींनाथांत, थोडा भाव वैष्णव देवीत, थोडा कामाख्या देवीत आणि थोडा मैहर देवीत असा वेगवेगळया देवतांच्या ठिकाणी आपली श्रध्दा, आपला भाव विखुरलेला असतो. प्रत्येक ठिकाणी तुमच्या मनातील भावच तुम्हाला सर्वत्र ओढत नेत असतो. अशा प्रकारे भगवान भेटत नाही. ईश्वराला प्राप्त करण्यासाठी संपूर्ण श्रध्देने पूर्ण मनोभावे, अनन्य भक्तीने त्या हृदयस्थित ईश्वराला शरण जा.

चला, आम्ही इतरत्र असणारे श्रध्दाभाव तोडून आम्ही त्या एकमेव असणाऱ्या ईश्वराला शरण गेलो तर आम्हाला त्यामुळे काय लाभ मिळणार आहे? यावर श्रीकृष्ण म्हणतात की त्याच्या कृपाप्रसादाने तुम्हाला परम शांती प्राप्त होईल. ते शाश्वत स्थान प्राप्त होऊ शकेल आणि म्हणूनच ज्याला सद्गुरूकडून विद्या प्राप्त होते, ज्ञान प्राप्त होते आणि मग तो साधक ज्या ठिकाणी व ज्याचे ध्यान-चिंतन-पूजन केले पाहिजे त्या त्याच्या हृदयातील देवतेचे तो अनन्य भावाने, भक्तीने पूजन करतो, **'बिन पद चलइ सुनइ बिन काना ।' 'जाहि धरहि मुनि ध्यान'** व मग त्याचे ध्यान करू लागतो. सुरूवातीला प्रत्येक श्रध्दाळू मूर्तिपूजकच असतो. ती कक्षा-इयत्ता पास करून तो उन्नत श्रेणीत प्रवेश करतो. मग मागच्या इयत्तेच्या कसोटीला पुन्हा बसत नाही. तेव्हा मंदिरात जाणे शुभ आहे. कल्याणकारक आहे, परंतु जीवनाच्या अंतापर्यंत मंदिरात जाणे, उन्नत स्तरावर पोहचण्याचे ध्येय न ठेवणे, उन्नत श्रेणीबद्दल विचार न करणे एवढे केल्याने भजनपूर्ती होत नाही. हे साधकाने नीट समजून घ्यावे. मूर्तिपूजा एक टप्पा आहे, प्राथमिक कक्षा आहे व म्हणून ती एका मर्यादेपर्यंत वैध आहे. त्याच्या पुढे गेल्यानंतर सर्व काही सुटून जाते. कारण पूर्व मनीषी जेथे जशी पूजा करीत होते त्याच प्रकारे साधकही पूजा करणे सुरू करतो.

ही गोष्ट सर्व मनुष्यमात्राला लागू पडते. मग दार्शनिक असो किंवा मोठा वैज्ञानिक असो किंवा ज्ञाता असो. अध्यात्माच्या क्षेत्रात पाच वर्षांच्या अज्ञानी बालकाप्रमाणे त्यांची अवस्था असते. कारण ते आत्मिक सत्याच्या निकषावर पडताळता येत नाहीत. पृथ्वीवरील एका एका कणाचा म्हणजेच संपूर्ण शोध केला, परंतु तो जगामधील फेरफटकाच होय. मनुष्याच्या पार्थिव जीवनापर्यंत ते सीमित आहे. परंतु तो आत्मिक सत्यपथ नाही. ईश्वर एकाचे दोन होत

नाहीत आणि समजा असतील तर ते खोटे आहे. म्हणून एकाच परमात्म्यावर श्रध्दा ठेवून त्याचा परिचय करून देणारा दोन किंवा अडीच अक्षराचा ॐ, राम अथवा दुसऱ्या कोणत्याही परमात्म्याचा परिचय (बोध) करून देणाऱ्या नामाचे चिंतन करावे व वर्तमानात उपलब्ध असणाऱ्या महापुरूषाला शरण जावे, त्याच्या सान्निध्यात राहावे, त्याला अनन्य भावे शरण जावे, त्याचा सत्संग करावा म्हणजे सर्व मार्ग सुलभ व प्रशस्त होत राहील.

**॥ ॐ श्री सद्गुरू भगवान की जय ॥**

साधनेच्या मार्गावर अनेक अडचणी येऊ शकतात. परंतु साधकाने कोणत्याही परिस्थितीत चिकाटीने भक्कम राहिले पाहिजे. खरा निष्ठावानच या मार्गावर यशस्वी वाटचाल करू शकतो. जो निष्ठेने व चिकाटीने साधना करतो त्या मनुष्यासाठी संकटेदेखील संपत्तीसमान बनतात. अर्जुन व महर्षी काक यांच्या जीवनाकडे पाहिले तर या गोष्टीचे आपल्याला प्रत्यंतर येते. अर्जुनाने अप्सरा उर्वशीकडे मातृभावनेने पाहिले. यामुळे उर्वशीच्या शापाने त्याला एक वर्ष नपुंसक बनावे लागले. परंतु अज्ञातवासात असताना हा शाप त्याला अत्यंत मदतरूप ठरला. अर्जुनाला हा शाप वरदानासारखा उपयोगी पडला. काकशुण्डीच्याही स्वभावामुळे त्यांना अनेक शाप मिळाले. पण त्यांचे शापही त्यांना वरदानरूपच ठरले आणि म्हणूनच साधकाने आपल्या निश्चयाशी दृढ राहिले पाहिजे, त्याने आपले व्रत-आपला मार्ग न सोडता त्या मार्गावर स्थिरपणे टिकून राहिले पाहिजे.

**– पूज्य श्री परमहंस महाराजांचे वचनामृत**
**''जीवनादर्श एवं आत्मानुभूति'' मधून उधृत**

# ध्यान ?

ध्यान म्हणजे साधनेचे फळ आहे-परिणाम आहे.

ध्यान म्हणजे प्रारंभ नव्हे.

सुरुवातीस म्हणजे प्रारंभात इंद्रिये संयमित आणि विषय रसापासून विरक्त कशी होतील? श्वासाची गती, मनाचा वेग प्रारंभी स्थिर ठेवण्याचा संयम कसा येणार? याच्यावर विचार करावयाचा आहे. याचा विचार करून साधनेला लागणे म्हणजेच ईश्वरीय प्रेमाचा उद्‌गम आहे.

सतत अभ्यास आणि श्रध्देने प्रेम निर्माण होत असते. त्यानंतरच ध्यानाचा स्तर येतो.

**- स्वामी अड़गड़ानन्द**

ब्रह्मलीन स्वामी ओमप्रकाशानन्दांच्या प्रतिमेचे अनावरण करताना कछवा, मिर्जापूर येथील विशाल सभेमध्ये ता. १/१२/२००० शुक्रवार या दिवशी पूज्य महाराजांनी ध्यान या विषयावर प्रवचन करून जिज्ञासूंच्या शंकांचे निराकरण केले.

# ध्यान ?

बंधुनो,

आज या समारंभात भाग घेण्यासाठी दूरदूरवरून संत-महात्म्यांसहित विशाल जनसमूह मोठया प्रमाणात उपस्थित आहे. स्वामी ओमप्रकाशनन्दावरील श्रध्देचे आणि त्यांच्या लोकप्रियतेचे हे प्रतीक आहे. आम्हाला तुमच्या श्रध्दाभावाने खुप आनंद वाटत आहे. महात्म्यांनी ध्यानासंबंधी काही प्रश्न विचारले आहेत. त्यातील काहींनी तर अनेक ठिकाणी भरणाऱ्या ध्यान शिबिरांत राहून प्रशिक्षण घेतलेले आहे. तरीही त्यांना शांती मिळत नाही. त्यांचा असा आग्रह आहे की आम्हीही अशा शिबिरांचे आयोजन करावे. एका सज्जनाने विचारले आहे की ध्यान कोणाचे करावे? ध्याना संबंधी समाजात अनेक प्रकारच्या शंका आहेत. पूज्य गुरूदेवांच्या पावन कृपेच्या आधाराने आज तुमच्या सर्व प्रश्नांचे, शंकाचे आम्ही निरसन करणार आहोत.

भारतात तसेच परदेशातही ध्यान-शिबिरांचे आयोजन केले जाते. त्यात प्रत्येकाच्या पध्दती अलग अलग असतात. काही विद्वानांनी ध्यानाच्या आधी हठयोग या नावाने प्रचलित असणाऱ्या नेती, धौती, वस्ती, नौली, त्राटक आणि कपालभाती या षट्कर्मावर भर दिला आहे. अन्य विद्वानांचे असे सांगणे आहे की, प्रथम आडवे झोपा, मग पायाच्या अंगठ्याकडे पाहा, नंतर पायाच्या मोठ्या बोटाकडे पाहा आता लहान बोटाकडे म्हणजे करंगळीकडे पाहा आणि मनात असे म्हणत राहा की आता आपण संकल्पहीन बनलो आहोत. मन शांत व स्थिर होत चालले आहे. याच प्रकारे शरीराचा प्रत्येक अवयव शिथील-स्थिर करत मस्तकापर्यंत चला आणि अचेतन बना. यालाच ते ध्यान म्हणतात. तंत्र आख्यायिकांमध्ये ध्यानासाठी मूलबंध, जालंदर बंध किंवा खेचरी इत्यादी मुद्रा आवश्यक आहे असे सांगितले आहे. कोणी विद्वान एखाद्या फुलावर ध्यान केंद्रित करतात तर कोणी 'ऐं''क्लीं' अशा अक्षराला किंवा नादाला ध्यानाचे माध्यम बनतात. एक विश्वविश्रुत आचार्य भस्त्रिका प्राणायाम सारख्या पध्दतीचा निर्देश करतात. ते म्हणतात लोहाराच्या भात्याप्रमाणे दीर्घ श्वास घ्या आणि सोडा. या क्रियेने थकून गेलात की मन शांत होईल. मन आपोआप ध्यानमग्न होईल. योग शिकवणारे अनेक आचार्य

मंत्राचा उपयोग करतात. त्यांच्या मते मंत्र ऐकता ऐकता मन अचेतन होते. याच प्रकारे कोणी गायत्री सारख्या इतर देवी-देवतांचे ध्यान करायला सांगतात तर कोणी शरीराच्या स्पंदनाची ध्यानासाठी मदत घेतात. तेव्हा आपल्या आर्ष ग्रंथात 'ध्यान' या विषया संबंधी काय सांगितले ते प्रथम पाहू.

रामचरित मानसाच्या मतानुसार ध्यान म्हणजे साधनेचा आरंभ नसून साधनेचा परिणाम आहे. अरण्यकांडमध्ये एक प्रसंग आहे. महर्षी अगस्त्य त्यांच्या काळातील श्रेष्ठ महापुरूष होते. त्यांनी रामाला दिलेल्या बाणामुळे दशानन रावण मारला गेला होता. त्या महर्षींना हजारो शिष्य होते. त्यात सुतीक्ष्ण नावाचा एक शिष्य होता. तो अगदी साधा व भोळा होता. त्याचा प्रामाणिकपणा व सरळ स्वभाव पाहून महर्षींनी एका साध्या, सोप्या पूजेचे काम सोपवले. ते त्याला म्हणाले की तू पूजेचा चौक स्वच्छ ठेव व रोज शाळीग्रामाला स्नान घालत जा. आश्रमाच्या जवळून कावेरी नदी वाहत होती. किनाऱ्यावर जांभळाची झाडे होती. सुतीक्ष्ण त्या शाळीग्रामानेच जांभळे तोडायचा, जेव्हा जांभळे फक्त उंचावर राहिली तेव्हा शाळीग्रामला ओढून जांभळावर मारू लागला.

एक दिवस शाळीग्राम नदीत गेला. सुतीक्ष्णाने नदीत डुबक्या मारून शाळीग्रामला खुप शोधले; पण शाळीग्राम सापडला नाही. तेव्हा सुतीक्ष्णाने एक गोलमटोल असे जांभूळ शाळीग्राम म्हणून चौकात ठेवले. गुरूदेव त्या शाळीग्रामला चंदन लावायला गेले तर त्यांचे बोट जांभळात घुसले. तेव्हा त्यांनी सुतीक्ष्णाला विचारले की ''हा काय प्रकार आहे?'' सुतीक्ष्ण म्हणाला, ''हा तर शाळीग्रामच आहे.'' गुरूदेव म्हणाले ''हा इतका कोमल कसा झाला?'' यावर सुतीक्ष्ण म्हणाला **'पुनि पुनि चंदन पुनि पुनि पानी। सालिक सड गये हम का जानी?'** महर्षी म्हणाले -वा रे ब्रह्मज्ञानी ! आता येथून तू चालता हो. खरा भगवान घेवून ये. तोपर्यंत तोंड दाखवू नकोस. आश्रमाचा आसरा होता तोही संपला. आश्रमात राहिल्याने सुतीक्ष्णाला साधनेचे ज्ञान होते. त्याने जंगलात एक झोपडी बांधली व तेथे राहू लागला.

**''ऋषी अगस्ति कर शिष्य सुजाना। नाम सुतीछन रति भगवाना ॥**
**मन क्रम वचन राम पद सेवक। सपनेहुँ आन भरोस न देवक ॥''**

सुतीक्ष्ण काया, वाचा, मने, रामचरणाचा सेवक होता. स्वप्नातदेखील दुसऱ्या देवतांचा त्याला भरोसा नव्हता. तो रामाच्या चिंतनात निमग्न झाला. एक दिवस चिंतनात असताना त्याला कळले की, प्रभू येथे समीपच आले आहेत. तो आपल्या भाग्याला दोष देऊलागला.

**'हे विधि दीनबन्धु रघुराया। मोसे शठ पर करिहहिं दया ॥'**

माझ्यासारख्या धूर्त मनुष्यावर ते काय दया करणार? त्याच्यात काय कमी होते? **'मोरे जिय भरोस दृढ नाही। भगति विरति न ज्ञान मन नाही ॥'** माझ्या हृदयात दृढ विश्वास

नाही, माझ्याजवळ भक्ती नाही, वैराग्य नाही. माझ्यावर परमेश्वराने दया करावी असा कोणताही गुण माझ्या अंगात नाही. मग त्यांनी माझ्यावर कसे प्रसन्न व्हावे? **'नहि सतसंग जोग जप जागा, नहि दृढ चरन कमल अनुरागा ॥'** मी समाधानकारक असा जपही करत नाही. योगसाधनाही मला चांगली करता येत नाही. भगवत् चरणी दृढ प्रेमही माझ्या मनात नाही. ईश्वराला एक गुण लक्षात आला. -**'एक बानि करुनानिधान की । सो प्रिय जाके गति न आन की ॥'** ईश्वराचा एक गुण असा आहे की जो ईश्वराशिवाय अन्य कोणावरही भरोसा ठेवत नाही त्याच्यावर निश्चितपणे कृपा करीत असतो. हा विचार मनात येताच सुतीक्ष्ण प्रेम-विव्हल झाला. भगवंताचे स्वरूप हृदयात ठसताच तो स्थिर व शांत होऊन बसून गेला -**'होइहै सुफल आज मम लोचन । देखि वदन पंकज भव मोचन ॥'** मनामध्ये ईश्वरविषयक भावना दृढ होताच ईश्वरविषयक प्रेमाने त्याचे मन भरून गेले व तो शांतचित्त झाला. **'मुनि मग माँझ अचल होई वैसा । पुलक शरीर पनस फल जैसा ॥'** तो रस्त्यामध्येच स्थिर व शांत होऊन बसून गेला.

ती काय एखादी पायवाट होती का की सुतीक्ष्ण रस्त्याच्या मधोमध बसून गेला? नाही. तसा अर्थ नाही. सृष्टीमध्ये दोनच मार्ग असतात -एक प्रवृत्ती मार्ग व दुसरा निवृत्ती मार्ग. प्रवृत्ती मार्ग तुम्हाला कोठेही पोहचवत नाही. तर तो तुम्हाला अनंत काळपर्यंत भवसागराच्या येरझारा घालायला लावतो. निवृत्ती मार्ग म्हणजे भक्तीमार्ग आहे. तो ईश्वराला स्पर्श करायला लावतो व मनुष्याला शांत करतो. ईश्वरापुढे दुसरी कोणतीही सत्ता नाही मग शोधायचे कोणाला? मग तो जाऊन जाणार तरी कोठे? आणि म्हणूनच भक्तीमार्गात जप-तप, नियम-संयम यांचा अभ्यास करता करता जेथे प्रेमाचा अविरत प्रवाह सुरू होतो तेथे भगवंत लगेच हृदयात प्रकट होतात. **'अतिशय प्रीति देखि रघुवीरा । प्रकटे हृदय हरन भव भीरा ॥'**

ईश्वर जवळ आले. **'मुनिहि राम बहू भाँति जगावा । जाग न ध्यान जनित सुख पावा ॥'** ईश्वराने नाना प्रकारे मुनींना जागवण्याचा प्रयत्न केला पण ते जागे झालेच नाहीत. कारण ते ईश्वराच्या ध्यानात अगदी तल्लीन झालेले होते. तेव्हा ईश्वराने एक उपाय केला. ध्यानाचे स्वरूप परिवर्तित झाले. मुनी व्याकूळ होऊन उठले. हृदयात जे स्वरूप ठसलेले तेच स्वरूप उघड्या डोळयांपुढे उठले. हृदयात जे स्वरूप ठसलेले तेच स्वरूप उघड्या डोळयांपुढे दृष्टिगोचर झाले. मुनींनीं ईश्वरचरणी लोळण घेतली. तेव्हा भगवान श्रीराम म्हणाले, ऋषिवर, आपल्या गुरूवर्यांचे आम्हाला दर्शन घ्यायचे आहे. आपल्या बरोबर मी येऊ इच्छितो यावर सुतीक्ष्ण म्हणाले-प्रभू, आपल्याला कोणाचे दर्शन घ्यायची काय आवश्यकता आहे? आपण तर माझ्या गुरूच्या आज्ञेची पूर्ती करत आहात. कारण गुरूदेवांनी मला खराखुरा भगवान घेऊन यायला लावले होते. आपण आज तीच पूर्ती करीत आहात.

वास्तविक '**हरि व्यापक सर्वत्र समाना। प्रेम ते प्रकट होहि मैं जाना।।**' भगवान सर्वत्र सारखाच व्यापून आहे. परंतु ते प्रेमामुळेच प्रकट होतात. या प्रकारे गुरुवर्यांच्या आश्रमात असतानाही सुतीक्ष्ण भजन करीत होते. प्रारंभी ते सेवापरायण होते. मग भजन-विधी आत्मसात केला. हळूहळू अभ्यासात प्रगती करता करता भजनरूपी कुटिराच्या एकांतात भजन करू लागले. दिवस रात्रीचेही त्यांना भान राहीले नाही. '**कबहुँक नृत्य करइ गुन गाई**' उठता-बसता चालताना-फिरताना एक ईश्वर भजनाची धून त्यांना चढली होती. ईश्वराच्या प्रीतीचा अविरल प्रवाह त्यांनी पाहिला. त्यामुळे भगवंताच्या ध्यानात ते तल्लीन झाले आणि मग भगवान त्यांच्या हृदयात प्रकट झाले. जेव्हा हृदयामध्ये ध्यान दृढ होते-स्थिर होते तेव्हा '**सियाराम मय सब जग जानी। जहँ तहँ देख धरे धनु बाना।।**' संपूर्ण जग ईश्वराने भरून गेल्याचे दिसते व ईश्वर हृदयात प्रकट होतो. सारांश ध्यान म्हणजे साधनेचा परिणाम आहे. शिबिरे भरवून ध्यान करायला येत नाही. ध्यानासाठी भजन कसे करावे? कोणाचे करावे? त्याचा विधी जाणून घेतला पाहीजे. हळूहळू हृदयात ईश्वराच्या प्रती प्रेमाची अभिवृध्दी करावी. एका परमात्म्याच्या ठिकाणी श्रध्दा स्थिर करावी. प्रेमाचा प्रवाह जेव्हा अविरत सुरू होतो त्याक्षणी ईश्वर प्रकट होतात. व त्या क्षणीच तुम्हाला ध्यानाचीही स्थिती प्राप्त होते, म्हणजे ध्यान हे साधनेचा परिणाम आहे, आरंभ नव्हे. मनाचा निरोध कसा करावा? इष्ट कोण आहे? त्याचा निश्चय करून साधनेला लागल्याने ईश्वराच्या प्रेमाचा उत्स (उद्‌गम) आहे. प्रेम सांगण्याने होत नाही. ते तर निरंतर अभ्यास व श्रध्देने येत असते. त्याच्या नंतरच ध्यानाचा स्तर येतो.

मानसमधीलच एक प्रसंग पाहू या. किष्किन्धाकांड मध्ये बळीच्या उध्दाराचा प्रसंग आहे. '**जिति पवन मन गोनिरसि मुनी ध्यान कबहुँक पावहीं।**' प्रथम श्वास उच्छावासाचे यजन करीत वाऱ्याला व उद्वेगाला जिंकतात आणि वायुमंडलालाही जिंकतात. मनाला आणि इंद्रियांना विषयरूपी रसापासून पूर्णपणे अलिप्त-निरस केल्यानंतरच मुनिजन सतत अभ्यासाचे फलस्वरूप त्या प्रभूचे ध्यान करू शकतात. '**ध्यान कबहुँक पावहीं।**' हा साधनेचा परिणाम आहे. प्रारंभ नव्हे. प्रथमतः इंद्रियांना संयमित कसे करावे, विषयांपासून त्यांना विरक्त कसे करावयाचे? श्वासाची गती आणि मनाचा वेग कसा स्थिर करायचा? या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे. या गोष्टींचा विचार केल्याशिवाय ध्यानाची शिबिरे भरवण्यात काही अर्थ नाही.

## 'पातंजली योगदर्शन-ध्यान'

योगदर्शनकार पातंजली महर्षी मोठे महापुरूष होते. त्या महापुरूषाने योगाची व्याख्या दिली आहे. '**अथ योगानु शासनम्।**' योग एक अनुशासन आहे. पण अनुशासन कोणावर करायचे? तेव्हा पुढच्या सुत्रात ते सांगत आहेत '**-योगश्चित्तवृत्ति निरोधः।**' चित्तवृत्तीचा

निरोध करणे म्हणजे योग आहे. चित्तवृत्ती अनंत आहेत. त्यांना एक गती आहे. मन वाऱ्यापेक्षाही वेगाने धावणारे आहे. मनाच्या वृत्तींचा निरोध म्हणजे योग आहे. आम्हाला आमच्या वृत्तींना काबूत ठेवायचे आहे. समजा आम्ही अगदी परिश्रमपूर्वक चित्तवृत्तींचा निरोध केला. पण त्यापासून काय फायदा? महर्षी म्हणतात **'-तदा द्रष्टः स्वरूपेऽवस्थानम् ।'** त्या वेळी द्रष्टा असलेला आत्मा आपल्याच सहज स्वरूपात परमात्म्यामध्ये स्थित होतो. तर मग स्वरूपात स्थित होण्यापूर्वी आत्मा काय मलिन होता का? महर्षी सांगतात **'-वृत्ति सारूप्यमितरत्र'** दुसऱ्या वेळेस जसा वृत्तींचा प्रवाह असतो, तसाच आत्मा असतो. जशी वृत्ती तसाच आपल्यासाठी हा आत्मा आहे.

वृत्ती म्हणजे का? सूत्रकार त्यांचे स्वरूप सांगताना म्हणतात **'-वृत्तयः पंचतथ्यः क्लिष्टाक्लिष्टाः' (१/५)** चित्तवृत्ती पाच प्रकारच्या असतात आणि प्रत्येक वृत्तीत दोन प्रकार असतात. त्या कधी क्लेश देणाऱ्या असतात, आवागमनाच्या प्रवाहात येरझाऱ्या घालणाऱ्या असतात. तर कधी त्या वृत्ती क्लेशांपासून मुक्ती देणाऱ्या असतात. वृत्ती तर अनंत आहेत. परंतु प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा आणि स्मृती रूपाने पाच प्रकारच्या असतात.

प्रश्न असा निर्माण होतो की, त्या वृत्तींचा निरोध कसा होतो? त्या ताब्यात कशा ठेवता येतील? **'अभ्यास वैराग्याभ्यां तान्निरोधः'** -अभ्यास आणि वैराग्य द्वारा चित्तवृत्तींचा चांगल्या प्रकारे निरोध करता येतो. वैराग्य काय आहे? पुढच्या सूत्रात ते म्हणतात की पाहिलेल्या व ऐकलेल्या वस्तूंमध्ये प्रेमाचा त्याग, आत्मीयतेचा त्याग म्हणजे वैराग्य होय आणि परमात्म्याचे दर्शन करून साधनेचा अंत म्हणजे परम वैराग्य होय. अभ्यास म्हणजे काय? चित्तवृत्तींचा निरोध करण्याचा प्रयत्न म्हणजे अभ्यास. प्रयत्न कसा करावा? चित्त कशात गुंतवावे? **'क्लेश कर्म विपाकाशयैरपरामृष्टः पुरूष विशेष ईश्वरः ।'** अविद्या, अस्मिता, प्रेम, द्वेष आणि अभिनिवेशाच्या रूपाने पाच क्लेश जीवाच्या दुःखाला कारण असतात. चांगल्या वाईट कर्मांचा परिणाम आणि त्याच्या समुदायाच्या किंवा संग्रहाच्या संबंधापासून जो अलिप्त आहे तो विशेष पुरूष ईश्वर आहे. पूर्वी कधी त्याचा संबंध पुरूषाशी होता. आता नाही. जर पूर्वी या स्थितींचा ईश्वराशी कधी संबंधच नव्हता तर ईश्वराबरोबर त्यांची कल्पना का केली जाते? तो एक विशेष पुरूष ईश्वर आहे. काळ त्या ईश्वराला लहान-मोठे करू शकत नाही. त्याच्या पुढे काळाचीही मात्रा चालत नाही. तो गुरूंचा गुरू आहे. अर्थात सद्‌गुरू आहे कारण तो म्हणजे परम सत्य आहे. **'तस्य वाचक प्रणवः'** त्याचे वाचक नाव ॐ कार आहे. त्याच्यासाठी ओमचा जप करा आणि त्याच्या अर्थस्वरूप त्या ईश्वराचे ध्यान करा. त्याच्या प्रभावाने तुम्ही सर्व विघ्नांच्या पार जाऊ शकाल. येथे सूत्रकाराने स्पष्ट केले आहे की ध्यान कोणाचेही करू नका. ध्यान एकमात्र परमात्म्याचे करा आणि त्याच्याच नामाचा जप करा.

योगदर्शनाचा दुसरा अध्याय 'साधनपाद' मध्ये महर्षीनीं योगाचा आरंभ कोठून होतो ते सांगितले आहे. **'तपः स्वाध्यायेश्वर प्राणिधानानि क्रियायोगः-'** तप, स्वाध्याय आणि ईश्वर शरणागतीची क्रिया म्हणजे योग आहे. या योगाचे आठ अंग आहेत. **'यमनियमासनप्राणायाम प्रत्याहार धारण ध्यान समाधयोऽष्टा वंगानि ॥'** यापैकी यम पाच आहेत-अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ! शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वराला शरणागती हे पाच नियम आहेत. शौच म्हणजे अंतःकरणाची शुध्दता, संतोष म्हणजे समभाव वृत्ती आहे, तपाचा आशय म्हणजे मनासहित इंद्रियांचा निरोध होय. स्वाध्याय म्हणजे अध्ययन. म्हणजे भजनामध्ये मन इतके तल्लीन करणे की त्या प्रभूच्या प्रती समर्पित होण्याची भावना निर्माण होणे. यांपैकी तप, स्वाध्याय आणि ईश्वर प्रणिधान तीन क्रिया योग आहेत. जेथे या तीन क्रियांचा आरंभ होतो तेव्हा भजनास आरंभ होतो. (योगाची सुरूवात होते.) क्रमशः अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह हे प्रथम साधले जाईल व नंतर शौच व संतोष प्राप्त होईल.

यम, नियमांवर योगाचे तिसरे अंग आहे आसन **'स्थिर सुखमासन ।'** स्थिरपणे व सहजतेने (सुखपूर्वक) बसणे याला आसन असे म्हणतात. एक शेटजी सकाळपासून संध्याकाळपर्यंत गादीवर बसून राहतात. मग याला आसन म्हणयचे का? नाही. मग योगामधील आसनाची सिध्दी केव्हा प्राप्त होते? महर्षी उत्तर देताना म्हणतात-**'प्रयत्न शैथिल्यान्त समापत्तिभ्याम्** ' यम आणि नियम करताना जे प्रयत्न-परिश्रम करावे लागताना ते न करताही सहजतने त्या अनंत, परम परमात्म्याच्या ठिकाणी मन स्थिर होणे. याल आसन सिध्द झाले असे म्हटले जाते. जर बाहेर गादीवर बसण्याला आसन म्हणण्यात आले असते तर अनंताच्या ठिकाणी मन केंद्रित करण्याची काय आवश्यकता होती? कडक योग साधना करण्यात काय औचित्य होते? वास्तविक आसन म्हणजे सुखाने गादीवर बसणे किंवा बैठक मारणे असा होत नाही; परंतु स्वैरभैर भटकणाऱ्या मनाल एका परमात्म्याच्या ठिकाणी स्थिर करणे म्हणजे आसन होय. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्यादि यासाठी जो निग्रह, जे प्रयत्न करावे लागतात ते प्रयत्न करावे न लागता सहजतेने मन स्थिर होणे, अनासायास मन त्या अनंत परमात्म्याच्या ठिकाणी एकाग्र होणे. स्थिर होणे यालाच आसन सिध्द होणे किंवा साधणे असे म्हणतात.

आसन साधताच **'तस्मिन सति प्रश्वासयोर्गतिविच्छेदः प्राणायामः ।'** श्वासप्रश्वासाची गती थांबते यालाच प्राणयम असे म्हणतात. बाह्य वातावरणातील संकल्प-विचार मनात प्रवेश करीत नाहीत किंवा आत मनात काही विचार निर्माण होऊन मन उद्विग्न होत नाही यालाच प्राणायाम म्हणतात. आता प्राणांच्या क्रियेवर- स्वैरपणावर पूर्णविराम लागतो. ईश्वरप्राप्तीसाठी तपःसाधना, अंहिसा, सत्य, ब्रह्मचर्य, अपरिग्रह यांच्या पालनासाठी करावे

लागणारे कठोर प्रयत्न हे सर्व शिथिल होऊन मन सहजतेने ईश्वराच्या ठिकाणी केंद्रित होते याला आसन सिध्दी म्हणतात व आसन सिध्दी होताच प्राणायाम म्हणजे प्राणांच्या क्रियेवर पूर्णविराम लागतो. अभ्यासाचा, साधनेचा परिणाम म्हणजे ही स्थिती होय. यम-नियमांच्या परिपालनाचे हेच फळ होय. या स्थितीपर्यंत पोहचण्यासाठी चार स्तर किंवा चार पायऱ्या पार कराव्या लागतात. **'-बाह्याभन्तर स्तम्भवृत्तिः देशकाल संख्याभिः परिदृष्टो दीर्घसूक्ष्मः'** बाह्य वृत्ती, अभन्तर वृत्ती, स्तम्भ वृत्ती देश, समय व संख्येच्या द्वारे मोजत गेल्याने प्राणायाम दीर्घ व सूक्ष्म होत होत स्थिर होतो, बाह्य वृत्ती म्हणजे- राग-द्वेष, अनंत इच्छा, वासंनानी आच्छादित षड्विकारवाली वृत्ती. म्हणजे या जगात मनाला स्वैरभैर ही भटकवणारी वृत्ती आहे. दुसऱ्या बाजूला विवेक, वैराग्य, तप, स्वाध्याय, ईश्वराच्या चिंतनाने भारलेल्या वृत्ती आहे. आता बाह्य वृत्तीमध्ये चित्त कोणत्या देशात (म्हणजे लोभाच्या देशात, मोहाच्या देशात की कामवासनेच्या देशात) भटकत आहे, किती काळ असे चितंन करत आहे, किती वेळा असे चिंतन केले हे तपासले पाहिजे. (घड्याळ्याचा शोध समय- ज्ञानासाठी झाला नव्हता.)

बाह्य वृत्तीमध्ये भटकणारे मन कधी कधी आपले संयम- नियमाचे विश्लेषण करायला लागते. कधी वैराग्याच्या देशात कधी ब्रह्मचर्याच्या क्षेत्रात तर कधी स्वाध्यायात म्हणजे अभ्यांतर वृत्तीमध्ये जाते परंतु हेही चित्तात उठणारे तरंगच आहेत. तेव्हा ते तेथे किती वेळ स्थिर झाले आहे ते नीट मोजून पाहा. नंतर पुन्हा तेथून काढून त्याला स्तंभवृत्तीमध्ये स्थिर करा. त्याचा वेग (गती)कमी करा. त्याला दीर्घातून सूक्ष्माकडे आणा आणि स्तंभवृत्तीत केंद्रित करा.

पूज्य गुरूदेव महाराज म्हणत असत, ''मनातील विचारांवर पहारा ठेवा तेव्हाच भजन (चिंतन)होईल. सचेतनावस्थेत राहाल तेव्हाच भजन होईल'' शरीरातील प्राण दीर्घ, सूक्ष्म आणि स्थिर होतो. तेव्हाच प्राणायामाची सहज स्थिती प्राप्त होते. **'बाह्याभ्यान्तर विषयाक्षेपी चतुर्थः'** त्यावेळी बाहेरील आणि आतील विषयांचा त्याग होणे म्हणजे आपोआप होणाऱ्या प्राणायामाची चौथी पायरी (किंवा स्तर) आहे. श्वास आत घेणे, माठासारखे पोट फुलवणे, नंतर लोहारच्या भात्याप्रमाणे श्वास बाहेर टाकणे, बाहेरच रोखणे हा प्रकार म्हणजे प्राणायाम नव्हे, प्राणायामाचे ते विकृत रूप आहे, हा भ्रामक प्रकार आहे. वास्तविक अशा प्रकारचे हे चुकीचे रूप-पध्दत प्रचलित झाली आहे. अरे श्वासाने आपले काय बिघडवले आहे? श्वास म्हणजे तर शरीराची जीवनशक्ती आहे. अहो, श्वास बंद झाला तर तुम्ही-आम्ही जिवंत राहणार नाही. अविद्या, अस्मिता इत्यादी पंचक्लेशाचा चढ-उतार शरीरामध्ये नाही तो वृत्तीमध्ये होत असतो. त्या वृत्तींचा निरोध करावयाचा आहे, संकल्पांचा निरोध करावयाचा आहे, श्वासाचा निरोध करावयाचा नसतो. श्वासामध्ये निर्माण होणारे संकल्प विकल्प थांबताच **'ततः क्षीयते प्रकाशावरणम्-'** प्राणायाम सुरू होताच प्रकाशाचे आवरण क्षीण होते.

आत्म्यामध्ये व आपल्यामध्ये जो संस्काराच्या आवरणाचा पडदा आहे तो क्षीण होऊ लागतो. **'धारणासु च योग्यता मनसः।'** आणि मग मनामध्ये धारणा करण्यासाठी योग्यता येते.

'विभूतिपादां' च्या प्रथम सूत्रात महर्षी धारणेचे स्वरूप सांगताना म्हणतात **'देशबन्धश्चित्तस्थ धारणा-'** कोणत्याही देशात चित्ताला बध्द करणे किंवा केंद्रित करणे म्हणजे धारणा आहे. महर्षींनी धारणेसाठी या पूर्वीच दोन देश सांगितलेले आहेत-एक म्हणजे ओमूचा जप आणि दुसरे त्याच्या अर्थानुरूप ईश्वराचे ध्यान ! सुरूवातीस प्रयत्न करूनही आत्मस्वरूप आपल्याला पकडता येत नाही. ओम्‌चा जप करता करता थोड्याच वेळात मन काही वेगळेच जप करू लागते. परंतु प्राणायाम साध्य होताच मनामध्ये धारणेची क्षमता येते व मग आत्मस्वरूप आपल्या पकडीत येते. **'तत्र प्रत्यैकतानता ध्यानम्'** ज्या ठिकाणी चित्ताला केंद्रित कराल त्याच देशात सतत तीच एकधारी वृत्ती ठेवणे म्हणजे ध्यान होय. इतक्या सर्व प्रयत्नांचा-साधनांचा परिणाम म्हणजे ध्यान आहे. ध्यान म्हणजे आरंभ नव्हे. इंद्रियांचा संयम कसा करावा? ध्यान कशाचे व कसे करावे यासाठी ध्यान शिबिरांचा उपयोग निश्चितपणे होतो. परंतु ही तर पध्दत शिकवण्याचे शिबिर झाले परंतु ध्यानाचे शिबिर भरवणे शक्य नाही, ध्यान म्हणजे साधनेचा परिणाम आहे किंवा साधनेचे ते फलित आहे.

हे ध्यान जेव्हा परिपक्व होते तेव्हा **'तदेवार्थमात्र निर्भासम स्वरूपशून्यमिव समाधिः।'** जे लक्ष्य पकडले जाते ते लक्ष्य फक्त शेष राहील बाकी चित्ताचे स्वतःचे स्वरूप नाहीसे होते, पकडणाराही स्वतःला विसरून जातो आणि अशा स्थितीलाच समाधी असे म्हणतात. परमतत्त्व परमात्म्याच्या बरोबर समत्व देणाऱ्या अवस्थेला समाधी असे म्हणतात. **'सम आदि स समाधिः।'** आदि-अनादि तत्त्व असणाऱ्या परमतत्त्व परमात्म्याच्या बरोबर समत्त्व देणाऱ्या अवस्थेला समाधी असे म्हणतात. या अवस्थेत चित्तही स्वतःला हरवून बसते. **'मन मरा माया मरी, हंसा बेपरवाह। जाके कछू ना चहिए सोई शहंशाह।'** ज्या मनावर मायेची पकड होती ते मनच स्वतःला हरवून बसल्यावर माया राहीलच कोठे? या बरोबर द्रष्टा स्वरूपाची अवस्था प्राप्त होते हेच योगाचे लक्ष्य होते.

महर्षी पंतजलीच्या मतानुसार 'ध्यान सद्गुरूचे करावे व जप प्रणवचा (ओमचा) करावा. सदगुरू ते आहेत जे क्लेश-कर्म-फळ परिणाम त्याच्या आशयापासून विमुक्त आहेत, ज्याला काळाची मर्यादा नाही, ज्याची करणी-रहाणी परमात्म्यासारखी आहे, ते गुरूंचे गुरू आहेत. मानसमध्ये सांगितले आहे **'-बालक रूप राम कर ध्याना।'** श्रीरामाच्या बाळरूपाचे ध्यान करावे. पूज्य महाराजश्री म्हणत असत की पाच एक वर्षांचे मूल आणि स्थिती प्राप्त झालेल्या महापुरूषाची राहणी एक सारखीच असते. महापुरूषाची राहणी स्वभाव, वृत्ती बालवत असते. गीतेतील ११/४३ मध्ये भगवान श्रीकृष्णास **'गुरूर्गरीयान्'** असे संबोधले आहे. त्याचा

अर्थ गुरूंपेक्षा श्रेष्ठ असा होतो. याच प्रकारचा **'पूर्वेषामपि गुरू'** आणि मानसाच्या **'तुम त्रिभुवन गुरूदेव बरखाना ।'** याचा तोच आशय आहे. ही सद्‌गुरू एक स्थिती आहे.

जर असे सद्‌गुरू मिळाले नाहीत तर घाई करून कोणालाही गुरू बनवू नका. संतांची सेवा करा त्यांच्या सान्निध्यात राहा, जप करा, प्रार्थना करा. आत्माच्या व आपल्या मधील जन्मांतरांच्या संस्काराच्या संग्रहाचे नाव मलिनता आहे. आपल्या व आत्म्याच्या मध्ये हेच आवरण विक्षेप निर्माण करते. हे मलिनतेचे आवरण-विक्षेप जेव्हा निघून जातो तेव्हा आपल्या आत्मरथाचा प्रत्यक्ष ईश्वर रथी बनतो आणि आपल्याला मार्गदर्शन करू लागतो व हे असे करा, तसे करू नका असे आपल्याला मार्गदर्शन करत राहतो. त्यानंतर तुमचे हे सद्‌गुरू आहेत हेही तो सुचवतो. आमच्या पूज्य गुरूदेवानां ईश्वरानेच सांगितले की या मंदिरात तुझे सद्‌गुरू तुला भेटतील. आमचे गुरूजी सांगत की त्या महापुरूषाला त्या पूर्वी मी अनेक वेळा पाहिले होते. त्यांना बघून लोक त्यांना वेडा माणूस आहे असे म्हणायचे. मीही त्यांना वेडा माणूस असेच समजायचो. ईश्वराने आकाशवाणीने आम्हाला सांगितले की हे तुझे सद्‌गुरू आहेत. भगवंताने सांगितल्यावर त्यांचे खरे स्वरूप मला समजले. थोडक्यात चिंतन-भजन करावयाचे असेल तर गुपचूप करा, वेडे होऊन करा. केवळ दिखावा करून भजन होत नाही हे लक्षात ठेवा. आजपर्यंत सृष्टित ज्या महापुरूषांची कीर्ति आहे त्या सर्वांचे आचरण वेड्यासारखे होते. रामकृष्ण परमहंस, जड भरत, भगवान महावीर, काकभसुण्डि इ. सर्व सद्‌गुरू साधनावस्थेत वेड्यासारखे प्रतीत व्हायचे. आमचे गुरूदेव आणि त्यांचे गुरूमहाराज जेव्हा साधनावस्थेत असत तेव्हा त्यांना सर्व वेडेच समजायचे. आमचे गुरूमहाराज म्हणायचे आम्ही कोठेही गेलो तरी लोक आम्हाला वेडेच समजायचे. मुलं आम्हाला दगडही मारायचे परंतु जेव्हा आकाशवाणी व्हायची तेव्हा गुळाला मुंग्या चिटकतात त्याप्रमाणे आम्हाला सर्व चिटकायचे व म्हणायचे महाराज, आम्ही तर तुम्हाला वेगळेच समजत होतो; पण आपण तर मोठे संत आहात. वास्तविक महापुरूष भजन अगदी एकांतात करतात. ज्याप्रमाणे एखादा मनुष्य आपल्या उद्योगात इतका मग्न असतो की त्यांना लोक-व्यवहाराचे भान राहात नाही, किंवा दैनिक वर्तमानपत्र वाचताना एखादा इतका तल्लीन होतो की त्याला आपल्या जवळून कोणी निघून गेले तरी समजत नाही त्याप्रमाणे जो भजनात तल्लीन होतो त्याला बाहेर जगात काय चालले आहे त्याचे काही भान नसते. भजन ही एकांतात करण्याची क्रिया आहे. भजन करताना जवळ बसणाऱ्यालाही तो कधी भजन करतो ते समजता कामा नये. थोडक्यात सद्‌गुरू प्राप्त होणे अवघड गोष्ट प्राप्त करण्यासारखे आहे. परंतु साधनेची योग्य पध्दत समजली तर त्यांना प्राप्त करणे अगदी सरळ आहे. सतत ईश्वराच्या नामाचा जप करा, प्रार्थनेत राहा, श्रध्देने सत्पुरूषाची सेवा करा मग ईश्वर स्वतः तुम्हाला सांगतील **'-संत विशुध्द मिलहिं परि तेही । रामकृष्ण करि चितवाहिं जेहिं ।।'** जेव्हा ईश्वराची कृपा होते व अत्यंत प्रेमाने-करूणेने ज्याच्याकडे दृष्टिक्षेप करतो त्याला विशुध्द असा संत सद्‌गुरू आपोआप

प्राप्त होतो. सद्गुरू जेव्हा प्राप्त होतात तेव्हा शेष काय शिल्लक राहणार? **'सद्गुरू मिले जाहिं जिमि, संशय भ्रम समुदाइ।'** त्याच्या नंतर क्रम येतो ध्यानाचा. ध्यान म्हणजे प्रारंभीची क्रिया किंवा स्तर नाही हे लक्षात ठेवावे. सद्गुरू साधनेचा मंत्र (विधी) प्रदान करतील तेव्हा हळूहळू ध्यानावस्था प्राप्त होईल. कारण भजन-साधना लिहिली जात नाही. ती अनुभवी सद्गुरूद्वारे साधकाच्या अंतःकरणात स्फुरित केली जाते.

## गीतेमध्ये 'ध्यान'

सहाव्या अध्यायात योगेश्वर श्रीकृष्णाने सांगितले आहे की एकांत स्थळी बसून, अशा व संग्रह वृत्तीचा त्याग करून मन आणि इंद्रियांचा संयम करून पवित्र स्थळी स्थिर आसनात शरीर, शीर आणि ग्रीवा यांना एका सरळ रेषेत ठेवून माझ्यात चित्त केंद्रित करावे अर्थात याला ध्यान साधनेचा आरंभ असे म्हणत नाहीत. याच्या आधी साधकाला एकान्त स्थळाचे सेवन, आणि इंद्रियाच्या संयमाचे पालन आवश्यक आहे. ध्यानाचा अर्थ म्हणजे योगेश्वराने आपल्या स्वरूपाचे दर्शन असे म्हटले आहे. म्हणजे गीतेनुसार कोणत्याही व्यक्तीचे किंवा वस्तूच्या ध्यानाचे औचित्य नाही.

गीतेच्या १८ व्या अध्यायात (५१-५५) योगेश्वर श्रीकृष्णाने म्हटले आहे की ज्ञानाची परानिष्ठा अथवा परम नैष्कर्म्य सिध्दीच्या प्राप्तीसाठी साधक शब्दादिक विषयांचा त्याग, एकांत देशाचे सेवन, स्वल्पाहार, शरीर आणि इंद्रियांच्या संयमाचे पालन, ध्यानयोग परायण होऊन माझ्या पराभक्तीला प्राप्त होतो. येथेही श्रीकृष्णांनी ध्यानाच्यापूर्वी अनेक भूमिकांचा निर्देश केला आहे आणि ध्यानाद्वारे आपल्या भक्तीचा उल्लेख करून कोणा योगेश्वराच्या ध्यानाला पुष्टी दिली आहे.

अर्थात कशाचेही ध्यान करायला गीता सांगत नाही. अध्याय ८/६ मध्ये

**'यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम्।**
**तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः॥'**

जो ज्याचे ध्यान करत शरीर त्याग करतो त्याला साधारणतः तीच योनी प्राप्त होत असते. जो माझे चिंतन करत शरीर-त्याग करतो त्याला माझे सहज अविनाशी स्वरूप प्राप्त होते. मग त्याला पुन्हा परत आवागमन करावे लागत नाही. म्हणून हे अर्जुना, तू निरंतर माझे चिंतन कर. थोडक्यात सांगायचे म्हणजे योगेश्वर श्रीकृष्णांनी आवागमनापासून मुक्ती, अविनाशी पद, अमृततत्त्वातील स्थितीसाठी आपले ध्यान करावे असे सांगितले, तसेच हेही सांगितले अन्य कशाचेही ध्यान केले तर त्या योनीची प्राप्ती अपरिहार्यपणे किंवा निर्विवादपणे होत असते.

तेव्हा ईश्वराच्या ऐवजी कोणाचेही ध्यान करणे किंवा फूल पाहणे किंवा दीपक पाहणे असे चालणार नाही. या प्रसंगावर पुन्हा भर देताना योगेश्वर म्हणतात-अर्जुना, तू निरंतर माझे चिंतन करत युध्द कर. पुढच्या श्लोकात त्यांनी लगेच चिंतन विधी स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, अर्जुना, वैराग्यात स्थिर राहून, एकान्त देशाचे सेवन करून अंतःकरणात योगविधी धारण करून **'चेतसा नान्यगामिना-'** इतर कोणाचेही चिंतन न करता फक्त माझेच चिंतन करीत तू युध्द कर. म्हणजे ईश्वराशिवाय अन्य कोणतेही दृश्य डोळयापुढे दिसले तर ते चिंतन अपूर्ण आहे. येथे भगवान श्रीकृष्णांनी आपले स्वतःचे ध्यान करायला सांगितले आहे.

नवव्या अध्यायात आपला परिचय देताना भगवान श्रीकृष्ण म्हणतात-

**'अवजानन्ति मां मूढा मानुषी तनुमाश्रितम् ।**
**परं भावमजानन्तो मम भूत महेश्वरम् ॥'**

माझ्या परभावाला न जाणल्यामुळे शरीरधारी मनुष्य सर्व प्राणिमात्रांच्या महान ईश्वराला, अविनाशी असणाऱ्या मला तुच्छ मनुष्य म्हणून पुकारतो. महात्मा दुसरा आणखी काय असतो? तेही परमतत्त्वाला स्पर्श करून परमभावात स्थित होतात. अशा महात्म्याचे शरीर म्हणजे फक्त एक घर आहे. **'साधन धाम मोच्छ कर द्वारा ।'** परंतु ते महापुरूष मानव शरीराचा आधार असणारे असतात.

गीतेच्या आठव्या अध्यायात ते महापुरूष म्हणतात

**'यदक्षरं वेदविदो वदन्ति**
**विशन्ति यद्यतयो वीतरागाः।**
**यदिच्छन्तो ब्रह्मचर्य चरन्ति**
**तत्ते पदं संग्रहणे प्रवक्ष्ये ॥ ८/११॥'**

अर्जुना, प्रत्यक्षदर्शी महापुरूष ज्याला प्राप्त होतात, ज्याला प्राप्त करू इच्छिणारे साधक कठोर ब्रह्मचर्यादि यम नियमांचे पालन करतात व सतत हृदयात एकमात्र धारण करण्यास जो योग्य आहे त्या पदाबाबत मी थोडक्यात सांगतो. ते काय

**'सर्वव्दाराणि संयम्य मनो हृदि निरूध्य च ।**
**मूर्ध्न्याधायत्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ ८/१२॥'**

संपूर्ण इंद्रियांच्या दरवाजांना संयमित करून इंद्रियांचे दमन करून योगविधीला हृदयात धारण करून मनाला आत मस्तकात स्थित करून 'ओमित्येकाक्षंर ब्रह्म' 'ओम्' म्हणजे अक्षय ब्रह्माचा परिचय करून देणारा आहे त्याचा जप करीत, 'मामनुस्मरन्' माझे स्मरण (ध्यान) करत

(माझ्या स्वरूपाचे ध्यान करत) देशध्यासाचा त्याग करतो. हा अभ्यास इतक्या परीसीमेला पोहोचेतो की, **'त्यजन्देहं'** देहाविषयीचे भान समाप्त होते, विदेहावस्थेची स्थिती त्याला प्राप्त होते. **'ततो याति परमां गतिम् ।'** तत्क्षणी तो परमगतीस प्राप्त होतो. येथे भगवंताने ध्यान आपले, जप ओम्‌चा आणि योगविधीला धारण करीत इंद्रियांना विषयांमध्ये भटकण्यापासून रोखण्यास सांगितले आहे.

यावर पुन्हा भर देताना भगवान श्रीकृष्ण म्हणतात-

**'अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ ८/१४ ॥'**

**'अनन्य चेताः-'** अर्थात सतत माझे स्मरण करत असतो.

**'तस्याहं सुलभः-'** त्याला मी सुलभतेने प्राप्त होतो. आपल्या सुलभ होण्यापासून काय लाभ?

**'मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।'**
**'नाप्नुवन्ति महात्मानः संसिध्दि परमां गताः ॥ ८/१५ ॥'**

दुःखांची खाण असणारा पुनर्जन्म त्याला प्राप्त होत नाही. मग पुनर्जन्माच्या बंधनात कोण सापडते?

**'आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥ ८/१६॥'**

स्वतः सृष्टीचा रचनाकार विधाता आणि त्याच्यापासून उत्पन्न होणारे यावन्मात्र जड चेतन, स्थावर-जंगम, दिति-अदिती यांची मुले म्हणजे देव व मानव हे सर्व पुनरावर्ती स्वभाव असणारे आहेत. आज आहेत तर उद्या दुसरा जन्म घेतात. **'पुनरपि जननम् पुनरपि मरणम् ।'** या परिघात राहणारे आहेत, ते दुःखांची खाण आहे, क्षणभंगुर आहे. परंतु अर्जुना, माझा भक्त कोणी दुसऱ्याचे ध्यान करीत नाही. येथे योगेश्वरांच्या मते अन्यत्र कोणी दुसऱ्याचे ध्यान करीत असेल तर तो दुःखाच्या खाणीलाच आमंत्रित करीत आहे. म्हणजे नष्ट व्हायचे असेल तर नश्वराला पकडा आणि अविनाशी पद प्राप्त करावयाचे असेल तर योगेश्वराचे ध्यान करा.

गीतेच्या समापनाच्या अध्यायात भगवान योगेश्वराने स्वतः अर्जुनाला भगवान कोठे वास करतो ते सांगितले आहे.

**'ईश्वरः सर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ १८/६१॥'**

अर्जुना, तो परमात्मा संपूर्ण प्राण्याच्या हृदयदेशात वास करतो. परमात्मा इतका समीप आहे तर लोक त्याला का पाहू शकत नाहीत? मायारूपी यंत्रावर आरूढ होऊन लोक स्वैरभैर भटकत असतात म्हणून त्याला पाहू शकत नाही. त्यासाठी काय करावे? योगेश्वर सांगतात

**'त्वेमव शरंण गच्छ सर्वभावेन भारत ।**
**तत्प्रसादात्परां शान्ति स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ १८/६२ ॥'**

अर्जुना, त्या हृदयस्थित ईश्वराला संपूर्ण भावांसह शरण जा. मात्र थोडा भाव पशुपतिनाथाला, थोडा कामेच्छा देवीला थोडा भैरवनाथाला अशा प्रकारे तुमचा भाव वाटत जाऊ नका. यामुळे तुमचे कल्याण होणार नाही. **'सर्वभावेन'** मनाच्या सर्व भावांसह ईश्वरचरणी शरण जा.

असे समजा की आपल्या सर्व मान्यता, सर्व पूर्वग्रह सोडून एखादा परमात्म्याला शरण गेला तर काय फायदा होईल? **'तत्प्रसादात परां शान्तिम् '**त्याच्या कृपाप्रसादाने तुम्हाला परम शांती प्राप्त होईल. एवढेच नव्हे तर **'स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् -'** तुम्ही ते शाश्वत स्थान प्राप्त करू शकाल. हेच अमृतत्त्व असून अविनाशी पदाची प्राप्ती आहे. पंरतु हृदयस्थित ईश्वराला तर आम्ही पाहिलेले नाही. मग त्याला कसे शरण जायचे? यावर योगेश्वर म्हणतात-अर्जुना, यापेक्षाही गोपनीय अति गोपनीय वचन तू ऐक.

**'मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरू ।**
**मामेवैष्यसि, सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ १८/६८॥'**

अर्जुना, माझ्यामध्ये मन केंद्रित कर, माझा अनन्य भक्त बन, मला नमस्कार कर. मनातील सर्व भावांनी मला शरण ये. तू निश्चितपणे मला प्राप्त होशील हे अगदी सत्य आहे.

**'सर्वाधर्मान्परित्यज्य मामेकं शरण व्रज**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ १८/६६॥ '**

सर्व धर्मांची चिंता सोडून दे. हा रस्ता बरोबर आहे की तो रस्ता बरोबर आहे याची चर्चा करण्याचे सोडून दे आणि तू मला श्रध्देने शरण ये. म्हणजे तू सर्व पापांपासून मुक्त होशील आरंभीच्या दोन श्लोकांमध्ये भगवंत म्हणतात-ईश्वर हृदयात आहे. त्या हृदयस्थित ईश्वराला शरण जा. पुढच्या दोन श्लोकांत ते म्हणतात की संपूर्ण भावांसह शरण ये. आता बाहेर उभ्या असणाऱ्या श्रीकृष्णाला शरण जायचे की हृदयात असणाऱ्या भगवंताला शरण जायचे? वास्तविक ईश्वर हृदयात असतो, परंतु हृदयस्थ परमात्म्याला प्राप्त करण्याचा एकच रस्ता आहे. तो म्हणजे सद्गुरू ! श्रीकृष्ण एक योगेश्वर आहेत. गीतेमध्ये ठिकठिकाणी सद्गुरूच्या रूपातच तो महापुरूष परमात्मा तुम्हाला भेटेल.

तेव्हा हृदयस्थित ईश्वराला प्राप्त करायचे असेल तर मन-क्रम-वचनाने (काया-वाचा-मने) एखाद्या तत्त्वदर्शी महापुरूषाला शरण जावे लागेल. यालाच पतंजलीने क्लेश-कर्म-विपाकाच्या (परिणामाच्या)आशयापासून मुक्त असणाऱ्या ईश्वराची संज्ञा दिली आहे. संजय प्रत्यक्षदर्शी होता. जे काही अर्जुनाने पाहिले ते संजयानेही पाहिले. अर्जुनाला श्रीकृष्णाच्या कृपेने दिव्य दृष्टी प्राप्त झाली होती तर तशीच दिव्य दृष्टी संजयाला व्यासांच्या कृपेने प्राप्त झाली होती. म्हणजे जे कृष्णाने दिले तेच व्यासही देऊ शकले.

त्या प्रत्यक्षदर्शी संजयाने शेवटी निर्णय दिला-

**'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। १८/७८।।'**

जेथे योगेश्वर श्रीकृष्ण आहे, जेथे योगानुरूप धनुष्य धारण करणारा महात्मा अर्जुन (लक्षवेधी भक्त) आहे, तेथे श्रीः आहे, तेथे विजय आहे, विभूती आहे, अचल नीती आहे. राजन, विजय पांडवांचा होईल कारण योगेश्वर श्रीकृष्ण जेथे आहेत तेथेच विजयश्री उभी आहे. अन्यथा प्रकृतीवर कोणीही विजय प्राप्त करू शकत नाही. भगवान श्रीकृष्ण परमच्या स्पर्शाने परमभावामध्ये स्थित असणारे साक्षात परमात्मास्वरूप आहेत, योगेश्वर आहेत.

अर्जुनाने विचारले, भगवान, ते ज्ञान मी कोठून प्राप्त करू? ते ज्ञान जाणून घेतल्यानंतर काहीही जाणणे शिल्लक राहात नाही, जे प्राप्त केल्यानंतर काही प्राप्त करणेही शिल्लक राहात नाही, ते ज्ञान मी कोठून मिळवू? यावर श्रीकृष्ण म्हणाले,

**'तत्विध्दि प्राणिपातेन परिप्रश्ने न सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ।।४/३४।।'**

अर्जुना, तत्त्वदर्शी महापुरूषाच्या जवळ जा, त्याला स्वतःला समर्पित होऊन त्याची सेवा करा आणि त्या महापुरूषाला प्रश्न विचारून तुम्ही त्याच्याकडून सत्यज्ञान प्राप्त करा. ते ज्ञान प्राप्त करून घेतल्यानंतर तुमचे अज्ञान कायमचे नष्ट होईल.

भगवान योगेश्वर तर समोरच उभे होते. तत्त्वदर्शी महापुरूषाकडे अर्जुनाला पाठवण्याची काय आवश्यकता होती? वास्तविक भगवान श्रीकृष्णही तत्त्वदर्शी होते. परमात्मा म्हणजे परमतत्त्व होय. ज्याने त्याला पाहिले, केवळ पाहिलेच नाही तर पाहताच परम स्थितीही प्राप्त झाली असे परमभावाने युक्त असणारे महायोगेश्वर भगवान श्रीकृष्ण होते. गीता म्हणजे

गुरू-शिष्य संवाद आहे. अर्जुन म्हणाला 'शिष्यस्तेऽहं' मी आपला शिष्य असल्याने आपण मला सांभाळून घ्या. म्हणजे भगवान श्रीकृष्ण स्वतःएक योगीपुरूष असूनही परमतत्त्वाचा स्पर्श झालेल्या महापुरूषाकडे शरण जायला सांगतात. सर्व आर्षग्रंथामध्ये सद्‌गुरूचे ध्यान करावे असेच सांगितलेले आहे.

**॥ ॐ श्री सद्‌गुरू भगवान की जय ॥**

# हठयोग. चक्र-भेदन आणि योग ?

हठयोग, कुंडलिनी विविध चक्रांविषयीची परिकल्पना या सर्व गोष्टी साधकाला अंतर्मुख बनवतात.

**- स्वामी अड़गड़ानन्द.**

नेपाळ येथील काठमांडू येथे झालेल्या सभेत दिनांक २२/११/२००० मध्ये योग विषयक जिज्ञासेवर महाराजश्रींनी केलेले प्रवचन.

# हठयोग, चक्र-भेदन आणि योग ?

बंधुनो,

आपणाकडून माझ्याकडे येथे दोन प्रश्न आलेले आहेत. मूर्तिपूजा उचित आहे की अनुचित आहे हा आपला पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न योगाचे वास्तविक स्वरूप काय आहे? म्हणजे हठयोग षट्चक्र आणि विविध प्रकारची आसने या सर्व गोष्टींमध्ये योगाचे वास्तविक स्वरूप काय आहे हा प्रश्न आहे.

मूर्तिपूजेविषयी आश्रमात असणाऱ्या 'यथार्थ गीता' 'जीवनादर्श एवं आत्मानुभूति' आणि 'शंका समाधान' या ग्रंथामध्ये आम्ही सविस्तर चर्चा केलेली आहे. मंदिर, मशीद, गुरूद्वारा, चर्च, स्तूप इत्यादी श्रध्दास्थाने (प्रार्थनास्थाने) म्हणजे आध्यात्माच्या प्राथमिक शाळा आहेत. त्यांच्या द्वारे आम्ही आमच्या पूर्वजांच्या वाटेने पुढे चालू शकतो. धर्माची एक योग्य दिशा प्राप्त होते. धर्माच्या दिशेने वाटचाल करू शकतो. अर्थात एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच यांचा उपयोग होतो. अक्षरज्ञानासाठी प्राथमिक इयत्तेत बसणे बरोबर आहे; परंतु कोणी जर आजीवन त्याच इयत्तेत बसू म्हणेल तर योग्य आहे का? तीच गोष्ट प्रार्थनास्थानांची व मूर्तिपूजेची आहे. मंदिरे व मूर्ती म्हणजे आमची अशी श्रध्दास्थाने आहेत की ज्यांमध्ये आपल्या पूर्वजांनी परमात्म्याच्या प्राप्तीसाठी केलेल्या प्रयत्नांची गौरवपूर्ण स्मृती जतन केल्या गेल्या आहेत. या ठिकाणी आमच्या महान विभूतींनी-संत-साधकांनी कशा प्रकारे साधना केली? त्या परमतत्त्वाची प्राप्ती कशी कशी करून घेतली? त्यांनी प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी कोणता संदेश दिला? जर हे सांगितले गेले तर त्या मंदिरांचे व मूर्तींचे सार्थक झाले असे म्हणायला पाहिजे. परंतु जेथे केवळ तीर्थ (चरणामृत) व प्रसादच भक्तांना देणे महत्त्वाचे समजले जाते अशी मंदिरे निरर्थक आहेत. भक्तांच्या श्रध्देचा तो केवळ दुरूपयोग आहे असे नाइलाजाने म्हणावे लागेल.

आपल्या योगविषयक प्रश्नाबाबत मात्र विस्ताराने सांगता येण्यासारखे आहे. आज योगाच्या नावावर देशात परदेशात अनेक प्रशिक्षण केंद्रे सुरू आहेत. केंद्रात गृहस्थजन, विरक्तजन, लहान-मोठे असे अनेक लोक योग शिकत आहेत. लहान लहान मुलेदेखील योगामध्ये पारंगत झालेली दिसून येतात. आमच्या आश्रमातही अनेक लहान मुलांनी योगात प्राविण्य प्राप्त करून

सुवर्णपदके मिळवली आहेत. (ते जिमन्यास्टर होते). परंतु गीतेसारख्या योगशास्त्रात याला योग म्हणत नाहीत. गीतेमध्ये सांगितले आहे की-

**तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसञ्ज्ञितम् ।**
**स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ।।६/२३।।**

जो या संसारातील संयोग-वियोगापासून विमुक्त असतो, जो परम सुखदायक असतो त्याला परमततत्त्व असे म्हणतात व त्याच्याशी एकरूपता साधण्याला योग असे म्हणतात. धरसोड न करता, विचलित न होता निश्चयपूर्वक योग करणे साधकाचे कर्तव्य आहे. निर्धारपूर्वक व अभ्यासपूर्वक योग करणारा त्या परमतत्त्वाला प्राप्त करू शकतो. परमतत्त्व परमात्मा आणि आमच्या मध्ये मनातील विचार असतात, मनातील वृत्ती असतात. या वृत्तींचा-कामनांचा निरोध कसा करावा? त्यासाठी आमच्या ऋषी मुनींनी देश, काल, पात्र-भेदानुसार साधनेचा क्रम आपापल्या भाषाशैलीत व्यक्त केला आहे. लौकिक सुख तसेच पारलौकिक आनंदाच्या प्राप्तीचा एकमात्र स्त्रोत असणाऱ्या परमात्म्याला प्राप्त करण्याचा साधनाक्रम जो वेदांमध्ये सांगितलेला आहे, तोच उपनिषदांमध्ये उद्गीथ विद्या, मधुविद्या, दहरविद्या, भूमाविद्या, मन्थविद्या, न्यासविद्या इत्यादी नावांनी अभिहित केलेला आहे. यालाच महर्षी पातंजलीच्या दर्शनात योगाची संज्ञा दिलेली आहे.

योग म्हणजे खरोखर काय प्रकार आहे? महर्षी म्हणतात-**'अथ योगानुशासनम्-'** योग एक अनुशासन आहे. आम्ही कोणाला अनुशासित करावे? परिवारास, देशास की आजूबाजूच्या शेजारपाजाऱ्यांना? सूत्रकार म्हणतात. नाही **'योगश्चित्तवृत्ति निरोधः-'** चित्तवृत्तींचा निरोध म्हणजे योग होय. कोणी परिश्रम करून वृत्तींचा निरोध केला तर त्यापासून काय लाभ होईल? **'तदा द्रष्टः स्वरूपेऽवस्थानम्-'** तेव्हा तो साधक आपल्या आत्म्याला सहज स्वरूप परमात्म्याच्या ठिकाणी स्थिर करू शकेल. यापूर्वी ही स्थिती त्याला प्राप्त झालेली नव्हती का? तो परमात्म्याच्या ठिकाणी स्थित नव्हता का? महर्षी म्हणतात-**'वृत्ती सारूप्यमितरत्र'** साधकांची वृत्ती ज्याप्रमाणे असेल म्हणजे सात्विक, राजस, अथवा तामसी तसेच क्लिष्ट, अक्लिष्ट यापैकी जशी असेल तशीच असते. अशा वृत्तीचा निरोध कसा करावा? **'अभ्यास वैराग्याभ्यां तन्निरोधः'** चित्त एकाग्र-स्थिर करण्यासाठी जो प्रयत्न केला जातो त्याला अभ्यास असे म्हणतात. दिसणाऱ्या, ऐकल्या जाणाऱ्या सर्व गोष्टींमध्ये ममत्वाचा त्याग करणे म्हणजे वैराग्य होय. मग अभ्यास कशाचा करावा? **'क्लेशकर्म विपाक आशयैरपरामृष्टः पुरूष विशेष ईश्वरः'** क्लेश, कर्म, कर्मांचा संग्रह आणि परिणाम, भोग यांच्याही पलीकडे आहे तो विशेष पुरूष म्हणजे ईश्वर होय. हा ईश्वर काळापेक्षा श्रेष्ठ आहे, तो गुरूंचा गुरू आहे. त्याचे वाचक (उच्चारण्याचे) नाम **'ओम्'** आहे. **'तज्जपस्तदर्शभावनम् '** त्या ईश्वराच्या ओंकार नामाचा जप करा. त्याच्या अर्थानुरूप

त्या ईश्वराच्या स्वरूपाचे ध्यान करा. हाच अभ्यास आहे. या अभ्यासाच्या प्रभावाने सर्व विघ्न नष्ट होतील, क्लेश नाहीसे होतील आणि मग साधक स्वरूपस्थिती प्राप्त करू शकेल.

या समस्त प्रकरणात योगासाठी सतत चित्तवृत्तींशी संघर्ष करावयाचा आहे. मग शरीराच्या विविध क्रिया, त्याच्या विविध मुद्रा यांना 'योग' केव्हापासून व का म्हणू लागले? कोणीही दिवस-रात्र म्हणजे चोवीस तास सतत योगाच्या नावाने प्रचलित आसने करणे शक्य नाही. वास्तविक गीता शास्त्राप्रमाणे योग म्हणजे अविरत चालणारी प्रक्रिया आहे. तर महर्षी पतंजलीच्या मतानुसार **'स तु दीर्घकाल नैरन्तर्य सत्कारा ऽऽ सेवितो दृढभूमिः-'** अत्यंत निष्ठेने, अत्यंत श्रध्देने पुष्कळ दिवस योगाचा अभ्यास सतत केल्यानेच, साधकाला स्वरूपस्थिती प्राप्त होत असते. मग हा अभ्यास करायचा म्हणजे काय करायचे? कोणती आसने करायची असतात का? नाही, आसने करायवयाची नसून ओमचा जप आणि सतत ईश्वराचे ध्यान करावयाचे असते? मग या योगापासून काय निष्पन्न होते? साधकाला या योगामुळे स्वरूपस्थिती प्राप्त होते. या व्यतिरिक्त कोणत्याही साधनेला, क्रियांना किंवा लक्षणांना योग म्हणत नाहीत.

म्हणजे योग ही एक मानसिक क्रिया आहे. मग त्याच्या नावावर शारीरिक मुद्रा, विभिन्न आसने केव्हापासून प्रचलित झाली हे पाहणे आवश्यक आहे. पूर्वी साधकजन घनघोर जंगलातील एकांतात कंदमुळे, फळे सेवन करून ईश्वराचे ध्यान, धारणा करत असत. जंगलात त्यांना अनेक प्रकारच्या आजारांना-व्याधींना तोंड द्यावे लागत असे. **'लागत अति पहार कर पानी। विपिन विपति नही जाई बरवानी ।।'** साधरणतः पर्वतमय म्हणजे पहाडी प्रदेशातील पाणी शरीरस्वास्थ्यासाठी अनुकूल असत नाही आणि जंगलामध्ये इतक्या प्रकारच्या अडचणी असतात की त्याचे वर्णन करता येणार नाही. सर्प, विंचू, वाघ, सिंह, अस्वल, जंगली हत्ती, गेंडें, लांडगे आणि विविध प्रकारचे कीटक, जीवजंतू, भयंकर अशा डासांचा त्रास. अशा भयंकर वातावरणात राहण्याने साधकांना चार-पाच महिन्यातच मलेरिया, लिव्हर वाढणे, पोटदुखी (उदर-शूल) इत्यादी जंगलातील विकार त्रस्त करीत असत. दोन-दोन तीन-तीन महिने ताप त्यांचा पिच्छाच सोडायचा नाही. म्हणजे चार-पाच महिने ईश्वराचे सतत चिंतन-स्मरणाचा अभ्यास करून प्रेमपूरित होऊन ईश्वरचरणी मनाला स्थिर करण्यात यश प्राप्त होत असतानाच या शारीरिक व्याधींमुळे, आजारपणामुळे मन ईश्वरचिंतनाकडून शरीरस्वास्थ्याच्या चिंतेकडे वळायचे. यामुळे चिंतनक्रमाचा अभ्यास खंडित व्हावयाचा. येन केन प्रकाराने स्वास्थ चांगले करून व मन पुन्हा ईश्वरचिंतनाकडे वळवावे तो पुन्हा साधकाला दुसरे कसले तरी आजारपण यायचे.

प्राचीन काळी आजच्याप्रमाणे औषधाची किंवा रूग्णालयाची व्यवस्था नव्हती आणि जंगलात तर त्याचा आणखी अभाव होता. त्यामुळे साधकांनी ध्यानधारणेतून थोडा वेळ काढून त्या मार्गात विघ्नरूप बनणाऱ्या आजारपणाच्या निवारणासाठी शरीरस्वास्थ कसे प्राप्त करता

येईल याचे चिंतन करणे सुरू केले. मलावरोध दूर होऊन त्यापासून उत्पन्न होणारे विकार-आजार यांपासून शरीराचे कसे रक्षण करता येईल याचाही अभ्यास सुरू केला. **'योग करत रोग बढत। वैराग योग कठिन ऊधो, हम न करब।'** गोपी उध्दवाला म्हणतात की उध्दवजी,वैराग्य आणि योग दोन्ही अत्यंत कठीण आहे. योग करण्याने रोग वाढू लागतो. खरे पाहू जाता या गोष्टीत तथ्य आहे. कारण चिंतन वाढणे व कमी होणे हे श्वासावर अवलंबून असते. ईश्वराचे नामःस्मरण वैखरी, मध्यमा, पश्वन्ति आणि परा या चार स्तरावर केले जाते. (किंवा या चार स्तरावर नामजप केला जातो.) जे व्यक्त होते त्याल वैखरी म्हणतात. इतरांना ऐकू जाईल अशा रीतीने वैखरीमध्ये नामजप केला जातो. मध्यमा म्हणजे अस्फुट स्वर ! म्हणजे जवळ कोणी बसलेला असला तरी त्यालाही उच्चारलेला नामजप ऐकू न जाणे. फक्त जप करणाऱ्यालाच ऐकू जाणे व समजणे म्हणजे मध्यमेचा स्तर होय. याच्या पुढची अवस्था पश्यन्ति मध्ये दिसून येते. यामध्ये दृष्टी श्वासावर केंद्रित केली जाते. म्हणजे श्वास केव्हा आत घेतला, किती वेळ तो आत रोखून ठेवला गेला व केव्हा तो बाहेर सोडला? याचा अभ्यास पश्यन्तिमध्ये होतो. म्हणजे मनाला निरीक्षिकाच्या रूपात या अवस्थेत राहावे लागते. जेव्हा मन निरिक्षक बनते तेव्हा चितंनात नामजप करण्यास सुरूवात होते. पश्यन्तिच्या पुढची परिपक्व अवस्था म्हणजे विपश्यना ! या अवस्थेत श्वासाच्या एका विशिष्ट अवस्थेत नाम जागृत होते. त्याला आता जागृत करावे लागत नाही एकदा ईश्वराचे ठिकाणी दृष्टी स्थिर झाली की मन परमतत्त्वात स्थित होते. परमतत्त्वात प्रवेश देणारी ही वाणी आहे म्हणून हिला परा वाणी असे संबोधले जाते. या अवस्थेत श्वासाची गती शिथिल होते. एका मिनिटात तर तुम्ही चार वेळा श्वास घेत असाल तर पराच्या या अवस्थेत तुम्ही एकदाच श्वास घेऊ शकता. श्वासच तुमचे रक्त शुध्द करते आणि तेव्हा या श्वासाची गतीच शिथिल होते तेव्हा रक्ताभिसरणाची क्रिया आपोआप मंद होते. नसांतील नाडयातील, मांसपेशीमधील रक्ताभिसरण मंद होताच शरीराला विविध रोग घेरून टाकतात. तेव्हा चिंतनप्रवाह खंडित होऊ नये म्हणून मग महापुरूषांनी नेति, धौति, आसन इत्यादी शारीरिक क्रिया शोधून काढल्या.

नेति म्हणजे नाकात सुताचा दोरा घालून तो तोंडावाटे बाहेर काढणे. धौति म्हणजे पाच सेंटिमीटर लांबीचे वस्त्र पाण्यात बुडवून ते पिळून पाणी नाकातून तोंडावाटे काढणे म्हणजे धौति क्रिया होय. बस्ति एनिमाप्रमाणे आतील भाग स्वच्छ करणे आणि नौलि म्हणजे उभे राहून नंतर दोन्ही हात गुढग्यावर ठेवून नौलिला (छोटे आतडे) नाभीच्या चारी बाजूस फिरवणे. त्राटक म्हणजे कोणत्याही वस्तूकडे एकटक पाहात राहणे. कपालभाती म्हणजे लोहारच्या भात्याप्रमाणे जोराने श्वास आत घेणे व सोडणे याशिवाय कर्ण धौति (कान स्वच्छ करणे) दंत्तधौति (दातांची सफाई), शंख प्रक्षालन (तोंडाने पाणी पिऊन गुदाद्वारे बाहेर काढणे) इत्यादी सर्व शारीरिक उपचार होते. ज्यामुळे चिंतनात व्यत्यय येऊ नये म्हणून यासाठी हे उपचार केले जात असत.

मूळ साधनेशी याचा काहीच संबंध नव्हता. **‘तन बिन भजन वेद नही वरना’** ईश्वर चिंतनासाठी शरीर निरोगी राखण्याचे उपाय या क्रियेमध्ये आहेत. याच क्रियांना पुढे हठयोग असे संबोधण्यात येऊ लागले.

वास्तविक हठयोग नावाची कोणती वेगळी साधना नाही. जेव्हा मी गुरूमहाराजांच्या आश्रमात आलो तेव्हा महिन्या दोन महिन्यातच गुरूदेव अंतरंगातून प्रेरणा देऊ लागले की येथे बस, आता श्वासाने चिंतन कर. आता तुझे चिंतन बरोबर सुरू आहे. आता बरोबर चाललेले नाही. आता चिंतनात विघ्न येणार आहे. त्या विघ्नाचे आता निवारण झाले आहे. याप्रकारे धडाधड अनुभव येऊ लागले. गुरूमहारांजाच्या कृपेने अनुभव जागृती प्राप्त झाली, इष्टदेव आत्म्याचे मार्गदर्शक बनले. नामजपाचा विधि, श्वास-प्रश्वासाने चिंतन, नाम-रूप लीला आणि ब्रह्मविद्या इत्यादी साधनेचा सर्व क्रम गुरूमहारांनी विधीवत शिकवला; परंतु नेति, धौति, नौलि, बस्ति, योगासन इत्यादींचा कधी उच्चारही केला नाही.

गुरूमहाराज सेवा करण्यावर खूप भर देत असत. हे करा, ते करा असे सांगून आम्हाला सतत सेवेत गुंतवत असत. त्यामुळे आसनांची उणीव भरून निघत असे. ते सांगत की जागे असे पर्यंत योगाचे आचरण करीत राहा. तुमच्या मनाला सतत नाम, रूप लीला आणि रूप धाम यापैकी कशात ना कशात गुंतवत ठेवा. जर मनाला चिंतनापासून थोडे जरी रिकामे ठेवाल तर ते लगेच मायेत गुरफटले जाईल. तुमचे मन म्हणजे कधीही शांत न राहणारे यंत्र आहे. सतत ते काही ना काही विचार करत असते, म्हणूनच तुम्ही सतत ईश्वराच्या चितंनात त्याला मग्न ठेवा. सेवा करताना, गवत-लाकडे उचलतानासुध्दा मन ईश्वराच्या ठिकाणीच मग्न असले पाहिजे. प्रतिज्ञापूर्वक म्हणजेच अत्यंत निर्धाराने मनाला ईश्वरचरणी स्थिर करा यालाच ‘हठ’ म्हणतात. ‘हठ’ च्या नावाने कोणतीही वेगळी क्रिया सांगितलेली नाही. पंचाग्नीत तापणे, जल शयन, कंटक शयन, अरण्य निवास, एका पायावर किंवा हात वर करून उभे राहणे, वृक्षाच्या फांदीवर उलटे लटकून खालून धूर घेणे, किंवा दिगंबर बनणे किंवा मौनी बनणे निराहार, जलाहार, फलाहार, दुर्वाहार, दुग्धाहार किंवा कंदमूलाहारवर निर्वाह करणे इत्यादी हठयोगाचेच प्रकार आहेत. वास्तविक हठयोग म्हणजे ईश्वराच्या ठिकाणी श्रध्दा स्थिर करणे होय.

पार्वतीपुढे सप्तर्षींनी प्रस्ताव मांडला की तू ऐश्वर्य संपन्न विष्णूशी विवाह करावा. त्या दिगंबर शंकराजवळ काय आहे? तेव्हा पार्वती म्हणाली **‘हठ न छूटे छूटे बरू देहा-’** मला या शरीराला सोडावे लागले तरी चालेल पण मी माझा हट्ट सोडणार नाही. **‘जन्म कोटी लागि रगर हमारी । बरऊँ शम्भू न त रहउँ कुँआरी ।’** लाखो जन्मापार्यंत शिवशंभूशी विवाह करण्याचीच जिद्द आहे. अन्यथा मी कुमारी राहीन. **‘तजऊँ न नारद कर उपदेसू। आपु कहहि**

**सत बार महेसू ।।'** मी नारदाच्या उपदेशाचा त्याग करू शकत नाही. स्वतः भगवान शंकरही शंभर वेळा मला सांगायला आले तरी मी माझा हट्ट सोडणार नाही **'गुरू के वचन प्रतीति न जेही । सपनेहु सुगन न सुख सिधि तेही ।।'** गुरूंच्या सांगण्यावर ज्याचा विश्वास नसतो त्याला स्वप्नातदेखील कधी सुख प्राप्त होत नाही ना सिध्दी ! हा होता जगदंबा पार्वतीचा हठ तिची प्रतिज्ञा ! भगवान बुध्दांचा हट्ट अशाच प्रकारचा होता. याचा उल्लेख ललित विस्तारमधील पुढील श्लोकात आहे. **'इहासने शुष्यतु मे शरीरम्, त्वगस्थि मांसं प्रलयं च यातु । अप्राप्य बोधि बहुकल्प दुर्लभाम् नैवासनात् कायमतश्च लिप्यते ।'** जरी माझे शरीर शुष्क झाले, माझी हाडे मांस शरीर सोडून गेले, प्रलय झाला तरी जोपर्यंत मला आत्मज्ञान प्राप्त होत नाही तोपर्यंत या बैठकीवरून (बसलेल्या जागेवरून) उठणार नाही. हठयोगाच्या नावावर कोणती वेगळी क्रिया केली जात नाही. ज्या ईश्वराला प्राप्त करण्यासाठी तुम्ही प्रयत्न करीत आहात त्यापासून तुम्हाला विचलीत करण्यासाठी लाखो उपदेशक आले तरी आपल्या हट्टापासून प्रतिज्ञेपासून यत्किंचितही विचलीत न होणे याला हठयोग म्हणतात. योगसाधनेत हठयोग आवश्यक आहे परंतु वरील प्रकारची जिद्द. निश्चय ! पूज्य महाराज म्हणत असत की हनुमान म्हणजे हट्ट (हठ) आहे. साधकाने हनुमानासारखे झाले पाहिजे. पार्वतीप्रमाणे जिद्दी (हट्टी) झाले पाहिजे. याला म्हणतात हठयोग! नेति धौति यासारख्या क्रिया म्हणजे हठयोग नव्हे. 'ह' आणि 'ठ' या दोन अक्षरांत सूर्य आणि चंद्र किंवा पिंगला आणि इडा नाडयांचे समीकरण म्हणजे आमच्या परवर्ती पूर्वजांची देणगी आहे.

तंत्र ग्रंथामध्ये शरीर शुध्दीसाठी वरील षट्कर्माव्यतिरिक्त अनेक आसने, मुद्रा आणि प्राणायामविषयक चर्चा केली आहे. मूलबंधात श्वासाद्वारे गुदाचे संकोचन केले जाते. उड्डीयनबंधामध्ये पोटाला पाठीशी जोडण्याची क्रिया असते. जालंदर बंधमध्ये हनुवटी छातीला लावून पोटाचे संकोचन करावयाचे असते. यामध्ये जीभ उचलून वर टाळयाच्या शेवटच्या भागाला लावायची असते. यामध्ये घर्षण, छेदन, चालन व दोहनद्वारे लंबिका योग म्हणजे जिभेला लांब केले जाते. जननेंद्रियाचा पुनःपुन्हा संकोच करणे या क्रियेला अश्विनी मुद्रा म्हणतात. नितम्ब जमिनीवर पुनःपुन्हा आपटण्याच्या क्रियेस शक्तिचालिनी मुद्रा म्हणतात. तर नाकाच्या अग्रावर दृष्टी स्थिर करण्याला शांभवी मुद्रा म्हणतात. जननेन्द्रियद्वारा पाणी वगैरे वर खेचणे या क्रियेस बजोली मुद्रा म्हणतात. दोन अंगठयांनी दोन कान, तर्जनींनी दोन्ही डोळे, मध्यमाने नासिका छिद्र, अनामिका आणि कनिष्ठकांनी ओठ अधर बंद करण्यास योनी मुद्रा किंवा षण्मुखी मुद्रा म्हणतात. परक, कुंभक आणि रेचकमध्ये विभाजित प्राणायाम, प्रवणसह सगर्भ प्रणवरहित निगर्भ, सूर्यभेदी, उज्जाई, शीतली, भस्त्रिका, भ्रामरी, मूर्धा आणि केवली (प्लाविनी) असे आठ प्रकार होतात. एखाद्या घडयात भरावे त्याप्रमाणे पोटात वायू भरण्याच्या क्रियेला तडागी मुद्रा म्हणतात. भिन्न-भिन्न रोगांमध्ये या क्रियांमुळे अपेक्षित लाभही होत होता. परंतु हा

उपचार फार क्लिष्ट होता. यात धोक्याची शक्यता जास्त होती. चांगल्या प्रकारच्या जाणकारांकडूनही थोडी चूक झाली तरी ते आपले प्राण गमवून बसत होते. यामुळे आसनांचा प्रयोग सुरू झाला. चौऱ्याऐंशी लाख जींवाचे अनुकरण करून जी आसने शोधून काढली त्यात चौऱ्याऐंशी आसने मुख्य आहेत. उदा. सिध्दासन, पद्मासन, शीर्षासन, मयूरासन, सर्वांगासन इत्यादी. यापैकी काही आसने केलीत तरी घाम येईल, रक्ताभिसरण स्वाभाविकपणे होऊ लागेल. मांसपेशीवर दाब पडू लागेल व तुम्ही निरोगी राहाल. याप्रकारे आसनाच्या रूपात प्रचलित झालेला हा व्यायाम ना योगाचा सहयोगी आहे ना योग आहे. काही लोक योगाच्या नावावर केवळ आसने, नेति, धौति सारख्या शारिरीक क्रिया करतात. हा योग नव्हे. योग हा संसाराच्या संयोग-वियोगापासून रहित असतो. आत्यंतिक सुख, काळाच्या पलीकडे असणाऱ्या आत्मतत्त्वाशी एकरूप होणे म्हणजे योग होय. बाकी शारिरीक क्रियांमुळे विकारांचे निवारण होऊ शकते. बाकी त्याला योग कदापि म्हणता येणार नाही. संपूर्ण योग प्रक्रिया समजून घेण्यासाठी श्रीमद्‌भगवद्‌गीता या ग्रंथावरील आमच्या 'यथार्थ गीता' या भाष्याचे अध्ययन करावे.

पूज्य गुरू महाराज साधनावस्थेत जेव्हा निराधारपणे विचरण करीत होते तेव्हा एकदा प्रयागला गेले होते. प्रयाग येथील संगमावर काही हठयोगी राहात होते. गुरू महाराज भल्या पहाटेपासून चिंतनात बसलेले पाहून एका नवयुवक साधकाने त्यांना विचारले की तुम्ही रात्री दोन वाजल्यापासूनच ध्यानात बसलेले आहात. अहो, आत इतका मळ भरलेला असताना ध्यान कसे होईल? ध्यान करण्यापूर्वी नैति, धौति इत्यादी आवश्यक क्रिया न करताच ध्यानाला बसलात. त्यावर महाराज हसले आणि म्हणाले, मळ असतो तो मनात असतो. या शरीराच्या आतील आतडी साफ करण्याने काय होणार आहे? जन्म-जन्मांतराचे दूषित संस्कारच मळस्वरूप असतात. मनातील दूषित मळ साफ करण्याच्या क्रियेला योग संस्कार असे म्हणतात आणि अनुभवी महापुरूषांच्या द्वारेच जन्म जन्मांतरीच्या मनातील मळ साफ होऊन तो नष्ट होऊन मनाचे ध्यान ईश्वराचे ठिकाणी लागते. या मानसिक चिंतनाचा शरीराशी काही संबंध नाही. गीता हे योगशास्त्र आहे; परंतु त्याचे एकही सूत्र नेति, धौति किंवा बस्तीशी, संबंधित नाही. रामचरित मानसदेखील त्याच ध्यान प्रक्रियेने योग करीत असतो; परंतु त्यामध्येदेखील या क्रियांना योगक्रियेत स्थान नाही. पंतजली आणि कबीरांनीही या क्रियांना योगक्रियेत स्थान दिलेले नाही. नेति, धौति इत्यादी शारीरिक उपचार आहेत त्यामुळे शारीरिक विकारांचे-व्यांधींचे शमन होते. परंतु त्यामुळे योगाची पराकाष्ठा असणारा जो परम प्रभू आम्ही प्राप्त करू शकत नाही. योगाची प्रक्रिया एकच आहे. गीतेमध्ये श्रीकृष्ण म्हणतात -

**'व्यवसायात्मिका बुध्दिरेकेह कुरुनन्दन ।**
**बहुशाखा ह्यनन्ताश्च बुध्दयोऽव्यवसायिनाम् ।। (२/४१)'**

अर्जुना या कल्याण मार्गावर निश्चयात्मक बुध्दी एकच आहे. अविवेकी लोकांची बुध्दी अनंत गोष्टींकडे विखुरली जात असते त्यामुळे ते अनंत क्रियाकर्म करत राहतात. या नियत विधीला गीतेमध्ये यज्ञचक्र असे म्हटले आहे. काही सूत्रकारांनी याला अनेक म्हणजे विविध प्रकारची नावे दिली. साधनेच्या वेगवेगळया क्रियांवर भर देण्याने परिणाम असा झाला की, ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग, राजयोग, हठयोग, मंत्रयोग, लययोग, सुरती शब्दयोग, कुंडलिनी योग, चक्रभेदन योग इत्यादी अनेक प्रकार निर्माण झाले व आपलाच मार्ग खरा या हठाग्रहामुळे काहीजण एकमेकांना विरोधीही समजू लागले. ज्ञानयोगींनी बुध्दीवर, कर्मयोगी लोकांनी सेवेवर, भक्तियोगाचा मार्ग स्वीकारणाऱ्यांनी समर्पणावर, राजयोगाचा मार्ग स्वीकारणाऱ्यांनी ध्यानावर, हठयोगीनी शारीरिक शुध्दीवर, तंत्रयोगींनी मंत्रावर, लययोगींनी मनाच्या संस्काराच्या विलयावर आणि परमात्म्यांच्या ठिकाणी मन स्थिर करून तत्त्वस्वरूप होण्यावर भर दिला आहे. संत कबीरांचा 'सुरति-शब्द योग' अशाच प्रकारचा आहे आणि गुरू गोरखनाथांचा कुंडलिनी योगही अशाच प्रकारचा आहे. योग या शब्दाचा अंतर्भाव सर्वांच्यात आहे.

महापुरूषांच्या पश्चात अनेक विकृत गोष्टींचे सृजन होऊ लागते आणि त्या गोष्टी मग त्या महापुरूषांच्या नावावर खपवल्या जातात. याच कारणामुळे मध्ययुगात साधनेच्या नावावर अनेक रहस्यमयी परिभाषा, निरर्थक मंत्र आणि गुह्य साधना समाजात रूढ झाल्यावर त्यामध्ये पंचमकार म्हणजे मत्स्य, मांस, मदिरा, मुद्रा, मैथुनाचे अश्लील तसेच व्यभिचारपदक अर्थ केले गेले व याची पुनप्रतिष्ठा संत गोरखनाथ सारख्या महान योग्याने केली आहे.

योगसाधनेबरोबर मत-मतांतराचे सृजन होण्याचे दुसरे कारण असे झाले की मध्ययुगाात संस्कृत भाषा सर्व सामान्यांसाठी वर्जित केली होती. या भाषेचे अध्ययन-अध्यापनाचा विशेष अधिकार एका विशिष्ट वर्गाकडे गेला. याच कारणामुळे सामाजिक कुलीनता नसलेले अनेक श्रेष्ठ बुध्दीचे लोक या ज्ञानराशीपासून वंचित राहिले. पण ज्ञानी लोकांचे जे पूर्वीचे अनुयायी होते त्यांनी प्रादेशिक भाषेत अध्यात्मावरच्या अनेक ग्रंथाची रचना करून अन्य संप्रदायापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत हे दाखवू लागले. वास्तविकतेचे ज्ञान नसल्यामुळे त्यांनी शरीरातील चक्रांची संकल्पना हास्यापद बनवली.

साधरणतः शरीरात सात चक्रे असतात असे आजपर्यंत लोक ऐकत आले आहेत. सौभाग्य लक्ष्मी उपनिषदात नऊ चक्रे सांगितली आहेत. परंतु संत कबीरांच्या शिष्यांनी यापुढे जाऊन आणखी अधिक चक्रे सांगून कबीरांना सर्वात श्रेष्ठ ठरवण्याचा (शिखरावर बसवण्याचा) प्रयत्न केला आहे. संत पूर्णसिंह म्हणतात की गोरखनाथांनी चौदा चक्रे सांगितली आहेत पण गुरू नानकांनी यापेक्षाही अधिक चक्रे सांगितली असून ते महामहिमावती विहंगमपूरमध्ये निवास करतात असे सांगतात. सारांश चक्रांबाबत अशी अनेक मतमतांतरे आहेत.

वास्तविक शरीरातील ही चक्रे रूपकात्मक आहेत. महापुरूषांनी या चक्रांच्या दृष्टांताचे माध्यम बनवून अध्यात्माच्या क्षेत्रातील अमूर्त रहस्यांना समजवण्याचा प्रयत्न केला आहे. शरीर आणि ब्रह्मांडामध्ये एकरूपता दाखवण्याचा प्रयत्न या चक्राच्या मुळाशी आहे. ज्या प्रकारे पृथ्वीच्या खाली अतल, वितल, सुतल, महातल, रसातल, तलातल आणि पाताळ असे सात लोक (खंड) असल्याची कल्पना आहे, त्याच प्रकारे पृथ्वीच्या वर भुवः, स्वः, महः, जन, जप, तप, आणि सत्यलोक आहे असे समजले जाते. त्याच प्रकारे शरीरात मेरुदंडाच्या खाली मूलाधार चक्र भू-लोक आहे व त्याच्या खाली पदतल, एडी, गिट्ट, पिण्डली, जानू, जंघा आणि तडाघी अशी सात स्थाने आहेत; तर पृथ्वीच्या वरच्या लोकांच्या समकक्ष शरीरात मूलाधाराच्या वर स्वाधिष्ठान, मणिपूरक, अनाहत, विशुध्द, आज्ञा आणि सहस्त्रार नावाची सात चक्रे किंवा सात स्थाने आहेत. एका महापुरूषाने यांना चक्रव्यूहाचे सात दरवाजे असे म्हटले आहे तर महापुरूषाने यांना भक्तीच्या सात पायऱ्या किंवा भक्तीर्गाकडे नेणारा सात पायऱ्यांचा हा सोपान आहे असे संबोधले आहे. **'एहि महँ रूचिर सात सोपाना । रघुपति भगति केर पंथाना ।।'** (रामचरितमानस)

नैगमिक परंपरेतील अनेक उपनिषदांत उदा. कृष्णयजुर्वेदीय अक्ष्युपनिषद्च्या द्वितीय खंडात यांनाच योगाच्या सात भूमिका (असंवेदन, विचार, असंसर्गा, स्वप्न, सुषप्ति, तुर्या आणि विदेहमुक्ति)असे संबोधले गेले आहे. तर सामवेदीय महोपनिषदाच्या पाचव्या अध्यायात ज्ञानाची आठ साधने सांगितली आहेत. विवेक, वैराग्य, षड्संपत्ती, (शम, दम, श्रध्दा, समाधान, उपरामता आणि तितिक्षा) मुमुक्षा, श्रवण, मनन, निदिध्यासन व साक्षात्कार. ज्ञानाच्या सात भूमिका-शुभेच्छा, सुविचारणा, तनुमानसी, सत्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभावना आणि तुर्यगा या टप्प्याने पुढे गेल्यावर ज्ञान परिपक्व होते आणि त्याचे फळ प्राप्त होते. यालाच योगाचा सोपान किंवा योगसोपानाच्या सात पायऱ्या म्हणतात व त्याच अधिक प्रसिध्द आहेत.

पहिली भूमिका म्हणजे पायरी आहे शुभेच्छा म्हणजे शुभाच्या प्रती इच्छा ! ज्यामध्ये अशुभाला मज्जाव असतो, जी भावना निर्दोष आहे, नित्य आणि परमसत्य आहे, ते प्राप्त करण्याची इच्छा. परमश्रेय शाश्वताची इच्छा शुभेच्छा योगाची पायरी आहे. योगाचा शुभारंभ आहे. अर्थात केवळ ईश्वरप्राप्तीची शुभ इच्छा करून परमात्म्याची प्राप्ती होत नाही. त्याला मग शोधायचे कोठे? त्यासाठी मनात चांगले विचार येणे, मनात मंथन होणे, व्याकूळता येणे, वैराग्य निर्माण होणे याबरोबर सदाचरणाची प्रवृत्तीही जागृत होणे आवश्यक आहे. यानंतर इंद्रियांची विषयासक्ती कमी होऊ लागते, परमात्म्याच्या प्रती श्रध्दा दृढ होते तेव्हा तनुमानसा या तिसऱ्या अवस्थेचा उदय होतो. (ती अवस्था जागृत होते.) आजपर्यंत साधक शरीराच्या क्रियांनाच आपले समजत होता. आता ते मनही त्याला आपले वाटू लागले. मन जेवढे विकृत तेवढया

त्याच्या चुका अधिक होतात आणि ते जेवढे संयत असते तेवढे स्वस्वरूपाची लवकर वृध्दी होते म्हणजे ईश्वराची ओळख होते व मन अंतर्मुखी बनू लागते. एकांत देशात राहणे व मानसिक चिंतन करणे ही योगाची चौथी भूमिका म्हणजे सत्वापत्ती येते. या टप्प्यावर जे सत्य आहे, नित्य आहे, सनातन आहे, त्याची जागृती होते. येथे आत्मा जागृत होतो, तेव्हा चित्त शुध्द स्वरूपात स्थिर होऊ लागते. साधना आणखी उन्नत होते. तेव्हा पाचवी अवस्था म्हणजे असंसक्ती म्हणजेच संसर्गहीनता स्वभावात येऊ लागते. जीवनातील चांगल्या वाईट अशा कोणत्याही परिस्थितीत असंपृक्त म्हणजे अलिप्त राहण्याची क्षमता येते. कोणतीही परिस्थिती आली तरी अलिप्त (तटस्थ) राहण्याची, पुढे जाण्याची क्षमता म्हणजे असंसक्ती आहे. साधना आणखी उन्नत झाल्यावर सहावी पायरी म्हणजे पदार्थभावनी अर्थात भोग-सामग्री ! सांसारिक मनुष्य उठल्यापासून झोपेपर्यंत पदार्थच शोधत असतो. आपल्यासाठी आवश्यक त्या भोग्य वस्तूंचा तो संग्रह करीत असतो. परंतु आता ज्या स्तरावर साधक पोहचला आहे त्या स्थितीमध्ये त्याला कोणत्याही पदार्थांची अभिलाषा नसते. **'सीयराममय सब जग जानी । करउँ प्रणाम जोरि जुग पानी ।।'** एक अशी अवस्था येते की जेथे ईश्वराचा संचार दिसायला लागतो. जेव्हा विषयवस्तूच राहात नाही तेव्हा मन जोईल कोठे?

**'सरग नरक अपवर्ग समाना । जहँ तहँ देख धरे धनु बाना ।।'** या अवस्थेतील योग्याची अशी अवस्था होते की ज्याची त्याने इच्छा धरावी तो स्वर्ग त्याच्यासाठी स्वर्ग राहात नाही. ज्याला त्याने घाबरावे तो नरक त्याच्यासाठी नरक राहात नाही. उलट-'जहँ नहँ धरे धनु बाना' त्याला सर्वत्र आराध्य देवाचा संचार झालेलाच दिसतो.

साधना आणखी सूक्ष्म झाल्यावर योगाची सातवी भूमिका तुर्यगा येते. मन हे अत्यंत चपळ, गतिमान व वेगवान असल्याने महापुरूषांनी मनाला घोडयाची उपमा दिलेली आहे. या अवस्थेतील योगी मनरूपी तुरंगावर (घोडयावर) स्वार होतो; पण तो मनाचा गुलाम होत नाही तर तो संचालक बनतो. तो मनाला कोठेही (चिंतनात,श्वासात, रूपात, ब्रह्मविद्येत) रोखू शकतो. ही मनाची जवळजवळ निरोधवस्था असते, पण मन अजून जिवंत आहे. पण ते इतके शांत, स्थिर, स्तब्ध बनते की संकल्प-विकल्पाची मनाची क्रियाच बंद होते. **'मन मिटा माया मिटी, हंसा बेपरवाह । जाका कछु न चाहिए सोई शहंशाह ।।'** आणि मनाची क्रिया बंद होताच माया नष्ट होते. कारण संकल्पाचेच दुसरे नाव मन आहे. आता (हंस) हा संत अवस्थेतील योगी बेदरकार बनतो. मानसामध्ये हंसाचे लक्षण सांगताना म्हटले आहे- **'जड-चतन गुण दोष मय, विश्व कीन्ह करतार । सन्त हंस गुन गहहि पय, परिहारि वारी विकार ।।'** विधात्याने गुण-दोष एकत्र करून या जगाची रचना केली आहे, पण जे संत असतात ते हंसाप्रमाणे गुणरूपी दूध सेवन करतात, विकाररूपी पाणी ते प्राशन करीत नाहीत. त्यांचा त्याग करतात.

अशा स्थितीच्या लोकांना म्हणूनच हंस म्हणतात. वाघाला गवत खायला घातले तर तो काय जगणार आहे का? माशांना पाण्याबाहेर काढले तर ते काय जिवंत राहणार आहेत का? याच प्रकारे ईश्वरीय गुणांचे सेवन करणे हा हंसाचा आहार आहे. जर दुर्गुण खायला लागला तर हंस हा हंस राहणार नाही. तो तर मग कावळा झाला. या प्रकारे ईश्वरीय गुणांचे ग्रहण करता करता मनाचा निरोध आणि निरूध्द मन ज्या क्षणी लयास जाते त्या क्षणी त्या परम चेतनाचे प्रतिबिंब प्राप्त होते. हाच तुर्यातीत, विदेह व जीवनमुक्त पुरूष आहे. ज्याला प्राप्त केले, ज्या तत्त्वाला शोधायचे होते ते आता विदित झाले. त्यानंतर तो योगी निश्चिंत होतो. **'जाका कछू न चाहिए ॥'** जर पुढे काही असते तर इच्छा नक्कीच झाली असती; पण इच्छा करण्यासाठी काही उरलेच नाही तेव्हा तो **'सोई शहंशाह'** तो बादशहांचाही बादशाह बनतो. अगदी आत्मतृप्त होतो.

इतर ग्रंथात योगातील या सात पायऱ्यांना शरीरस्थ असणारी सात चक्रे असे संबोधले गेले. उदा. शुभेच्छा योगाचा मुलाधार आहे. सुविचारास स्वाधिष्ठान चक्र असे म्हटले आहे. तनुमानसा मणिपूरक चक्र आहे. सत्वापत्ति-अनाहत, असंसक्ती-विशुध्द, पदार्थभावना-आज्ञा आणि तुर्यगा सहस्त्रार चक्र आहे. स्वामी ब्रह्मानंदजी हे एक चांगले भजनानन्दी होऊन गेले. आपल्या एका पदात त्यांनी कुण्डलिनी योगाचा थोडक्यात परिचय दिला आहे.

**निरंजन पद को साधु कोई पाता है ॥**
**मूलद्वार से खींच पवन को उलटा पथ चलाता है ।**
**नाभी पंकज दल मे सोयी, नागिन जाइ जगाता है ।**
**मेरूदण्ड की सीढी बनाकर, शून्य शिखर चढ जाता है ।**
**भँवर गुफा मे जाय विराजै, सुरता सेज बिछाता है ।**
**शशि मण्डल से अमृत टपके, पीकर प्यास बुझाता है ।**
**सब कर्मो की धूनि जलाकर, तन मे भस्म रमाता है ।**
**ब्रह्मानन्द स्वरूप मगन हो, आप ही आप लखाता है ।**
**निरंजन पद को साधु कोई पाता है ॥......**

ब्रह्मानंदजींनी परमपदाला निष्कलंक निरंजन पदाची उपमा दिली आहे. **' गुरू पद रज मृदु मंजुल अंजन-'** गुरू महाराजांचे चरण-रज, कोमल व सुंदर अंजनाप्रमाणे आहे. त्यामुळे हृदयाचे विवेकरूपी नेत्र जागृत होतात. या अंजनाचा प्रभाव सांगताना ते म्हणतात **'-सुकृत शंभु तन विमल विभूति । मंजुल मंगल मोद प्रसूती ।'** पुण्यात्मा शिवशंकराच्या शरीरात जे निर्मल-पवित्र ऐश्वर्य प्राप्त होते ते गुरू महाराजांच्या चरण रजाचाच प्रभाव आहे. एक शिव पापपुण्याच्या पलीकडे आहते. तर दुसरे पुण्यात्मा शंकरजी ! हे दोन कसे काय? वास्तविक **'कः पूजनीय? शिवतत्त्वनिष्ठ।'** या सृष्टीमध्ये पूजनीय कोण आहे? जो शिवतत्त्वात स्थित

आहे तो महापुरूष आहे. ज्योतिर्मय परमात्म्याच्या स्थितीचे नाव शिव असे आहे. ते प्राप्त करण्याचा अधिकारीही कोणी पुण्यात्माच असतो. आजचा पुण्यात्मा उद्याचा स्थितीवाला होतो. निरंजनपद त्या परमपदाची प्राप्ती आहे ज्यासाठी गुरू महाराजांच्या चरण-रजाचा आश्रय घेतला होता. आता तर त्याचीही आवश्यकता नसते. अंजनाचा परिणाम दिसून येऊ लागतो, तत्त्व विदित होते. कैवल्य स्थिती प्राप्त होते. त्या निर्दोष, निर्लेप, अविनाशी, परमपदास, त्या निरंजनपदास कोणी एखादाच संत प्राप्त करतो.

ते पद प्राप्त करण्याचा विधी काय आहे? **'मूलद्वार से खींच पवन को, उलटा पंथ चलाता है।'** मूलद्वारामध्ये चार पाकळयांचे कमळ अधोमुख आहे. साधनेद्वारा त्याला ऊर्ध्वमुखी करता येते. अंतःकरण चतुष्टय (मन, बुध्दी, चित्त आणि अहंकार) हेच चतुर्दल आहे. ते अधोमुख आहे. प्रकृतीकडे आवागमनाकडे आहे. त्याला बांधून टाका. तिकडे जाण्यापासून रोखा. हेच मूलबंध आहे. जर आम्ही त्याला बांधू शकलो नाही तर ईश्वराचे भजन-चिंतन होणार नाही. कारण ज्यांना भजन करावयाचे आहे, ते अधोमुखी चिंतन करत आहेत. म्हणजे मन प्रकृतीचे चिंतन करीत आहे. चित्त प्रकृतीचे चिंतन करीत आहे. बुध्दी प्रकृतीचाच निर्णय घेत आहे आणि यातून कदाचित सफलता मिळाली तर अहंकारपण प्रकृतीचाच ! त्याचाच तर त्याग करावयाचा आहे. त्यासाठी मन, बुध्दी, चित्त आणि अहंकार जे अधोमुखी प्रवृत्तींकडे उन्मुख आहेत त्यांना तेथून बंद करा ऊर्ध्वमुखी करा, इष्टोन्मुखी करा. संकल्प करणाऱ्या प्रशक्तीचे नाव मन आहे. संकल्पाचे सतत चिंतन करणारी शक्ती म्हणजे चित्त आहे. चिंतन करता करता एखाद्या निश्चयाप्रत पोहचले तर निश्चय करणारी शक्ती बुध्दी आणि निश्चय कर्मामध्ये परिणित झाला तर आम्ही केले-हा अहंकार ! हेच चार दलाचे कमळ आहे. ते प्रकृतीकडे उन्मुख आहे. तेव्हा प्रथम त्याला बांधा. म्हणजे मन संकंल्प करेल तर हरीचे करेल, चिंतन करेल तर इष्टाचे करेल, निश्चय करेल तरी त्याचेच आणि अहंकारपण असेल तर त्या प्रभूचाच करेल **'असं अभिमान जाई जनि भोरे। मै सेवक रघुपति मोरे।'** हेच आहे मूलबंध ! एवढे होताच भजनाची सुरूवात होते. याचे नाव आहे मूलद्वार ! हे योगसाधनेचे प्रथम द्वार आहे. आत्मदर्शन ही पहिली खिडकी आहे. अंतःकरण चतुष्टमध्ये विषयरूपी वारा वहात असतो. त्याला खेचून काढा आणि उलट रस्त्याने त्याला चालवा. विषयांकडून त्याला खेचून इष्टाकडे त्याला वळवा. जेव्हा अभ्यास उन्नत होतो. तेव्हा **'नाभि पंकज दल मे सोशी, नागिन जाय जगाता है।'**

केंद्राला नाभी असे म्हटले जाते. जेथे चांगल्या वाईट अशा सर्व संस्कारांचे केंद्रिकरण होते त्या नाभीकमळाच्या त्रिकोणामध्ये कुंडली मारून नागीण पसरली आहे. वास्तविक नागीण ही चित्तवृत्ती आहे. ती सत, रज आणि तम या तिन्ही गुणांच्या अंतरंगात कुंडलीला पकडून बसली आहे. विषयोन्मुख असणारी चित्तवृत्ती विषयरूपी विष उगाळत असते. ती जीवाला खूप

यातना देत राहते. नाभीमध्ये षड्दल कमळ अधोमुखी षड्विकारांचे-काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सराचे प्रतीक आहे. ते ऊर्ध्वमुखी होताच ती षड्संपत्ती विवेक, वैराग्य, शम, दम, त्याग, तितिक्षा इत्यादीमध्ये परिणीत होते. खारोखरीचे कमळ फुलत नाही हे नीट लक्षात ठेवा. चित्ताला षड्विकारांपासून दूर करून षडैश्वर्याकडे प्रवाहित करणे म्हणजे नागिणीस जागृत करण्यासारखे आहे.

**'या निशा सर्वभूतांना तस्यां जागर्ति संयमी ।'** गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात की हे अर्जुना, जगतरूपी रात्रीमध्ये सर्व प्राणी निश्चेष्ट होऊन पडले आहेत. रात्रंदिवस जो धावपळ करत असतो, केवळ स्वप्नेच बघत बसतो, अशा लोकांत फक्त संयमी पुरूष जागा होतो. जेव्हा विवेक वैराग्य, शम, दम, त्याग व तितिक्षाचा संचार होतो तेव्हाच संयम निर्माण होतो. हीच गोष्ट गोस्वामी तुलसीदासजीही म्हणतात-**'मोहनिशा सब सोवनिहारा । देखहिं सपन अनेक प्रकारा ।'** मोहरूपी रात्रीच्या वेळी सर्व लोक निश्चेष्ट पडले आहेत. जे रात्रंदिवस धावत आहेत ते फक्त स्वप्नवत आहे. कारण लोकांनी धावपळ करून जरी स्वर्गाचे ऐश्वर्य एकत्र मिळवले तरी जेव्हा आयुष्याचे दिवस संपतात तेव्हा सर्व येथेच ठेवून जावे लागते **'सोइ पुर पाटन बहुरि न देखा आई'** पुन्हा परत येऊन काहीही (ते ऐश्वर्यही) पाहता येत नाही. मग रात्री जागते कोण? **'एसि जग जामिनी जागही योगी । परमारथी प्रपंच वियोगी ।।'** परमार्थी म्हणजे परम धन परमात्म्यासाठी व्याकूळ असणारे, प्रपंचापासून विरक्त झालेले योगीजन या जगतरूपी रात्रीच्या वेळी जागत असतात. जोपर्यंत साधक मोहरूपी रात्रीत झोपलेला असतो तोपर्यत नागीन त्याला दंश करीत असते, मनुष्याला भवसागराच्या येरझारा घालायला लावत असते. तरी त्याचे विष उतरत नाही, जीव वेदनेने कण्हत राहतो. तो मरतही नाही कारण त्याच्यात ईश्वराचा अंश असल्याने त्याचा सर्वथा नाश होत नाही. तो बेचैन राहतो. **'जानिय तबहिं जीव जग जागा । सब सब विषय विलास विरागा ।'** तेव्हा साधक सर्व विषयांपासून विरक्त होतो. त्याला विषयांबाबत वैराग्य निर्माण होते तेव्हा जागृत झाला असे समजावे. याप्रकारे सर्व महापुरूष एकाच प्रकारची गोष्ट सांगत असतात.

जेव्हा साधना जागृत होते तेव्हा चिंतनाचा चढ उतार श्वासावर निर्धारित होऊ लागतो. प्रत्येक महापुरूषाने यावर भर दिलेला आहे. **'श्वास-प्रश्वास पर राम कहू, वृथा श्वास मत खेय । ना जाने यदि श्वास का, आवन होय न होय ।'** भगवान बुध्द म्हणतात-श्वसन क्रियेवर, प्राण-अपानवर लक्ष द्या-ध्यान केंद्रित करा. वेगवेगळया महापुरूषांनी वेगवेगळया शब्दांचा उपयोग केलेला असला तरी त्यांच्या सांगण्याचा मतितार्थ एकच आहे. त्यांची समजावून सांगण्याची पध्दत वेगळी असली तरी विषयवस्तू एकच असते. तसे पाहू जाता संपूर्ण शरीर श्वासामुळेच ऊर्जास्वित झालेले आहे. परंतु त्याच्या माध्यमातून मनाला अंतर्मुख व एकाग्र

करण्यासाठी नाकापासून मेरुदंडाच्या मदतीने नाभीपर्यंत श्वासाच्या गमनागमनाच्या निरीक्षणाचा निर्देश महापुरूषांनी दिलेला आहे. मनाला निरीक्षक बनवून उभे करा व निरीक्षण करीत राहा की श्वास कधी आत गेला कधी बाहेर गेला? बाहेर किती वेळ तो राहिला? पुन्हा आत कधी गेला? आमच्या सूचनेशिवाय एकही श्वास आत जाता कामा नये. या श्वासावर तुमची नजर स्थिर करा आणि जेव्हा पाहण्याची क्षमता येते तेव्हा हळूहळू चिंतनाचे नाव त्यात जोडा. म्हणजे श्वास आत आला तरी ओम् आणि बाहेर गेला तरी ओम् ! ओम्-ओम् किंवा राम-राम असे जे नाव तुम्हाला जपण्यास अनुकूल वाटेल व जे नाव ईश्वराचा परिचय करून देणारे आहे असे कोणतेही नाव या श्वासप्रक्रियेत जोडून टाका. मग नागीण जागी होऊन श्वासाच्या चिंतनात प्रवाहित होऊन जाते. तिलाच मेरूदंडाची शिडी म्हणतात. काही काही उपनिषदांत मेरूदंडाला वीणादंड असेही संबोधले आहे. श्वास-प्रश्वासाचे द्वारे मेरूदंडाला शिडी बनवून योगी त्या शून्य शिखरावर आरूढ होता चांगले-वाईट सर्व संकल्प शांत होतात, केवळ लक्ष्य मात्र राहते. अन्य काहीही लक्षात राहात नाही. ज्याच्या प्राप्तीची इच्छा आहे, त्याला जागृतपणे पाहात राहावे. श्रध्दापूर्वक व प्रेमपूर्वक हृदयाने त्या ईश्वराच्या नावावर दृष्टी ठेवावी. श्वासात ईश्वरनाम अविरत सुरू ठेवावे. पुज्य महाराजांच्या शब्दात सांगावयाचे झाले तर श्वास बांबूसारखा ताठ उभा राहावा म्हणजे ओम्-ओम्-अशी धून श्वासात प्रावहित व्हावी. हृदयात कोणताही संकल्प-विचार निर्माण होता कामा नये किंवा बाहेरच्या वातावरणातील संकल्प-विचार हृदयात शिरता कामा नये. जेथे मन व दृष्टी स्थिर कराल तेथेच ती टिकून राहिली पाहिजे. यालाच चिंतन म्हणतात, यालाच शून्य शिखरावर पोहोचणे असे म्हणतात. हेच साधनेचे अत्युच्च शिखर होय. असा योगी **'भ्रमर गुफा मे जाय विराजे सुरता सेज बिछाता है ।'** अशा पुरूषांनी परमात्म्याला पुष्पाची व मनाला भ्रमराची उपमा दिली आहे. संत कबीरांचे एक भजन महाराजांना खुप आवडायचे. त्याचा आशय होता की **'फुलवा के छुवन भँबर मरि जाई । का कही, केसे कही को पतियायी?'** परमात्मा एक फुल आहे. हा मनरूपी भ्रमर त्या पुष्पाच्या प्राप्तीसाठी विकल होतो. जो ईश्वराच्या प्राप्तीसाठी विव्हल होतो तो शुन्य शिखरावर पोहचला. शून्याच्या गुहेत तो आता शांत बसू शकतो, राहू शकतो परंतु चंचल मन स्थिर राहणार नाही. स्मरण हे मनाच्या दृष्टीचे नाव आहे. समजा आपण येथे बसला आहात, नाना रंगाचा वर्षाव होत आहे. सर्वत्र सुगंधी वातावरण पसरलेले आहे. तुम्ही या वातावरणात अगदी गुंग आहात. अशा वेळी तुमच्या कानात कोणी सांगितले की, तुमचा मुलगा तुमच्या घराच्या छपरावरून खाली पडला व तो बेशुध्द झाला असून त्याला हॉस्पिटलमध्ये नेले आहे. अशा वेळी आताचे सर्व दृश्य तुमच्या नजरेसमोरून नष्ट होईल तुमचे डोळे, कान उघडे असूनही तुम्हाला समोरचे काहीही दिसणार नाही. कानावर सर्व पडत असून काही ऐकू येणार नाही. एक मिनिटापूर्वीच त्या वातावरणाने तुम्ही इतके गुंग झाला होतात की तुम्ही स्वतःलाही विसरला होतात. आता तुम्हाला

मुलाचा एक एक अवयव दिसू लागेल. त्याचे दात, डोळे, त्याचे नाक आठवू लागेल. त्याच्या शरीराच्या कणाकणाची आठवण तुम्हाला त्रस्त करीत राहील, वस्तू समोर नाही पण वस्तूचे जे दृष्य तुम्ही मनापुढे आणता ती स्थिर दृष्टी म्हणजे ईश्वराचे स्मरण आहे. या अवस्थेलाच भजन असे म्हणतात. असे स्थिर-शांत झालेले मन श्वासाच्या ठिकाणी केंद्रित करणे म्हणजे भजन होय. या अवस्थेत योगी दृष्टी श्वासावर केंद्रित करून शयन करीत असतात.

**'शशि मण्डल से अमृत टपके पीकर प्यास बुझाता है।'** जेव्हा दृष्टी शून्यशिखरावर स्थिर होते तेव्हा **'मन शशि चित्त महान !-'** ईश्वरीय तेज खाली उतरून येते. मृत्यूच्या पलीकडे असणाऱ्या अविनाशी, अमृततत्त्व परमात्म्याच्या प्राप्तीचा संकेत मिळू लागतो व जेव्हा तो प्राप्त होतो तेव्हा त्या जीवात्म्याची तहान कायमची संपून जाते. इतर कोणत्याही धनदौलतीने, ऐश्वर्याने, समृध्दीने अशी तहान कधी भागत नाही. साधक ज्याचा विशुध्द अंश आहे, ज्याचे संतान आहे, त्याचा जो मूळ उदगम् आहे, अशा त्या भगवंताला तो प्राप्त करतो तेव्हाच त्याची तहान भागते. ज्याला प्राप्त करावयाचे होते त्याला प्राप्त केले. मग आता भजन (चिंतन) करून कोणाला शोधायचे? कर्मदेखील कोणासाठी करावयाचे? तेव्हा **'सब कर्मोकी धुनि जलाक र, तन मे भस्म रमाता है।'** ईश्वरप्राप्तीसाठी जे भजन-साधन, कर्म अनिवार्य होते, त्या कर्मांची ईश्वरप्राप्तीनंतर धुनी जळून गेली. त्याच्या जळण्याने काहीही नुकसान होत नाही. कारण त्याचेद्वारे जी विभूती आहे, ऐश्वर्य आहे ते शरीरात येते.

भगवान श्रीकृष्ण गीतेत (अध्याय ४/१६-१९) म्हणतात-अर्जुना, कर्म, अकर्म आणि विकर्म हे काय आहे? मोठेमोठे विवेकी लोकपण या प्रश्नांनी भ्रमित होतात. परंतु हे कर्म केल्याशिवाय ना परमतत्त्व कोणी प्राप्त करू शकत किंवा कोणी करू शकणारही नाही. पौर्वात्य देशात जेवढया महापुरूषांनी नैष्कर्म्य स्थिती प्राप्त करून घेतली त्या सर्वांनी हेच कर्म करत ती स्थिती प्राप्त करून घेतली. परंतु **'यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्प वर्जिताः'** संपूर्णतेतून आरंभ केलेले कर्म इतके सूक्ष्म झाले की कामना आणि संकल्पाच्या तो वर पोहचला तेव्हा **'ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं'** ज्ञानाग्नीमध्ये त्याची सर्व कर्मे कायमची जळून जातात. **'तमाहुः पण्डित बुधाः'**अशी स्थिती प्राप्त झालेल्या योग्यांनाच बोधस्वरूप महापुरूषांनी पंडित असे संबोधले आहे.

गीतेमध्ये (५/१९) श्रीकृष्ण म्हणतात- **'इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः। निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद् ते स्थिताः॥'** अर्जुना, त्या पुरूषांनी जिवंतपणीच सर्व जग जिंकले कारण त्यांचे मन समत्त्वात स्थित झाले, दृष्टी ईश्वरचरणी स्थित करून शून्यामध्ये स्थिर झाले. आता मनाचे अचल, स्थिर राहणे आणि जग जिंकणे यात काय संबंध आहे? श्रीकृष्ण म्हणतात-**'निर्दोष हि समं ब्रह्म'** ते ब्रह्मनिर्दोष आणि सम आहे. इकडे याचे मनपण

निर्दोष आणि समत्वस्थितीवाले बनून गेले. **'तस्माद् ब्रह्माणि ते स्थिताः'** व म्हणून ते ब्रह्मात स्थित झाले.

आताच चौथ्या अध्यायातील **'ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं'** ची चर्चा केली. ज्ञानाचा अर्थ काही अमुक सिध्दांत पठण करणे असा होत नाही. ज्ञानाचा अर्थ आहे परमात्म्याच्या दर्शनाबरोबर त्याची होणारी अनुभूती ! गीतेच्या १०/३ व्या अध्यायात भगवंत म्हणतात- **'यो मामजमनादिंच वेति लोकमहेश्वरम् । असम्मूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते।।'** जो अजन्मा, अनादि, समस्त लोकांच्या महान अशा मज ईश्वराला जाणून घेतो तो पुरूष मरणधर्मी मनुष्यांमध्ये ज्ञानवान आहे. जेव्हा ईश्वराला जाणले जाते तेव्हा जी अनुभूती प्राप्त होते त्याला ज्ञान असे म्हणतात. जर साधना न करता केवळ अनुभूतीसंबंधींचे, ज्ञानासंबंधीचे सिध्दांत वाचत राहाल तर काहीही प्राप्त होणार नाही. हिमालयाचा नकाशा रात्रंदिवस पाहुन वास्तव हिमालयाची कल्पना येणार नाही. तेव्हा प्रत्यक्ष साधनेची पूर्ती म्हणजे मनाचा निरोध आणि विलयकाळात अविदित ईश्वराला जाणण्याबरोबर मिळणारी अनुभूती म्हणजे ज्ञान होय. गीतेच्या मते, प्रत्येक महापुरूषाच्या मते ज्याला जाणायचे होते त्याला जाणल्यानंतर पुढे जर जाणण्यासारखे काहीही नाही तर कोणाला शोधायचे? **'दग्धं कर्माणं'** कर्म नेहमीसाठी दग्ध होऊन जाते. पुढे कोणी ईश्वर राहीलाच नाही तर जाणार कोठे? पूजणार कोणाला? म्हणून भजनही समाप्त? आता **'भजन हमारा हरि करें, हम पाये विश्राम !'** हेच आहे. **'सब कर्मोंकी धूनी जलाकर तन मे भस्म रमाता है ।'** शेवटी म्हणतात **'-ब्रह्मानन्द स्वरूप मगन हो, आप ही आप लखाता है !'** तो साधक या सृष्टीच्या कणाकणात व्याप्त असणाऱ्या त्या विशालस्वरूप ब्रह्माच्या आनंदात निमग्न होऊन जातो. **'आप ही आप लखाता है ।'** ईश्वर जेव्हा आपला स्वीकार करतात तेव्हा आपल्याला अलग जीव बनवून बाजूला बसवत नाहीत- **'जानत तुम्हहि तुम्हहि होई जाई ।।'** म्हणजे सेवक नेहमीसाठी संपून जातो-स्वामीच शिल्लक राहतो. **'ईश्वर अंश जीव अविनाशी'** हा जीव म्हणजे परमात्म्याचा विशुध्द अंश आहे, तो अविनाशी आहे. साधनेच्या मार्गाने जाऊन जेथे मूळ स्वरूपास स्पर्श केला तेव्हा अंश नष्ट झाला आणि शेवटी जे व्यापक होते ते शिल्लक राहिले. तर मग **'सुरसरि मिले सो पावन कैसे । ईस अनीसहिं अंतर तैसे ।।'** तो विलय पावला, ईश्वराच्या भगवत्तेत तो सर्वत्र आपोआप ओतप्रत भरून गेला. ईश्वर जेव्हा आपला स्वीकार करतात तेव्हा ते आपले ईश्वरत्व भक्ताला प्रदान करतात. ते भक्ताला जीव बनवून किंवा सेवक बनवून ठेवत नाहीत. आणि म्हणूनच **'आप ही आप लखाता है ।'** असे निरंजन पद एखादा संतच प्राप्त करू शकतो.

स्वामी ब्रह्मानंदजींनी शरीरस्थ चक्रांचा उल्लेख आपल्या गीतात केलेला नाही; परंतु मेरूदंडाच्या शिडीमध्ये या चक्रांचा अंतर्भाव दिसून येतो. मूलाधारची चर्चा त्यांनी केली आहे.

त्यावर स्वाधिष्ठान चक्र आहे. स्व चा अर्थ आपण स्वतः, अधिष्ठानचा अर्थ निवास अर्थात आपल्या स्वरूपाच्या ठिकाणी श्रध्दा सुदृढ होणे. तुम्हाला तेथून कोणी बाजूला हटवू शकणार नाही. त्या वेळी अधोमुखी षड्दल, षड्विकार काम, मोह, मद, मत्सर हजर असतात. ते ऊर्ध्वमुखी झाल्यावर हेच षडैश्वर्य विवेक, वैराग्य, शम, दम, त्याग आणि तितिक्षेत परिणत होतात. हेच कमळाचे फुलणे (विकसणे) आहे.

साधना आणखी तीव्र केल्यानंतर मणिपूरम चक्र येते. येथे दहा पाकळयांचे कमळ आहे. -पाच कर्मेन्द्रिये व पाच ज्ञानेंद्रिये जी प्रथम अधोमुखी होती ती इष्टोन्मुखी होतात. ती जेथे संयमित होते तेथे मणिपूरक ! महापुरूषांनी प्रत्येक श्वासाला मण्याची संज्ञा दिलेली आहे. **'तात भगति मणि उर बस जाके । दुख लवलेस न सपनेहु ताके ।।'** हा भक्तिरूपी मणी ज्याच्या हृदयात बसतो त्याला या सृष्टीत कोठेही यत्किंचितही दुःख दिसत नाही. अष्टधा मूलप्रकृती अष्टसिध्दीच्या स्वरूपात परिवर्तीत झाली. कोणी-कोणी येथील कमळास आठ पाकळयांचे कमळ असे संबोधले आहे. सांसारिक दलदलीपासून अलिप्त-निर्लेप राहत असल्याने त्याला कमलवत असे म्हटले जाते.

उत्तरोत्तर साधना उन्नत झाल्यानंतर साधकाला अनाहत चक्रात प्रवेश मिळतो. येथे बारा पाकळयांचे कमळ फुलते. दहा इंद्रिये होतीच, त्यात मन आणि बुध्दी, संकल्प व निश्चय या दोन पाकळयांनी भर पडली व बारा पाकळयांचे कमळ येथे उमलले. तो आता ईश्वराच्या विभूतींना धारण करणारा बनतो. तो आता प्रकृतीमध्ये असणाऱ्या मोहांनी-अडचणीत खचत नाही. तो आपल्या श्रेयमार्गावर अग्रेसरच असतो.

या क्षमतेनंतर सोळा पाकळयांचे कमळ असते. हे कमळ स्थूल शरीर पाच तत्त्व क्षिति, जल, पावक, गगन व पवन यापासून बनलेला आहे. त्याच्या अंतरंगात एक सूक्ष्म शरीर आहे. जे मनाचे जग आहे. ते सोळा तत्त्वांपासून बनलेले आहे. दहा इंद्रिये, चतुष्टय अंतःकरण, तैजस आणि प्राज्ञ-यात ईश्वरीय तेजाचे प्रस्फुटन होते- **'कबिरा मन निर्मल हुआ जैसे गंगा नीर । पीछे लागे हरि फिर कहत कबीर कबीर ।।'** सोळा तत्त्वांचे हे सूक्ष्म शरीर जेव्हा विशुध्द बनते तेव्हा आज्ञाचक्र येते. स्वामी व सेवक समोरासमोर येतात. येथे या चक्राला दोनच आरे आहेत. साधकाला येथे केवळ आज्ञापालन करावयाचे आहे. त्याच्या निर्देशनानुसार साधनाक्रियेत पुढे पुढे जात असताना साधना आणखी उन्नत होते. तेव्हा सहस्त्रार चक्र येते. सहस्त्रचा अर्थ अनंत असाही होतो. अनंत प्रवृत्ती जेव्हा इष्टोन्मुखी होतात तेव्हा ईश्वराच्या आज्ञेत चालताना एकही प्रवृत्ती अधोमुखी राहात नाही. तेव्हा **'विश्वे अणुः स विष्णुः'** जगामध्ये अणुंनी व्याप्त जी सत्ता आहे तो परमात्मा आपल्याला अनुभूती देऊ लागतो. तो साधकाचा आपल्या विभूतींशी परिचय करून देतो. जेव्हा साधना समजत नाही तेव्हा काकभुसुण्डि किंवा अर्जुनाप्रमाणे भगवान

त्यांना आपल्या विराट रूपाचे दर्शन देतो. मग त्याला जाणून साधक तोच भाव प्राप्त करतो. **'जानत तुम्हहिं तुम्हहिं होइ जाई ।'** येथे जीव ही संज्ञा समाप्त होते. परमात्मा साधकाच्या शरीरास आपले निवासस्थान बनवतो.

**'राम भगत हित नर तन धारी । सही संकट किये साधु सुखारी ।।'** भक्ताच्या हितासाठी ईश्वर मनुष्याचे शरीर धारण करतो. स्वतः संकटांशी सामना करूनही संतांना तो सुखी करतो.

सारांश हठयोग, कुण्डलिनी, भिन्नभिन्न चक्रांची कल्पना या सर्व गोष्टी म्हणजे साधकाला अंर्तमुख करण्याचे प्रयत्न आहेत. बहुतांशी संतांनी चक्रभेदन क्रियेपेक्षा भक्तीलाच श्रेष्ठ समजले आहे. कारण भक्तीने या सर्व अवस्था आपोआप सहजतेने पार होतात. म्हणून प्राचिन आर्षग्रंथांत यांची चर्चा केलेली नाही. मनाच्या निरोधाबरोबरच ईश्वराची स्थिती महापुरूषांनी वेळोवेळी समजावली आहे. ही सर्व साधनाक्रिया संपूर्णतः व क्रमबध्द जाणण्यासाठी गीता अभ्यासावी. कारण भगवान श्रीकृष्णोक्त गीता म्हणजे योगदर्शन आहे. गीतेवरील भाष्य 'यथार्थ गीता' या नावाने आश्रमाने प्रकाशित केले आहे. त्याचे अध्ययन केल्यानंतर योगा-संबधी, श्रेयसंबंधी कसलीही भ्रांती तुम्हाला होणार नाही.

**।। ॐ श्री सद्‌गुरूदेव भगवान की जय ।।**

# रामकथेच्या दृष्टिकोनातून द्रविड आणि आर्य

प्रश्न-महाराज जी ! दक्षिण भारतीयांना असे शिकविले जात आहे की आर्य भारतात बाहेरुन आले व त्यांनी इकडच्या शांतताप्रिय मूळ रहिवासी असलेल्या द्रविडांना दक्षिण भारताकडे पळवून लावले. उत्तर भारतातील राम-लक्ष्मणांनी दक्षिण भारतातील शूर्पणखेला अपमानित केले व राजा रावणाला पराजित केले. त्यांचे यशोगान गाणारे वाल्मिकींचे 'रामायण' म्हणजे विजयी लोकांद्वारा लिखित सवर्णीयांची कपोल कल्पित कथा आहे, ज्यामधून रामाच्या साम्राज्यवादी मनोवृत्तीचा परिचय होतो. म्हणून दक्षिण भारतीयांनी रामकथेचा बहिष्कार केला पाहिजे. ह्या ज्वलंत प्रश्नावर प्रकाश टाकण्याची कृपा करावी.

उत्तर - हे महोदय ! दक्षिण भारतीयांना उत्तर भारतीयांपासून वेगळे करण्याचा प्रयत्न काही नवीन नाही. राजनैतिक स्वार्थाने प्रेरित झालेल्या विदेशी शासकांनी उत्तर व दक्षिण भारतीयांमध्ये 'फूट पाडा आणि राज्य करा' ह्या नीतीच्या अंतर्गत हे विष पसरविले. ज्यांच्या संदर्भात आश्रमीय साहित्य 'जीवनादर्श एवं आत्मानुभूति' आणि 'शंका समाधान' ह्या पुस्तकांमधील आर्य विषयक लेखांमध्ये प्रकाश टाकला गेला आहे. आज आपण रामकथेचे मूळ प्रस्तुतकर्ता आदि कवि महर्षि वाल्मीकिकृत 'रामायण' तसेच त्यावर आधारित गोस्वामी तुलसीदासांचे 'रामचरितमानस' ह्यांच्या दृष्टिकोनातून ह्या प्रश्नावर विचार करु या.

रामायण मूलतः आध्यात्मिक ग्रंथ आहे. शास्त्र दोन दृष्टिकोनातून लिहिले जाते. एक तर इतिहासाला अखंडित ठेवण्यासाठी की ज्यामुळे भावी पिढी पूर्वजांच्या पावलावर पाऊल ठेऊन चालू शकेल व मर्यादित सुसभ्य जीवन जगू शकेल. परंतु केवळ सफलतापूर्वक जगून-खाऊन आयुष्याचे दिवस पूर्ण करण्यात जीवाचे वास्तविक कल्याण संभवनीय नसते. त्यामुळे शास्त्रलेखनाचा दुसरा दृष्टिकोन आहे अध्यात्म. प्रत्येक जीव प्रकृतीच्या आधीन असतो. प्रकृति जीवाला हवे तसे नाचवते. त्याला प्रकृतीच्या बंधनातून सोडवून, आत्म्याच्या अधिपत्याखाली आणणे, त्याच्या निर्देशनाखाली चालवून आत्मदर्शन, स्पर्श व स्थिति प्रदान करणे, आत्मभावाची प्राप्ति करणे - ह्याला अध्यात्म म्हणतात. अध्यात्म असे जीवन प्रदान करते की ज्याला मृत्यूचे भय असत नाही. असे अध्यात्म सतत रहाणारी शांति, समृद्धि व स्थिती प्रदान करते. त्याचेच नाव मोक्ष आहे. अशा दोन दृष्टिकोनांमधून शास्त्राची रचना होते. रामायण तसेच रामचरित मानस यामध्ये वर्णिलेल्या रामाची कथा हा आपला खरा इतिहास आहे. घटना अवश्य घडल्या व त्यांनाच उदाहरण बनवून महापुरुषांनी आध्यात्मिक तथ्यांना मर्मस्पर्शी करण्याचा प्रयास केला. रामायण हे ह्या दोन्ही दृष्टिकोनांचा अनोखा संगम आहे. न समजल्या कारणाने किंवा निहित स्वार्थवश त्याला कपोल कल्पित कथा म्हटले जाते. वस्तुतः तो आपल्या पूर्वजांचा निर्मळ इतिहास आहे.

सृष्टीच्या आरंभाच्या वेळी मनुष्य हे एकच संबोधन होते. परम पावन परमात्म्यापासून मनुष्याची उत्पत्ती झाली आहे. मनूपासून जन्मल्यामुळे सगळ्यांना मनुष्य किंवा मनुज म्हटले जाते. आदि मनु एकछत्र सम्राट होते. त्यांच्यापासून उत्पन्न झाल्याकारणाने सर्व मनुष्य राजवंशी आहेत, सर्व राजपुत्र व सूर्यवंशी आहेत, कारण मनु सूर्यपूत्र होते. सूर्य परमात्म्याचा तो ज्योतिर्मय अंश आहे की ज्यापासून मानवाची संरचना झाली. महाराज मनुपासून उत्पत्ति झाल्याने सर्व पावन होते - **'स्वयंभू मनु अरु सतरुपा। जिन्हतें भै नर सृष्टि अनूपा ।।'** स्वयंभू अर्थात स्वयं कर्ता-धर्ता मनु आणि सत्यस्वरुप मातेपासून जी सृष्टि निर्माण झाली ती अनुपम होती. त्याच्याशी कोणाची तुलनाच करता येत नव्हती. सगळे अतिशय पवित्र होते.

हळू-हळू लाखों वर्षे निघून गेली. सृष्टीत घनत्व आले. परंतु सम्राटांची परंपरा चालत राहिली. मनूचा पुत्र इक्ष्वाकु राजा झाला. त्यांच्याच वंशात महाराज कश्यप होते. त्यांच्या दिति आणि अदिति अशा दोन राण्या होत्या. त्यांच्या पुत्रांमधे श्रेष्ठत्वावरुन भांडणे होऊ लागली. दितीच्या पुत्रांना दानव म्हटले गेले. त्यांचा पराक्रम, प्रकृतीचे भोग व संग्रह ह्यावर विश्वास होता, त्यामुळे ते राक्षस म्हणवले गेले. अदितीच्या पुत्रांना देव म्हटले गेले कारण त्यांचा परमदेव परमात्म्यावर विश्वास होता. परमेश्वराला प्राप्त करवून देणारी दैवी संपत्ती त्यांच्याकडे होती. अशाप्रकारे देव आणि दानव सख्खे भाऊ होते परंतु ते दोन भागांमध्ये विभागले गेले.

विभाजनाच्या पश्चात् सुद्धा देव आणि दानवांमधील आपसातले संबंध जसेच्या तसे होते. दानवराज पुलोमाची कन्या शची देवेंद्राची पत्नी होती. देवेंद्राची कन्या जयंती दानवांचे गुरु शुक्राचार्य यांची पत्नी होती. अशी देवाण-घेवाणही चालू होती व ज्याप्रमाणे भाऊ-भाऊ शेताच्या कुंपणावरून भांडतात तसेच हे भांडत पण होते. दोघांमधे देव-संस्कृति व राक्षस-संस्कृतिचा मतभेद होता. देव परमेश्वरावर निर्भर होऊन चालणारे होते, तर दानव आपल्या बाहुबळावर निर्भर होऊन चालण्यात विश्वास ठेवत होते. **'प्रभुता पाइ काहि मद नाही'** असे समजणे स्वाभाविकच होते.

राक्षसांचा राजा रावण वगैरे दक्षिण भारतीय कदापि नव्हते किंवा लंका निवासी नव्हते. त्यांचा जन्म देवलोकांत झाला होता, जो हिमालयाच्या खालील सपाट भूभाग आहे व जो पश्चिमेकडून पूर्वेपर्यंत हजारो किलोमीटरपर्यंत आसामपासून आणि अरुणाचलपर्यंत पसरलेला आहे. ह्या प्रदेशाचे वायुमंडळ अनादिकाळापासून प्रदूषण-मुक्त, शुद्ध राहिले आहे. रोगाचे जंतू तेथे नाहीत. काही भाग तर असे आहेत की तेथे आजपण रोगराई नाही. अशा देवलोकात मानससरोवर आणि कैलास पर्वतापासून बद्रीनारायणाच्या मध्यभागी महाप्रतापी रावणाचा जन्म झाला होता. हीच अलकापुरी होती. त्याचे आजोबा पुलस्ति, पिता विश्रवा असे सर्व तेथेच निवास करत होते. त्याचे जेष्ठ भाऊ कुबेर अलकापुरीचे महाराज होते. ते देवतांचे कोषाध्यक्षही होते.

रावण ह्याच वैश्रवणाचा धाकटा भाऊ होता. जीवनाच्या प्राथमिक वर्षात त्याने कठोर तपश्चर्या केली. त्या काळात रावण एक भक्त होता. तपस्येमुळे त्याला अनेक शक्ती प्राप्त झाल्या, जसे लाखों वर्षांचे आयुष्य, मस्तक कापल्यावरही जीवंत, हजार वेळा मस्तक छाटल्यावरही मरण न येणे, नाभिमध्ये अमृत असणे. अशा शक्ती मिळाल्यामुळे तो उत्च्छृंखल झाला. मोठा भाऊ कुबेर ह्याचे विमान त्याने पळवून नेले. कुबेराने विचार केला, लहान भाऊ आहे तेव्हा त्याच्याशी कशाला भांडायचे. त्याने आपल्या वडिलांजवळ व आजोबांकडे तक्रार केली. पुलस्ति म्हणाले, ''घेऊन जाऊ दे. त्याची एवढी हिम्मत नाही की तो 'पुष्पक' सांभाळू शकेल. त्याला काही दिवस फिरू दे. मग पुष्पक विमान स्वतःच तुझ्याकडे येईल''. लाखो वर्षे रावण त्या विमानातून फिरत राहिला. रावण जेव्हा मारला गेला, तेव्हा राम पुष्पक विमानात बसून अयोध्येला आले व म्हणाले ''पुष्पक ! तुम्ह कुबेर पहिं जाहु।'' त्यांनी पुष्पकाला कुबेराकडे पाठवून दिले. कोणताही संघर्ष न करता कुबेराला पुष्पक विमान परत मिळाले. केवढा शोध होता पूर्वजांचा की रावण त्या विमानात लाखो वर्ष फिरत राहिला तरी नाही कधी तेल घालायला लागले, ना कोणता विमानाचा भाग खराब झाला.

पुष्पक विमानात बसून रावण त्रिलोकावर विजय मिळवायला निघाला. त्याला त्याची राजधानी कोठे स्थापावी ह्याची चिंता होती, कारण हिमालयात मोठ्या भावाचे राज्य होते. अर्थात त्याची सत्तालोलुप नजर त्याही राज्यावर होती. रावण फिरत-फिरत गंधर्व नगरीत पोहोचला. जी समुद्राच्या मध्यभागी होती. चोहोबाजूंना समुद्र आणि मध्यभागी असलेल्या सुंदर नगरीवर दृष्टि पडताच रावणाने गंधर्वांना मारून हाकलले व तेथे आपली राजधानी वसविली. असो, यावरून हे दिसून येईल की, रावण दक्षिण भारतीय नव्हता.

राजधानीची निवड झाल्यानंतर रावणाने आपला पुत्र अहिरावण ह्याला पाताळाचा राजा बनविले. त्याचा पुत्र नारांतक हा बिहबावलपूर (ब्रिटन)चा सम्राट झाला. त्याच्या उत्पत्तीच्या संदर्भात अशी कथा आहे की अभुक्त मूळ नक्षत्रावर लंकेत बहात्तर करोड मुले जन्मली. भोगवादी संस्कृतीत आणखी काय होणार? तर त्या अनिष्टकारी मुलांना रावणाने समुद्रात फेकून दिले. परंतु राक्षसांचीच मुले ती ! इतक्या सहजपणे कशी मरतील? त्यांनी पोहत एका वडाच्या झाडाला पकडले, मोठी झाली आणि नारांतक विलायतेत सम्राट सुद्धा झाला.

राम-रावणाचे युद्ध चालू झाल्यावर रावणाने आपल्या मंत्र्याकडून नरांतकाला युद्धासाठी आमंत्रण पाठविले. नरांतकाचे बहात्तर करोड भाऊ एकत्र वाढलेले, सारख्या रंग-रुपाचे होते आणि ते एकाच रांगेत सिंहासनांवर बसले होते. सर्वांचे चेहरे एकसारखे, एकच रंग, एक सारखे मुकुट आणि वेशभूषा बघूनसुद्धा बुद्धिमान मंत्री चकित झाला नाही. त्याने स्तुति-पाठ चालू केला. रावणाचे पूर्वज, माता मंदोदरीची प्रशंसा केल्यावर, रावणाच्या पराक्रमाचे वर्णन केल्यावर

तो म्हणाला की महाराजाधिराज त्रिलोक विजयी रावणाचा जेष्ठ पुत्र इंद्रजयी मेघनादाचा जेष्ठ भाऊ नरांतक ह्याच्या चरणी मी प्रणाम करतो. सर्वांची दृष्टि नरांतकाकडे वळली कारण ते सर्वजण आपसात तर जाणतच होते की त्यांच्यात नरांतक कोण आहे. बुद्धिमान मंत्र्याने मग त्याला रावणाचे पत्र समर्पित केले.

अशाप्रकारे रावण व त्याच्या वंशजांनी संपूर्ण विश्वावर अधिकार गाजविला. देवलोक त्यांच्या नियंत्रणाखाली आले. मेघनादाने कैद केलेल्या इंद्राला ब्रह्माने मुक्त केले व आशीर्वादाने ब्रह्मशक्ति प्राप्त केली. **'देव जच्छ गंधर्व नर, किन्नर नाग कुमारि। जीति बरीं निज बाहुबल, बहु सुंदरि बर नारि।'** (मानस, १/१८२). देव-यक्ष-नर-नाग-किन्नर-गंधर्व ह्यांच्या जितक्या सुंदर मुली होत्या त्या सर्वांना रावणाने पुष्पक विमानात बसविले, त्या सर्वांच्या अश्रुंच्या धारा पुष्पकात वाहू लागल्या परंतू त्याला दया आली नाही. रावणाने त्यांच्याशी जबरदस्तीने विवाह केला. **'सुरपूर नितहिं परावन होई'** (मानस, १/१७९/८). रावणाच्या आतंकाने देवलोक त्रस्त झाला.

देवलोकावर विजय मिळवून रावण भारताकडे वळला तेव्हा लंकेच्या समीप असलेल्या किष्किंधा नरेशाला पराजित करण्याचा विचार त्याच्या मनात आला.जेथे लोक आस्तित्वाचे उपासक होते अशा आर्यावर्तात त्याने घुसण्याचा विचार केला. महान बलशाली किष्किंधा नरेश बाली तेव्हा समुद्र तटावर अर्धवट मिटलेल्या डोळ्यांनी ईश्वराच्या ध्यानामध्ये निमग्न होता. रावणाने पाठिमागून त्याला पकडले तेव्हा बालीने डोळे मिटलेले असून सुद्धा रावणाला पकडले व काखेत दाबून धरले. त्याच अवस्थेत बालीने समुद्राची प्रदक्षिणा पूर्ण केली, घरी आला व हात उचलला तर रावण खाली पडला. अंगदाने त्याला बांधून टाकले.

पुलस्त ऋषिंना हे कळल्यावर त्यांनी रावणाला मुक्त करविले, दोघांमधे समेट केला. मित्रत्वाचा हात पुढे केला, परंतु कुटील रावणाने त्या क्षेत्रावर आपले वर्चस्व मिळविण्याचा उपक्रम चालूच ठेवला. त्याने बालिशी समझोता तर अवश्य केला. परंतु आपले दोन मेहुणे दुदुंभि आणि मायावी यांना बालिशी लढण्यास पाठविले. **'मय सुत मायावी तेहि नाऊँ। आवा सो प्रभु हमरे गाऊँ।।'** मयची मुलगी मंदोदरी व त्याचा मुलगा मायावी. ते खूप पराक्रमी होते. त्यांनी समुद्र व हिमालय पर्वताला युद्धासाठी आमंत्रित केले. समुद्र व हिमालय पर्वत म्हणाले, असुरेश्वर ! आम्ही आपल्यासारखे सामर्थ्यवान नाही. इतके दूर येण्याची काय आवश्यकता होती? आपले समीपवर्ती नरेश बाली आपली युद्ध करण्याची इच्छा पूर्ण करतील. त्यांनी बालीला आवाहन दिले. बालीने त्याला मारून टाकले. दुदुंभि पहाडाएवढया म्हशीचे रूप घेऊन युध्द करीत होता.बालीने त्याला उचलून चार योजने दूर फेकून दिले. मातंग ऋषींचा आश्रम जवळच होता. आश्रमात रक्ताचे शिंतोडे उडाल्यामुळे ऋषींनी बालीला शाप दिला की ह्या बाजूला आलास तर मारला जाशील.

नर्मदेच्या तटावर रावण शंकराची आराधना करीत होता. फुलांचा ढीग रचला होता. जवळपासच हैहय नरेश सहस्त्रार्जुन सपत्निक जल-विहार करीत होता. नर्मदेचा प्रवाह थांबल्यासारखा वाटायला लागला. पाण्याची पातळी वाढल्याने रावणाची फुले तरंगू लागली. रावण जिथे बसला होता तिथे चहूकडे पाणी झाले. त्याने मंत्र्यांना कारण विचारले तर समजले की हजार हातांची एक भयंकर व्यक्ति पाण्यात बसली आहे. रावणाने सेनेसहित त्यावर आक्रमण केले. सहस्त्रार्जुनाने रावणाच्या सर्व सेनेला मारून पळवून लावले. रावणाचे अंगरक्षकही पळून गेले. सहस्त्रार्जुनाने रावणाला कैद केले. पुलस्त ऋषि आले व म्हणाले, ''राजन् ! हा माझा नातू आहे, मस्तीखोर आहे, त्याला क्षमा करा.'' हैहय नरेशाने रावणाला मुक्त केले.

भारतातले हे राजे इतके शक्तिशाली होते की रावणाचे त्यांच्यापुढे काही चालू शकत नव्हते. परशुराम, महर्षि अगस्त्य, शबरी, मतंग त्यातलेच होते. गिधाडांचा राजा जटायु, त्याचा भाऊ संपाति, महान पराक्रमी आणि बलशाली होते. सीतेचे अपहरण करून रावण निघाला तेव्हा जटायु सीतेला म्हणाला, ''पुत्री ! निश्चिंत रहा. मी येतो व त्या दुष्टाला मारून टाकतो.'' त्या अतिशय वृद्ध गिधाडाला पाहून रावणाने विचार केला, की **'मैनाक की खगपति होई। मम बल जान सहित पति सोई॥'** माझा पराक्रम मैनाक पर्वत जाणतो, मी त्याला पळवून लावले आहे किंवा हा गरुड असू शकेल? परंतु तो पण आपले स्वामी विष्णु सहित माझा पराक्रम जाणतो. तेव्हा इथे येण्याची त्याने हिंमत कशी केली ? जवळ आल्यावर रावणाने त्याला ओळखले की हा वृद्ध गिधाड आहे. असे वाटते की त्याला माझ्या हातून प्राण गमावण्याची इच्छा आहे. रावणाने त्याच्या सामर्थ्याला जरा कमीच लेखले. गिधाडाने रावणाला पुष्पकातून खाली पाडले. रावणाने चंद्रहास तलवारीने त्याचे पंख छाटले.

सागराच्या तटावर जटायुचा भाऊ संपाति ह्याचा पुत्र सुपार्श्व आपल्या पित्यासाठी आहार सामग्री गोळा करीत होता. त्याने रावणाला एक विचित्र जीव समजून खाण्यासाठी पकडले. त्या बलशाली युवकाशी लढण्यात आपली भलाई नाही हे जाणून रावण त्याला विनयाने म्हणाला, ''हे पक्षीप्रवर ! आपण अशा महान कुळातील आहात की ज्यांनी सूर्यापर्यंत प्रवास केला आहे. आपण सर्व वेदज्ञ आहात आणि वेद सांगतात की याचकाला निराश करता कामा नये. मी लंकाधिपति रावण आपल्याकडे मार्गाची याचना करतो. आपल्यासारखी कुलीन व्यक्ति मर्यादा कधी सोडू शकत नाही. तर धर्माचा विचार करून मला मार्ग प्रदान करा.'' सुपार्श्व अशा गोड बोलण्याने फसला, रावण आपल्या बुद्धि-कौशल्याचा प्रयोग करून निसटला.

संध्याकाळी संपाति स्वल्प भोजन सामग्री बघून पुत्राला ओरडला, ''काय भोजन इतकेच असते? दिवसभर कोठे उडाणटप्पूपणा करीत होतास?'' तेव्हा सुपार्श्व म्हणाला, ''भोजन सामग्री तर बरीच एकत्र केली असती, परंतु एक काळी सावली स्पष्ट दिसली त्यामुळे आपल्या

भोजन सामग्रीसाठी त्याला पकडले. तो लंकाधिपती रावण होता. आपल्या कुळाची, तुमची प्रशंसा करीत होता व सोडून देण्याची याचना करू लागला. धर्माचा विचार करून मी त्याला सोडून दिले. ह्या गोष्टीतच खूप वेळ निघून गेला.'' संपातीने विचारले, ''त्याच्याजवळ काय होते?'' सुपार्श्व म्हणाला, 'त्याच्याजवळ एक कन्या होती. असे वाटत होते की रावण तिचे अपहरण करून घेऊन चालला होता. ती कन्या हे राम ! हे लक्ष्मण ! हे दशरथनंदन असे काहीतरी म्हणत होती.'' संपातीने सुपार्श्वची निंदा करीत म्हटले, ''दुष्टा ! दशरथ माझा बालसखा आहे. अंतःकरण जाणणारा मित्र आहे. त्यांच्या पुत्रवधूचा अपमान म्हणजे माझा अपमान आहे. तू सीतेला मुक्त का नाही केलेस? रावणाला मारून का नाही टाकलेस? रावणाला माझ्या चरणांशी आणले असतेस तर मीच त्याला मारले असते. जा, तोंड काळे करुन, माझ्या दृष्टिपासून दूर जा.'' त्याने आपल्या पुत्राला हाकलून लावले.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे की हाड-मांस खाऊन उदर-भरण करणाऱ्या पक्षांचे नातलग चक्रवर्ती सम्राट असू शकतात? नाही, गरुड, नाग, अस्वल, वानर, किन्नर इत्यादि आपल्या पूर्वजांची संबोधने होती. किन्नर नपुंसक नव्हते. त्यांना मुली होत्या, त्यातल्याच काहींना रावण पकडून घेऊन गेला होता. सर्व मनुष्य होते व महान बलशाली होते. सुपार्श्वने रावणाची मान पकडून त्याला फरफटत नेले. तेव्हा नितिज्ञ रावणाने त्याच्याबरोबर लढणे उचित समजले नाही. परंतु शक्तीची तुलना करता वृद्ध जटायुशी तो लढला. अशाप्रकारे संपूर्ण भारतात रावणाचे काही चालत नव्हते. रावणाच्या सीमेलगतच्या क्षेत्रांमध्ये महान बलशाली जाती निवास करीत होत्या.

रावणाच्या जवळपासचे दक्षिण भारतीय राजे हे सर्व चक्रवर्ती इक्ष्वाकुवंशीय सम्राट दशरथ आणि त्यांच्या परंपरेतले होते. हे असे चक्रवर्ती सम्राट होते की ते त्यांच्या अधीन राज्यांकडून कर न घेता, संकट आल्यावर संस्कृतीचे रक्षण मात्र करीत होते, तेथील राजांना अभय देत होते. जेव्हा रामाने बालीला मारले, तेव्हा घायाळ झालेला बाली म्हणाला, ''राम ! तुम्ही तर धर्माच्या ध्वजेचे संवाहक आहात. आपसात युद्ध करून माझ्यासारख्या निरपराध्याला का मारलेत?'' रामाने उत्तर दिले, ''बाली, ही संपूर्ण पृथ्वी नरेशांची आहे. आज त्या गादीवर भरत आहे. तेव्हा त्याच्या राज्यात कोठे अशिष्ट व्यवहार होत असेल, मर्यादा भंग होत असेल, संस्कृतीचा ऱ्हास होत असेल तर त्याचे रक्षण करणे माझा धर्म आहे. लहान भावाची बायको, बहीण, सून आणि कन्या ह्यांना समान आदर मिळाला पाहिजे. ह्यांच्यावर कोणी वाईट नजर टाकत असेल, सांस्कृतिक मर्यादा भंग करीत असेल **'ताहि बधे कछु पाप न होई'** तर त्याला मारणे काही पाप नाही. आम्ही तर धर्माची रक्षाच केली आहे.''

अंगदाला रामाच्या चरणी सोपवून बालीने देहत्याग केला. रामाने सुग्रीवाला तेथील राजा बनविले व अंगदाला युवराज म्हणून नियुक्त केले. रामाने दक्षिण भारताकडून काही घेतले नाही.

रावणाची अशी योजना होती की भारतीय नरेशांना वश करून त्यांची व्यवस्था उध्वस्त करायची, सर्वांना असुर बनवायचे. भारतीय नरेश पराक्रमी अवश्य होते परंतु मदांध असल्याने भोग-विलासात अनुरक्त होते. बली, हैहय नरेश, संपाति इत्यादि बलशाली असून सुद्धा खाऊन-पिऊन चैनीत रहायचे. संस्कृति आणि जनतेच्या रक्षणाकडे त्यांचे लक्ष नव्हते. संधीचा फायदा घेत समुद्रापलीकडील शूर्पणखा, खरदूषण, त्रिशिरा, मारीच, ताडका इत्यादिंनी आर्यवर्तामिध्ये घूसून ठिकठिकाणी आपले पडाव बनविले होते. जनतेत दैवी गुण आणि सद्-परंपरांचे प्रसारण ज्या ऋषिंकडून होत असे, त्या ऋषिंनांच हे निशाचर खाऊन टाकत. परंतु बाली किंवा हैहय नरेशांनी त्यांच्या रक्षणासाठी काहीच उपाय योजले नाहीत.

राक्षसांचे शिकार बनलेले हे ऋषिही दक्षिण भारतीय होते. विंध्य पर्वतापासून दक्षिणेच्या भागाला दक्षिण भारत म्हणतात. रामाला इथे विराध, ताडका, सुबाहु, मारीच इत्यादिंचे पडाव मिळाले. गाजीपुरच्या जवळ देवतांनी स्थापन केलेला करुष देश होता. तेथील देवतांचा विध्वंस करून ताडका तेथे राज्य करीत होती. ते स्थान म्हणजे जनशून्य जंगल झाले होते. ताडका लोकांवर नाही तर जंगलावर राज्य करीत होती. विश्वामित्र राम-लक्ष्मणांना घेऊन आले व त्यांनी तिचा वध करविला. वनवास काळात राम विंध्य पर्वतावरून पुढे निघाले, तर विराधने सीतेला पळविले. सीतेवरच सर्व राक्षसांची दृष्टि होती. विराधला मारून राम पुढे निघाले तर त्यांना अस्थींचा ढीग दिसला. लोकांनी सांगितले-

**निसिचर निकर सकल मुनि खाए। सुनि रघुनाथ नयन जल छाए॥**
**निसिचर हीन करउँ माहि भुज उठाइ पन कीन्ह।**
**सकल मुनिन्ह के आश्रमन्हि जाइ-जाइ सुख दीन्ह॥ (मानस ३/९)**

जेथे-जेथे राक्षसांचे आक्रमण होत होते, तेथे तेथे रामाने राक्षसांना मारले व ऋषिंना राक्षसांच्या अत्याचारापासून मुक्त केले.

असे करीत-करीत राम पंचवटीला पोहोचले. तेथेच शूर्पणखेचे आगमन झाले. स्त्रियांचे अपहरण करणे, धन लुटणे हा असुरांचा स्वभाव होता.

**बाढे खल बहु चोर जुआर। जे लंपट परधन परदारा॥**
**मानहि मातु पिता नहिं देवा। साधुन्ह सन करवावहिं सेवा॥**
**जिन्ह के यह आचरन भवानी। जानहु ते निसिचर सब प्रानी॥**

ज्यांचे असे आचरण असते ते सर्व निशाचर असतात. अपहरण करणे ही असुरांची वृत्ति होती, धर्म नव्हता. धर्म तर एक आहे, जो शाश्वत आहे, सनातन आहे. एक परमात्मा, जो अपरिवर्तनशील आहे, कालातीत आहे, त्याला हृदयात धारण करणे धर्म आहे. असुर हा धर्म नसून एक वृत्ति आहे. आसुरी वृत्तीत स्त्रियांचे अपहरण करणे विधिसंमत होते. जर असुरांची अशी वृत्ति होती तर त्यांच्या स्त्रियांची वृत्ति आणखी कशी असणार? शूर्पणखा विकल होऊन रावणाकडे पोहोचली व म्हणाली, ''तू भाऊ आहेस की शत्रू? तू माझा पति विद्युतजिह्वाला मारून टाकलेस. आता लोक मला विधवा म्हणतात.'' रावण म्हणाला, ''युद्धाच्या नशेत मी त्याला ओळखले नाही म्हणून तो मारला गेला. परंतु ह्यात चिंता करण्याचे कारण नाही. आपल्या जातीत कोणी कधी विधवा-सधवा असतात का? आम्ही हजारो बायका ठेवतो, तेव्हा तू पण भाऊ खरदूषणबरोबर जा आणि हवे तसा लोकांत वावर कर.'' तर अशाप्रकारे खाणे-पिणे, मजा करणे, ज्याला हवे त्याला मारणे ही आसुरी वृत्ति आणि परंपरा आहे.

शूर्पणखा स्वच्छंद विहार करीत रामाच्या जवळ आली. कपटाने सुंदर वेष धारण करून म्हणाली, **'मनु माना कछु तुम्हही निहारी'**- आपण खूप सुंदर आहात असे नाही. जन्म घेतला आहे तर जीवन घालवायला पाहिजे. आतापर्यंत कुमारी राहिले आहे, तेव्हा काम चालून जाईल. खरे-खोटे बोलायला लागली. तिने सीतेवर आक्रमण केले. लक्ष्मणाने समुद्रापलिकडून आलेल्या त्या राक्षसिणीचे नाक-कान कापले. तिला तर मारुनच टाकायला पाहिजे होते. पण दया आली म्हणून जिवंत सोडून दिले. असुरांसारखीच त्यांच्या बायकांची पण वृत्ति होती. **'भ्राता पिता पुत्र उरगारी। पुरूष मनोहर निरखहिं नारी॥'** त्यांच्यात मर्यादा नव्हती. सर्वांकडे केवळ पुरुष-भावाने बघायच्या, चारित्र्य नावाची गोष्टच त्यांच्याजवळ नव्हती. ती दक्षिण भारतीय नव्हती, तर दक्षिण भारतात घुसून असुर आपली संख्या वाढवत होते की जेणेकरून संख्येच्या बळावर ते पराक्रमी राजांना विवश करू शकतील. आपली पत्नी सीता हिच्या शोधात वनवासी राम ऋष्यमूक पर्वताच्या जवळील भागात प्रविष्ट झाले. तेथे सुग्रीव त्यांच्या मंत्र्यासहित निवास करीत होते. सुग्रीवाला बालीपासून धोका होता म्हणून त्याने त्याच्या चारही बाजूंना पहारा लावला होता की बालीच्या कोणी गुप्तहेराने त्याची हत्या करू नये. जरी पहारा होता तरी राम-लक्ष्मणाला सर्वात आधी सुग्रीवानेच पाहिले. कारण तो सदैव सतर्क रहायचा. त्याने हनुमानाला निर्देश दिला, ''लवकर जा. काही संकट असेल तर मला संकेत दे, मी पळून जाईन. ते बघ दोन धनुर्धारी येत आहेत.''

विचार करा, सुग्रीव राजा होता, त्याच्या रक्षणासाठी हनुमानासारखा सेनापति होता, जांबुवंतासारखा मंत्री होता, काही सेना पण असेल, परंतु तो इतका भयभीत झाला की दोन धनुर्धर दिसल्यावर पळण्याची तयारी करायला लागला. हे लोक रावणाच्या सततच्या आक्रमणांनी

इतके त्रासले होते की साहस आणि आत्मविश्वास हरवून बसले होते. रामाने सुग्रीवाशी मैत्री केली. सर्वांना संगठित केले, सेतु बांधला गेला व सेना पलिकडे पोहोचली. युद्ध सुरू झाले. युद्धात गगनचुंबी निशाचर कुंभकर्णाला बघून सर्व वानर सेना पळायला लागली. काही घाबरून समुद्रात पडून मेले, काही दलदलीत फसले, काही झाडांच्या पडझडीमुळे चिरडले गेले तर बरेचसे त्याच पुलावरून परत निघून गेले. पूर्ण फौज पळून गेली, फक्त पाच-सातजणच वाचले. राम म्हणाला, ''बिभीषणा ! लढणे तर दुरची गोष्ट आहे. केवळ ह्याचे रूप बघूनच आपली फौज पळून गेली. कोण आहे हा? यंत्र आहे का मनुष्य?''

बिभीषण म्हणाला, ''प्रभु ! हा माझा मोठा भाऊ, रावणाचा धाकटा भाऊ कुंभकर्ण आहे. आशिर्वादाने नाही तर लहानपणापासूनच ह्याचे शरीर असे आहे आणि जसा आकार आहे तसाच पराक्रमपण आहे. त्याला वाटल्यास तो एकाच दिवसात सर्व वानर सेनेला खाऊन टाकू शकतो. आपली फौज तेव्हाच ह्याच्यासमोर उभी राहील जेव्हा सर्वांना समजाविले जाईल की हा यंत्र आहे.'' रामाने ही जबाबदारी अंगदावर सोपविली. अंगद एक उडी मारून समुद्रापलीकडे आला. **'अंगद कहइ जाऊँ मैं पारा।'** एका उडीत समुद्रोल्लंघनाची क्षमता अंगदामधे होती. इकडे वानर सेना पण पोहोचली होती. दोन-चार मिनीटांचा उशीर झाला असता तर वानर जंगलात विखुरले गेले असते, मग त्यांना एकत्र आणणे म्हणजे समस्या बनली असती. वानरच ते त्यांना कोठे शोधणार? परंतु युवराज अंगदला बघून ते निश्चिंत झाले.

अंगद म्हणाला, ''शूरवीरांनो ! आपण त्या आर्यांची मुले आहोत जे मोठ्या-मोठ्या लढाया लढले, विजय मिळविला किंवा वीरगति प्राप्त केली पण कधी पाठ दाखवून पळून नाही आले. आज आपण असे पळून आल्याने अनार्य म्हंटले जाऊ.'' कोण म्हणते की उत्तर भारतीय आर्य आणि दक्षिण भारतीय अनार्य आहेत? दक्षिण भारताचे राजा सुग्रीव, युवराज अंगद पुस्तदर आर्य होते. अंगदाने उत्तेजीत केल्याने सेना परत फिरली व युद्धाला तयार झाली. असो, तर रावणाने त्रास दिल्यामुळे हे लोक इतके त्रासले होते की राम-लक्ष्मणाला बघितल्यावर महाराजा सुग्रीव पळायची तयारी करायला लागला व कुंभकर्णाला बघितल्यावर तर पूर्ण दक्षिण भारतीय फौज पळून गेली. रामाने भयक्रांत झालेल्या ह्या लोकांना नवीन आशा दिली, त्यांच्यात आत्मविश्वास वाढविला आणि अन्यायाचा प्रतिकार करण्याचे साहस त्यांच्यात आणले. रावणावर विजय मिळविल्यावर कृतज्ञता व्यक्त करीत त्या सैनिकांना संदेश दिला की, **'निज निज गृह अब तुम्ह सब जाहू। सुमिरेहु मोहि डर पहु जनि काहू।।'** (मानस ६/११७/५) त्यांच्या जीवनातून भय कायम निघून गेले.

निःसंदेह रावण पराक्रमी होता, परंतु तो दक्षिण भारतीय नव्हता. हा सर्वच्या सर्व भारत आर्यावर्त आहे. आर्यांचे निवास-स्थान आहे. आर्य तो आहे जो आपल्या लक्ष्यापासून विचलीत

होत नाही. जो अस्तित्वाचा उपासक आहे, तो आर्य आहे. पण अस्तित्व फक्त आत्म्याचे असते. आत्माच अविनाशी परमतत्त्व, सनातन आहे, जो त्या सत्याला शोधणारा आहे, त्याच्या प्रति श्रद्धावान आहे, तो आर्य आहे. त्याला प्राप्त करण्याच्या गीतोक्त विधीचे जो आचरण करतो तो आर्यव्रती आहे. ज्याला परमेश्वराचे दर्शन, स्पर्श व स्थिति प्राप्त झाली आहे त्याला आर्यत्व प्राप्त झाले आहे. आर्य हे एका साधनेचे नाव आहे. भगवत्पथातील एका संकल्पाचे नाव आहे. कुठच्या जमिनीच्या भागाचे नाव नाही. आपला एक सख्खा भाऊ आर्य तर दुसरा अनार्य असू शकतो. अरब देशात जन्मलेलाही आर्य होऊ शकतो आणि भारतात एका ब्राह्मण परिवारात जन्मलेलाही अनार्य होऊ शकतो. पूर्ण दक्षिण भारत विशुद्ध आर्य आहे, आर्यांचा वंशज आहे. बिभीषण आर्य होता, रावणाचे पिता विश्रवा ऋषि आर्य होते. पुलह पुलस्तंचा संपूर्ण वंश आर्य होता. त्यांच्यातच जन्मलेला रावण अनार्य होता. त्याचे सासरे वगैरेअनार्य होते. अनार्यचा पर्यायी वैदिक शब्द 'दस्यु', असुर वा दानव, जे पिशाच्च वृत्तीचे होते. जे एकाच परमेश्वरावर श्रद्धा ठेऊन, निर्भर होऊन जीवन निर्वाह करतात ते आर्य आहेत, देवता आहेत.

आर्य हे पृथ्वीच्या कोणत्याही भागाचे नाव कधीही नव्हते की हे आर्य कोठून आले किंवा गेले. परंतु द्रविड हा शब्द स्थानसूचक आहे. संस्कृत वाङमयात आहे की, **'अस्ति द्रविडेषु काञ्ची नाम नगरी।'** द्रविड दक्षिण घाटावर असलेल्या भू-भागाचे नाव आहे. पंच द्रविड मधे द्रविड, कर्णाट, गुर्जर, महारा ष्ट्र आणि तैलंगाना असे प्रदेश येतात. भारताच्या राष्ट्रगीतात - 'पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, बंग। विंध्य हिमाचल.....' इत्यादि भारतातल्या विभिन्न खंडांची नावे आहेत. भागवतातसुद्धा भक्तिदेवीने 'उत्पन्ना द्रविडे साहं' (१/४८) म्हणून त्याची स्थानवाचकताच दर्शविली आहे.

आर्य उत्तर भारतातच रहातात असे म्हणणे चुकीचे आहे. तसेच द्रविड अनार्य आहेत हा एक भ्रम आहे. प्राचीन ऋषींच्या ग्रंथांमध्ये असे प्रयोग आढळणार नाहीत. महापुरुषांच्या नावावर प्रचारित काही अर्वाचीन साहित्यात ह्या शब्दांचा जातिवाचक प्रयोग हे विदेशी शासकांनी निव्वळ स्वार्थासाठी केलेले कूटनीतीचे एक अंग होते. शास्त्राचे ज्यांना थोडे जरी ज्ञान आहे त्यांना असा भ्रम कधी होणार नाही. महर्षि वाल्मीकिंची वाणी, वेदव्यासांची वाणी, उपनिशदांतील सूक्ते, भगवान महावीर व भगवान बुद्धांची वाणी, गोस्वामी तुलसीदासांचे साहित्य - ह्या सर्वांत आर्य म्हणजे एक साधना पद्धति आहे आणि द्रविड, अंग, बंग, पंजाब इत्यादि विविध भू-भागांची संबोधने आहेत.

जर फक्त उत्तर भारतच आर्यावर्त असता, त्याच प्रदेशात आर्य रहात असते तर, 'कृण्वंन्तु विश्वमार्यम्' विश्वाला आर्य कसे बनवायचे? ऋषींचे आव्हान आहे की पूर्ण विश्वाला आर्य बनवा. अंधारात पडलेल्या अचेतन जीवांना जागे करा. आसुरी संपत्ति अधोगती आणि नीच

योनींचे कारण आहे. ज्याने देवांनाही दुर्लभ असे मानव शरीर प्राप्त केले आहे असा हा पुरुष नीच योनीकडे चालला आहे. त्याला कल्याणाचा मार्ग दाखवा. कृण्वंन्तु विश्वमार्यं त्याला अविनाशी हे जे तत्व आहे त्या परमात्म्याचा उपासक बनवा. आपल्या पूर्वजांच्या आमंत्रणाचे विश्वाने मनापासून स्वागत केले. आर्य-संस्कृति संपूर्ण विश्वात पसरायला लागली. आजपण अमेरिकेसारख्या खूप दूरच्या देशात पुरातन शिव मंदिराचे अवशेष मिळत आहेत, इंका आणि माया हयांसारख्या संस्कृती मिळत आहेत. हिटलर स्वतःला आर्य म्हणत असे. जर्मन स्वतःला आर्य म्हणतात. रशियाची मूळ विचारधारा आर्यच होती. पूर्वज सर्व विश्वाला भाऊबंध बनवून गेले-'वसुधैव कुटुम्बकम्' आणि आपण आपल्याच घरात उच्च-नीच, जात, शिवाशिव, आर्य-द्रविड अशा कृत्रिम भिंती घालून संकुचित होत चाललो आहोत. ही तर ब्रिटीश शासकांची कुटिल निती होती. त्या काळी भारत अशिक्षित होता. भारतीयांची कमजोरी ओळखून त्यांनीच हा प्रश्न उकरून काढला की आर्य इथून आले, तिथून आले, उत्तर भारतात स्थायिक झाले आणि त्यांनी मुळच्या भारतीयांना दक्षिणेकडे हाकलून लावले. उत्तर भारतातून राम-लक्ष्मण आले व त्यांनी दक्षिण भारतायांशी लढाई केली. ही भ्रांति समूळ नष्ट करण्यासाठी प्रत्येक मुलाला बोध करविणे आवश्यक आहे की आर्य म्हणजे काय?

संपूर्ण युद्धात रामाने रावण, कुंभकर्ण अशा दोन-तीन राक्षसांचा वध केला. एक-दोन राक्षसांचा वध लक्ष्मणाने केला. बाकी अमाप राक्षस सेनेचा वध तर वानरांनी केला; दक्षिण भारतीयांनी केला. कारण रामाने त्यांच्यात शौर्य जागृत केले होते. युद्ध संपल्यावर देवेंद्र म्हणाला, ''प्रभु आणखी काही आज्ञा?'' राम म्हणाला, ''ह्या वानरांनी मला खूप साथ दिली, त्यांना जीवन प्रदान करावे.'' अमृत-वृष्टी झाली ज्यामुळे अस्वल-वानरे जिवंत झाली. राक्षस जिवंत नाही झाले कारण त्यांना रामाने आपल्यात समाविष्ट केले होते. अशाप्रकारे ह्या महान युद्धात दक्षिण भारतातील एक उंदिर सुद्धा मेला नाही. सर्व अस्वल-वानरें सकुशल जिवंत परत आली.

रामाने दक्षिण भारतातच नव्हे, तर उत्तर भारतातील राक्षसांचा पण नायनाट केला. खर-दूषण, विराध, त्रिशिरा आणि ताडका ह्या राक्षसांचा अंत तर आधीच केला होता. समुद्र पलिकडे जावयास मार्ग देत नव्हता. रामाने धनुष्याला बाण लावला तेव्हा भयभीत होऊन समुद्राने सेतू बांधण्याचा उपाय सांगितला. राम म्हणाला, ''ह्या धनुष्याला लावलेल्या बाणाचे मी काय करू? हा अमोघ आहे. धनुष्याला लावल्यावर हा कोणाचातरी वध करूनच शांत होतो. तेव्हा सांगा कोणाचा वध करू?'' समुद्र म्हणाला, ''प्रभु जे राक्षस आपल्या समोर आले त्यांचा तर तुम्ही वध केला. परंतु त्यांचे जाळे अजूनही पसरलेले आहे.'' **'एहि सर मम उत्तर तट वासी। हतहु नाथ खल नर अधरासी।।'** दक्षिण समुद्राचे काय उत्तर होते तर हिमालयापर्यंत संपूर्ण भारतात आणि हिमालयाच्या पलिकडील पापांच्या राशी असंलेले जितके दुष्ट राक्षस आहेत,

रावणाचे अनुयायी आहेत त्या सर्वांचा वध करा. रामाने 'एवमस्तु' म्हणून भारतात लपलेल्या सर्व राक्षसांचा वध केला आणि लंकेला गेल्यावर तेथील राक्षसांचाही वध केला. एका प्रकारे रामाने विश्वभरात पसरलेल्या राक्षसांच्या आत्याचाराना मुळासकट उपटून टाकले , कारण रावणाने एक-एक करून जगाच्या प्रत्येक कोपऱ्यातील राक्षसांना लंकेला बोलविले होते. पाताळ लोकीचे राक्षसपण ह्या युद्धात सामील झाले होते. असे म्हणतात की सूर्याची मध्यान्ह किरणे जेव्हा पृथ्वीवर पडतात तेव्हा पाताळात मध्यरात्र होते. हे अंतर अमेरिका आणि भारतात आजपण आहे.

रामाने विजय झाल्यावर बिभीषणाला राज्याभिषेक केला, त्याच्याकडून काही घेतले नाही. लंका उद्ध्वस्त झाली होती, परंतु सोन्याच्या लंकेचे काही नुकसान झाले नव्हते. सोन्याचे काही नुकसान होत नाही. लोकांनी पूर्ववत् लंका निर्माण केली. लंका परत तयार झाली. **'जो सम्पति सिव रावनहिं, दीन्ह दिये दस माथ। सोइ सम्पदा बिभीशनहिं, सकुचि दीन्हि रघुनाथ दिये ।।'** (मानस ५/४९) रामाने ती संपत्ति संकुचित होऊन दिली कारण रामाचे काम संपत्ति देणे नसून अभयपद देणे आहे. लंकेची संपत्ति रामाच्या दृष्टीने काहीच नव्हती. रामाने त्या संपत्तिमधून काही घेतले नाही. जेव्हा ते अयोध्येला आले तेव्हा रिकाम्या हातांनीच आले. माता कैकयीचा तसा आदेशच होता की वनवासात तपस्वी आणि उदासीन होऊन राहिले पाहिजे. जर रावणाकडून दोन-चार तोळे काही सोने वगैरे घेऊन आले असते तर कैकयी रागावली असती, की तेथे व्यापार करायला गेला होतात काय? ते ज्या अवस्थेत गेले होते त्याच अवस्थेत अयोध्येला परत आले. रिकाम्या हाती गेले, रिकाम्या हाती परत आले. सर्वप्रथम कैकयीकडे जाऊन त्यांनी हे प्रमाणित केले की जसाच्या तसाच परत आलो आहे. रामाने दक्षिण भारतातील भित्रेपणा, फूट पाडणे समाप्त केले. त्यांचे साम्राज्य त्यांना परत करून संपूर्ण पृथ्वीला बाधारहित केले. राक्षसी संस्कृतीचा अंत केला.

जेव्हा रामराज्य झाले तेव्हा, **'बयरु न कर काहू सन कोई। राम प्रताप विषमता खोई ।। नहिं दरिद्र कोउ दुखी न दीना। नहि कोउ अबुध न लच्छन हीना ।।** मानस' (७/१९/२०) सर्व प्रबुद्ध होते, कोणी दरिद्री नव्हते. **'अल्पमृत्यु नहिं कवनिउ पीरा'** - सर्वांचे स्वास्थ्य चांगले होते व सर्व धन धान्याने परिपूर्ण होते. **'राम भगति रत नर अरु नारी। सकल परम गति के अधिकारी ।।'** (मानस ७/२०/४) सर्व एका परमात्म्याच्या प्रति श्रद्धावान होते, एक रामाच्या प्रति समर्पित होते. दक्षिण भारतातील लोकांचे पण असेच होते. पूर्ण भारत आर्यावर्त होता. समुद्रापलिकडून ज्या दुर्व्यवस्था आल्या होत्या त्या समाप्त झाल्या आणि आर्यावर्त जसाच्या तसा सुरक्षित झाला.

अवर्ण आणि सवर्ण असे विभाजन भगवान रामाच्या जीवनकाळात नव्हते. जीवनभर रामाने अधम मानले गेलेल्यांचाच उद्धार केला. केवट, वानर, अस्वल, जंगली आदिवासी, शबरी, राक्षस अशा अधमांना रामाने धार्मिक बनविले. अधमचा अर्थ आहे अधार्मिक, धर्माची व्याख्या न जाणणारा, संस्कृति-रहित, रामाने त्या सर्वांना धार्मिक बनविले. 'गीध अधम खग आमिष भोगी.' त्यांना अशी गती दिली की जी योग्यांनाही दुर्लभ आहे. त्यांनी अधम म्हणवणाऱ्या सर्वांचा उद्धार केला परंतु एकाही ब्राह्मणाला तारले नाही. केवळ महर्षि वशिष्ठांनी त्यांच्याकडे अपांय न होणाऱ्या शक्तिची याचना केली. ज्या गुरुंकडून शिक्षण घेतले, त्यांनाच राम एवंमस्तु कसे म्हणणार? 'मौनं स्वीकार लक्षणम्' असे मानले तर रामाने एका ब्राह्मणाला अवश्य तारले. तर मग कोण म्हणते की रामायण सवर्णियांचे आहे?

वनवासकाळात दक्षिण भारतातील संत-महात्म्यांनी रामाला भरपूर सहयोग दिला. महर्षि अगस्ती जे तेथेच जन्मले होते त्यांनी कोदंड (धनुष्य) दिले. समृद्ध तामिळ भाषा ह्याच महर्षिंपासून उत्पन्न झाली आहे. अगस्तींनी दिलेल्या बाणानेच रावण मारला गेला. दक्षिण भारतीय सुतीक्ष्णानी पण रामाला एक तलवार भेट दिली. तामिळ लोकांना तर गर्व वाटला पाहिजे की रामाने त्यांचा उद्धार केला. सर्वांना संगठित-सुव्यवस्थित केले. पुऱ्या दक्षिण भारतातील राक्षसांचे पडाव रामाच्या नेतृत्वाखाली दक्षिण भारतीयांनी नष्ट केले व शाश्वत जीवन प्रदान केले.

वस्तुतः भारतात अशी कोणतीच जात नाही की जिला धर्म म्हटले जाते. जाती म्हणजे कुळ-गोत्राचे दाखले होते. परंतु धर्म म्हणजे एका परमेश्वराला धारण करण्याची क्रिया आहे. जो अस्तित्वाचा उपासक आहे तो आर्य आहे आणि प्रकृतिरूपी अंधाराकडे ज्याची गती आहे तो अनार्य आहे. तोच असुर पण आहे. मनुष्यमात्रांचे स्वभावपण दोन प्रकारचे असतात - देवतांसारखा आणि असुरांसारखा. परमदेव परमात्म्याची जागृति, दर्शन, स्पर्श आणि स्थिती हा आर्यावर्ताचा आध्यिात्मिक विधी आहे ज्याचे सांगोपांग विवरण रामायण, गीता, रामचरित मानस अशा ग्रंथांमधे सर्वत्र आहे. परंतु मूळ शास्त्र गीता आहे. हे आदिदर्शन आहे, मनु महाराजांना वंशपरंपरेने प्राप्त झालेली आहे आणि मूलतः संस्कृतमधे आहे. आता संस्कृत बोली भाषा राहिली नाही. हिंदी राष्ट्रभाषा झाली आहे. तेव्हा भगवान श्रीकृष्णांचा आशय जसाच्या तसा समजण्यासाठी गीतेचे हिंदी अथवा मराठी भाषांतर 'यथार्थ गीता' ह्याचे वाचन दोन-तीन वेळा अवश्य करावे.

**॥ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय॥**

# महाभारताची ऐतिहासिकता

महाशय,

आपल्या सौजन्याने श्री. माधव गोविंद वैद्य ह्यांनी ६.२.०६ तारखेला यथार्थ गीतेवर लिहिलेले विद्वत्ताप्रचूर पत्र वाचले. प्रस्तावना, पहिले तीन अध्याय व तेराव्या अध्यायाचे भाष्य सखोल वाचल्यावर काही मुद्यांवर त्यांनी असहमती दर्शीविली आहे व आपल्या मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

१) विद्यमान महाभारताची रचना तीन अवस्थांमध्ये झाली. व्यासांनी लिहिलेला 'जय' नामक इतिहास केवळ सहा हजार श्लोकांचा बनलेला होता. नंतर जनमेजयाच्या सर्प सत्राच्या प्रसंगी वैशंपायन ऋषी तीच कथा  बरेच दिवस सांगत होते आणि तो चोवीस हजार श्लोकांचा ग्रंथ झाला. त्यानंतर शौनकजींच्या बारा वर्षांच्या सत्रात सौतीने ती कथा सांगितली व जवळजवळ एक लाख श्लोक झाले. एक लाखात केवळ सातशे श्लोकांच्या गीतेचे एक छोटेसे प्रकरण आहे. पूर्ण महाभारताच्या केवळ ०.७ हिस्सा. परंतु दोन गोष्टी निश्चित होत्या-

अ) अर्जुन लढण्यासाठी आला होता. पण रंणागणावर  लढण्याची त्याची इच्छा नव्हती.

ब) शेवटी तो लढला व विजयी झाला.

२) अडगडानंद महाराजांची व्याख्या जर बरोबर धरली तर सारा महाभारत एक रुपक कथा (Allegory) बनून जाईल. असे मानले जाते की तो एक इतिहास आहे. योग समजून देण्यासाठी इतक्या मोट्या कथेच्या रचनेचे प्रयोजन असू शकत नाही. त्यातील पात्रांची नावे ऐतिहासिक आहेत. त्यांचा यौगिक अर्थ काढल्याने इतिहास हरवून जाईल. गीतेचा मूळ अर्थ योग नाही.

३) क्षेत्र शरीरवाचक शब्द आहे, हे सांगण्यासाठी महाराजांना तेराव्या अध्यायापर्यंत जावे लागले. क्षेत्र-क्षेत्रज्ञ हा मुद्दा प्रमुख असता तर प्रारंभीच त्याचे विवेचन असते.

४) जरी अर्जुनाला अनुरागाचे प्रतीक मानले तरी भीष्म 'भ्रम' कसा किंवा भीम 'भाव' कसा? हृदयस्थ भावाला वृकोदर ही संज्ञा उपयुक्त आहे का? द्रोण, अश्वत्थामा, विकर्ण, कर्ण, नकुल, सहदेव, काशीराज, शिखंडी आणि या सर्वांच्या शंखांच्या नावांचे विवेचन शब्दार्थ शास्त्राच्या विपरीत आहे.

५) 'हृषिकेश' मध्ये हृषीक शब्दाचा अर्थ इंद्रिय (Senseorgan), त्याचा स्वामी म्हणजे त्यांना आपल्या स्वाधीन ठेवणारा. म्हणून भगवान श्रीकृष्णांना हृषिकेश म्हटले गेले आहे.

महाराजांनी हृषीकचा अर्थ हृदय असा केला आहे. थोडेफार संस्कृत जाणणारासुद्धा हे मान्य करणार नाही.

६) 'कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्मा सनातनाः' ह्यामध्ये 'सनातन' हे कुलधर्माचे विशेषण आहे. ते Predicate नाही. कुलधर्माचा अर्थ सनातन धर्म असा नाही.

७) 'कौमारं यौवनं जरा' - ह्या देहाच्या अवस्था आहेत. देहीच्या नाहीत. देहधारी जीवात्म्याच्या ह्या अवस्था नाहीत.

८) श्रीमद्भगवद्गीतेचे तात्पर्य कर्मयोग आहे. भगवान श्रीकृष्णांनी कर्माचे असे कौशल्य सांगितले की ज्याने कर्माचे बंधन वा पाप कर्म करणाऱ्यास लागत नाही. सर्व कर्म आस्थापूर्वक परंतु अनासक्त होऊन केली पाहिजेत. ध्यान-धारणेच्या ज्या गोष्टी आहेत त्या चांगल्या सांगितल्या आहेत. परंतु गीतेचे ते तात्पर्य होऊ शकत नाही.

श्री. वैद्य यांच्या आक्षेपांबाबत मी खालीलप्रमाणे खुलासा करतो.

सर्वप्रथम आपण हाच आक्षेप विचारात घेऊया की ज्यात महाभारत तसेच गीतेच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह टाकले आहे की विद्यमान महाभारताचा ढाचा त्याच्या काही आवृत्त्यांनंतर विस्तारित झाला. त्यामुळे त्यातील मूळ जय काव्य किती आहे हे निश्चित करणे कठीण आहे. विदेशियांनी पसरविलेला तसेच अज्ञानापायी भारतीयांनी समर्थन दिलेला हा कारस्थानपूर्ण आक्षेप, भारतीयतेचे पुरोहित आणि राष्ट्रीयतेची पताका वाहणाऱ्या श्री. वैद्य ह्यांच्याकडून आला ही गोष्ट चिंताजनक आहे. महाभारताच्याच आंतरसाक्षीवरून हे स्पष्ट आहे की विद्यमान एक लाख श्लोकांचा ग्रंथच महाभारत आहे, तोच 'भारत' होता आणि त्याचेच नाव 'जय' ही होते.

अनुक्रमणिका पर्वात असे आहे की -

**कृष्णद्वैपायन प्रोक्ताः सुपुण्या विविधाः कथाः ॥**
**कथिताश्चपि विधिवद् या वैशम्पायनेन वै ।**
**श्रुत्वाहं ता विचित्रार्था महाभारत संश्रिताः॥ (महा.अनु. १/११)**

परिक्षितनंदन जनमेजयाच्या सर्पसत्रात वैशंपायनांनी, कृष्ण द्वैपायन व्यासांच्याद्वारा सांगितलेल्या विचित्र अर्थांनी युक्त असलेल्या महाभारतातील ज्या कथा सांगितल्या, त्या मी ऐकून आलो आहे, असे नैमिषारण्यात कुलपति शौनक ह्यांच्या बारा वर्षांच्या यज्ञामध्ये सौति उग्रश्रवा ह्यांनी सांगितले.

अनुक्रमणिका पर्वाच्याच पुढील पंक्तिंमध्ये असे आहे की, धृतराष्ट्र इत्यादींना परमगति प्राप्त झाल्यावर व्यासांनी प्रथम महाभारताची रचना करून तो मनुष्य लोकांत प्रकट केला. सर्पसत्रात जनमेजय आणि हजारो ब्राह्मणांनी प्रश्न केल्यावर आपला शिष्य वैशंपायन ह्यास व्यासांनी महाभारताची कथा ऐकविण्याचा आदेश दिला. वैशंपायनांनी व्यासांच्या तौंडून ऐकलेली कथा जनमेजयास सांगितली व तीच कथा सौतीने शौनकाला ऐकविली.

**इदं शत्त सहस्त्रं तु श्लोकानां पुण्य कर्मणाम् ॥१०१॥**
**उपाख्यानैः सह ज्ञेयमाद्यं भारतमुत्तमम् ।**
**चतुर्विंशति साहस्त्रं चक्रे भारतसंहिताम् ॥१०२॥**
**उपाख्यानैर्विना तावद भारतं प्रोच्यते बुधै ।**
**ततोऽप्यर्धशतं भूयः संक्षेप कृतवानृषिः ॥१०३॥**
**अनुक्रमणिकाध्यायं वृत्तान्तं सर्वपर्वणाम् ।**
**इदं द्वैपायनः पूर्व पुत्रमध्यापयच्छुकम् ॥१०४॥**
**ततोऽन्येभ्योऽनुरूपेभ्यः शिष्येभ्यः प्रददौविभुः ।**
**षष्टिंशत सहस्त्राणि चकारान्यां चे संहिताम्॥१०५॥**
**त्रिंशच्छतसहस्त्रं च देवलोके प्रतिष्ठितम् ।**
**पित्र्ये पञ्चदशं प्रोत्त्कं गन्धर्वेषु चतुर्दशः ॥१०६॥**
**एकं शत सहस्त्रं तु मानुषेषु प्रतिष्ठितम् ।**
**नारदोऽश्रावयद् देवानसितो देवलः पितन्॥१०७॥**
**गन्धर्व यक्ष रक्षांसि श्रावयामासवै शुकः ।**
**अस्मिंस्तु मानुषे लोके वैशम्यायन उत्त्कवान ॥**
**शिष्यो व्यासस्य धर्मात्मा सर्ववेदविदां वरः ।**
**एक शतसहस्त्रं तु मयोत्त्कं वै निबोधत ॥**

लोमहर्षण ह्यांचे सुयोग्य पुत्र सौति उग्रश्रवा म्हणतात की पुण्यकर्म करणाऱ्या लोकांच्या कथांसहित एक लाख श्लोकांचा 'आदि भारत' आहे. उपकथांना वगळले तर २४,००० श्लोकांचा तोच भारत आहे. त्यानंतर पुन्हा संक्षेपाने दिडशे श्लोक आणि पर्वांच्या वृत्तांताची एक अनुक्रमणिका रचली गेली.

कृष्ण द्वैपायन ह्यांनी आपला पुत्र शुक ह्यास महाभारत प्रथम ऐकविले. त्यानंतर समर्थ ऋषिंनी अन्य योग्य शिष्यांना ते प्रदान केले. तत्पश्चात् महर्षि व्यासांनी साठ लाख श्लोकांची दुसरी भारत संहिता रचली. त्यातील तीस लाख श्लोक देवलोकांत प्रतिष्ठित झाले. नारदांनी ते देवलोकांत ऐकविले. असित, देवल ह्यांनी पितरांना एक लाख श्लोक ऐकविले. शुकदेवाने

त्यातलेच चौदा लाख श्लोक गंधर्व आणि यक्षांना ऐकविले. मनुष्य लोकांत एक लाख श्लोक वैशंपायनांनी ऐकविले. तेच एक लाख श्लोक मी सांगणार आहे. आपण सर्वजण ते आत्मसात करा.

ह्या सर्वांचा आशय इतकाच आहे की भरतवंशी लोकांच्या कथांच्या रुपात व्यासांनी चोवीस हजार श्लोकांचे जयकाव्य किंवा 'भारत' ह्याची संकल्पना (रुपरेखा) केली. त्यानंतर धर्म, अर्थ, काम, मोक्ष प्रदान करणारी आख्याने त्यास जोडल्याने ते एक लाख श्लोकांचे महाभारत झाले. त्यामध्येच दिडशे श्लोकांची अनुक्रमणिका एका अध्यायाच्या रुपात आहे. महाभारतापासून भिन्न अन्य महाभारत-'जय' वा 'भारत' नामक ग्रंथ अस्तित्वातच नाहीत. असो, तर महाभारतातील श्लोकांची संख्या वेळोवेळी वाढवली गेली असे म्हणणे भ्रमपूर्ण आहे. वास्तविक महाभारत विस्तारित झाला आहे ही गोष्ट नाकारता येत नाही. तसे तर आपणही मानता की महाभारतात एक लाख श्लोक आहेत म्हणूनच आपण असे लिहिले आहे की एक लाख श्लोकांत गीता हे सातशे श्लोकांचे एक छोटेसे प्रकरण आहे. ०.७ प्रतिशत हिस्सा ह्याचा अर्थ महाभारतात एक लाख श्लोक आहेत हे आपल्यालाही मान्य आहे.

इतक्या मोठ्या ग्रंथाचे 'गीता' हे एक छोटेसे प्रकरण आहे. पुऱ्या महाभारताचा ०.७ प्रतिशत हिस्सा. पण त्यामुळे गीतेचे महत्त्व कमी होत नाही. ती तर महाभारताचे सार आहे. स्वतः महाभारतकारांच्या शब्दात...

**भारतामृत सर्वस्य गीताया मथितस्य च।**
**सारमुदधृत्य कृष्णेन अर्जुनस्य मुखे हुतम् ।। (महा. भीष्म ४३/५)**

'भारत' रूपी अमृताचे मंथन करून त्यातील गीतारूपी सार काढून कृष्णाने अर्जुनाच्या मुखात घातले.

धृतराष्ट्र स्वर्गलोकी गेल्यावर जेव्हा युधिष्ठिराचे राज्य चालू होते, त्या काळात महाभारत लिहिले गेले. परंतु गीतेची उत्पत्ति युद्धाच्या पहिल्या दिवशीच झाली होती. गीता तर महाभारताच्या आधीचा इतिहास आहे. महाभारतासारख्या विशाल इतिहासापुढेसुद्धा आपण तिच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही.

आता दुसऱ्या मुद्यावर येऊ या की स्वामीजींची व्याख्या सत्य धरून महाभारतातील पात्रांना रुपकात्मक मानले तर संपूर्ण महाभारत एक रुपक वा कल्पना बनून जाईल व आपला इतिहास हरवून जाईल. अभिमानाची गोष्ट आहे की आपणाला आज आपल्या इतिहासाची आठवण तर झाली. निःसंदेह महाभारत हा इतिहास आहे, परंतु आपण तो केव्हाच विसरून गेलो आहोत. महाभारत शौर्य, पराक्रम, पाठ न दाखविणे शिकवितो, पळपुटेपणा शिकवित

नाही. परंतु आजचा सारा भारतच पळपुटा आहे. कोठे सांप्रदायिक दंगे झाले की तथाकथित बहुसंख्य हिंदुंना लपण्यासाठी वा पळण्यासाठी गल्ली बोळ मिळत नाही. काय महाभारताने हेच शिकविले आहे? काय हाच इतिहासाचा प्रभाव आहे? इतिहास साक्षी आहे की फक्त दहा-पंधरा हजार लोक अरबस्तानातून आक्रमण करायला आले. ते लाखो हिंदूंना त्यांच्याच दोरखंडांनी बांधून घेऊन गेले व बगदाद वा अन्य शहरांमध्ये दोन-दोन रूपयांना विकले. कधी-कधी तर एक दिनारला पाच-पाच हिंदू विकले गेले. लाखो हिंदू कैदी मारले गेले व त्यांच्या मुंडक्यांचे डोंगर रचले गेले. ते शस्त्रहीन असूनसुद्धा एकत्रित होऊन जर त्यांच्यावर तूटून पडले असते तर इतिहास काही वेगळाच घडला असता. हा भ्याडपणा कोठून आला? यथार्थ गीता तर आज लिहिली गेली आहे, इतिहासाला तर आपल्या पूर्वजांनी केव्हाच नकार दिला आहे.

धर्मगुरुंनी सांगितले की महाभारत वाचू नका अन्यथा तुमच्याच घरात महाभारत होईल. इतके मोठे साहित्य अभ्यासाला काही वर्षे जरुर लागतील आणि दरम्यान घरात काही दुर्घटना घडणे पण स्वाभाविकच आहे. पण त्याचा दोष मात्र लोक महाभारताला द्यावयास लागले. महाभारत कथेच्या वाचनाची परंपरा हळूहळू लुप्त होत चालली. ज्या महाभारताला वेदांचाही वेद, पंचमवेद मानले जायचे, जी गोष्ट ह्याच्यात नाही ती इतरही कोणत्या ग्रंथात आढळणार नाही -अशा मौल्यवान ग्रंथावर प्रतिबंध लावला गेला. कारण महाभारत प्रचलित असताना वाईट रीतींना पसरविणे शक्य झाले नसते व पुढील काळातील व्यवस्थाकारांची तीच इच्छा होती. शिक्षणाचा अधिकार एकाच वर्गातील लोकांपुरता सिमित ठेऊन त्यांनी स्वार्थमयी व्यवस्थांना धर्म म्हणून प्रसारित केले. अशिक्षित, श्रद्धाळू जनतेची भितीमुळे पिळवणूक होऊ लागली. हा महाभारताच्या विस्मृतीचा परिणाम होता.

महाभारत ही आपल्या पूर्वजांची शौर्य-गाथा आहे. समुद्रापलीकडील निवात कवचांबरोबर अर्जुन युद्ध करायला गेला, विजयी झाला आणि परत आला. परंतु आपल्या 'स्मृति' सांगतात की समुद्र पार केला की आपला सनातन धर्म लोप पावतो. सीतेने समुद्र पार केला तरी आपण तिची पूजा करतो, श्रीरामाच्या वामांगी तिची स्थापना करतो. 'सीतासमारोपित वामभागम् ।' हनुमान व पूर्ण फौज समुद्र पार करून गेली व परत आली. आता समुद्र पार करणे, न करणे ह्याचा धर्माशी काय संबंध? शरीर नष्ट होऊ शकते. समुद्र पार केल्याने धर्म कसा नष्ट होईल? चिरकाल टिकणारे कसे नष्ट होऊ शकेल? अविनाशीचा विनाश कसा शक्य आहे? काय हा अंधविश्वास आपल्याला इतिहासाची देणगी आहे?

महाभारतात असलेल्या दैदिप्यमान गीतेचा संदेश आहे की, **'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।'** गीता सांगते की शरीर हे एक वस्त्र आहे, त्याच्यात परिवर्तन होते, ते मरत नाही. अभिमन्यूला वीरगति प्राप्त झाल्यावर अश्रु ढाळणारी पांडवांची सेना हळू-हळू माघार घेऊ लागली. तेव्हा धर्मराज युधिष्ठिर फौजेच्यासमोर जाऊन उभे राहिले व म्हणाले,

''शूरवीरांनो अभिमन्यूसाठी शोक नका करू. त्याने दहा हजार मुकुटधारी महारथी राजकुमारांचा वध करून महान पुण्य कमविले आहे व तो सनातन लोकांत गेला आहे.'' आजचे व्यवस्थाकार सांगतात की मुंगीलाही मारु नका. शुद्रास मारल्यास दहा गायी दान द्या. केरसुणीने केर काढल्यास पाप लागते. जंगलातसुद्धा काही जीव आपल्याहातून मेले असतील तर येऊन सांगायचे व मृत्युकर द्यायचा. नाही सांगितले तर रौरव नरकात जावे लागेल. प्रत्येक जीवाच्या मृत्युमागे भारतीय नागरिकाला आपला नरक दिसत असेल. महाभारत तर होताच पण त्यावर प्रतिबंध आज नव्हे तर केव्हाच लावला गेला होता. महापुरुषांनी महाभारतातून गीतेला वेगळे काढून तिला स्वतंत्र ग्रंथाची मान्यता दिली. भगवान म्हणतात **'इति गुह्यतमं शास्त्रं'** (गीता १५/२०) अत्यंत गोपनीय शास्त्र, **'ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।'** (गीता १२/२०) ह्या धर्ममय अमृताचे जो शास्त्रानुसार सेवन करतो तो योग्यांमधील अति उत्तम योगी मला प्रिय आहे. तर त्यावरही व्यवस्थाकारांनी प्रतिबंध लावला की गीता घरात ठेऊ नये, अन्यथा ती वाचून तुमची मुले संन्यासी होतील व तुम्ही पुत्रहीन व्हाल. ह्या गौरवशाली ग्रंथाच्या जागी शेकडो स्मृति स्थापित झाल्या. भ्याडपणा, पळपुटेपणा हा ह्याच नवीन व्यवस्थाकारांची देणगी आहे, 'यथार्थ गीतेची' नाही. योगपूरक 'यथार्थ गीतेच्या' भाष्याने इतिहास हरपणार नाही, तो तर आपण आधीच हरवून बसलो आहोत. इतिहास जर का लक्षात असता तर आपण पळपुटेपणा का केला? भारत गुलाम का झाला? आनंद वाटतो की आज इतिहासाची आठवण तरी झाली.

निःसंदेह महाभारत हा आपला गौरवशाली इतिहास आहे. ज्यामधे सृष्टीच्या आरंभापासून ते द्वापारयुगापर्यंतच्या भरतवंशीयांचे विवरण आहे. ज्यात खाणे-पिणे, रहाणीमान, मित्रता-शत्रुत्व, युद्धकौशल्य, विविध अस्त्र-शस्त्रांचे शोध, राजनीति, लोकनीति, भेदनीति, माता-पिता, पति-पत्नी, भाऊ आणि मित्रांबरोबर सद्‌व्यवहार, कृषि, उद्योग, व्यापार इत्यादि सर्व नमूद आहे. प्रत्येक कार्य हे परमेश्वराच्या स्मरणाने आरंभ करणे व परमेश्वराच्या स्मरणानेच संपन्न करणे ही भारतीय संस्कृति आहे. परमेश्वराला विसरून नुसते कार्य करणे म्हणजे केवळ कृती करणे होय. महाभारत हे संस्कृति शास्त्र आहे, परंतु त्याहीपेक्षा प्राचीन भारतीयांचा मूळ इतिहास योग आहे.

भगवान आदि मनुपासून ह्या जगाची उत्पत्ति झाली. मनुपासून जन्माला आल्यामुळे आपणाला 'मनुज' म्हटले जाते. महाराज मनूला आपले पिता सूर्य यांच्यापासून गीता परंपरेने मिळाली. भगवान श्रीकृष्ण म्हणाले, ''अर्जुन कल्पाच्या सुरूवातीला हा अविनाशी योग मी सूर्याला सागितला. सूर्याने तो त्याचा पुत्र आदिमनु ह्यास सांगितला. सूर्याला वंशपरंपरेने मिळाला म्हणून आपला आदि इतिहास योग आहे, त्याचे क्रमबद्ध प्रस्तुतीकरण म्हणजे गीता होय. तोच योग मनुने आपला पुत्र इक्ष्वाकुला सांगितला.'' त्याकाळी लेखनाची कल्पनाच अवगत नव्हती.

ऐकलेल्या किंवा सांगितलेल्या गोष्टी स्मरणात ठेवल्या जायच्या. आठवणीचेच नाव स्मृति आहे. महाराज मनुने अशाप्रकारे स्मृति परंपरा चालू केली. त्यांच्यापासून क्रमा-क्रमाने राजर्षिंनी ती जाणली. ह्या महत्त्वपूर्ण काळानंतर मात्र ते ज्ञान लुप्त होत चालले. परंतु भगवान श्रीकृष्णांनी सांगितले की तोच पुरातन योग मी आता तुला सांगत आहे, कारण तू माझा प्रिय सखा आहेस, अनन्य भक्त आहेस. असो, तर गीता म्हणजे मनुस्मृतीच आहे.

योगेश्वर श्रीकृष्णांनी हे ज्ञान तेव्हा सांगितले जेव्हा महाभारतात रणभूमीवर दोन्ही सेना समोरासमोर उभ्या होत्या. 'प्रवृत्ते शस्त्रसंपाते' शस्त्र उचलण्यास तयार होत्या त्या वेळेस सांगितले. दोन्ही सेना स्तब्ध उभ्या होत्या, परंतु हे ज्ञान कोणीही ऐकले नाही, केवळ अर्जुनानेच ऐकले. भगवान म्हणतात, ''हे ज्ञान केवळ अधिकारी व्यक्तिलाच सांगितले पाहिजे.'' अर्जुन अधिकारी होता.

भीषण युद्धाच्या आरंभीच भगवान श्रीकृष्णांनी हे शास्त्र का कथन केले? भगवान हे चांगल्या प्रकारे जाणत होते की कोट्यावधी लोकांना मारून जो विजयी होईल, तो असफल मनोरथ, हतबलच राहील, सुखा-समाधानात, चैनीत राहूच शकणार नाही. शांतीचा लाभ होणार नाही. तेव्हा त्यांनी वास्तविक युध्दाचा (की ज्यामधे सतत रहाणारे जीवन, सतत रहाणारी समृद्धि व शांति मिळते) आरंभ ठीक अशावेळेला केला की विजयी झाल्यावरही जेव्हा निराशा येते त्या काळात ते चांगल्याप्रकारे समजेल. ठेच लागल्यावरच मनुष्य सांभाळून चालतो आणि तेव्हाच तो वैराग्योन्मुख होऊ शकतो. राजा भर्तृहारीला जेव्हा आपल्या प्रिय महाराणीमधे दोष दिसला तेव्हाच तो गृहत्याग करू शकला.

महाभारतातील युद्धात युठिष्ठिर विजयी झाल्यावरसुद्धा त्यांना हरवल्यासारखे झाले. रात्रंदिवस ते चिंतित रहायचे. कधी कर्णासाठी तर कधी इतर भावांसाठी. त्या गादीवर बसून त्यांनी काय मिळविले? इतक्यात असे कळले की यदुवंशी आपसात लढून मरण पावले व श्रीकृष्णांनीही धरतीचा परित्याग केला. असे दुःख झाले की सिंहासन, यशापयशाची नश्वरता दृष्टिपटलावर स्पशष्टपणे चमकून गेली. तत्काळ उठून त्यांनी सिंहासनाचा त्याग केला व गीतेत सांगितलेला मार्ग धरला.

म्हणून आपला मूळ इतिहास योग आहे. भारतीयांची मूळ ओळख त्यांची अध्यात्मिकता आहे. सृष्टीच्या आरंभापासून द्वापारपर्यंतचे वर्णन म्हणजे शेष महाभारत आहे. जे युद्ध झाले (गीतोपदेशानंतर) ती महाभारताची कथा आहे. घनघोर युद्ध क्षत्रियांमधे झाले, परंतु गीता हा आपला यौगिक इतिहास आहे. तेथूनच आपला इतिहास आरंभ होतो. भारतीयांचे रहाणीमान, खाणे-पिणे, युद्धकौशल्य, शौर्य-पराक्रम असे सर्व महाभारतात आहे. त्यामध्ये भारतीयांचा यौगिक उत्कर्ष कसा होता ह्याची रेखाटणी म्हणजे गीता होय. अशा गीतेस महाभारताच्या

मध्यभागी ठेवले कारण सृष्टीमधे विजय मिळविला तरी परिणामी ती हारच असते. गीतेतील विजय म्हणजे सदैव रहाणारी शांति प्रदान करणाऱ्या योग-दर्शनाची प्राप्ति आहे. त्यात फक्त सातशे श्लोक आहेत जे सुरूवातीपासून आजपर्यंत तेवढेच आहेत. शेष एक लाख श्लोकांचा महाभारत जसाच्या तसा सुरक्षित आहे.

पात्रांना रुपकात्मक प्रस्तुत करण्याने किंवा दृष्टांत वर्णिल्याने घडलेल्या घटना काल्पनिक होत नाहीत. प्रत्येक महापुरुषाची प्रस्तुत करण्याची स्वतःची शैली असते. कोणत्यातरी घडलेल्या घटनेला उदाहरणाच्या रूपात घेऊन मनातील अमूर्त भावांचे किंवा हृदय-देशातील पात्रांचे चित्रण केले जाते. हृदयस्थ यौगिक साधनेला समजवण्याची ही प्रथाच आहे. गोस्वामी तुलसीदासांच्या रामचरितमानसमध्ये

**राम नाम नरकेसरी, कनककसिपु कलिकाल ।**
**जापक जन प्रहलाद जिमि, पालिहि दलि सुरसाल ।। (१/२७)**

रामनाम नृसिंह भगवान् आहे, तर हिरण्यकश्यपु कलिकाळ आहे. हिरण्यकश्यपु सत्‌युगात झाला होता, जेव्हा कलि नव्हताच. संस्कृत वाङ्मयात हिरण्यकश्यपूचा शब्दकोशीय अर्थ कलिकाळ होत नाही. मग हिरण्यकश्यपुला कलिकाळ का म्हटले गेले? तर ते प्रतिकात्मक आहे. इथे नाम नाही तर गर्भितार्थ मुख्य आहे. त्याचप्रमाणे,

**रामकथा मंदाकिनी, चित्रकूट चित चारू।**
**तुलसी सुभग सनेह बन, सिय रघुवीर बिहारु ।। (१/३१)**

कूटस्थ चित्तच चित्रकूट आहे, रामकथा म्हणजे मंदाकिनी आहे. तर काय मंदाकिनी हरवून गेली? चित्रकूट नाही राहिला? इतिहास हरवून गेला? **'वपुष ब्रम्हांड सुप्रवृत्ति लंका'** (विनयपत्रिका, ५८) शरीर हेच सुव्यवस्थित ब्रम्हांड आहे व त्यात प्रेम लंका आहे. म्हणजे काय लंकेचा इतिहास हरवून गेला? महापुरुषांची समजावण्याची हीच पद्धत आहे. भगवान श्रीकृष्णांनीपण म्हटले की ,**'तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्'** - संसार सागर आहे म्हणजे काय तो जलाशय आहे? ती समजावण्याची शैली आहे. ह्या प्रतीकांच्या माध्यमातूनच क्षेत्र-क्षेत्रज्ञाचा संघर्ष समजावला गेला आहे. त्यात इतिहास हरविण्याचा किंवा घडलेल्या घटना काल्पनिक होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. इथे त्यांचा शब्दकोशीय अर्थ शोधण्याचे औचित्यच रहात नाही.

दुसऱ्या मुद्याबरोबरच चौथ्या मुद्याचे स्फस्रष्टीकरण झाल्यामुळे तिसऱ्या असहमती दर्शविलेल्या मुद्याकडे येऊया, ज्यामध्ये त्यांचा असा आक्षेप आहे की क्षेत्र शब्दाचे स्पष्टीकरण करण्यासाठी स्वामीजीं पहिल्या अध्यायातून एकदम तेराव्या अध्यायात का गेले?. ही तर योगेश्वर

श्रीकृष्णांची शैली आहे की शब्दाला प्रथमच ते परिभाषित करीत नाहीत. प्रथम ते त्याचा नामोल्लेख करतात, त्याच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकतात आणि शेवटी त्या शब्दाची व्याख्या सांगतात, त्याला परिभाषित करतात. उदाहरणार्थ, चौथ्या अध्यायात त्यांनी 'तत्वदर्शी' शब्दाचा उल्लेख केला परंतु तत्वदर्शन म्हणजे काय? हे तेथे सांगितले नाही. ते प्रकरण त्यांनी अठराव्या अध्यायात घेतले. तीच गोष्ट क्षेत्राच्या बाबतीतही आहे. पहिल्या अध्यायात त्यांनी त्याचे नाव घेतले व वेळ आल्यावर तेराव्या अध्यायात त्याचे स्पष्टिकरण दिले.

आणखीन दुसरे उदाहरण घेऊया. अध्याय २/३९ मध्ये त्यांनी कर्माचे नाव घेऊन सांगितले की आता ह्या बुद्धिला तू कर्मयोगाच्या संदर्भात ऐक, ज्यामुळे तू कर्म-बंधनातून चांगल्याप्रकारे मुक्त होशील. येथे त्यांनी कर्म म्हणजे काय ते सांगितले नाही. प्रथम त्यांनी कर्मयोगाची वैशिष्ट्ये सांगितली की ह्यामध्ये आरंभाचा नाश होत नाही, मर्यादित फळरूपी दोष नसतो, **'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात'**-ह्या धर्माचा स्वल्प अभ्याससुद्धा जन्म-मृत्यूच्या भयापासून उद्धार करणारा असतो. ह्यामध्ये एकच निश्चयात्मक क्रिया आहे. एकच बुद्धि आहे. मग तर जे बऱ्यांच क्रिया करतात ते काय भजन करीत नाहीत? साधना जाणत नाहीत? भगवान म्हणतात की अविवेकी लोकांची बुद्धि अनंत शाखांनी युक्त असते. त्यामुळे ते अनंत क्रिया करतात. 'स्वर्गपरा' -स्वर्गच सर्वात श्रेष्ठ आहे असे ते मानतात. 'वेदवादरतः' -वेदावरील वाद-विवादातच ते आसक्त रहातात. त्यांना अनंत जन्ममरणाचे फळ प्राप्त होते. असे लोक अनंत क्रिया नुसत्या करीतच नाहीत तर दिखावा करणाऱ्या शोभायुक्त वाणीने त्या व्यक्तही करतात. त्यांच्या मधुरवाणीची छाप ज्यांच्या मनावर पडते त्यांचीही बुद्धि नष्ट होते, त्यांना काहीही प्राप्त होत नाही. परंतु मी जे कर्म सांगणार आहे ते करून तुम्ही चांगल्याप्रकारे संसाराच्या बंधनातून मुक्त व्हाल.

अशाप्रकारे दुसऱ्या अध्यायात योगेश्वर श्रीकृष्णांनी कर्माचे उच्चारण केले, कर्माच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. कर्म करतेवेळी घ्यावयाच्या दक्षतेवर भर दिला की कर्म करण्यातच तुझा अधिकार आहे त्याच्या फळामधे नाही. फळाची इच्छा ठेवणारा होऊ नकोस. कर्म करण्यात तू अश्रद्ध होऊ नकोस, समर्पणासह कर्मात प्रवृत्त रहा, अशी दक्षता बाळगण्यावर भर दिला. परंतु कर्म म्हणजे काय? हे सांगितले नाही.

अध्याय ३/९ मध्ये त्यांनी सांगितले, **' यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः'** - अर्जुन यज्ञाची प्रक्रिया म्हणजेच कर्म होय. **' नियतं कुरु कर्म त्वं '** (३/८) कर्माचा एक निर्धारित विधि आहे. चौथ्या अध्यायात ते म्हणतात, **'एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे । कर्मजान्विद्धि तां सर्वाणि एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।'** (४/३२) श्वास-प्रश्वासाचे यजन म्हणजे यज्ञ होय, इंद्रियांच्या बर्हिमुखी प्रवाहाचे संयमाग्नीत हवन म्हणजे यज्ञ होय. योगाग्नि-

ज्ञानाग्नि मधे हवन म्हणजे यज्ञ. यज्ञाचा परिणाम म्हणजे अमृताचे सेवन व सनातन ब्रह्मची स्थिती. हा यज्ञ ज्या-ज्या उपायांनी संपन्न होतो, त्या-त्या उपायांचे नाव कर्म होय. इथे कर्म म्हणजे काय, ते स्पष्ट होते. ह्यानंतरही कर्मावर चर्चा आहे. सातव्या अध्यायात म्हटले आहे की हे पुण्य करणारे संपूर्ण ब्रह्माला जाणतात, संपूर्ण अध्यात्माला जाणतात, संपूर्ण अधिदैव, संपूर्ण कर्म, संपूर्ण अधियज्ञासहित मला जाणतात.

अशाप्रकारे दुसऱ्या अध्यायात त्यांनी क्षत्रिय वर्णाबद्दल सांगितले की क्षत्रियाला युद्धापेक्षा श्रेष्ठ दुसरे काही नाही (२/३१). अध्याय ४/१३ मध्ये भगवान म्हणतात, **'चातुर्वण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।'** -चार वर्णांची संरचना मी केली. चार भागांमध्ये काय विभागले गेले? भगवान म्हणतात की गुणांच्या माध्यमातून कर्माला चार भागांमध्ये विभागले गेले? ज्याचे वितरण झाले ती गोष्ट होती कर्म. जर कर्म काय ते समजले तर विभाजनही समजण्यात येईल. भगवान श्रीकृष्णांनी पुढे अठराव्या अध्यायात हा प्रश्न पूर्ण केला की वर्ण म्हणजे काय? म्हणजे त्यांनी क्रमा-क्रमानेच हा मुद्दा पूर्ण केला.

योगेश्वरांनी अध्याय ३-९ मध्ये प्रथम यज्ञाचा नामोल्लेख केला- **'यज्ञार्थात्कर्मणोन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः।'** परंतु यज्ञ म्हणजे काय? ते सांगितले नाही. प्रथम त्यांनी यज्ञ कोठून उत्पन्न होतो हे सांगितले. विधात्याने यज्ञासहित प्रजा निर्माण करून सांगितले की ह्यामुळे देवतांची उन्नति होईल व त्या तुमची उन्नति करतील. अशाप्रकारे परस्पर उन्नति करीत करीत परमश्रेयास प्राप्त करा. 'तैर्दत्तान्' - तोच एकमात्र देणारा आहे आणि हाच प्राप्तीचा मार्ग आहे. त्यांचा उत्कर्ष केल्याशिवाय जो म्हणतो की मला परमप्राप्ति झाली आहे, तो निश्चितच खोटा आहे, तोंड झाकण्यास लायक आहे, परंतु अजूनही हे नाही सांगितले की यज्ञ म्हणजे काय? चौथ्या अध्यायात त्यांनी विधिवत् यज्ञ म्हणजे काय ते सांगितले. स्थिती प्राप्त झालेल्या महापुरुषांचा यज्ञ ब्रह्मार्पणं ब्रह्माग्नि, संयमाग्नि, शब्दाग्नि, योगाग्नि, प्राणायाम असे क्रमशः सांगितले आणि सतराव्या अध्यायात स्पष्ट केले की हा यज्ञ शास्त्र-विधिनुसार निश्चित आहे. मनाचा निरोध करणारा आहे, तो करणेच कर्तव्य आहे आणि तो समर्पणासह केला जातो. ह्या अध्यायातच असा निर्णय मिळतो की यज्ञ म्हणजे असा विधि आहे की जो मनाचा निरोध करतो, यज्ञ असा विधि आहे की जो आपल्याला अमृताचे भोजन प्रदान करतो, सनातन बह्मामध्ये स्थिति देववितो. हीच शैली वापरून पहिल्या अध्यायात 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' मध्ये त्यांनी गीतेची प्रस्तावना केली की धर्म एक क्षेत्र आहे आणि कुरु एक क्षेत्र आहे. तेराव्या अध्यायात क्रमा-क्रमाने त्यांनी क्षेत्राचे विस्तृत स्पष्टिकरण केले. ह्या मुद्याचे सिंहावलोकन करण्याच्या हेतूने पहिल्या श्लोकाची व्याख्या देताना त्याबद्दल संकेत दिला गेला आहे, ह्या बाबतीत दुसरा काही अर्थ घेऊ नका.

चौथा असहमति दर्शविलेला मुद्दा असा आहे की 'हृषीक' ह्या शब्दाचा अर्थ इंद्रिय असताना, स्वामीजींनी हृदय होतो असे कसे सांगितले. हृषिकेश म्हणजे इंद्रियांना आपल्या स्वाधीन ठेवणारा. भगवान हृषिकेश आहेत. वस्तुतः ह्यात असहमतिची गोष्टच असू शकत नाही. आपण म्हणता तोच भाव 'यथार्थ गीतेतील' त्या शब्दाच्या व्याख्येत दिला आहे (पहा पृष्ठ १०). असे वाटते की ते स्पष्टिकरण आपल्या नजरेतून निसटले असावे. भगवान श्रीकृष्ण सद्गुरु आहेत. पान दहावर पहिल्या अध्यायाच्या पंधराव्या श्लोकाच्या अर्थामध्ये दिले आहे, ''इंद्रियांना वश करून त्यांना आपल्या सेवकाची श्रेणी देणे ही हृदयाला प्रेरणा देणाऱ्या सद्गुरुंचीच देणगी आहे.'' इंद्रियांना स्वाधीन करणे किंवा त्यांना वश करून सेवकाच्या श्रेणीत उभे करणे ही एकच गोष्ट आहे. तेथे इंद्रिय शब्दाचा प्रयोग केला गेला आहे.

आता ह्यावरही विचार करूया की इंद्रिय शब्दाच्या ठिकाणी हृदय शब्दाचा प्रयोग का केला गेला आहे? वस्तुतः इंद्रिये ही फक्त माध्यम असतात. डोळे बघतात परंतु निर्णय मात्र बुद्धि देते. म्हणजे डोळे बघत नाहित तर डोळ्यांच्या माध्यमातून बुद्धि बघते. कानाने श्रवण केले जाते, परंतु श्रवणाचे वास्तविक स्थान बुद्धि आहे, तीच इंद्रियांची संचालक आहे. तीच म्हणजे अंतःकरण, त्यालाच हृदय म्हटले गेले आहे. हृदयाचा अर्थ फुफ्फुसांमध्ये स्थित धडधडणारा शरीराचा एक भाग असा घेऊ नका. गीतेत आहे की, **'मन षष्ठानींद्रियांणि प्रकृतिस्थानि कर्षति।'** (१५/७) -मनासहित सहा इंद्रियांची चर्चा केली आहे. ह्याच सहाव्या इंद्रियास अंतःकरण, मन अथवा हृदय म्हटले गेले आहे. प्रथम अध्यायाच्या पंधराव्या श्लोकातच पुढे दिले आहे की, ''लहान मुलांबद्दल आपल्याला जो प्रेमभाव वाटतो, वस्तुतः त्या भावाचे केंद्र आपल्या हृदयात असते व मुलांमध्ये फक्त प्रकट होत असतो.'' गीतेत हृदय हा शब्द ह्याच अर्थाने वापरला गेला आहे- **'सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो'** (१५/१५) अशाप्रकारे सहा इंद्रियांमध्ये हृदयही आहे, तेच बाकी पाच इंद्रियांचे प्रेरक आहे, संचालक आहे. भगवान ह्या सर्वांचे ईश आहेत म्हणून त्यांना हृषिकेश म्हटले गेले आहे. वैद्यजींनी ह्या दृष्टिकोनातून बघितले तर त्यांना अभिप्रेत असलेला योग्य अर्थ मिळू शकेल.

आपला सहावा मुद्दा असा आहे की, 'कुळधर्मा सनातनाः' (१/४०)मध्ये सनातन हा शब्द कुल-धर्माचे विशेषण आहे, Predicate नाही. महोदय, नाम, सर्वनाम, क्रियापद, विशेषण अशा शब्दांची ढाल बनवून सत्यापासून कोठपर्यंत तोंड लपवाल? ज्या सनातन कुलधर्मासाठी, शाश्वत जाति-धर्मासाठी अर्जुन विकल होता, भगवान श्रीकृष्णांनी त्याला अज्ञान म्हटले आहे. अर्जुनाने निवेदन केले, ''भगवन्! मग सनातन काय आहे?'' भगवान श्रीकृष्णांनी सांगितले की, ''हा आत्मा अच्छेद्य आहे, अदाह्य आहे, अक्लेद्य आहे, अशोच्य, सर्वव्यापक, अचल, स्थिर रहाणारा आणि सनातन आहे.'' त्यांनी सांगितले की शाश्वत, सनातन असे शब्द केवळ

आत्मा, परमात्मा वा ब्रह्मासाठीच वापरले जातात. जात आणि कुळासाठी त्यांचा प्रयोग कदापि उचित नाही. मग भले ते विशेषण असतील, क्रियापद असतील अथवा कर्म कारक असतील.

अध्याय २/१८ मध्ये योगेश्वर श्रीकृष्णांनी म्हटले आहे की शरीर नाशिवंत आहे. आज शरीर आहे तर उद्या त्याचे परिवर्तन होईल. शरीर बदलले की त्याबरोबर दुसरे आई-वडिल, वेगळी मान-प्रतिष्ठा, तर मग कुलधर्म वा जातिधर्म सनातन कसा काय?

प्रश्न उद्‌भवतो की ह्या शरीरांच्या शृंखलेत कोण-कोण येतात? आठव्या अध्यायात भगवान म्हणतात-

**मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।**
**नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ (गीता ८/१५)**

अर्थात मला प्राप्त केल्यावर ते दुःखांची खाण असलेल्या क्षणभंगुर पुर्नजन्मास प्राप्त होत नाहीत. ह्या क्षणभंगुरतेच्या कक्षेत कोण-कोण येते? त्यावर ते म्हणतात -

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥ (गीता ८८/१६)**

अर्जुन, सृष्टिची रचना करणारे स्वतः ब्रह्मा आणि त्यांच्यापासून उत्पन्न झालेले यावन्मात्र जगत् पुर्नजन्म पावणारे आहे, आज आहे तर उद्या नाही. तर मग ह्या शरीरांसाठी दिली गेलेली व्यवस्था म्हणजे जात आणि कुळ सनातन कसे होईल? म्हणून भगवान म्हणतात की तुला हे अज्ञान कोठून उत्पन्न झाले? अर्जुन तर 'जातिधर्माः कुलधर्माः' ह्या व्यवस्थांना धर्म मानीत होता. धर्म म्हटले म्हणजे काही धर्म होत नाही. ह्याच वाईट रीतीची देणगी आहे की आज देवी-पूजा म्हणजे धर्म, देव-पूजा, भूत-पूजा, प्रेत-पूजा म्हणजे धर्म, कपडे घालणे, खाणे म्हणजे धर्म, लसूण खाल्ली म्हणजे झाला अधर्म, पाणी प्यायले, कोणाला शिवले की अधर्म. महाभारताला लोक-जीवनातून बहिष्कृत करण्याचा तसेच गीता-शास्त्रावर प्रतिबंध लावण्याचा परिणाम असा झाला की धर्माच्या नावावर अनेक भ्रांतीना प्रवेश मिळाला व दोन घास अन्न आणि दोन घोट पाणी प्यायल्यामुळे लोक अधर्मी होऊ लागले. जीवधारी मारल्यावर मरतो पण आज धर्म तर इतका जीर्ण झाला आहे की नुसत्या शिवा-शिवीने, खाण्याने नष्ट व्हायला लागला आहे. संस्कृत जाणणाऱ्या पंडिताकडे आजपर्यंत धर्माची जी लिखित व्याख्या होती ती नष्ट झाली. कोणीही कोणास शिवणे, खाणे चालू लागले. ज्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता ते शिकून सुव्यवस्थित जीवन जगायला लागले. नवीन व्यवस्था लागू झाल्यावर स्मृतींनी सांगितलेली व्यवस्था प्रभावशून्य केली गेली. आता आपल्याकडे धर्म म्हणजे काय आहे? भगवान श्रीकृष्णोक्त शास्त्राला सोडून आपण सुख, शांति आणि समृद्धिच्या कोणत्या प्रवाहाच्या शोधात आहात?

जात आणि कुळातील परंपरा अवश्य बाळगाव्यात. त्या आपल्या किर्तिमान पूर्वजांच्या गौरव-गाथा आहेत, परंतु त्यांना शाश्वत धर्म, सनातन धर्म समजून भ्रांति उत्पन्न करू नये.

विद्वांनानी विचार करावयास हवा की विश्वाची आदिभाषा संस्कृत, 'देववाणी' हा गौरव प्राप्त झालेली संस्कृत, भगवान ज्या भाषेत सर्वप्रथम बोलले ती संस्कृत, जिचे आज कॉम्प्युटरच्या जगातही वर्चस्व आहे ती मृतभाषा म्हणून म्हटली जात आहे. इतर विषयांचे विद्यार्थी विश्वविद्यालयीन शिक्षणाच्या दरम्यान कॅम्पस सिलेक्शनमध्ये उच्च पदावर नियुक्त होत आहेत. परंतु संस्कृत विभागातील कोणीही कॅम्पस सीलेक्शनसाठी पोहोचू शकत नाही. संस्कृत शिकविण्यासाठी जितके शिक्षक आहेत तितकेही विद्यार्थी नाहीत. शिष्यवृत्ति, निःशुल्क रहाण्याची सोय अशा सुविधा मिळूनसुद्धा कोणीही ही देवभाषा शिकण्यास तयार नाही. आम्ही एका गुरूंना विचारले, ''आपल्या संस्थेत विद्यार्थी कमी आहेत. संस्कृत सर्वांना शिकण्याचा अधिकार नाही का?'' ते म्हणाले, ''महाराज! आता तर सर्व जातींचे लोक शिकत आहेत. परंतु शूद्र वेद शिकू शकत नाहीत.'' अशाप्रकारे प्रतिबंध लावलेलाच आहे. अशा नियमांमुळे ब्राह्मण समाजाची खूप बदनामी झाली आहे. सर्व भारतात तिखट प्रतिक्रिया झाली आहे. असो, तर निवेदन आहे की भारताच्या हितासाठी, एकजुटीच्या रक्षणासाठी आणि वृद्धावस्थेमध्ये आपल्या कल्याणासाठी परमात्म्याच्या श्रीमुखाची वाणी आणि त्याचे भाष्य 'यथार्थ गीता' ह्या पुस्तकाचे जसेच्या तसे तीनदा वाचन करा. हा संघ आपला आभारी राहील, हा भारत, सर्व जग आपले आभारी राहील, कारण हे विश्व-दर्शन आहे.

सातव्या मुद्यात महोदयांनी 'कौमारं यौवनं जरा' (गीता २/१३) ह्या देहाच्या अवस्था मानून हे जाणण्याची इच्छा व्यक्त केली आहे की 'यथार्थ गीतेतील' भाष्यात त्यांना जीवात्म्याच्या अवस्था असे कसे म्हटले आहे. ह्या देहाच्या अवस्था आहेत की देहीच्या? ह्या तत्त्वज्ञानावरील विवादात न पडता गीतेच्या पंधराव्या अध्यायात असलेले भगवान श्रीकृष्णांचेच मत आम्ही त्यांना सांगू इच्छितो की देहात जीवात्मा हा माझाच सनातन अंश आहे. शरीरात राहून तो डोळे, कान, त्वचा, जीभ, नाक आणि मनाचा आश्रय घेऊन विषयांचे सेवन करतो. शरीर सोडून जाताना, शरीरात असताना, विषयांचे भोग भोगताना अथवा तीनही गुणांनीयुक्त जिवात्म्याला मूर्ख लोक जाणत नाहीत. केवळ ज्ञानरूपी नेत्र असलेलेच त्याला जाणतात. कोण म्हणतो की जिवात्मा शरीरात स्थित नसतो अथवा विषयांचे सेवन करीत नाही? म्हणूनच तर आत्मा अधोगतीलाही जातो आणि आत्म्याचा उद्धारही होतो. हां, परमात्म्यामध्ये स्थिती मिळाल्यानंतर तो निर्लेप इत्यादि ईश्वरीय गुणधर्मांनी अवश्य युक्त होतो.

पत्राच्या शेवटच्या परिच्छेदात ते लिहीतात की गीतेचे तात्पर्य कर्मयोग आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनास कर्माचे असे कौशल्य सांगितले की ज्यामुळे कर्माचे बंधन वा कर्माचे पाप

कर्म करणाऱ्यास लागत नाही. आस्थापूर्वक परंतु अनासक्त होऊन सर्व कर्मे केली पाहिजेत. ध्यान, धारणा, समाधि वगैरे मुद्दे चांगले आहेत पण गीतेचे ते तात्पर्य होऊ शकत नाही.

सर्व कर्म केली पाहिजेत म्हणजे काहीही करा. तर मग कोणी ख्रिश्चन वा मुसलमान होतात, तेव्हा राग का येतो? काहीही करू द्या न सर्व कर्म केवळ अनासक्त होऊन, समर्पण भावानेच करायची आहेत. असे काहीही वा सर्वकाही करण्याचे नाव कर्म नाही. मग आपण गीता वा महाभारताचे नावच का घेता? आपण शिक्षण कशाचे देता? आत्ताच मथुरेच्या सेविका प्रकाशनने प्रकाशित केलेली 'हिंदुत्व' नावाची एक पुस्तिका बघायला मिळाली. त्यात म्हटले आहे, ''हिंदु धर्माचा ना कोणी संस्थापक आहे , ना संस्थापनाची तिथि आहे. ना कोणता ग्रंथ वा एकांगी एकमेव पूजेची पद्धत आहे. धर्माचा अर्थ कर्तव्य आहे. मनुस्मृतिमध्ये दिल्याप्रमाणे तो उदात्त जीवन मूल्यांशी जोडलेला आहे. जसे धैर्य, क्षमा, इंद्रियांचा निग्रह , अस्तेय, शौच, सत्य, अक्रोध, बुद्धि, विद्या इत्यादि. सहिष्णुता, उदारता, विविधता हे हिंदुत्वाचे इतर विशेष गुण आहेत. प्रत्येक वस्तुत ईश्वराला बघितल्या कारणाने आपण प्रत्येकाचा सन्मान करतो मग ते पशु-पक्षी, पर्वत, नदी, दगड असतील वा केरसुणी सारखी क्षुद्र वस्तू असेल. हिंदुत्व ही एक जगण्याची पद्धत आहे. 'वसुधैव कुटुम्बकम्' आणि 'कृण्वंतु विश्वमार्यम्' हे संकल्प हिंदू समाजाचा स्वभाव आहेत. प्रत्येक धर्माचा निष्ठावान उपासक कधी ना कधी सनातन धर्माला अवश्य येऊन मिळेल. हिंदुत्वाचा सीमा संबंध राष्ट्रीयतेशी आहे. हिंदुत्वाचा अर्थ एकात्म मानवतावाद. सर्वांना सामावणारा....'' इत्यादि इत्यादि. आमच्याकडे धर्माचे ना कोणते पुस्तक आहे ना पुजेची पद्धत.

आपल्या माहितीत कोणता ग्रंथ नाही, पुजेची पद्धत माहित नाही हे संभवनीय आहे. परंतु विश्वाला अध्यात्माचे शिक्षण देणाऱ्या जगद्गुरु भारताकडे धर्मग्रंथ नाही वा निश्चित पुजेची पद्धत नाही असे म्हणणे उचित नाही. वरील पुस्तिकेत हे मान्य केले आहे की हिंदू सहिष्णु आहे, उदार आहे. जगात कोठूनतरी लोक इथे आले आणि आपल्या संस्कृतीने सर्वांना स्विकारले. आपण महान आहोत. स्वीकार तर तेव्हा होतो जेव्हा आपली संस्कृति ते स्विकारतात. आपले रहाणीमान, खाणे-पिणे, वेशभूषा स्विकारतात. तुमची मान पकडून त्यांची संस्कृति त्यांनी तुमच्यावर लादली. कोणी कुराण वाचायला लावले तर कोणी बायबल. कोणी वाचले नाही तर मान कापली जायची. हजारो लोकांनी किती तरी वेळा वाचले आणि लाखों लोक कापले गेले तरीही अभिमान इतका की आम्ही त्यांना स्विकारले, आम्ही उदार आहोत. हिंदीत म्हणच आहे की, 'निर्बल की लुगाई, सब की भौजाई।' आक्रमकांनी आपल्याला विवश करून आपल्या जमिनीवर कब्जा केला, आपल्या जिवित शरीरावर कब्जा केला, आपल्या मनावर ताबा मिळविला. लाखो लोकांची हत्या व बायका, गुलामांची विक्री झाली. इतिहास चाळून पहा.

तरीही शाबासकी देऊन सांगितले जात आहे की आम्ही महान, आम्ही उदार, आम्ही सहिष्णु आहोत. जे आले त्यांना आम्ही शरणागति दिली, जागा दिली. वास्तविक हिंदु हा एक भटका समुदाय आहे. हे पक्षांच्या विहार करण्यासारखे आहे. तऱ्ह-तऱ्हेचे पक्षी पण आपल्या थव्यामध्ये, आपल्या घरट्यापुरते सिमित. म्हणायला हिंदु आहेत, परंतु निवडणुका येताच यादव-यादव एक होतात, ब्राह्मण-ब्राह्मण एक होतात व हरिजन एकीकडे होतात. त्यावेळेस कोणीही स्वतःला हिंदू समजत नाही. त्यातच कोणी सांप्रदायिक बनतात तर कोणी धर्मनिरपेक्ष. ही फूट, हे विखुरणे मनाला वाटणाऱ्या क्षुद्र प्रलोभनांच्या मानसिकतेमुळे आहे, दुसरे काही कारण नाही. लुप्त झालेल्या परंपरांसाठी अकारण दुःख करणे ह्यात कसली हुशारी आहे? असे म्हणता की शास्त्र कोणतेही नाही, विधि कोणताही नाही, सर्व कर्म करायला पाहिजेत तर मग पक्ष बनवून भोळ्या जनतेला का त्रास देता? आम्ही मशिदीत गेलो तर आमचा काय अपराध झाला? जर कोणताही विधि आपल्याजवळ नाही व काहीही करणे धर्म आहे तर धर्मांतरण झाल्यावर वाईट का वाटून घेता? जर धर्म म्हणजे काय माहित नसेल तर गीतेत भगवान श्रीकृष्णांनी सांगितल्याप्रमाणे, '**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**' कोणा महापुरुषाला शरण जाऊन, निष्कपट भावाने सेवा, प्रश्न करून ते माहित करून घ्या. ते तत्त्वाला जाणणारे आपल्याला त्या ज्ञानाचा उपदेश देतील. मान्यवरांना असा आग्रह आहे की, त्यांनी 'यथार्थ गीता' सुरवातीपासून शेवटपर्यंत नीट वाचावी. शंका समाधान, जीवनादर्श, अनाकलनीय प्रश्न इत्यादि आश्रमाचे इतर साहित्यही बघावे. आपल्यासारखी विभूति जर अशी हताश झाली तर आम्ही लोकांनी कोणाच्या आधाराने जगायचे ? दुरून प्रश्नांचे बाण सोडण्याची काय आवश्यकता आहे, समोरा-समोर विचाराची चर्चा झाली तर जास्त उपयोगी ठरेल. तेव्हा आश्रमात आलात तर चांगले होईल, तुमचे स्वागतच आहे. ह्या आमंत्रणाबरोबर,

थमते थमते थमेंगे आँसू, रोना है कोई हँसी नहीं ।

**॥ ॐ श्री सद्गुरुदेव भगवान की जय ॥**

# श्रीमद्भगवतगीतेच्या सर्वग्राह्य टिकेचे औचित्य

(११ डिसेंबर २००५ मध्ये गीता जयंतीच्या पावन प्रसंगी संतांच्या सभेत महाराजांनी दिलेला संदेश)

पाच हजार वर्षांच्याही आधी महायोगेश्वर भगवान श्रीकृष्ण म्हणजे 'साक्षात् परमात्मा' ह्यांच्या श्रीमुखातून गीता द्वापार युगात प्रकाशित झाली. प्रभु म्हणाले, **इति गुह्यतमं शास्त्रं** (गीता १५/२०) हे गोपनीयाहून अती गोपनीय शास्त्र माझ्या द्वारा सांगितले गेले आहे. त्याला जाणून तू संपूर्ण ज्ञान तसेच लोकांत समृद्धि आणि परमश्रेय प्राप्त करशील. हेच माझ्याद्वारा सांगितले गेलेले धर्म-शास्त्र आहे.

त्यांनी गीतेच्या शिकवणीप्रमाणे वागण्यास प्रेरित करीत सांगितले की, ह्या शास्त्राव्यतिरिक्त अन्य कोठलाच मार्ग नाही - **'यः शास्त्रविधि मुत्सृज्य'** (गीता १६/२३) ह्या गीताशास्त्रातील विधीला सोडून जे अन्य विधींनी भजतात, त्यांच्या जीवनात ना सुख आहे, ना सिद्धी आहे आणि ना परमगती ही आहे. म्हणजेच क्रिया करण्याचा अन्य कोणताही विधि नाही. **'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते'** (गीता १६/२४) म्हणूनच तुझ्या कर्तव्य आणि अकर्तव्याच्या व्यवस्थेत हे शास्त्रच प्रमाण आहे. त्याचे चांगल्याप्रकारे आचरण केलेस तर तू मला प्राप्त होशील. तू अमृतमय पद प्राप्त करशील. सदा राहणारी शांति आणि समृद्धि प्राप्त करशील.

ह्याचे तात्पर्य असे की धर्मशास्त्र गीता द्वापारयुगात मानवमात्रासाठी प्रकाशित झाली. तसे तर हे धर्मशास्त्र द्वापारपेक्षाही प्राचीन आहे. सृष्टीचे आदि धर्मशास्त्र आहे. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने हे स्पष्ट करीत असताना सांगितले-अर्जुना! हा अविनाशी योग मी कल्पाच्या सुरुवातीला सूर्याला सांगितला, सूर्याने तो त्याचा पुत्र मनू ह्यास सांगितला. मनुने इक्ष्वाकुला सांगितला, इक्ष्वाकुकडून राजर्षिंनी जाणला. ह्या महत्त्वपूर्ण काळानंतर हा योग लुप्त झाला होता. योग अविनाशी आहे, त्यामुळे नष्ट तर होऊ शकणार नाही. मनुष्यांच्या स्मृति-पटलावरून गायब झाला होता. तोच मी तुला सांगणार आहे. प्रारंभीही त्या परमेश्वरानेच सांगितला होता. आजही मीच सांगणार आहे. ही परमात्म्याच्या श्रीमुखातील वाणी आहे. सृष्टीच्या आरंभी मनुष्य प्रगट होण्याच्या थोडे आधी गीतेचा अविर्भाव झाला, जी मनुला सूर्याकडून मिळाली होती. सर्व मनुष्य मनुपासून जन्मलेले आहेत. अशाप्रकारे सृष्टीच्या आरंभापासून गीताच सर्वांचे आदि धर्मशास्त्र आहे.

गीतेतील ज्ञान मनुला परंपरेने मिळाले होते. त्यांनी ते ज्ञान आपल्या स्मृतीत धारण केले होते. त्याला सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांनी स्मृतीची परंपरा दिली. म्हणून गीताच विशुद्ध मनुस्मृति आहे. ती विस्मृत झाली होती परंतु भगवान श्रीकृष्णांच्या द्वारा ती पुन्हा प्रकाशात आली. काही

प्रश्नांनंतर अर्जुन म्हणाला, 'प्रभो, **नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा**' माझा मोह नष्ट झाला आहे, मला स्मृती प्राप्त झाली आहे. जी सृष्टिच्या आरंभी सांगितली होती, ती स्मृती अर्जुनाला प्राप्त झाली. तो म्हणाला, ''मी आपल्या आदेशांचे पालन करेन.'' त्याने धनुष्य उचलले, युद्ध झाले व विजय मिळविला. एका संपूर्ण धर्म साम्राज्याची स्थापना झाली. धर्मात्मा नरेशाच्या रूपात युधिष्ठिराचा राज्याभिषेक झाला आणि तीच धर्मशास्त्र गीता पुन्हा जनमानसात प्रसारित झाली.

भगवान श्रीकृष्णांच्या एक-दोन हजार वर्षांनंतर काळानुसार परत काही विकृती आल्या. शासनाचे सूत्र तसेच सामाजिक व्यवस्थांच्या संचालनासाठी हळू-हळू गीतेवर कडक प्रतिबंध लावला गेला, कारण गीता प्रचलनात असताना धर्माच्या बाबतीत रुढी आणि भ्रांति निर्माण होऊच शकल्या नसत्या. असे सांगितले गेले की महाभारत वाचू नका अन्यथा घोर महाभारत होईल. विद्वानांनी गीतेला महाभारतापासून वेगळे केले. तर व्यवस्थाकार सांगावयास लागले, गीता घरात ठेऊ नका नाहीतर तुमचा मुलगा साधू होईल, तुम्ही निर्वंश म्हटले जाल. समस्त भारतीय समाजाला अशिक्षित ठेऊन गीता व इतिहासापासून वंचित केले गेले आणि जीवन-पद्धति म्हणजेच धर्म म्हणून प्रसारित केले गेले. भावनावश जनता जीवन शैलीलाच धर्म मानावयास लागली आणि त्यानुसार चालू लागली. हळू-हळू गीता पुन्हा लुप्त होऊ लागली. आज तोच पुरातन योग, आदि धर्मशास्त्र गीता, जी मनुने स्मृतीत धारण केली होती, योगेश्वरांच्या श्रीमुखातून प्रसारित झालेली होती तीच गीता वरिष्ठ ऋषि आणि महर्षिंच्या कमल मुखातून पुन्हा प्रसारित झाली. सौभाग्याची गोष्ट आहे की स्थळ तेच असून आपल्यासारख्या योगीजनांकडून ती पुन्हा गौरवप्राप्त झाली आहे. ही मोठी गर्वाची गोष्ट आहे की आजपासून प्रत्येक महापुरुष गीताच धर्मशास्त्र आहे असा उद्‌घोष करत राहतील.

जोपर्यंत गीतेच्या बहुमानाचा प्रश्न आहे, ब्रिटिशांच्या शासनकाळात स्वामी विवेकानंद, योगानंद, स्वामी रामतीर्थ इत्यादि महापुरुषांची वाणी वारंवार श्रवण करून इंग्रजी शासनकर्ते ह्या निष्कर्षावर पोहोचले होते की गीता ह्यांचे धर्मशास्त्र आहे. म्हणूनच ते सेना, पोलिस आणि न्यायालयात ह्या गीतेवर हात ठेऊन शपथ घ्यावयास सांगायचे. स्वातंत्र्य लढ्याचे वरिष्ठ नेते मालवीय, लोकमान्य टिळक, गांधी तसेच स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे नेते पंडित नेहरू, पटेल, राजेंद्र प्रसाद, सर्वपल्ली डॉ राधाकृष्णन इत्यादिंनी गीतेची स्तुति केली. इंग्रजांद्वारा प्रचारात आलेली शपथ घेण्याची परंपरा तशीच चालू ठेवली. परंतु गीता असतानाही हिंदुचा होणारा ऱ्हास थांबू शकला नाही. स्वातंत्र्यानंतरही कोट्यावधी हिंदू, मुसलमान किंवा ख्रिश्चन बनले. केवळ गीतेवर हात ठेऊन ह्या समस्येचे समाधान नाही झाले. आजही धर्मशास्त्राच्या रूपात गीतेची फक्त प्रशंसा करून हा प्रश्न सुटणार नाही.

गीता माणसा-माणसापर्यंत चांगल्या प्रकारे पोहचण्यासाठी एका प्रसारण विधिची आवश्यकता आहे. जी मिळाल्यावर लोकांच्या जाती आदिवासी, अनुसूचित जाती, दलित व सर्व जनजाती निश्चिंत होतील. कोणाच्याही समोर टाकल्यानंतर त्यांना ती त्यांच्या हृदयातील

वस्तूच वाटायला लागेल व ते तिचे अनुयायी होतील. सृष्टीत मग पुन्हा त्यांना कोणिही भ्रमित करू शकणार नाही. वर्णभेदाची दरी नाहिशी करून आत्मिक पथ आणि अस्तित्त्वाचा बोध करू शकेल. सर्व एका परमपित्याच्या मुलांच्या रूपात सामाजिक समानतेच्या पातळीवर उभे राहू शकतील. सर्व एका सूत्रात संघटित होऊन चालू लागतील. एकाच थाळीत जेवायला लागतील, एकाच पित्याच्या मुलांच्या रुपात परस्पर प्रेमपूर्वक राहू शकतील. भारतीय मूळ असलेला कोणी कोठेही असला, त्याला सारखाच बोध दिला जाईल आणि त्यानंतर सर्व जगाला आपल्यात समाविष्ट करू शकेल -गीतेच्या अशा बोधगम्य व्याख्येची आवश्यकता आहे.

गीतेवर बऱ्याच बहुमान्य टीका आहेत. सर्व टीका आदरणीय आहेत. ईश्वर पथावर काही अंतरापर्यंत निश्चितच त्या सर्व टीका पोहोचल्या आहेत. परंतु सर्वांना एक सारखा बोध करेल, एका पंक्तित सर्वांना बसवेल, जात-पात, शिवाशीव अशा भेदभावापासून मुक्त असलेली अशी टीका जी सर्वांना हृदयग्राह्य असेल, जी काल्पनिक नसेल, जी अतिशयोक्तिपूर्ण नसेल, ज्यात भगवान् श्रीकृष्णांचा संदेश जसाच्या तसा सांगितलेला असेल, ज्यामध्ये परमात्म्यापर्यंत पोहोचवणाऱ्या संपूर्ण साधनेचे क्रमबद्ध वर्णन असेल, अशा कोणत्यातरी संपूर्ण समदर्शी व्याख्येची, प्रसारण-विधिची आवश्यकता आहे. ह्या विधीचाच प्रसार सर्व लोक अनुसरतील, की ज्यामुळे माणसा-माणसांत, झोपडीपासून महालापर्यंत, जंगल आणि आदिवासी क्षेत्रातसुद्धा एक सारखा संदेश सर्वत्र पोहोचेल. कोणीही महात्म्याने कोठूनही उपदेश केला तरी एकच निर्णय प्रसारित करेल तेव्हा आपली ही गीता धर्मशास्त्राच्या रूपात पुन्हा दैदिप्यमान होईल.

आनंदाची गोष्ट अशी आहे की अशा बोधपर व्याख्येच्या रूपात यथार्थ गीता उपलब्ध आहे. त्याचे तीन-चार वेळा वाचन केल्यानंतर आपण सर्व विद्वानांनी आपला बहुमूल्य सल्ला अवश्य द्या की त्यामध्ये कोठे त्रुटि आहेत आणि आपल्या समस्येच्या समाधानाच्या रूपात भारताला एक समान रूपात, मुला-मुलाला एका सूत्रात बांधण्याच्या मोहिमेत ही कोठपर्यंत उपयोगी पडेल?

अनादि काळापासून हे अतिशय गूढ कार्य संत, सत्पुरुषांद्वाराच होत आलेले आहे कारण संत महापुरुष हे चालते-बोलते तीर्थराज प्रयाग आहेत. ते **'सबहिं सुलभ सब दिन देसा'** - देश-विदेशात, वनात, गावात, नगरात, शहरात सर्वत्र उपलब्ध आहेत. ह्यांच्याच द्वारा धर्म प्रसारित होत आला आहे. ह्या संत, विभूतींनी आजही ही जबाबदारी आपल्या डोक्यावर घेतली आहे आणि भविष्यात सुद्धा समाज ह्या संतांकडून तीच आशा बाळगेल. संतांच्या ह्या वस्तूस परत त्यांनाच समर्पित करून आम्ही आमच्या वाणीला विराम देत आहोत.

**॥ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय॥**

# हिंदू धर्म हे कोणत्या जीवन-शैलीचे नाव आहे का?

(काय हिंदू धर्म हे कोणत्या जीवन-शैलीचे नाव आहे अशी जिज्ञासा भक्तांच्या द्वारा एका पत्राच्या माध्यमातून व्यक्त केली गेली. ह्या संदर्भात दिनांक २५ डिसेबंर २००५ मध्ये शक्तेषगढ येथील आश्रमात सायंकाळच्या सभेत स्वामीजींनी दिलेले उत्तर)

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान पीठाने ११ नोव्हेंबर १९९५ मध्ये एक निर्णय घोषित केला की हिंदुत्व ही भारतीयांची जीवन-शैली आहे. काही वरिष्ठ राजनेते सुद्धा अशाप्रकारचे विचार वेळो-वेळी व्यक्त करीत असतात.

ह्या वर्षी (२००५ मध्ये) भारतातून काही लोक जर्मनीत पुस्तकांच्या प्रदर्शनाला गेले होते. ते हे बघून अस्वस्थ झाले की तेथील हवाई अड्ड्यावर ख्रिश्चन, यहूदी, पारसी, इस्लाम इत्यादि धर्माचे आचरण करणाऱ्या लोकांसाठी वेग-वेगळी उपासना केंद्रे आहेत. परंतु हिंदूसाठी असे कोणतेही स्थान ठेवले नव्हते.

सत्य तर हे आहे की धर्माला आपल्या आचार्यांनी बाहेर पडायलाच कधी दिले? समुद्र पार करण्यावर ज्यांनी प्रतिबंध लावला आहे त्यांच्याकडून कशी आशा करणार की ते धर्माला विदेशात जावयास अनुमति देतील? हिंदूंमध्ये धर्माच्या नावावर जे काही प्रचलित आहे त्याला स्वामी विवेकानंदांनी जीवन पद्धती असे म्हटले आहे. काय चुकीचे म्हटले त्यांनी? इथे धर्माच्या नावावर जे काही प्रचलित आहे ते म्हणजे जीवनशैलीच तर आहे. चार वर्णांमध्ये विभागलेला समाज, कोणी देवळात जायचे, कोणी नाही? कोणी चांगले अन्न खायचे आणि कोणी नाही? कोणी चांगले कपडे घालायचे? ही जीवनशैली नाही तर आणखी काय?

जीवन-पद्धत देश, काळ व परिस्थितीनुसार बदलतच रहाते, परंतु धर्म अपरिवर्तनशील असतो. एका बाजूला जीवन जगण्याची सामाजिक व्यवस्था आणि दुसऱ्या बाजूला परमात्म्यात प्रवेश व स्थिति. दोन्हिंची काय तुलना होऊ शकणार? कोणत्यातरी जीवन-शैलीला धर्माच्या बरोबरीचे स्थान देण्यासाठी आपण शोक का करता? जर का ती धर्म नाही, फक्त जीवन-शैली आहे तर धर्माबरोबर स्पर्धा का लावता?

परदेशाची तर गोष्टच सोडा पण धर्माचे विशुद्ध रुप त्याकाळच्या आचार्यांनी भारतीय जनमानसापर्यंतही जाऊ दिले नाही. शासन-सूत्र आणि सामाजिक व्यवस्था चांगल्या प्रकारे चालविण्यासाठी महापुरुषांच्या नावे स्मृति ग्रंथाची रचना करून जीवन पद्धतीलाच धर्म म्हणून भावुक जनतेपुढे ठेवले आणि जनता त्या जीवन-पद्धतीलाच धर्म समजायला लागली. शिक्षणावर प्रतिबंध लावून व्यवस्थाकारांनी ह्या स्मृतीही लपवून ठेवल्या. ह्यात लिहिले आहे की स्मृति तोच वाचू शकतो जो गर्भाधानापासून ते अंत्यविधीपर्यंतचे मंत्र जाणतो. त्या वाचण्यासाठी केवळ ब्राह्मण असणे पुरेसे नव्हते कारण अधिकांश ब्राह्मणांनाही त्या माहित नव्हत्या.

त्या स्मृतींमध्ये अशी व्यवस्था दिली होती की जात-पातिप्रमाणे जीवन व्यतीत करणे धर्म होय. त्याचे उल्लंघन करणे म्हणजे अधर्म. शुद्राने देवळात जाऊ नये, लग्न-समारंभातही कंबरेच्या वर वस्त्र परिधान करू नये. त्याने गाईचे दूध प्यायले तर तो नरकात जाईल. अध्ययन-अध्यापनावर ब्राह्मणांचा एकाधिकार, मंत्रीपद ब्राह्मणांना, न्याय ब्राह्मणांच्या सल्ल्याने, इत्यादि. लहान-मोठे न्याय ब्राह्मणच करणार, राजा करेल तर नरकात जाईल. मोठ्या बाबतींमध्ये ब्राह्मण राजाचाही परामर्श करणार. धर्माध्यक्ष ब्राह्मण! आता छोट्या छोट्या संस्थानांचे हे नियम प्रभावी नाही राहिले, त्यांना मानणारे किंवा त्याप्रमाणे चालणारे कोणी राहिले नाही आणि त्या व्यवस्थेवर बोट उठवणारे मात्र कोट्यावधी आहेत. तर मग ह्या व्यवस्थेलाच धर्म म्हणण्याची जी चूक झाली आहे त्यात सुधारणा का नाही करायची?

का धर्माच्या विशुद्ध स्वरुपाची ओळख नाही करून घ्यायची आणि त्याला माणसा-माणसापर्यंत, देश-विदेशांत प्रसारित करायचे? ह्या प्रयत्नात सर्वप्रथम धर्माला अशा धर्माचार्यांपासून मुक्त केले पाहिजे जे रुढींनाच धर्म म्हणून पकडून बसले आहेत आणि बऱ्याच काळापासून ही गोष्ट ते लोकांवर लादत आले आहेत. हिंदूंचे इतके पतन झाल्यावरसुद्धा आजही ते त्यांच्यावर आपला विशेष अधिकार आहे असे मानतात.

धर्म शिल्लक होता महापुरुषांच्या चिंतनात, जे शांत एकांत जंगलात चिंतनात गढलेले असायचे. त्यांच्या हृदयात धर्म तेव्हाही सुरक्षित होता, आजही आहे. त्यांच्याकडून धर्माची परिभाषा घ्या व प्रसारित करा. ख्रिश्चन, यहूदी आणि इस्लामिक देशांमध्ये आपल्यासाठीही तेवढीच जागा आहे. प्रथम धर्माची परिभाषा तर प्रसारित करा.

धर्म काल्पनेतून बनलेला नाही, तो तर अपौरुषेय आहे. धर्मशास्त्रसुद्धा परमात्म्याच्या श्रीमुखातील वाणी श्रीमद्‌भगवद्‌गीता आहे. त्याला प्रत्येक माणसापर्यंत पोहोचविणे आपले कर्तव्य आहे.

गीतेच्या बहुमान्य टीका वेळो-वेळी होत आल्या आहेत. त्या सर्वांनी विविध दृष्टिकोनांतून ह्या धर्मशास्त्राला बघण्याचा प्रयास केला, सर्वांची आपली आपली उपयुक्तता आहे, आपले सौंदर्य आहे. परंतु हे सर्व असतानासुद्धा लाखो, कोट्यावधी हिंदूंचे धर्मांतरण काही थांबले नाही. म्हणून गीतेच्या अशा भाष्याची आवश्यकता आहे की जे झोपडीपासून महालापर्यंत सर्वांना एकसारखे आश्वासन देईल, ज्यामुळे श्रीमंत-गरीब, वरच्या-खालच्या जातीतले सर्व एकाच ताटात जेवायला लागतील व बंधु-भावाने वागावयास लागतील. गीतेची सोपी, सरळ व्याख्या जी कृत्रिम नसेल, अक्षरशः तोच भाव असेल जो भगवान श्रीकृष्णाचा होता. अशा बोधपर व्याख्येच्या रुपात गीता भाष्य 'यथार्थ गीता' आपणा सर्वांना आचरणात आणण्यासाठी प्रस्तुत करीत आहोत. त्याचे तीन-चार वेळा वाचन केल्यावर धर्माचे विशुद्ध स्वरुप स्पष्ट व्हावयास लागेल.

धर्म आपल्याला मन, कर्म, वचनानी एका परमात्म्याप्रति समर्पित करवितो.चांगल्या प्रकारे समर्पित झाल्यावर तो परमात्मा आपल्या अंतःकरणात जागृत होऊन उठता बसता मार्गदर्शन करू लागतो, सद्गुरुंचा परिचय करून देतो. सद्गुरु मिळताच मार्ग प्रशस्त होऊ लागतो, अंतःप्रेरणा मिळावयास लागते, अन्यथा जगभरातील ज्ञानाचा संग्रह करूनसुद्धा कोणी भाषा आणि बुद्धिकौशल्याने धार्मिक निर्णय देऊ शकत नाही. महापुरुषांच्या अभावी समाजात परमेश्वराबद्दल श्रद्धा कमी व्हावयास लागते. बुद्धीने घेतलेल्या निर्णयांमुळेच रीति-रिवाज व सामाजिक व्यवस्था धर्माचे स्थान घेऊन बसतात. सद्गुरूंच्या अभावामुळे समाज नास्तिक होऊन जातो. मनुष्य श्रद्धेचा पुतळा आहे. विकल होऊन तो परमेश्वराला शोधतो. व्यवस्थाकार त्यांना काही न काहीतरी सांगून त्यांना भ्रमित करून निघून जातात. भगवान श्रीकृष्णाच्यावेळी सुद्धा भारत अनेक वाईट रितींमध्ये अडकला होता. श्रीकृष्णाने त्या वाईट रितींचे निवारण केले.

बरोबर त्याचप्रकारे भारत आज शास्त्रविहीन भटकत आहे. जेव्हा शास्त्राचा विसर पडला तेव्हा, ज्याने जे सांगितले त्याला धर्म मानले गेले. कोट्यावधि देव, कोट्यावधि मंत्र आणि कोट्यावधि पूजेच्या पद्धती ह्यामध्ये श्रद्धेचा पुतळा, ऋषिंचा वंशज असलेला भारत भटकत आहे.

आपले सर्वश्रेष्ठ धर्मशास्त्र गीता आहे. विश्वाचे आदि धर्मशास्त्र गीताच आहे. मनुष्याच्या जन्माच्या आधी प्रसारित झालेली परमात्म्याच्या श्रीमुखातील वाणी म्हणजे गीता आहे. ही महाराज मनुला परंपरेने मिळाली, जिला त्यांनी स्मृतिमध्ये धारण केले म्हणून मनुस्मृति गीताच आहे.

गीता असताना समाजात संप्रदाय, भ्रम, मतभेद, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, सवर्ण-अवर्ण असे संघटन होऊच शकत नाही. हे सर्व गीता विस्मृत होण्याचे दुष्परिणाम आहेत, कारण गीतेच्या अनुसार आपण सर्व ईश्वराची मुले आहोत, तितकेच पवित्र आहोत जितका ईश्वर आहे.

गीतेनुसार एक आत्माच शाश्वत आहे, परम सत्य आहे, सनातन आहे. तोच कणाकणात व्याप्त आहे. तो सर्वबाजूंनी पहात आहे आणि ऐकत आहे. आम्ही-तुम्ही नंतर संकल्प करतो, जो तो आधीपासून जाणत असतो. त्या एका परमात्म्याला शरण जाणे, त्याला आपल्या हृदयात श्रद्धेने धारण करणे म्हणजे धर्म होय. जो त्याच्या प्रति आस्था बाळगणारा आहे तो आस्तिक आहे, आस्तित्वाचा उपासक आहे म्हणून आर्य आहे.

त्या परमात्म्याच्या प्रति समर्पित होऊन उठणे-बसणे, प्रत्येक कार्य समर्पित होऊन आरंभ आणि संपन्न करणे आर्यव्रत आहे, आर्य संस्कृति आहे.

त्या परमात्म्याला पहाणे, स्पर्श करणे, त्यात प्रवेश करणे, स्थिति प्राप्त करणे आणि त्याच्या सर्व विभूतींना जाणून घेणे आर्य विधि आहे. हाच आर्य-विधि मानव संहिता गीता होय.

ओम् चा जप आर्य-विधिची जागृति आहे. परंतु जीवन-शैलीला धर्म म्हणणे ही मोठी चूक आहे. ती सुधारणे अपेक्षित आहे. आपले प्राचीन नाव आर्य होते. एका ईश्वराच्या दर्शनाचा विधि आर्य-विधि आहे. कालांतराने त्याचे नाव सनातन पडले कारण आत्मा शाश्वत आहे, सनातन आहे. त्याच्या प्राप्तिचा तो विधि असल्याकारणाने सनातन म्हटले गेले. कोट्यावधि वर्षांच्या काळानंतर वर्तमानात त्याचे नाव हिंदु पडले. हृदि + इंदु = हिंदू. **'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।'** -त्या जगतूरूपी रात्रीत परमात्म्याचा क्षीण प्रकाश सतत विद्यमान आहे. त्यामुळे बऱ्याच काळानंतर एक नाव हिंदू असे पडले. तिनही नावाचा अर्थ एकच आहे. तिनही परम पवित्र आहेत. ह्याचा आशय असा आहे की जगात अंधःकार असून सुद्धा हृदय-देशात तो परमात्मा सदा विद्यमान आहे. गीता १३-१७ मध्ये आहे की ते ज्ञेय ब्रह्म तेजांचेही तेज आहे. अंधारापासून अत्यंत निराळे पूर्ण ज्ञानस्वरूप आहे. ज्ञानानेच प्राप्त होणारे आहे. सर्वांच्या हृदयात स्थित आहे. **'हृदि सर्वस्य विष्ठितम्'** त्याचे निवास स्थान हृदय आहे. 'अतःहृदि + इंदु=हिंदू' हा शब्द आर्य आणि सनातनचाच बोधक आहे. हाच आशय गीतेच्या **'सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो'** (१५-१५) तसेच **'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे र्जुन तिष्ठति'** (१८-६१) मध्ये पहावयास मिळतो.

**।। ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय।।**

# हिंदुत्व म्हणजे काय?

महाशय,

मुंबईमधील हिंदू रिसर्च फाऊंडेशनने हिंदू, हिंदुत्व तसेच हिंदुस्तान अशा शब्दांच्या आधुनिक काळातील प्रासंगिकतेच्या संदर्भात लिहिले आहे. त्यांचा आशय आहे की सध्या 'हिंदू' शब्दाच्या उत्पत्तिवर विचार करण्यात फुकट वेळ न घालविता हिंदू धर्माच्या प्रचार व प्रसाराबद्दल विचार केला तर तो अधिक उपयोगी होईल.

त्यांचे हे सुचविणे सार्थक प्रतीत होते, पण तसे ते नाही आहे. हिंदू शब्द वापरून संस्था बनविणे, हिंदू नावावर दुःख व्यक्त करणे, पश्चात्ताप करणे, डोळ्यातून अश्रू वहाणे ही वेगळी गोष्ट आहे. प्रश्न असा आहे की हिंदू धर्म काय आहे ज्याचा प्रचार-प्रसार करावयाचा आहे? ह्यासाठी धर्माला मूळ रूपात जाणणे, उत्पत्तिपासून त्याचा स्वच्छ परिचय करणे जरुरीचे आहे.

आश्चर्य वाटते की संस्थेचे नाव 'हिंदू रिसर्च फाऊंडेशन' असूनही ते 'हिंदू' शब्दाच्या उत्पत्तिविषयी विचार करू शकत नाहीत, तर मग कोणता रिसर्च करतात! मूळ तथ्यांपासून लांब जाणे म्हणजे काही रिसर्च नव्हे.

इंग्रजी भाषेत लिहिलेल्या त्यांच्या पत्रात पंधरा मुद्दे आहेत. विषयाचे विवरण केल्यानंतर पत्रातील सुरूवातीच्या ओळींमध्ये त्यांनी असे ध्यानात आणून दिले आहे की भारताच्या पंच्याऐंशी टक्के जनतेने हिंदू धर्म स्विकारला आहे. नक्कीच स्विकारला आहे, परंतु केव्हापर्यंत करू शकेल? हां, जर त्यांना त्यांची उत्पत्ति आणि धर्माची व्याख्या मिळाली तर अवश्य ते धर्माचा आश्रय घेऊन राहू शकतील.

दुसऱ्या मुद्यात त्यांनी म्हटले आहे 'असे प्रतीत होते की आपल्याला हिंदू धर्माच्या जागी आर्य-धर्म पुन्हा प्रस्थापित करावयाचा आहे.' त्यांचा हा निष्कर्षसुद्धा भ्रमपूर्ण आहे.

आपल्या सर्वांचे आदि धर्मशास्त्र गीता आहे. मनुष्य नंतर जन्माला आला, गीता त्याआधीच प्रसारित झाली. गीतेत भगवान श्रीकृष्ण म्हणतात, ''अर्जुना, हा अविनाशी योग कल्पाच्या सुरूवातीला म्हणजे सृष्टीच्या आरंभी मी सुर्याला सांगितला. सुर्याने त्याचा पुत्र आदिमनु ह्यास सांगितला. महाराज मनूने हा अविनाशी योग आपल्या स्मृतीमध्ये धारण केला आणि स्मृतिपरंपरा चालू केली. त्यांनी हाच योग आपला पुत्र महाराज इक्ष्वाकुला सांगितला, इक्ष्वाकुकडून राजर्षिंनी जाणला. ह्या महत्त्वपूर्ण काळानंतर हा अविनाशी योग ह्या पृथ्वीवरून लुप्त झाला होता. मनुष्यांच्या स्मृतिपटलावरून गायब झाला होता. लोक विसरून गेले होते. तोच पुरातन योग, अविनाशी योग मी तुला सांगत आहे, कारण तू प्रिय भक्त आहेस, अनन्य सखा आहेस.'' अर्जुनाने काही

तर्क-वितर्कांनंतर स्विकार केले की, **'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत। स्थितो स्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव॥'** मोहापासून उत्पन्न झालेले माझे अज्ञान नष्ट झाले आहे. हे भगवन् 'स्मृतिर्लब्धा' -मनु महाराजाने जो स्मृतिमध्ये धारण केला होता, ज्या स्मृतिची परंपरा चालू केली, मी त्या स्मृतीस प्राप्त झालो आहे. तो अविनाशी योग मी स्मृतिमध्ये धारण केला आहे. मी आपल्या आदेशांचे पालन करेन. असे म्हणून अर्जुन युद्धाला तयार झाला. युद्ध झाले, विजय मिळाला आणि एका धर्मसाम्राज्याची स्थापना झाली. एक संपूर्ण धर्मात्मा राजा युधिष्ठिर अभिषिक्त झाले आणि एकच धर्मशास्त्र गीता पुन्हा प्रसारित झाली.

गीतेच्या सुरुवातीलाच अर्जुनाने सांगितले, ''भगवन्! मी युद्ध करणार नाही कारण कुलधर्म सनातन आहे. **'जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः'** - हे जातिधर्म व कुलधर्मच शाश्वत आहेत. युद्धजनित नरसंहाराने पिंडोदक क्रिया लुप्त होतील, पितरांचे अधःपतन होईल, वर्णसंकर होईल इत्यादि. आपण सर्व समजूतदार असूनही पाप करण्यास तयार झालो आहोत. शस्त्रधारी कौरवांनी माझ्यासारख्या शस्त्रविहीनास मारले तर मरणे श्रेयस्कर ठरेल. भगवन्, मी युद्ध नाही करणार. हे पाप आहे.'' एका धार्मिक भ्रमाने अर्जुनाला मरणाच्या मुखात ढकलून दिले होते. गीता विस्मृत होण्याचा हा दुष्परिणाम होता की अनेक भ्रम पसरले गेले, अर्जुनही अशाच एका भ्रमाचा अनुयायी होता. ज्या कौरवांनी ह्यांच्यासाठी लाक्षागृह तयार केले, भीमाला विष दिले, वनवासकाळात राक्षसांकरवी ध्यानमग्न अर्जुनास मारण्याचा प्रयत्न केला, ते अर्जुन निःशस्त्र अवस्थेत मिळाल्यावर त्याला काय सोडून देतील? परंतु भगवान श्रीकृष्ण म्हणाले, ''अर्जुना ! तुझे हे अज्ञान कोणत्या कारणामुळे उत्पन्न झाले? हे न किर्ती मिळविणारे आहे, न कल्याण करणारे आणि पूर्वीच्या महापुरूषांनी चुकूनही त्याचे आचरण केले नाही. अनार्यजुष्टम् - अनार्यांसारखे आचरण तू कोठून घेतलेस?'' भगवंतानी पुष्कळ समजाविले. अर्जुनाने तर्क वितर्क केले. शेवटी त्याला दिव्य दृष्टि प्राप्त झाली. भगवंताचे दर्शन झाले तेव्हा काही ज्ञात झाले.असो तर भगवान श्रीकृष्णांच्या शब्दात जात-पात, शिवाशीव, भेदभाव, पिंडोदक क्रिया हे सर्व अज्ञान आहे. अनार्यांसारखे आचरण आहे. आर्य म्हणजे कोणता धर्म नव्हे, प्रजाति नव्हे, एक व्रत आहे. अस्तित्व असलेला अविनाशी एक परमात्मा आहे. जो ज्या एका परमात्म्याचा उपासक आहे, त्याला प्राप्त करण्याच्या नेमून दिलेल्या क्रियेचे आचरण करतो, तो आर्य होय. गीता ही आर्य-संहिता आहे.

गीतेच्यानुसार आत्माच शाश्वत आहे, सनातन आहे. आपण शाश्वताचे, सनातनाचे पुजारी आहोत. गीता ही सनातन प्राप्तिची संहिता आहे. म्हणून भारतीयांना सनातनधर्मी म्हटले जात होते. कालांतराने त्यांनाच हिंदू म्हटले जाऊ लागले. हृदि इंदु स हिन्दू हृदयातच त्या परमतत्व परमात्म्याचा निवास आहे. साधनेच्या योग्य मार्गावरून चालून जेव्हा कोणी कधी त्या

परमेश्वराला प्राप्त केले असेल तर ते हृदयातच प्राप्त केले आहे. जग एक रात्र आहे - **'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।'** जगत्रूपी रात्रीतसुद्धा तो ईश्वरीय प्रकाश सर्वांच्या हृदयात एकसारखा विद्यमान असतो. रात्र आपल्या ठिकाणी, क्षीण प्रकाश आपल्या ठिकाणी जीवन शक्तीच्या रुपात सदा प्रवाहित आहे म्हणूनच काही काळानंतर त्याचे एक नाव हिंदू पण आहे. आर्यव्रती, सनातनी, हिन्दू तसेच हृदयस्थित परमात्म्याचे व्रत घेणारा ह्या सर्वांचा आशय एकच आहे. ह्या नावांची आठवण करून आम्ही काही बदल नाही करीत आहोत, नवीन नामकरण नाही करीत आहोत, तर केवळ हे सांगत आहोत की त्या त्या काळानुसार ही नावे आपलीच आहेत. आम्ही मूळ नाव देत आहोत आणि आपल्याला इतिहासाशी जोडत आहोत. काळानुसार भाषा बदलत गेल्या, नावे बदलत गेली, परंतु मूलतः आपण तेच आहोत आणि आपल्या सर्वांचे शास्त्रही तीच 'गीता' आहे.

पत्रातील तिसऱ्या मुद्यात त्यांनी पुन्हा आठवण करून दिली आहे की भारतातील पंच्याऐंशी टक्के लोक स्वतःला हिंदू म्हणवतात व जगही त्यांना हिंदू म्हणूनच मान्यता देते. अरब निवासी ह्या देशाला हिंदुस्तान म्हणतात आणि आपणासारखे हिंदू शब्दाची उत्पत्ति शोधत आहेत.

वास्तविक हे काम तर संशोधन करणाऱ्या संस्थांचे होते की आपल्या गौरवशाली इतिहासाची आठवण ठेवणे. ते तर इतक्यावरच संतुष्ट आहेत की पंच्याऐंशी टक्के भारतीय स्वतःला हिंदू म्हणवतात. भले म्हणवत असतील परंतु संतुष्ट कोणी नाही. गेल्या दोन-तीनशे वर्षात कोट्यावधि हिंदु, शिखांच्या रूपात आपली वेगळी ओळख प्रस्थापित करण्यासाठी आंदोलन करीत आहेत, चोवीस कोटी हिंदु ख्रिश्चन झाले आहेत व तीस-बत्तीस कोटी मुसलमान झाले आहेत. आंबेडकर म्हणाले होते की मी हिंदू म्हणून अवश्य जन्मलो असेन, त्यात माझा काहीच इलाज नव्हता. परंतु मी हिंदू राहून मरणार नाही. उत्तरप्रदेश व बिहारकडचे हरिजन स्वतःला बौद्ध म्हणायला लागले आहेत. नागपूरमध्ये आंबेडकर जयंतीला बौद्ध बनण्याच्या हेतूने दहा लाख लोक एकत्रित झाले होते. जर जातपात, शिवाशीव, जातीय द्वेष हा हिंदू धर्म आहे तर किती लोक हिंदू रहातील? मुंबई जवळील गोवा, आसाम, नागालँड, अरुणाचल प्रदेश, केरळ, काश्मीर इत्यादि राज्यांत स्वातंत्र्यानंतर हिंदुंच्या संख्येत घट झाली. जोपर्यंत आपण धर्माची व्याख्या सांगत नाही, धर्मशास्त्राच्या रुपात गीता देत नाही, तोपर्यंत केवळ हिंदू हिंदू म्हटल्याने धर्मांतरण थांबणार नाही. हिंदूंना आश्वासन दिले पाहिजे. त्यांना धर्माबद्दल विश्वास दाखविला पाहिजे तर ते त्यावर टिकून रहातील.

वेदशास्त्राची धमकी देऊन त्या नावावर भारतात एक वेगळेच शास्त्र चालविले जायचे, ज्यांचे नाव होते स्मृति, जसे मनुस्मृति, पराशर स्मृति, देवल स्मृति, याज्ञवल्क्य स्मृति, इत्यादि. महापुरुषांच्या नावांवर प्रसारित ह्या स्मृतींमध्ये असे आहे की शुद्र परमेश्वराचे भजन करू शकत

नाही. त्याने वेदांवर विचार केला तर तो नरकात जाईल. त्याने वेद ऐकून पाठ केले तरी तो नरकात जाईल. मनात स्मरण केले तरी तो नरकात जाईल. तोंडाने वेदांचे उच्चारण केले तर जीभ कापली जाईल. जर असा आपला हिंन्दू धर्म, वेद आणि शास्त्र असेल तर कोणाला अशा व्यवस्थेमध्ये जगायला आवडेल?

संशोधन करणाऱ्या संस्थांनी असा निष्कर्ष काढला आहे की दक्षिण भारतातील लोक स्वतःला आर्य न मानता द्रविड मानतात, हिंदू मानतात. आर्य-दर्शनाचा प्रचार केल्याने उत्तर-दक्षिण भारतीयांमध्ये तिरस्कार निर्माण होईल. राष्ट्रगीत आपल्याला पाठ असेलच. पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, बंग। विंध्य हिमाचल.......... । ही सर्व भू-भागांची नावे आहेत. एक श्लोक नेहमी वाचण्यात येतो

**जंबूद्वीपे, भारतखंडे आर्यावर्ते .......**

जंबू एक द्वीप आहे, ज्यामध्ये भारत एक खंड आहे, जिथे आर्यव्रती लोक निवास करतात. आर्य एक व्रत आहे, कोणा भू-भागाचे नाव नाही. द्राविड, गुजरात, मराठा इत्यादि भारतातील प्रांतांची नावे आहेत. आर्य कोणताही भूखंड नसून एक व्रत आहे. गुणवाचक आहे. 'आर्य' एक जात आहे, हे विष तर इंग्रजांनी पसरविले होते. प्राचीन वैदिक ग्रंथांमध्ये 'आर्य' शब्दाची पुरेशी व्याख्या दिलेली आहे. भगवान वाल्मिकी, भगवान बुद्ध, भगवान महावीर व भगवान व्यासांच्या वाणीतून आर्य शब्दावर पुष्कळ प्रकाश टाकला गेला आहे. ह्यांमधील कोणाचेही उदाहरण न देता आर्यांच्या विषयी इंग्रज काय म्हणाले? मैक्समुल्लरने मध्य आशिया, तर आणखी कोणी कॉकशेस पर्वतावर आर्यांचा मूळ निवास होता असे सांगितले. कारण त्या ठिकाणी संस्कृत भाषेचे दोन-चार शब्द मिळाले. हे शक्य आहे का की 'आर्य' जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांच्या मूळ ठिकाणाहून आपल्याबरोबर सारे काही घेऊन आले आणि दोन-चार संस्कृत शब्द त्यांनी तेथेच सोडले.? एकही वेद त्यांनी त्यांच्या पूर्वजांच्या गावी ठेवला नाही.? आर्य व अनार्यांमध्ये फूट निर्माण करून राज्य करणे हे इंग्रजांचे षड्यंत्र होते. ज्याचे शिकार इंग्रजी विश्वविद्यालयाचे विद्यार्थी झाले. जर ते विद्यार्थि हे सर्व न लिहितील तर उत्तीर्ण कसे होतील? ब्रिटीश प्रशासनात लॉर्ड मॅकालेच्या कुत्सित शिक्षण योजनेचा परिणाम म्हणजे आर्य व अनार्यांचे विभाजन होय. आर्यांची विशुद्ध परिभाषा आश्रमीय साहित्य 'यथार्थ गीता', 'शंका-समाधान', 'जीवनादर्श एवं आत्मानुभूति' इत्यादि पुस्तकांमध्ये दिली आहे. दक्षिण भारतीय सुद्धा आर्यच आहेत. अंगद आर्य होता, बिभिषण, रावणाचे वडिल आर्यच होते. पहिले आर्य सूर्य, चंद्र, कुबेर, वरुण इत्यादि होते. भगवान श्रीकृष्ण आर्य होते. आर्य एक व्रत आहे. जे अस्तित्व, एकमात्र परमात्म्याच्या बाबतीत आस्थावान् आहेत, आर्य म्हणजे कोणती जात किंवा धर्म नव्हे. धर्म तर साधनेचे नाव आहे, साधनेला धारण करणे धर्म आहे.

संशोधन संस्थांना आनंद आहे की अरब लोक ह्या देशाला हिंदुस्थान तर म्हणतात. मुसलमान हिंदुंना काफिरसुद्धा म्हणतात, नास्तिक मानतात, पापी मानतात आणि हिंदुस्थानचा पाकिस्तान करण्यासाठी षड्‌यंत्र रचतच आले आहेत. कधी जानवे जाळले गेले, शेंडी कापली गेली तर कधी जिझिया कर लादला गेला. त्या काळात तीन विभूति अशा होऊन गेल्या की त्यांनी हिंदुंना समूळ नष्ट होण्यापासून वाचविले. ते होते महाराणा प्रताप, गुरु गोविंद सिंह आणि छत्रपति शिवाजी महाराज. ह्या तिघांनी हिंदुंच्या निर्बुद्ध परंपरेचे पालन केले नाही. महाराणा प्रताप ह्यांनी कोळी-भिल्लांना हातात शस्त्रे दिली, त्यांच्यातच राहिले, त्यांच्याबरोबर जेवले, त्यांना सन्मान दिला. महाराष्ट्रात जो जन्मला तो मराठा आहे, असे म्हणून शिवाजीने सर्वांना हाती शस्त्र घ्यावयास लावले. गुरु गोविंद सिंह ह्यांनी शिष्यांना शस्त्र धारण करावयास लावले व सांगितले की सर्व सिंह आहेत. कर्मकांड करणारे लोक मागे लागतच राहिले, त्यांना ह्या महापुरुषांनी हाकलून लावले. सर्वांबरोबर खाणे-पिणे, रहाणे हा त्यांचा हिंदू धर्म होता.

आर्य शब्दाला विकृत करण्याचे प्रयत्न झालेले आहेत, म्हणून लोकांमध्ये ह्या शब्दाबद्दल भ्रम निर्माण झाला आहे. दयानंदजींनीही त्याची उत्पत्ति तसेच प्राचीन ग्रंथांमध्ये असलेल्या त्या शब्दाच्या व्याख्येकडे लक्ष दिले नाही. जेव्हा त्यांनी वेदांना शास्त्र म्हटले तेव्हा लोकांनी स्मृतीस शास्त्र म्हटले. आता मूळ स्मृतीच्या रुपात गीता आली आहे तर म्हणतात की वेद शास्त्र आहे. दयानंदजींना मुसलमानांनी नष्ट नाही केले, ख्रिस्चनांनी नाही केले तर ह्या हिंदूंनीच केले. दयानंदजी 'वसुधैव कुटुंबकम्' चा आदर्शच देत होते. परंतु जगात फूट पाडणाऱ्यांनीच त्यांना प्रत्येक वेळेस विष देऊन मारण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे वेद धर्म आहे, शास्त्र धर्म आहे - ही एक फक्त ढाल आहे. ह्यांची नावे घेतल्याने लोक भावूक होतात. हे म्हणजे जाळे फेकून त्यावर चणे टाकून माकडाला पकडण्यासारखी निंदनीय कला आहे.

संशोधन संस्थांना गर्व आहे की विदेशी लोक भारतीयांचा हिंदू म्हणून आदर करतात. एक उदाहरण पुरेसे होईल. नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारताच्या स्वातंत्र्यासाठी हिटलर व मुसोलिनीकडून मदतीची अपेक्षा करीत होते. हिटलर व इतरांचा असा विचार होता की भारत कधी स्वतंत्र होऊच शकत नाही. भारतीय आपले शासन स्वतः चालविण्यास सक्षम नाहीत. भारत जाती, उपजाती, विविध धर्म, भाषा, भाऊबंदकी, पक्षपात, जातीय द्वेष ह्या गोष्टींमध्ये इतका गुंतला आहे की येत्या शंभर वर्षांतसुद्धा आपले शासन स्वतः चालविण्यास योग्य होऊ शकणार नाही. सापांना पुंगी वाजवून किंवा माकडाला डमरू वाजवून नाचविण्याव्यतिरिक्त भारतीय आणखी काय करून शकतो? शिवाशीव, भेदभाव ह्या गोष्टींमुळे परदेशात भारतीयांना मूर्ख, अज्ञानी लोकांचा समाज असे समजले जात आहे.

नवव्या मुद्यावर संस्थेच्या संचालक महाशयांचे म्हणणे आहे की, 'हिंदू शब्द पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण भारतीयांना एकतेच्या धाग्यात बांधून आहे.' विचार करा केरळमध्ये किती हिंदू शिल्लक आहेत? तेथील ८५ टक्के हिंदू ख्रिश्चन झाले आहेत. कधी एखादा पंडित चंदन लावून निघाला तर मुले टाळ्या वाजवून चेष्टा करायला लागतात. कोण म्हणते ह्या शब्दामुळे सर्व खूश आहेत? जर खूश होते तर ख्रिश्चन का बनले? आणि अजूनही बनत आहेत? जोपर्यंत धर्माची खरी व्याख्या केली जात नाही तोपर्यंत परिचय नसताना कोणी त्याबद्दल गर्व का बाळगेल?

अकरावा मुद्दाही विचार करण्यायोग्य आहे की पूर्वज स्वतःला हिंदू म्हणत होते. हिंदू शब्द दहा-अकराशे वर्षांपासूनच प्रचलनात आहे. पुष्यमित्र शृंगाच्या काळात काही स्मृति लिहिल्या गेल्या. त्यांमध्येही हिंदू शब्दाचा प्रयोग नाही. संस्कृत वर्णमाला, शब्दकोश 'हिंदू' ह्या शब्दापासून अपरिचित आहेत. गीता ह्या शब्दाला अवश्य समर्थन देते की ईश्वर हृदय-देशात निवास करतो, सहज प्रकाश देतच रहातो. हृदि इंदु पासून हिंदू अशी उदारवादी व्याख्या आपण देऊ शकता. गीता वेद-शास्त्रांचेही मूळ आहे, 'वसुधैव कुटुम्बकम्' ह्या भावनेने ओतप्रोत भरलेले आहे, संपूर्ण विश्वाचे हे आदि धर्मशास्त्र आहे.

भारताला विश्वगुरु होण्याचा सन्मान प्राप्त झाला होता, परंतु मध्यंतरीच्या काळात जगातील काही आगंतुक शिष्यांनी अचानक येऊन विहिरीत भाकरीचा तुकडा टाकला त्यामुळे गावच्या गाव मुसलमान बनला. ह्या विकृतींना जिवंत ठेवण्यामागे अनेक गुरु लागले आहेत. ज्यांना पुरोहित म्हटले जाते, जे जन्म-मृत्यु वा लग्नाच्या प्रसंगी घरोघरी जाऊन ह्या विकृतींनाच संरक्षण देत आहेत. 'नमो ब्रह्मण्य देवाय, गो ब्राह्मण हितायच.....' त्यांच्या तावडीतून आपण कसे वाचाल? तेव्हा धर्माला जाणण्यासाठी, वसुधैव कुटुम्बकम्च्या आदर्शासाठी आपण सर्वांनी गीता घ्या. प्रचार-प्रसाराचा इतर कोणताही वैज्ञानिक उपाय नाही. भगवान श्रीकृष्णांनी स्वतः सांगितले आहे, ''अर्जुना अन्य विधींनी जे भजतात त्यांच्या जीवनात ना सुख आहे, ना समृद्धि आहे आणि ना परमसिद्धी आहे.'' **'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ'** - तुमच्या कर्तव्य व अकर्तव्याच्या बाबतीत हे गीता शास्त्रच प्रमाण आहे. कारण ज्या परमेश्वराला धारण करणे म्हणजे धर्म, त्या परमेश्वराचाच संदेश गीता आहे.

संशोधन संस्थांना हे दुःख आहे की आज कोणी 'वसुधैव कुटुंबकम्' ही गोष्ट मानीत नाही. हेच मानले असते तर विश्वगुरु भारत, जगातील प्रत्येक मानव शिष्य व अशा शिष्यांच्या शिवण्याने, खाण्याने गुरु रसातळाला का गेले? अर्धा अरब भारतच होता. अल्लाई पर्वत, हिंदुकुश, मलाया, जावा, सुमात्रा, सिंहल, चीन, जपान आणि इजिप्तपर्यंत भारतच होता. आज कैलास मानससरोवरसाठी सुद्धा व्हिसा पासपोर्ट घ्यावा लागतो. तो संकुचित का झाला? ह्याच्या मुळाशी धार्मिक भ्रम आहे, जो कोट्यावधींमध्ये पसरला आहे. आपण एका ठिकाणावरून शिकवण

देऊन त्यांचा वाईट प्रभाव कसा कमी करू शकाल? ह्या धर्माचार्यांना बरोबर दिशा दाखविण्याची आवश्यकता आहे. त्यांना सत्याचा प्रसार करण्याचा उपाय दिला पाहिजे. उपनिषदांचे व वेदांचे मूळ गीता आहे, सृष्टीचे आदिशास्त्र गीता आहे. त्यावर संसोधन संस्थांची दृष्टि का नाही पडली?


संशोधन संस्थेने शेवटी असे सुचविले आहे की धार्मिक उद्देश्य ठेवून तयार झालेल्या संघटनांनी राजनितीपासून पूर्ण विरक्त राहिले पाहिजे. धर्माचे शुद्ध स्वरूप ज्यांना उपलब्ध झाले आहे अशा संघटना राजनितीमध्ये कधी जाऊच शकत नाहीत. धर्म त्यांना कोणाच्यात फूट पाडण्याची संधी देत नाही. हे तर तोच करू शकतो जो धर्म जाणत नाही. धर्माच्या दृष्टीने विश्वातील सर्व मानव एकसमान आहेत. दुसऱ्या कोणत्या ग्रहावर आणखी लोकसंख्या असेल तर त्यांच्यासाठीसुद्धा धर्मामध्ये एवढी जागा निर्माण केली आहे. गीतेच्यानुसार एका पित्याच्या मुलांच्या रुपात ते एकत्र खाऊ-पिऊ शकतात, नाते संबंध ठेऊ शकतात.

संस्थेने बौद्धांना आवाहन केले आहे की उदारवादी व्याख्येद्वारा हिंदू-धर्माच्या प्रचार-प्रसाराला लागा. वस्तुतः बुद्धीच्या जोरावर शास्त्रांना समजण्याचा प्रयास चुकीचा आहे. शास्त्र कोणी विरळा महापुरुषच जाणतो आणि त्याच्या संरक्षणासाठी कोणी विरळा अधिकारीच त्यांचा अभ्यास करू शकतो. पन्नास भाषांचा अभ्यास करूनसुद्धा कोणी शास्त्र जाणू शकत नाही. श्रीकृष्ण म्हणतात, ''अर्जुना हे ज्ञान जाणण्यासाठी तत्वदर्शी महापुरुषाला शरण जा.'' रामचरितमानसामध्ये आहे, **'जानहिं यह चरित्र मुनि ग्यानी'** -ही महापुरुषांच्या क्षेत्रातील वस्तू आहे. आपण त्यांच्याशी परामर्श करीत राहिलात तर कधी संदेह होणार नाही.

**॥ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय॥**

# अनाकलनीय प्रश्न

## श्रीमद्भगवद्गीता भाष्य 'यथार्थ गीता'
### – एक परिचय



भगवान श्रीकृष्णोक्त श्रीमद्भगवद्गीतेचा जसाच्या तसा अर्थ दिला आहे, म्हणून ह्या ग्रंथाचे नांव 'यथार्थ गीता' आहे.

गीतेच्या अनुसार 'एक परमात्मा' हेच सत्य आहे. त्या परमात्म्याला प्राप्त करणे म्हणजे 'यज्ञ' होय, व त्या यज्ञास कार्यान्वित करणे म्हणजे 'कर्म' (साधना) होय. गीतेत वर्णन केलेले युद्ध वास्तविक अत:करणातील लढाई आहे, कारण मानव शरीर एक रणभूमि आहे, जिच्या अंतराळात 'सजातिय व विजातिय' किंवा 'विद्या व अविद्या' ह्या दोन प्रवृत्ति विराजमान आहेत. ह्या दोन्ही प्रवृत्तिंना पार करणे हेच खरे 'युद्ध' आहे.

## गीतेत सांगितलेले ज्ञान हीच विशुद्ध 'मनुस्मृति'

गीता आदिमानव– महाराज मनु ह्याच्याही पूर्वीची आहे– 'इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम।' (४.१) अर्जुना, अरे हा अविनाशी योग मी सूर्याला कल्पाच्या प्रारंभीच सांगितला होता, तसेच सूर्याने तो मनुला सांगितला. मनुने तो ऐकला व आपल्या स्मरणात साठवून ठेवला, कारण ऐकलेली गोष्ट मनाच्या खोल कप्प्यात स्मरणात ठेवता येते. ते हेच ज्ञान मनुने इक्ष्वाकुला सांगितले. इक्ष्वाकुकडून राजर्षिंना हे ज्ञान समजले आणि याच महत्वपूर्ण काळात हा अविनाशी योग या पृथ्वीवरून लुप्त झाला. सुरुवातीच्या काळात–पूवी फक्त सांगण्याची व ते ऐकून लक्षात ठेवण्याची पद्धत होती. लिहितासुद्धा येऊ शकते याची कल्पनाच नव्हती. मनुमहाराजांनी याला मनाच्या स्मृतिंमध्ये साठवून ठेवले आणि लक्षात ठेवण्याची– स्मृति परंपरा दिली. म्हणून गीतेत वर्णन केलेले ज्ञान हेच विशुद्ध मनुस्मृति आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, तोच प्राचीन योग मी तुला सांगणार आहे.भगवान म्हणाले, अर्जुना, तू माझा उपदेश नीट एकाग्रपणे लक्षपूर्वक ऐकला आहेस का ? मोहापायी निर्माण झालेले तुझे अज्ञान नष्ट झाले आहे का ? अर्जुन म्हणाले – 'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा' (१८/७३)– भगवन्ता, माझा मोह नष्ट झाला आहे. मला स्मृतिंची प्राप्ती झाली आहे. मी आपल्या आदेशाचे पालन करीन, युद्ध करीन. त्यांनी धनुष्य उचलले, युद्ध झाले. त्यांना विजय मिळाला, एका विशुद्ध धर्म साम्राज्याची स्थापना झाली आणि एका धर्मशास्त्राच्या रूपात गीता पुन्हा प्रचारात आली.

प्रकाशक

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. 5, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व, मुम्बई - 400069 भारत. ● फोन : (091-22) 2825 5300

ईमेल : contact@yatharthgeeta.com ● वेबसाइट : www.yatharthgeeta.com